सत्पंथ-विजय.

(आत्मानंदावरील फौजदारी खटला)

प्रकाशक—

एन्. डी. महाजन.

For Reference See Pages: 1, 3, 4, 6, 7, 9, 10, 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20, 21, 22, 23, 36, 37, 38, 39, 40, 41, 43, 46, 53, 54, 57, 58, 60, 64, 66, 69, 74, 75, 83, 85, 87, 88, 92, 97, 101, 102, 103, 105, 106, 107, 108, 111, 112, 114, 115, 119, 120, 126, 127, 128, 129, 138, 146, 148, 152, 155, 157, 162, 179, 181, 184, 187, 190, 191, 198, 200, 201, 202, 204,

सत्पंथ–विजय.

(आत्मानंदावरील फौजदारी खटला)

प्रकाशक —
एन्. डी. महाजन.

ॐ

सत्पंथ--विजय.

(आत्मानंदावरील फौजदारी खटला)

प्रकाशक,

नाटू देवराम महाजन, फैजपुर.

किंमत रुपये तीन.

(१९२६)

Printed by S. T. Ajgaonkar, B. A., at Manoranjan Press, 3, Sandhurst Rd., Girgaon, Bombay, and published by Natoo Deoram Mahajan, at Faizpur, East Khandesh.



गुरुवर्य-धर्मा गुरु बारसु बोवा.
सत्पंथी मंदिर, फैजपुर.

अर्पणपत्रिका.

गुरुवर्य धर्मा गुरु बारसु बोवा ब्रह्मचारी,
सत्पंथी मंदीर फैजपुर यांचे चरणीं
सत्भावपूर्वक
अर्पण असे.

प्रस्तावना.

"धर्म" या शब्दाच्या अनेक शास्त्रकारांनीं, धर्मवेत्त्यांनीं व धर्मप्रसारकांनीं चिकित्सापूर्वक विविध व्याख्या केल्या आहेत. तथापि सामान्यतः 'मानवी अंतःकरणाला ज्या मार्गानें परमार्थप्राप्ति करून घेतां येते त्यास धर्म म्हणावें' ही धर्माची व्याख्या सर्वांस निर्विवाद मान्य होण्यासारखी आहे. मानवी आयुष्यांत सुखामागून दुःख, आशेमागून निराशा, हर्षामागून शोक, संपत्तीमागून विपत्ति अशीं द्वंद्वें वावरतांना पाहून त्यांचा कार्यकारणभाव जेव्हां गूढ होऊन बसतो तेव्हां परमेश्वराचें स्मरण होऊन मनुष्य तत्प्राप्तीचा मार्ग शोधूं लागतो. हा मार्ग म्हणजे धर्म होय.

जगांतील अनेक समाजघटनेप्रमाणें परमेश्वरप्राप्तीचे धर्ममार्ग विविध असणें साहजीक असलें तरी कोणत्याही धर्मांत सदाचार व नीति यांचें पालन, अहिंसा, भूतदया, परोपकार, सत्यप्रीयता, सद्भाव यांचींच सूत्रें असलीं पाहिजेत. त्यांवांचून असंख्य मानवी हृदयाचें आकलन होणार कसें ? या जगाच्या नश्वरतेचें पूर्ण ज्ञान ज्यांस इतरांपेक्षां अगोदर झालें व ज्यांनीं अशा ईश्वरी मार्गांचे आपापल्यापरीं संशोधन केलें ते धर्मस्थापक म्हटले जातात. नाना प्रकारचे लोकापवाद व लोकच्छल सोसून इतर मूढ जीवांकरितां या पवित्रतम धर्ममार्गांची रचना त्यांजकडून होत असते. श्रीबुद्ध, श्रीजिनवरम्, श्रीमहंमद, श्रीख्रिस्त हे याच कोटींतील लोक होत. त्यांच्या या अनन्यसाधारण कार्यांवरून त्यांच्या धर्ममार्गांस त्यांचींच नांवें मिळालीं आहेत.

हिंदुधर्म हा वेदकालापासून मानला जातो. वेद हे अनादि असल्यामुळें हिंदुधर्म "अनादी" या महत्तम पदास पावला आहे. आज जगांत प्रचलित असलेल्या बहुतेक धर्मांचा काल हा वेदकालानंतरच ठरलेला असल्यामुळें हिंदुधर्माइतका जुना धर्म पृथ्वीच्या पाठीवर दुसरा कोणताहि नाहीं. यामुळें इतर धर्मांतून त्यांच्या मूलभूत तत्वांचें अनुकरण प्रत्यक्ष अथवा रूपांतरानें पुष्कळ झालेलें आहे. जशीं एखाद्या राजमंदिरास अनेक द्वारें असावीं किंवा एखाद्या भव्य वृक्षास अनेक शाखा उपशाखा असाव्या तद्वत् हिंदुधर्मासारख्या हिंदुस्थानांतील प्रचंड धर्मांत अनेक धर्मपंथ निर्माण झाले. कोणताहि धर्म घेतला तरी

त्यांत हे असे भिन्न भिन्न धर्मपंथ निर्माण व्हावयाचेच. कारण साधु, संत, महात्मे, तपस्वी हे आत्मोन्नतीच्या बलावर केव्हांच ईश्वरी पदाला पोंचलेले असतात. रुळलेल्या धर्ममार्गावरून संसाराचा अनुभव घेत घेत मंदगतीला ते केव्हांच अनुसरत नाहींत. अशा साधुसंतांच्या ठायीं सामान्यजनांना जे अनेक चमत्कार पाहण्यांस सांपडतात त्या चमत्कारांनीं त्यांची त्यांच्या ठायीं भक्ति बसत जाते व ते त्या त्या महात्म्याला व तद्दर्शित परमार्थमार्गाला साहजिक अनुसरतात. शिवाय ज्या सुलभ मार्गानें आपलें जीवितसाफल्य झालें त्या मार्गानें इतर जीवांनींहि आपलें साफल्य करून घ्यावें अशी त्यांची सदिच्छा असते आणि तदनुसार होणाऱ्या उद्योगानें नव्या धर्मपंथाचा जन्म होतो.

रामानुज, चैतन्य, कबीर, नानक, दयानंद सरस्वति, गौतम बुद्ध, महावीर वगैरे लोकोत्तर पुरुषांकडून हिंदुस्थानांत असेच धर्म व धर्मपंथ निर्माण झाले ते ते पुरुष आज त्या त्या पंथांचे धर्मसंस्थापक आणि धर्मगुरु म्हणून मानिले जातात. येथें विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, नानक, गौतमबुद्ध वगैरेचे धर्म जरी निराळे मानिले गेले तरी जे पंथ म्हणून विशेषतः संबोधिले जातात त्या रामानुजाचार्य, चैतन्य वगैरेंच्या धर्मपंथांचा हिंदुधर्मांतच समावेश होतो. धर्मपंथांच्या वृद्धीला या ज्ञानी पुरुषांखेरीज कांहीं देवताही कारणीभूत होऊन शैव, वैष्णव, शाक्त असे पंथ निर्माण झाले आहेत तरी त्यांचाही मुख्य हिंदुधर्मांतच अंतर्भाव होतो.

एथवर धर्म म्हणजे काय, त्याची स्थापना, हिंदुधर्म व त्याचे पंथ यांविषयीं विचार झाला, आतां अशाच हिंदुधर्मांतर्गत सत्पंथांविषयीं प्रतिपादन करावयाचें आहे.

धर्मपंथांचा जन्म धार्मिक पुरुषांच्या अलौकिकत्वानें कसा होतो हें वर सांगितलेंच. त्याचप्रमाणें याहि पंथाची गोष्ट आहे. इ० स० १५ व्या शतकाच्या सुमारास **श्रीईमामशहा** बावा या नांवाचे एक प्रसिद्ध सत्पुरुष होऊन गेले. हे महान् बुद्धिवान, धर्मपरायण व सदाचारी असून सर्व लोकोत्तर दैवीशक्तीचे निदर्शक होते. पुढें **श्रीईमामशहा बावा** गुजराथेंतील अहमदाबाद शहरापासून ७ कोसांवर असलेल्या प्रीमथा गांवीं आले. या गांवीं **बावा** येण्यापूर्वी ३ वर्षांपासून पाऊस मुळींच पडलेला नव्हता अशा स्थितींत लोकांची काय दैना उडाली असेल ती कल्पनेनेंच जाणली पाहिजे. या महाभाग पुरुषाच्या दर्शनास लोक

गेले तेव्हां पावसावांचून त्यांच्या मुखांत दुसरा शब्द नव्हता. तप्त जीवांची ती विनंति ऐकतांच या दैवी सामर्थ्याच्या अद्भुत चरित्रनायकानें 'आज पाऊस पडेल !' अशी अमृतवाणी काढिली व ती त्याच दिवशीं खरी झाली ! त्या दिवशीं मेघराजांनीं ३ वर्षांच्या विरहाचें परिमार्जन केलें. याचप्रमाणें आणखी इतरहि चमत्कारांनीं बावांचा महिमा प्रतिपचंद्ररेखेप्रमाणें वाढूं लागला व लोकांनीं त्यांचा धार्मिक उपदेश घेतला. त्यांच्यांत गुरूशिष्याचें नातें निर्माण झालें. कांहीं दिवस गेल्यावर बावांनीं गांवच्या नैऋत्येस बाण मारला. तो बाण जेथें पडला तेथें त्यांनीं आपलें वसतिस्थान केलें.

Muhammad Begada

या काळीं गुजराथ प्रांत यवनी सत्तेखालीं असून 'महंमद बेगडा' हा बादशहा होता. त्याच्या कानीं बावांची कीर्ति गेली तेव्हां त्यानें बावांची स्वतः भेट घेतली. या प्रसंगीं बावांची परीक्षा पाहण्याच्या हेतूनें बादशहानें मांजराचें मांस एका ताटांत आच्छादून तें त्याजकडे पाठविलें पण बावांनीं आच्छादन न काढितां दुरूनच 'बिल्ली उठजाव' असें म्हटलें, त्या सरसें त्या ताटांतून मांजर जीवंत होऊन निघून गेलें. दुसऱ्यांदा मांसानें भरलेलें ताट गुलाबाचीं फुलें म्हणून पाठविलें ! बावांनीं ताटावरील रुमाल काढतांच ताजी टवटवीत गुलाबाचीं खरोखरच फुलें भरलेलीं दिसून आलीं ! तिसऱ्यानें जेव्हां विषारी दूध त्यास प्यावयास दिलें तेव्हां त्या सिद्ध पुरुषानें ते जलाल विषाचें दूध प्राशन करून पचवून टाकलें !! या चमत्कृतींनीं बादशहा थक्क झाला त्यांत या महत्तम पुरुषाचें पावित्र्य, ऐहिक वैभवाची निरिच्छता व उदात्त धर्मतत्त्वें पाहून बावांच्या ज्येष्ठ मुलांस त्यानें आपली मुलगी दिली व त्यांस आप्त केलें.

Begada's daughter married to eldest son (Nurmuhammad Shah) of Imamshah

कफनीच्या अस्तिनींत काशी दाखविणें, गंगेचें दर्शन करवून स्नान करविणें वगैरे बऱ्याच अलौकिक दैवी चमत्कृतींनीं जातिभेद मनांत न येतां अनेक हिंदू त्यांचे शिष्य व अनुयायी झाले. व त्यांनीं उपदेशिलेल्या धार्मिक वृत्तीनें ते वागूं लागले. त्यांच्या उपदेशांत सत्य आणि शुद्ध नीतींचाच समावेश झालेला आहे. म्हणून या पंथास सत्+पंथ=सत्पंथ हें नांव पडलें. बावांच्या उपदेशाचे शिक्षापत्री, मूलबंध, गोरवाणी, योगवाणी वगैरे जे ग्रंथ आहेत, व ज्यांस सत्पंथी लोक धार्मिक ग्रंथ मानितात तें हिंदुवाङ्मय आहे. कुराण अगर मुसलमानी धर्माचे कोणतेही धर्मग्रंथ हे या पंथाचे धर्मग्रंथ नाहींत, तसेंच या पंथांमध्यें मुसलमानी धर्माचा कांहींएक संबंध नसून त्यांत मुसलमानी धर्माचे

Kuran

Imamshah built a Dargah for his burial. First Kaka was Shana Kaka was Leva Patidar

कोणतेहि आचार विचार नाहींत. लेवा पाटीदार लोकांचें मूल वसतिस्थान गुजराथ प्रांतच असल्यामुळें **बावांच्या** शिष्य समूहांत या जातीच्या लोकांचा भरणा अधिक झाला. तरी पण ब्राह्मण, वाणी, काछीया या लोकांचीहि संख्या कांहीं कमी नाहीं.

बावांच्या समाधीकालीं सत्पंथाची पूर्णपणें स्थापना होऊन त्यास व्यवस्थित स्वरूप आलें होतें. **बावांनीं** तेथेंच पिराणा मुक्कामीं स्वतःच्या समाधीकरितां एक रोझा बांधण्याचें काम सुरू करविलें व तें त्यांच्या हयातींतच संपलें. नंतर त्यांनीं आपल्या गादीवर लेवा पाटीदार साधूची योजना करून ते सिद्ध पुरुष समाधिस्थ झाले. ही त्यांची गादी चालू असून तिजवर हल्लीं लेवा पाटीदार बालब्रह्मचारी साधु अधिष्ठित आहेत. त्यास काका म्हणतात. (Bombay gazettear volume IV.)

श्री ईमामशहा बावा हे केवळ जातीनें भिन्न असल्यामुळें सत्पंथीय लोकांचा आचार तरी कसा असेल अशा शंकेची जिज्ञासा उत्पन्न होणें साहजिक आहे. ह्मणून त्याचा उल्लेख होणें इष्ट आहे. ईश्वरी सान्निध्याचा मार्ग दाखविणारा महत्तम पुरुष कोणत्याहि जातिधर्माचा असो; त्याचा परमार्थमार्ग अगदीं निराळा असल्यानें तो किंवा त्याचा अनुयायी वर्ग जातिधर्माशीं संबद्ध असत नाहीं. ह्मणजे त्याचे धार्मिक विचार पाळले पाहिजे असें नाहीं. धार्मिक आचाराच्या जाळ्यांत जर तो लोकांस गुंतवील तर त्याचा उपदेश निष्फल होईल.

Kabir

प्रसिद्ध साधु कबीर ह्या जातीनें यवन असूनहि त्याच्या पंथानें वागणारा केवढा तरी हिंदु समूह आहे? पण तत्पंथीयांचे हिंदु आचार, विचार, संस्कृति, कांहीं सुटलेली नाहीं. ते लोक कबीरपंथी असले तरी हिंदूच आहेत. आणि तत्पंथीय नसलेल्या तज्जातीयांत त्यांचे रोटीबेटी व्यवहार चालू आहेत.

सत्पंथी लोक देखील वेदप्रणीत वर्णाश्रमधर्म पाळितात. चतुर्वेद व दशावतार प्रमाण मानितात. **ब्रह्मा, विष्णु, महेश व आदिशक्ति** या त्यांच्या इष्ट देवता आहेत. **कलशपाट व अखंड घृतज्योत** यांची ते पूजा करून तद्वारें परमात्म्याची आराधना करितात. यांत देखील,

कलशस्य मुखे विष्णुः कंठे रुद्रः समाश्रितः
मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणाः स्मृताः"

हेंच वैदिक तत्व दिसून येतें. रामनवमी, गोकुळअष्टमी, एकादशी, ध्रुवाष्टमी,

चतुर्दशी, अमावास्या, शुद्ध द्वितीया, चतुर्थी वगैरे दिवशीं सत्पंथी लोक शुद्ध आचरण करून व्रताचें पालन करितात. या दिवशीं त्यांच्या संस्थानीं मेळे भरतात. “ अहिंसा परमो धर्मः” या तत्वाचें ते पूर्ण पालन करितात, व मादक पदार्थांना त्याज्य समजतात. म्हणून अभक्ष्य भक्षण व अपेयपान यांपासून ते अलिप्त आहेत. कुलाचार पाळणें व स्पर्शास्पर्श यांचा सूक्ष्म विवेक ठेवणें यांतहि ते चुकत नाहींत. परमेश्वर एक आहे व जेथें निश्चय कराल तेथेंच तो तुम्हास लाभेल असें त्यांच्या गुरूंचें त्यांस सांगणें आहे. हा उपदेश “नायमात्मा बलहीनेन लभ्यः” या वेदांतोक्तिसदृश्यच आहे. सत्पंथी लोकांचा हा जो आचार उल्लेखिला त्याप्रमाणें वागण्याविषयीं श्रीईमामशहा गुरूंची त्यांना आज्ञा आहे.

सत्पंथांत लेवा पाटीदार जातींच्या लोकांचीं संख्या अधिक आहे. या पंथाचा जन्म प्रथम गुजराथेंत झाला. गुजराथेंतून लेवापाटीदार लोकांचीं जीं कुटुंबें इकडे खानदेशांत आलीं त्यांच्याबरोबर हा पंथ इकडे आला.तसा तो काठियावाड, गुजराथ इकडेहि पसरला असून वऱ्हाड नेमाड इकडेहि त्याच्या शाखा पसरल्या आहेत. श्री ईमामशहा बावानंतर त्यांच्या वंशांत ५।७ पिढ्यांपर्यंत या पंथाचे धर्मप्रसारक पुरुष निर्माण होत गेले म्हणून या पंथाच्या अनेक शाखा अनेक स्थळीं पसरल्या आहेत. त्यांपैकीं बऱ्हाणपुराजवळील बहादरपूर येथील एक संस्थान प्रसिद्ध असून त्याच्या अनुयायांत आज ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांतील विविध जातींचा हजारांनीं मोजण्यासारखा वर्ग विद्यमान आहे व बहादरपुरास दरवर्षी जो उरूस भरतो त्याला किती लोकसमूह लोटतो तो पाहिला म्हणजे या लेखनांतील सत्य प्रत्यक्ष अनुभवास येण्यासारखें आहे.

Khandesh
... Varhad
Nemad

लेवा पाटीदारांचीं जीं कुटुंबें खानदेशांत आली त्यांस सुमारें ४०० वर्षांचा काल लोटला असेल. या कुटुंबांत जीं कुटुंबें सत्पंथी होतीं त्यांची संख्या आज खानदेशांत सुमारें १०० आहे. इकडील एकंदर लेवा पाटीदार लोकांची वस्ती विशेषतः जळगांव, भुसावळ, यावल व रावेर या तालुक्यांत आहे. त्यांच्यांत स्वामीनारायण, मानभाव, माळकरी, सत्पंथी, नाथसांप्रदायी व कबीरपंथी वगैरे पंथ आहेत. एव्हांपर्यंत या सर्व पंथांत परस्पर रोटीबेटी व्यवहार चालत असून कोणत्याच प्रकारचा कांहीं भेदभाव नव्हता. असें असतां लेवा पाटीदार जातींत सत्पंथ याबद्दल मतभेद उत्पन्न झाला व त्यांचा गुरु मुसलमान म्हणून त्यांचा धर्म वेदबाह्य असें कित्येक म्हणूं लागले आहेत. असें म्हणणें

400 Years
Ago

100
Family

Muslim
Guru

अप्रौढतेचे, अपरिपक्व बुद्धीचे अर्थात् खुळेपणाचे आहे, असें कोणाहि विचारी मनुष्यास सकृद्दर्शनीं वाटल्यावांचून रहणार नाहीं.

गुरु म्हणजे परमार्थाचा मार्गदर्शक, अज्ञानाचें पटल दूर सारणारा सूर्य, संसार-सागरांत बुडणाऱ्या हताश जीवांना पैलतिरीं पोंचविणारी ती एक नौका, त्रिविध तापांनीं तप्त झालेल्या जीवांना शांतविणारी ती एक प्रशांत वासंतिक मरुल्लहरी असा गुरुचा महिमा कोठवर वर्णावा! शांतविणारी मरुल्लहरी कोठून वहात आली याचा आपण विचार करीत नाहीं. पैलतिरी पोंचविणारी नांव निंबाची आहे कीं चंदनाची आहे हेंहि शोधित बसत नाहीं, किंवा तमःपट दुर सारणाऱ्या सूर्याच्या जातीची कल्पनाहि मनाला शिवत नाहीं, त्याप्रमाणें गुरु जर मार्गदर्शक म्हटला तर त्याची जात पहाण्याचें काय कारण आहे? त्याच्याशीं आपणांस रोटीबेटी-व्यवहार करावयाचा नसून त्यानें उपदेशिलेल्या शुद्ध नीतींचा मात्र अवलंब करावयाचा असतो. त्यानें दाखविलेल्या मार्गानें आपणांस जावयाचें असतें. एखाद्यास अमक्या गांवाचा रस्ता कोणीकडून जातो हें विचारित असतां आधीं त्याच्या जातिधर्माचा जसा शोध करीत नाहीं (कारण त्याच्या जातीपासून कांहीं रस्ता कळत नाहीं) तद्वत् ईश्वरसान्निध्याचा मार्ग शोधण्यास गुरूच्या जातीची आपणास कांहीं जरुरी नाहीं. श्रेष्ठ कोटींतील लोक सारग्रहणाच्या दृष्टीनें मानवी वर्गाच्या पलीकडीलहि जीवांस गुरुपद देऊन त्यांचा एकेक उत्कट गुण ग्रहण करितात! श्री दत्तांनीं असे २४ गुरु केले होते, ते म्हणतात:—

Walk The Path Shown By Guru

"जो जो जयाचा घेतला गुण।
तो तो म्यां गुरु केला जाण॥"

या ज्ञानी पुरुषानें सारग्रहणाच्या दृष्टीनें शांतिगुणाचा पाठ शिकावयास गर्दभासहि गुरुपदावर बसवून आपण त्याचें शिष्यत्व स्वीकारिलें! तात्पर्य एवढेंच कीं ज्ञानी माणसें गुरूच्या जातिधर्माच्या खुळया कल्पनेंत शिरत नसतात.

Sadhu Aatmanand Brahmachari -> fought against Satpanth

तथापि या खुळ्या कल्पनेचा वाद लेवापाटीदार समाजांत अलीकडे ५।६ वर्षांपासून चालू असतां तीन वर्षांपूर्वी आत्मानंद नांवाचा ब्रह्मचारी म्हणविणारा फिरत फिरत यावल तालुक्यांतील फैजपूर गांवीं आला व तेथील खंडोबाचे वाडींत मठस्थ होऊन राहिला. या ब्रम्हचारी म्हणविणाराला कांहीं उपद्यापी लोकांनीं सत्पंथाविषयीं मतभेद भासवून कांहीं कुचेष्टायुक्त माहितीहि सांगितली. त्यामुळें त्याच्या मनांत सत्पंथाबद्दल विरुद्ध भाव शिरला! ब्रह्मचारीपद-

Recent, Satpanth related dispute in Leva Patidar Samaj is about 5 to 6 Years Old.

वीच्या साधु पुरुषानें वास्तविक हा पंथ पाळणाऱ्या सत्पंथी लोकांकडून खरी व योग्य माहिती मिळवावयास पाहिजे होती. ती त्यानें मिळविली नाहीं व सत्पंथी लोक आपण होऊन खरी माहिती सांगत असतां तो केवळ पक्षांध बनल्यामुळें त्यास ती खोटी वाटली ! पुढें सदरचा ब्रह्मचारी यानें मनस्वीपणानें भलभलत्या मजकुराच्या जाहिराती काढिल्या व ताशे लावून लेक्चरें दिलीं. त्याविषयीं सत्पंथानुयायी आनंदा लहानु किरंगे यांनीं इं. पि. को. कलम २९८ व ५०० या कलमाप्रमाणें मे. प्रांत साहेब जळगांव यांच्या कोर्टात फिर्याद केली होती त्यांत आरोपीवर गुन्हा शाबीत होऊन त्यास ५०० रुपये दंड झाला व तो मुंबई हायकोर्टापर्यंत कायम राहिला त्या खटल्याची सर्व हकिकत या बुकांत दिली आहे.

Court Case

Contents / Purpose of this book

वर सांगितल्याप्रमाणें ब्रह्मचारी यानें जाहिराती वाटल्यानंतर सर्व लेवा पाटीदारांची पंचाईत भरून त्यांत सत्पंथी लोकांना जातिबाह्य केलें, व कुमारिकांच्या सोयरिकी मोडण्यांत आल्या ! लेवा समाज नुकताच सुशिक्षित होऊं लागला आहे; तथापि या गोष्टीचा सूक्ष्म व सारासार विचार न करितां लेवा समाजानें एवढ्या दुराग्रहाचें स्वरूप या विषयास द्यावयाचें नव्हतें. भवरगांवाचे पंचायतींत पंचासमोर सत्पंथी लोक आपल्या आचाराविचाराची व धार्मिक वागणुकीची माहिती सिद्ध करून देण्यास तयार असतां त्यांची ती विनंती कां बरें अमान्य करावी ? पुन्हा श्रीमच्छंकराचार्यांकडून सत्पंथाविषयीं निर्णय लावून घेण्यास सत्पंथी लोक तयार असतां तीहि गोष्ट पंचांनीं कां ऐकूं नये ? सत्पंथी कुटुंबांची संख्या केवळ १०० आणि इतर सर्वांची संख्या शेंकडो पटीची, अशा स्थितींत दुसऱ्या बाजूचें कांहींहि म्हणणें ऐकून न घेतां बहुमतावर अन्यायी निर्णय देणें याला सूज्ञांच्या भाषेंत दुराग्रह, हटवाद याशिवाय अन्य शब्द आढळणार नाहीं.

Shankaracharya

लेवा सभाजांत स्वामीनारायण, मानभाव वगैरे पंथ चालू आहेत असें मागें सांगितलेंच आहे. भवरगांवाचे पंचायतींत सत्पंथी लोकांची अशी ही विनंति होती कीं, हे पंथ जर चालू आहेत तर आमचाहि सत्पंथ चालू रहावा किंवा सर्व लेवासमाज एकपंथी असावा. तेव्हां इतर पंथांविषयीं चाललेली चर्चा मात्र बंद होऊन सत्पंथावरचा कटाक्ष कायम राहिला ! पुन्हां यांत मौज अशी कीं, स्वामीनारायण व मानभाव हे पंथ वेदबाह्य आहेत असा श्रीमच्छंकराचार्य

Swaminarayar =Non Veg ?

Shankaracharya

यांनीं एकदां निर्णय दिला होता तरी लेवा समाज त्या पंथांविषयीं सहानुभूति बाळगितो आणि सत्पंथी लोक आपल्याविषयीं पाहिजे तर श्रीमच्छंकराचार्यांकडून निर्णय लावून घेण्यास आपण तयार आहोंत असें उघड सांगत असतां तोच समाज या सत्पंथी समाजास दूर लोटतो ही विसदृशता पाहून तर या समाजांतील पुढाऱ्यांचा सारासार विचार झोंपी गेला आहे असेंच म्हणावें लागतें.

आज दोनशें वर्षें झालीं औरंगजेबाच्या वेळेपासून जीं हिंदु कुटुंबें मुसलमानी धर्माचीं झालीं त्यांस हल्लीं स्वामी श्रद्धानंदजीसारखे सत्पुरुष शुद्धिकार्यानें हिंदु बनवून घेत आहेत, गजाननराव वैद्यासारखा ऋषि हेंच कार्य करीत परलोकीं गेला; खिस्ती धर्मांत गेलेले हिंदु अजूनही परत हिंदुधर्मांत आणिले जात आहेत; असा हिंदुधर्माच्या वृद्धयर्थ ज्या काळांत चोहोकडून यत्न होत आहे त्याच काळांत सत्पंथी लोक घसा फोड फोडून सांगत आहेत कीं, 'अहो! आम्ही हिंदु आहोंत, आमचा मुसलमानी धर्माशीं कांहीं संबंध नाहीं. आमचा आचार पहा! देवधर्म पहा! आम्ही सिद्ध करून देतों' पण तज्जातीय लेवा समाज म्हणतो "छे! तुम्ही जात सोडा किंवा पंथ सोडा, आम्ही तुमचें कांहींहि म्हणणें ऐकून घेत नाहीं!!" शिक्षणाचें पौष्टिक अन्न खातां खातां समाजरूपी पुरुष आपल्या शरीरावरच घाव घालून घेत आहे असें म्हणणें या विषमतेनें क्रमप्राप्त झालें आहे. या समाजरूपी पुरुषाच्या शरिराला एवढी बधिरता ज्या मानसिक महारोगानें आली त्या रोगाचें मूळ 'तुमचा गुरु मुसलमान म्हणून तुम्ही अवैदिक हेंच आहे! या मूळास भूतकाळांत व वर्तमानकाळांत कोठेंच स्थल नाहीं, तें लेवा समाजाच्या अज्ञान भूमिकेंत बांडगुळाप्रमाणें वाढून त्याचेच सत्वशोषण करीत आहे!

कबीराचा पंथ पाळणारे कितीतरी हिंदु हे हिंदूच आहेत. कबीराचा काल जुना असला तरी नगरजिल्ह्यांतील शिर्डी येथील सांईमहाराज, नागपूरचे सांईमहाराज हे जातीनें यवन असून त्यांच्या शिष्यवर्गांत ब्राम्हणापासून खालच्या वर्गापर्यंत सर्व प्रकारचे हिंदु आहेत. मुंबईचे प्रख्यात सॉलिसिटर मि० दिक्षित यांचें आराध्यदैवत सांई महाराज आहेत. आधुनिक कवींतील नामांकित कवि 'दासगणु' हे त्यांचे परमभक्त असून त्यांनीं त्यांजवर हरिविजय रामविजयासारखा सांईविजय नांवाचा एक ओवीबद्ध मोठा ग्रंथ आरंभिला आहे. सांईमहाराजांच्या भक्तमंडळींनीं 'साईलीला' नांवाचें जें मासिक सुरू केलें

आहे त्यांतून या ओवीबद्ध ग्रंथाचे भाग प्रसिद्ध होत असतात. जळगांव येथील प्रसिद्ध नूलकर घराण्यापैकीं डॉक्टर वामनराव नूलकर यांचे वडील तात्यासाहेब नूलकर (लक्ष्मणराव कृष्णराव) यांची सांईमहाराजावर निस्सीम भक्ति असून ते जेव्हां काळपुळी नांवाच्या रोगानें अस्वस्थ झाले तेव्हां त्यांनीं शिर्डीस जाऊन सांईमहाराजांच्या चरणाजवळ देह ठेविला. हल्लीं ब्राम्हणशिष्यांच्या देव मंदिरांत देखील सांई महाराजांची प्रतिमा विराजत आहे. व ते तिची ध्यान धारणा करीत आहेत. पण सांई महाराज मुसलमान म्हणून त्यांच्या शिष्यांना कोणी मुसलमान समजत नाहींत.

खरोखर सिद्ध पुरुष हे जातिधर्मांच्या पलीकडे गेलेले असतात. सर्व भेदभाव गळून त्यांच्या हृदयांत एकात्मकतेचें प्रेम नांदत असतें. लहान थोर, श्रीमंत गरीब, स्त्रीपुरुष, हिंदुमुसलमान यांपैकीं कोणतीच विषमता त्यांच्या जवळ नसते. षड्विकारांचे कोट फोडून त्यांचा आत्मा परमानंदांत नित्य विलीन झालेला असतो. आत्म सूर्य प्रगट झाल्यामुळें दिव्य भावनांचीं तेजोवलयें त्यांच्या भोंवतीं परिभ्रमण करीत असतात. त्यांचें पार्थिव शरीर पृथ्वीवर राहून ते स्वतः कुठें अंतराळांत फिरत असतात, हें फक्त त्यांचें त्यांनांच ठाऊक! त्यांच्या इच्छाशक्तिमागें मनःपावित्र्याचा तीव्रवेग असल्यामुळें त्या इच्छाशक्तीच्या बळावर त्यांजकडून अद्भुत चमत्कार घडत असतात. अशा महात्म्यांकडे कोणता सुज्ञ जातिभेदाच्या क्षुद्र दृष्टीनें पाहील? अशा क्षुद्र दृष्टीनें त्यांजकडे पाहणारे व त्याजविषयीं चिकित्सा करणारे परमार्थापासून फार लांब आहेत असेंच म्हटलें पाहिजे.

श्रीईमामशहा बावा हे अशाच अलौकिक सिद्ध पुरुषांपैकीं एक होते. परमार्थाचे एक मार्गदर्शक या दृष्टीनें आपल्या शिष्यवृंदाच्या धार्मिक रूढीस व कल्पनांस न दुखवितां त्यांनीं उपदेश केला. हे उपदेशक व त्यांचा उपदेश यांस पूज्य मानणारे सत्पंथी म्हणविले जातात. त्यांजविषयीं आजवर जो गैर-समज पसरला गेला त्याचें निराकरण या पुस्तकानें चांगलेंच होणार आहे.

प्रकाशक.



Advocate

फि.यांदीतर्फे वकील,

मि. केशव महादेव सोनाळकर, जळगांव.

श्रीसत्गुरु समर्थ.

सत्पंथ–विजय.

(आत्मानंदावरील फौजदारी खटला.)

फिर्याद.

मेहेरबान प्रान्त साो बहादूर जिल

पूर्वखानदेश.

पूर्वभाग मॅजिस्ट्रेट वर्ग १ यांचे कोर्टांत.

आनंदा वाा लहानु किरंगे उमर वर्षें ३६ धंदा शेतीचा जात लेवे पाटीदार फैजपूर ताो यावल } फिर्यादी.

Ananda Lahanu Kirange - is Satpanthi

विरुद्ध.

बदरीकाश्रम ज्योतिर्मठस्थ नंदवाल संप्रदायी आत्मानंद ब्रह्मचारी, खंडेरावकी वाडी मुाा फैजपूर ताो यावल, जात हिंदु } आरोपी.

Aatmanand Brahmachari - is the man who fought against Satpanth

गुन्हा इंडियन पिनल कोड कलमें १५३ अ, २९८ व ५०० नें. फिर्यादी कोर्टास कळवितो तें येणेंप्रमाणें:—

१. फिर्यादी हा लेवे पाटीदार जातीचा असून तो सत्पंथ धर्म पाळतो. सदर्हु धर्माची ईमामशाही ह्मणून एक शाखा आहे. आहे. सदर्हु शाखेचें अनुयायी हे सर्व हिंदु जातीचे आहेत. व ते हिंदु धर्म पाळतात. फिर्यादी हा ईमामशाही पंथाचा अनुयायी आहे, व तो जातीनें उच्च जातीचा हिंदु आहे.

२. कलम १ प्रमाणें हकीकत असतां आरोपीनें सदर्हु धर्म हा मुसलमानी आहे, व या धर्माचे लोक हे मोमना ह्मणजे मुसलमान आहेत. सबब त्यांच्याशीं हिंदुधर्मातील लोकांनीं खाणें, पिणें, लग्न करणें वगैरे संबंध ठेवून अधर्माची प्रवृत्ति करूं नये, अशा आशयाची विधानें कलम ३ यांत लिहिल्याप्रमाणें केलीं आहेत. आरोपीनें वेळोवेळीं हस्तपत्रकें छापवलीं आहेत. यामुळें सर्व जातीचे लोकांत फिर्यादीची अब्रु कमी झाली आहे.

३. आरोपीनें वेळोवेळीं जीं कृत्यें केलीं तीं खालीं लिहिल्या प्रमाणें:—

Pamphlet Swadharm Palan Karo

- See Page 36 of 258 of this book

अ. ता. २२ नोव्हेंबर सन १९२२ ह्मणजे संवत १९७९ चे मार्गशीर्ष शु|| ४ रोजीं ‘ स्वधर्म पालन करो ’ या मथाळ्याचीं हस्तपत्रकें छापलेलीं फैजपुर येथें व इतर ठिकाणीं लोकांत वाटलेलीं आहेत.

News Paper Prabodh Chandrika

- See Page 40 of

ब. ता|| ४।१२।२२ रोजीं जळगांव येथील प्रबोधचंद्रिका या नांवाच्या पत्राचे ता|| ४।१२।२२ चे अंकांत फिर्यादीचे धर्मसंबंधीं खोटा मजकूर छापवून त्यानें प्रसिद्ध केला आहे.

क. ता||२०।१२।२२ रोजीं ह्मणजे संवत १९७९ पौष शु|| २ रोजीं मु|| फैजपुर येथील आठवडे बाजारांत व गावांत

वाजंत्री लावून सत्पंथी धर्माच्या ईमामशाही धर्माबद्दल अपमानकारक व चीड येणारीं भाषणें ठिकठिकाणीं केलीं आहेत. भाषणाचा मुख्य विषय फिर्यादीचे धर्माचे लोक हे गोभक्षक ह्मणजे गाई खाणारे आहेत व ते मोमना ह्मणजे मुसलमान आहेत, व त्यांच्याशीं खाणें, पिणें, लग्न करणें वगैरे व्यवहार हिंदु लोकांनीं करूं नयेत, असा होता.

Cow / Beef Eating

वरप्रमाणें भाषण आरोपीनें खुद्द फिर्यादीचे घरासमोर फिर्यादीचे समक्ष केलेलें आहे. भाषणांतील व हस्तपत्रकांतील सर्व विधानें खोटीं असून यामुळें फिर्यादीची अब्रू कमी झाली आहे. वरप्रमाणें भाषणें केल्यानंतर आरोपीनें ‘स्वधर्म पालन करो’ अशा मथाळ्याचीं दोन हस्तपत्रकें लोकांनां वाजंत्रीं लावून वाटलेलीं आहेत. त्यांच्या दोन प्रती सोबत दाखल केल्या आहेत.

४. आरोपीनें मु॥ फैजपुर ता॥ यावल येथें हस्तपत्रकें वाटलीं त्या तारखेस म्हणजे ता॥ २२।११।२२ व ता॥ २०।१२।२२ रोजीं गुन्हे केले आहेत. भाषणाबद्दलचे गुन्हे ता॥ २०।१२।२२ रोजीं केलेले आहेत. सदर्हू हस्तपत्रकें छापविण्यांतहि आरोपीनें गुन्हे केले आहेत. परंतु पत्रकांवर तारखा नसल्यामुळें त्याबद्दलचा गुन्ह्याबद्दलच्या तारखेचा अदमास सांगता येत नाहीं. हीं हस्तपत्रकें मु॥ जळगांव ता॥ जळगांव येथें छापलीं आहेत. सबब याबद्दलचे गुन्हे मु॥ जळगांव येथें छापलीं आहेत सबब याबद्दलचे गुन्हे मु॥ जळगांव येथें घडले आहेत. प्रबोधचंद्रिकेंत खोटा मजकुर तारीख ४।१२।२२ रोजीं मु॥ जळगांव येथें छापला. त्याबद्दल गुन्हा सदर्हू गावीं घडला आहे.

Date not Printed In Pamphlet

५. आरोपीनें फिर्यादीची अब्रु सर्व लोकांत कमी व्हावी म्हणून त्याचे धर्माबद्दल हस्तपत्रकांत खोटीं विधानें करून तीं हस्तपत्रकें जाणूनबुजून व दुष्ट हेतूनें वर लिहिल्याप्रमाणें छापलीं आहेत, व तीं हस्तपत्रकें जाणून बुजून फिर्यादीचे समक्ष फिर्यादीचे घरापुढें लोकांत वाटलीं आहेत. व सत्पंथी धर्माबद्दल वर लिहिल्याप्रमाणें खोटीं चीड उत्पन्न करणारीं भाषणें फिर्यादीसमक्ष फिर्यादीचे धर्मसमजुतीस धक्का बसावा म्हणून जाणून बूजून व वाईट हेतूनें फिर्यादीचें घरासमोर केलीं आहेत. सबब त्यानें इं. पिनल कोड कलमें २९८ व ५०० यांत वर्णिलेले गुन्हे केले आहेत. तसेंच आरोपीनें हस्तपत्रकें वर लिहिल्याप्रमाणें छापवून व तीं लोकांत वाटून व कलम ३ यांत लिहिलेप्रमाणें भाषणें करून फिर्यादीचे धर्माचे सत्पंथी लोक व इतर जातीचे लोक ह्मणजे "सरकारचे प्रजाजन" यांचेमध्यें वैरभाव व द्वेष उत्पन्न केला आहे. व तसें करण्याचा त्याचा जाणून बुजून खोडसाळपणाचा हेतु होता. त्यामुळें त्यानें इं. पिनल कोड कलम १५३ अ. यांत वर्णिलेला गुन्हा केलेला आहे. वरील सर्व गुन्ह्यांचा तपास होऊन आरोपीस शिक्षा व्हावी अशी विनंती आहे.

६. फिर्यादीचे साक्षीदार आहेत ते खालीं लिहिलेंप्रमाणें:—

(१) फकिरखा वा॥ भुरेखा मुसलमान तांबट व॥ फैजपुर ता॥ यावल.

(२) सरवर वा॥ गुलमहंमद मुसलमान वा॥ फैजपुर ता॥ यावल.

(३) दामु निळोबा शेतवाल शिंपी वा॥ फैजपुर ता॥ यावल.

(४) नथु मोतीराम पाटील वा॥ पुनखेडें ता॥ रावेर.

(५) दलपत वा॥ रामचंद्र पाटील वा॥ तामसवाडी ता॥ रावेर.

https://archive.org/details/bk147/page/n24/mode/1up

(६) भुरा मुऱ्हा पाटील वा॥ आमोदें ता॥ यावल.

(७) तोताराम बधु महाजन वा॥ फैजपुर ता॥ यावल. (तुह्मी साक्षीस येतांना आरोपीनें तुह्मांस पाठविलेलीं पत्रें घेऊन साक्षीस येणें.)

(८) रा. रा. नारायण नरसिंह फडणीस, बाबजी प्रिंटिंग प्रेसचे मालक यांस मु॥ जळगांव ता॥ जळगांव. (तुह्मी साक्षीस येतांना प्रबोधचंद्रिकेचा ता॥ ४।१२।२२ चा अंक तसेंच ' स्वधर्म पालन करो ' या मथळ्याखालीं आरोपीनें तुमचे प्रेसमध्यें छापविलेलीं हस्तपत्रकें आहेत, त्याबद्दलचीं सर्व कागद पत्रकें जमाखर्चासुद्धां घेऊन साक्षीस येणें).

Printing Press

वर लिहिल्याप्रमाणें साक्षीदार आहेत त्यांनां समन्सें व्हावींत.

७. गुन्ह्याचा योग्य तपास होऊन आरोपीस योग्य शिक्षा व्हावी अशी विनंती आहे. ता॥ ९।१।२३.

(सही) आनंदा वा॥ लहानु किरंगे वा॥ फैजपुर दा॥ खु॥. (सही इंग्रजी) देवकर वकीलाची व (सही इंग्रजी) बापट वकिलाची.

Advocate

मी आनंदा लहानु किरंगे उमर वर्षे ३६ धंदा शेतीचा जात लेवे पाटीदार रहाणार फैजपुर प्रतिज्ञेवर लिहून देतो कीं, मी फिर्यादींत लिहिलेला मजकुर खरा आहे. मी लेवा पाटीदार जातीचा असून सत्पंथी धर्माचा अनुयायी आहे. हिंदु लोकांपैकीं पुष्कळ लोक माझ्या जातीचे व दुसरे इतर हिंदु या पंथाचे अनुयायी आहेत. आमचे आचार विचार, सण, कुलधर्म वगैरे सर्व हिंदु लोकांप्रमाणें आहेत.

असें असून आरोपीचें ह्मणणें असें आहे कीं, मी व आमच्या पंथाचे लोक मोमना (मुसलमान) असून गोभक्षक आहेत. त्यांचेशीं हिंदु लोकांनीं रोटीव्यवहार व बेटीव्यवहार करूं नये. असें अपील त्यानें आमच्या पंथासंबंधानें वरीलप्रमाणें हस्तपत्रकें खोटीं विधानें करून, वेळोवेळीं त्याप्रमाणें हस्तपत्रकें वाटून प्रसिद्ध ठिकाणीं भाषण करून प्रबोधचंद्रिका यांत लेख लिहून आमचे पंथा-बद्दल खोटीं विधानें केलेलीं आहेत. त्याबद्दल सविस्तर हकीकत फिर्यादींत लिहिली आहे. त्यायोगें फिर्यादीचे जातीचे इतर लोकांनीं या पंथाचे अनुयायी नाहींत अशी पंचाईत भरवून यापुढें सत्पंथी लोकांशीं रोटीव्यवहार बेटीव्यवहार करूं नये; ह्मणून ठराव केलेला आहे. माझी व माझे पंथानें चालणारे लोकांची बेअब्रु व्हावी या हेतूनें आरोपीनें खोडसाळपणानें वरील विधानें खोटीं केलेलीं आहेत. फिर्यादींत लिहिल्याप्रमाणें आरोपीनें गुन्हे केलेले आहेत. त्यास पुरावा साक्षीदार लोकांची यादी दिलेली आहे, तो घेऊन योग्य न्याय होईल. हें लिहून दिलें ता॥ ९।१।२३.

(सही) आनंदा लहानु किरंगा दा॥ खु॥

समक्ष

(सही इंग्रजी)

मॅ. वर्ग १ पूर्व भाग

शिक्का

निशाणी नं. १.

फिर्यादी याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव आनंदा बापाचें नांव लहानू धर्म जात लेवे पाटीदार उमर सुमारें ३५–३६ वर्षांची धंदा शेतीचा रहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पू. खा.

सर तपासणी:—आरोपी ओळखीचा आहे. हे १०।१२ महिने झाले फैजपूरला आले. हे भटकत फैजपूरला आले. यांचा तेथें मठ नाहीं. यांचा दुसरा कोठें मठ आहे कीं नाहीं, याची मला माहिती नाहीं हे स्वतः कोणचे मठाचे सांगतात तेहि मला माहीत नाहीं. जाहिरात वाचून सांगतों. बद्रिकाश्रम जोतीमठस्थ नंदवाल सांप्रदायी आत्मानंद ब्रह्मचारी खंडेरावची वाडी, असें स्वतःला संबोधितात. खंडेरावाची वाडी फैजपूरला आहे. हे खरोखर त्या मठाचे आहेत, अशाबद्दल मला माहिती नाहीं किंवा मी खात्री करून घेतली नाहीं. हे खरोखर ब्रह्मचारी आहेत किंवा नाहींत याबद्दल मला स्वतःला माहिती नाहीं. **माझा धर्म हिंदु आहे व वैष्णव वगैरे जसे पंथ आहेत तसा माझा पंथ सत्पंथ आहे.** या पंथाचा मुख्य पुरुष ईमामशाहा आहे. ईमामशाहा हे मुसलमानी अवलीया होते. **यांचे अनुयायी हिंदूच आहेत.** मुसलमान लोकांना त्यांचे अनुयायी होता येणार नाहीं. मूळ अवलीया **जरी मुसलमान होता** तरी **त्यांची शिष्य मंडळी सर्व हिंदूच होती. त्यांना जरी गुरु मानिलें तरी शिष्य मंडळी धर्म हिंदूच मानितात.** मला आतां दाखविल्या या जाहिराती फैजपूरला वाटण्यांत आल्या होत्या.(Ex I A)या जाहिराती

बोवांनीं (आ.) वाटल्या. त्यांना वाटतांना मी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलें. या जाहिरातींत जी हकीगत लिहिलेली आहे, ती खोटी आहे. त्यांतील कांहीं हकीगत खरीहि आहे. 'उसके पश्चिमके तरफ पंजेके उपर कुराणका कल्मा असें लिहिलें आहे, तें मी स्वतां डोळ्यांनीं पाहिलें नाहीं. म्हणजे पंज्यावर कुराणचा कल्मा असें लिहिलेलें आहे कीं नाहीं, हें पाहिलें नाहीं. काका लक्ष्मण करमशी हे हल्लीं आमच्या पंथाच्या गादीचे मालक आहेत. सय्यद हुसेन कोण आहे, मला माहीत नाहीं. पंज्यावर लिहिले वगैरेबद्दल मी काकांना हकीगत कळविली होती. त्यावरून त्यांनीं जाहीरपत्रक काढलें तें मजकडे आलें आहे. मला आतां दाखविली हींच ती (Ex I B) जाहिरात आहे. या जाहिरातीवरून (आ० नें०) पंज्याबद्दल लिहिलेली हकीगत खोटी आहे, असें मी म्हणूं शकतों. दुसरें वाक्य—'उशी तरफ छोटी कुडीमें' या शब्दानें आरंभ झालेंलें—हेंही वाक्य खोटें आहे, असें मी काकांच्या जाहिरातीवरून म्हणूं शकतों. तिसरें वाक्य 'हिंदु लोगोंसे सतपंथी लोगोंका कुछभी खाना पिना, विवाहसंबंध नही है,' हेंहि वाक्य खोटें आहे. आमची सोयरीक हिंदूशींच होते म्हणून हें वाक्य खोटें आहे, हें मी प्रत्यक्ष माहितीवरून सांगतों, 'ये लोक जो कुछ कुराणमें लिखा है वही धर्म पालन करते है,' हें वाक्यहि खोटें आहे.

भावसार लोक आमच्या जातीचे नसून रंगारी आहेत. त्यांचा आमचा रोटी व्यवहार बेटी व्यवहार कधींहि होत नाहीं.

सय्यद गुलाम हुसेन यांच्या सहीची जाहिरात मजकडे गुरुनींच पहिले जाहिराती (Ex I B) बरोबर पाठविली ती मी हजर करितों (Ex I C)

'स्वधर्म पालन करो' या जाहिरातींत सय्यद हुसेन यानें प्रत्यक्ष पाहिलें आहे ह्मणून मजकूर आहे. तोच हा सय्यद गुलाम हुसेन, रहाणार पिराणा. हा सय्यद गुलाम हुसेन (Ex I C) या जाहिरातींत पाहिलें नाहीं असें कळवितो. वाक्य नं. १।२ मधील आरोप पाहिल्याचें किंवा आरोपी यासहि पाहिल्याचें नाकबूल करतो. या जाहीर खबरीवरोन (Ex. IA) मधील 'सय्यद हुसेन पिराणा इनोने देखाया' हा मजकूर खोटा आहे असें मी ह्मणू शकतों.

स्वधर्म पालन करो ही जाहिरात (Ex I A) जळगांवला बाबजी प्रिंटिंगप्रेसमध्यें छापलेली आहे. त्या छापखानेवाल्याची मी साक्ष दिली आहे. ह्या जाहिराती सर्व जातीच्या लोकांना सरसहा वाटल्या. इतर धर्माच्या लोकांना देखील वाटल्या आहेत. या जाहिरातीवर तारीख वगैरे नाहीं.

दुसरी जाहिरात आरोपीनें 'स्वधर्म पालन करो' या मथळ्याखालीं काढलेली मी हजर करितों. (Ex I D) ही जाहिरात आरोपीच्या नांवावर प्रसिद्ध झाली आहे. या जाहिरातीवरून पहिली जाहिरात मार्गशीर्ष शु० ३ तृतीयेला छापली गेली. तारीख २१–११–१९२२ असली पाहिजे असें मी ह्मणतों. तारीख ४–१२–१९२२ चा प्रबोधचंद्रिकेचा अंक मला दाखविला. त्यांतील जळगांव या मथळ्याखालील स्फुट लेख मला दाखविला. हा लेखहि आरोपी यांचेच सांगणेंवरून लिहिला आहे. (Ex I E) ह्या लेखांतील 'सत्पंथी लोक हे हिंदुधर्मापैकीं नाहींत; हा धर्म निवळ मुसलमानी धर्माचा भाग आहे,' हें (5) विधान आरोपीनें केलें आहे तें खोटें आहे.

आरोपींनीं स्वतां वाजंत्री वगैरे लावून ता० २०।१२।२२ रोजीं आठवडे बाजारांत व फैजपूर गावांत लेक्चर दिलें. त्यावेळीं त्यांनीं आह्मांला मोमन ह्मटलें. (6) Allegation ' आह्मी गोरक्षक असून हे सत्पंथी गोभक्षक आहेत ' असें यांनीं (आरोपींनीं) ह्मटलें. (Allegation no. 7) 'ज्या ज्या जातींत सत्पंथी लोक असतील त्या जातीच्या लोकांनीं (सत्पंथ्यांशीं) त्यांच्याशी रोटी व्यवहार बेटी व्यवहार करूं नये ' ह्मणून त्यांनी (आ. नीं) सांगितलें. हें भाषण मी स्वतः ऐकिलें. माझ्या दारापुढें माझें नांव घेऊन बोवांनीं लेक्चर दिलें व माझेकडे बोट दाखविलें. वरील ' स्वधर्म पालन करो ' या दोन्ही जाहिराती त्यांनीं तेथें माझ्या दारासमोर वाटल्या (Ex I A & I D)

पत्रिका वाटण्यांत, लेक्चर देण्यांत, बोवाचा हेतू वाईट असावा असें मला वाटतें. या हस्तपत्रिकेवरून आह्मांला— सत्पंथी लोकांना— आमच्या जातीवाल्या लोकांनीं जातीबाहेर टाकलें. हे हिंदुबाह्य असून मुसलमानांपैकीं आहेत असा त्यांनीं (लेवे पाटीदारांनीं) ठराव करून टाकला. हल्लीं आमचा त्यांच्याशीं रोटीव्यवहार बेटीव्यवहार होत नाहीं. बोवांनीं लेक्चर दिल्यानंतर ३ दिवसांनीं पाडळशाला ठराव पंचांनीं केला कीं, ' हे (सत्पंथी) लोक हिंदुबाह्य आहेत. त्यांच्याशीं रोटी बेटी व्यवहार करूं नये.' पूर्वीं झालेल्या सोयरिका त्यांनीं मोडून टाकल्या. सबब आरोपीनें आमची बेअब्रु केली अशी माझी फिर्याद आहे. आमचे ब्राह्मण, न्हावी हेहि बंद केले आहेत.

उलटतपासणीः—बोवाची ओळख ह्मणजे बोलणें चालणें अजूनपर्यंत कधीं झालें नाहीं. हे धर्मोपदेशक आहेत किंवा नाहींत याबद्दल मी कांहीं माहिती मिळविली नाहीं. हे खंडेरावच्या मठाच्या

गादीचे मालक मयत झाले त्यांचे शिष्य ह्मणून गादी चालवित आहेत, हें मला माहीत आहे. माझी स्वतःची विटंबना केली त्याचप्रमाणें पंथांची विटंबना केली असें माझें ह्मणणें आहे. बधू जाना महाजन माहितीचे आहेत. त्यांना मरण्यास १०।१२ वर्षें झालीं असतील. हे आमच्या पंथापैकीं होते. हा पंथ पाळल्याबद्दल बधू महाजनला २२३५ रुपये दंड जातीनें केला होता कीं नाहीं मला माहित नाहीं. देवचंद तोताराम माझा चुलत भाऊ आहे तो आमच्याच पंथाचा आहे. बोवांनीं या पंथाबद्दल चर्चा केली त्याचे अगोदर जातीमध्यें हा धर्म मुसलमामी आहे अशी चर्चा कधीं निघाली नाहीं. आमच्या जातीच्या पंचायती पाडळसें तालुके यावल येथें होतात. मी ४।५ महिन्यापूर्वीं झालेल्या पंचायतीलाच गेलों होतों. त्यापूर्वीं कधीं गेलों नव्हतों. गेल्या पंचायतीला आमच्या जातीचे (सत्पंथी व इतर) ५००० लोक हजर होते. पंचाइत भरविण्याबद्दल खबर माहिती दीड महिना अगाऊच दिली होती कीं नाहीं माहीत नाहीं. पाडळशाला एक व्यवस्था करणार असतो. त्याचें नांव भिकू पाटील आहे. त्याला कुटुंब नाईक ह्मणतात. पंचायतींत जो ठराव झाला तो लेखी झालेला असून छापलेला आहे. तो ठराव मी स्वतः पाहिला नाहीं. दुसऱ्यानें वाचलेला मात्र मी ऐकिला. वाचणारा इसम कोण होता ओळखीचा नाहीं त्या ठरावांत " हा धर्म हिंदुबाह्य आहे ह्मणून यांच्याशीं (सत्पंथ्यांशीं) रोटीबेटीव्यवहार करूं नये असें लिहिलेलें मी वाचतांना ऐकिलें. त्या ठरावांत बोवाचा संबंध कांहींच नमूद केलेला नाहीं. पंचांनीं ज्यांना आमच्यांत रहावयाचें असेल त्यांनीं हा पंथ सोडावा ह्मणून ठरविलें व कांहीं लोकांनीं पंथ सोडतो ह्मणून

सह्याहि केल्या. पंचायतींत बधू महाजननें हा पंथ सोडला आहे किंवा त्याबद्दल त्यावेळीं चर्चा झाली होती, असें भाषण पंचायतींत झालें नाहीं. आमच्या पंथाचें सर्व शास्त्र मला माहीत नाहीं. पण आचारविचार जे पाळावे लागतात ते माहीत आहेत. अनवरे हिदायत हें पुस्तक मी वाचिलें नाहीं. आरोपीचें व माझें स्वताचें वांकडें नाहीं. ईमामशाहा मुसलमानांच्या १२ पैगंबरापैकीं एक पैगंबर आहे असें मला माहीत नाहीं. आमची गादी पिराणा येथें गाहे. पिराणा अहमदाबाद जिल्ह्यांत आहे फैजपूरला आमच्या पंथाची एक धर्मशाळा आहे. त्या धर्मशाळेंत धर्मा ह्मणून एक इसम गादीवर आहे. धर्मशाळेंत गादी आहे. धर्मा लेवा पाटीदार सत्पंथी आहे. त्याचा व आमचा रोटीव्यवहार आहे. बहादरपूर–बऱ्हाणपुराजवळ– येथें या पंथाची दुसरी गादी आहे किंवा नाहीं मला माहिती नाहीं. तिकडे धर्मा जात नाहीं; व मुसलमान लोकांत जेवणखाण करीत नाहीं हें मला माहीत आहे. लेवा पाटीदार लोकांपैकीं (सत्पंथी नव्हत) कांहीं मुर्दे जाळतात, कांहीं गाडतात. आमचे सत्पंथी मुळींच मुर्दे जाळत नाहींत. गाडतात. जाळण्याची मनाई आहे किंवा कसें मला माहीत नाहीं. आमच्या पंथांतील लोकांच्या व इतर लेवे पाटीदार लोकांच्या मुर्दे गाडतांना ठेवण्याचे वगैरे पद्धतींत फरक असतो. मुसलमान लोक मुर्दे कसे ठेवतात हें मला माहीत नाहीं. हंबर्डीला गांवप्रयोजन झालेलें मला माहिती नाहीं. हिंदु लोक जेवण्याचेवेळीं पुंडलीक वरदे हरी विठ्ठल म्हणतात. हंबर्डीसा जेवण्याचे वेळीं 'ईमामशाकी जय' असें ह्मटलें किंवा नाहीं मला माहीत नाहीं, मुसलमान लोक चांदण्याचे पंधर-

वाड्यांत उपास करतात. पुनः सांगतों करतात कीं नाहीं, मला माहीत नाहीं. या (चांदणें) पंधरवाड्यांतील गुरुवारीं उपास करतात कीं नाहीं मला माहीत नाहीं. आमच्या पंथांत शु० २ द्वितीयेस उपास करतात. वद्य द्वितीयेस करीत नाहींत. दुसरे लेवे पाटीदार शु० २ द्वितीयेस उपास करतात कीं नाहीं, मला माहीत नाहीं. फैजपुरला धर्मशाळेंत आमच्या पंथाचे लोक नेहमीं जमतात. धर्म राहतो त्या धर्मशाळेंत आमची पूजा होते. त्यावेळीं आमच्या पंथांत नसतील त्यांना तेथें बसण्याची परवानगी नसते. त्या धर्मशाळेंत सत्पंथी लेवे पाटीदार यांनांच जाण्याची परवानगी आहे. इतर जातीचे साळी वगैरे सत्पंथी यांना परवानगी नाहीं. पिराणा येथें मी स्वतः कधीं गेलों नाहीं. कांहीं ब्राह्मणांना ईमामशाहा यांनीं काशीला जातांना कांहीं तरी चमत्कार दाखविला व त्यामुळें ब्राह्मणांनीं जानवीं काढून ठेविली अशी हकीगत आमचे पंथांतील पुस्तकांत असलेबद्दल मला माहिती नाहीं. आमच्या पंथांत एखादा इसम मेला तर अकराव्या दिवशींच क्रियाकर्मांतर करतात. ४० व्या दिवशीं करीत नाहींत. काशिराम कोल्हा व तानु हुला यांना मी ओळखतों. हे पूर्वींहि सत्पंथी नव्हते व आतांहि नाहींत. हुना (पुना) रामजी वायकोळा यांस ओळखतो. त्यांनीं पाडळसें येथें सत्पंथी धर्म सोडला नाहीं. तो मला समजतें तेव्हांपासून पाहतों, या पंथांत कधींच नव्हता. डोंगर वायकोळा यास ओळखतो. तो सत्पंथी होता कीं नाहीं आठवत नाहीं. शामू किरंगा माझा भाऊबंद आहे. या पंथांत आहे किंवा नाहीं मला माहीत नाहीं. पण त्याला धर्मशाळेंत कधींच पाहिलें नाहीं. पाडळशाला सत्पंथांतून इकडे ह्मणजे सत्पंथ सोडून किती लोक

गेले मला माहीत नाहीं. बोवांनीं तूं गोभक्षक आहेस, मोमन आहेस, तूं संतपंथी आहेस, असें विधान माझ्याविरुद्ध केलें. बाकीं विधानें सत्पंथाविरुद्ध केलीं. बाजा वाजविण्यास २ मुसलमान होते. ते माझ्या ओळखीचे नाहींत. आमच्या गांवचे होते किंवा दुसरे गांवचे होते ओळखत नाहीं. त्यांनां पूर्वीं कधीं मी पाहिलें नाहीं. हीं विधानें माझ्या दारासमोर घरापासून १०।१२ हातांवर रस्त्यांत केलीं. त्यावेळीं तेथें ५।५० लोक जमा झाले होते. त्या लोकांपैकीं दिलेल्या साक्षीदाराशिवाय बाकी कोणाचें नांव सांगतां येणार नाहीं. रामु गंगाराम व काशिराम कोल्हा यांचीं घरें ५।६ घराआड आहेत व रामूचें घर ६ घराआड आहे व काशिरामचें ७ वें घर आहे. बोवांनीं विधान केलें त्यावेळीं हे लोक घरीं होतें कीं नव्हते मला माहीत नाहीं. माझ्या शेजारीं रामचंद्र लहानूचें—माझ्या भावाचें—घर आहे. तो त्यावेळीं घरीं नव्हता. बोवा माझ्या दारासमोर पावपासून अर्ध्याघंट्यापर्यंत उभे होते. गांवांतले लेक्चराबद्दल कांहीं माहिती त्या दिवशींच कळली. कांहीं माहिती दुसऱ्या दिवशीं कळली. गांवांत ५।६ ठिकाणीं बोवांनीं लेक्चरें दिलीं. पिंपरूड दरवाजाजवळ शिवदिन कलाल याचे घराजवळ दिलें दुसरें हजिऱ्याच्या जवळ! तिसरें तोतारामबधुच्या दरवाजासमोर! चौथे शांमजी भाई भाटे याचे समोर व्याख्यान दिल्या-बद्दल मला माहीत आहे. फकीरखां यानें शिवदिनचे घराजवळील लेक्चर-बद्दल सांगितलें, सरवर यानें हजिऱ्याजवळील लेक्चरबद्दल सांगितलें. तोताराम बधुच्या घराजवळील लेक्चराबद्दल व शामजी भाव्याचे घराजवळील लेक्चराबद्दल तोताराम बधु यानीं सांगितलें. या चारहि ठिकाणीं माहिती देणाऱ्या इसमाशिवाय आणखी कोण कोण होते

याची माहिती मी फिर्याद देण्यापूर्वीं मिळविली नाहीं. फकीरखांनें शिवदिनचे घराजवळील व माझ्या दारासमोरील लेक्चराबद्दल माहिती सांगितली. माझ्या घरासमोर लेक्चर झालें तेव्हां फकीरखां समोरच बसला होतां. बोवा गेल्यावर त्यानें मला लेक्चराबद्दल माझे घरासमोरील माहिती सांगितली. मी होऊनच त्याला विचारिलें कीं, बोवा असें असें बोललें हें तुझी ऐकिलें काय? तो ह्मणाला होय.

उलट तपासणीः—कोर्टाचा वेळ झाल्यानें तूर्त तहकूब.

मुा जळगांव — सही इंग्रजी

तारीख ३।५।२३ — Sd. **जी. एस्. राज्याध्यक्ष,**

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

पुन्हां प्रतिज्ञेवर उलट तपासणी चालूः—

खंडेरावाच्या वाडीशीं पुष्कळ लेवा पाटीदार व इतर जातीचे लोक यांचा संबंध आहे. **मोमना शब्द खान्देशांत मुसलमान लोक वापरतात.** दुसऱ्या देशांतील मला माहीत नाहीं. मोमना शब्द खानदेशांत वापरतात. मोमीन व मोमना एकाच अर्थी शब्द खानदेशांत वापरतात. विणकरी लोकांना मोमीन ह्मणतात कीं नाहीं, मला माहीत नाहीं. मला आरोपी नांव घेऊन गोभक्षक असें ह्मणाला. मी या खटल्यांत वकीलमार्फत फिर्याद दिली आहे. माझें नांव घेऊन आरोपी गोभक्षक ह्मणाला ही माहिती मी फिर्यादींत लिहिण्यास सांगितली होती. वकिलांनीं लिहिली कीं नाहीं मला माहीत नाहीं. बोवांचें सर्व व्याख्यान माझ्या घरापुढील मला सांगतां येईल. आरोपी माझ्याकडे बोट करून ह्मणाला, "ये आनंदाभी सत्पंथी मोमीन

मुसलमान है. हम गोरक्षक है, ये सत्पंथी लोक गोभक्षक है." प्रति वाचून प्रथम असें बोलले व नंतर भाषणाला सुरुवात केली. हे (आ०) बोलल्यांवर मीहि बोललों. नंतर त्यांनीं दोन प्रती वाचून दाखविल्या. मग पुन्हां त्यांनीं लेक्चर दिलें नाहीं. चालते झाले एवढीच हकीगत झाली. फकीरखां भुरेखां याचा भाऊ नूरखां याच्या मुलीचें प्रेत इदु नांवाच्या मुसलमानानें अटकविलें होतें. त्याबद्दल खटला चालला. त्यांत माझी नूरखांतर्फे साक्ष झाली. फकीरखां व नूरखां निरनिराळे रहातात. घरदार वाटलेलीं आहेत. त्या खटल्यात फकीरखां आला असेल.

फेर तपासणीः—वर प्रेत गाडण्याबद्दल मी फरक सांगितला तो आह्मी (सत्पंथी) गांवाच्या उत्तरेला गाडतों व इतर लेवे पाटीदार दक्षिणेला गाडतात हा आहे.

मुा जळगांव — Sd. **जी. एस्. राजाध्यक्ष,**
तारीख ४।५।२३ — मॅ. वर्ग, पूर्व भाग

पुन्हां प्रतिज्ञेवर उलट तपासणीः—चॉर्जानंतर. Ex I A ची माहिती मला पत्रिका वाटल्या त्यापूर्वीं तीन आठवडे माहीत पडली. वाजंत्री वाजून वाटलीं. त्यापूर्वीं मला माझ्या पोराकडून माहीत पडलें. बोवांनीं लेक्चर माझ्या दारापुढें दिलें. त्यावेळीं मी दारापुढें बोवा येण्याचे-पूर्वीं १० मिनिटें उभा होतों. मी प्रथम बाहेर आलों तेव्हां फकीरख व भुरा पाटील हे फकीरखांच्या दारींच बसलेले दिसले. शिवदिन कलालाच्या घरापासून माझ्या घरापर्यंत येण्याला १०।१२ मिनिटें लागलीं असतील. हॅंडबिल वाटण्यापूर्वीं बोवाचें व माझें कांहीं बोलणें झालें नाहीं. बोवा मला ओळखत होते. मी सत्पंथी आहे असें बोवाला माझ्या समोर कोणी सांगितलें नाहीं. आमच्या पंथाची मुख्य पूजेची

जागा धर्मशाळा आहे. तेथें हिंदु देवाच्या मूर्ती नसतात. बोवांनीं लेक्चर दिलें. पुन्हां पाडळशाला पंचायत होणार असें बोवा ह्मणाले होते. त्या पंचायतींत तुह्मीं मुसलमान आहांत असें दाखवीन ह्मणून बोवा म्हणाले होते. पंचायतींत भिकू पाटील, पाडळशाचा कुटुंब नाईक यांनीं हे सत्पंथी गोभक्षक आहेत असा आक्षेप घेतला होता. तेव्हां तोताराम भाऊ, धोंडू शामा हे तेथें होते. खुशाल भाऊला मी पाहिलें नाहीं. तोताराम भाऊ आमच्या पंथाचे जास्त माहितगार पुढारी आहेत. भिकू पाटलाच्या सांगण्याला कोणी उत्तर दिल्याचें मला ऐकूं आलें नाहीं. सत्पंथापैकीं ईमामशाहीचे पंथापैकीं जे कुणबी लोक गुजराथेंत आहेत त्यांचा व आमचा पंथ सारखाच आहे. काका करमसीचा पुरावा झाला त्यावेळीं मी होतो. तोताराम भाऊ त्याचवेळीं अहमदाबादला आले होते कीं नाहीं मला माहीत नाहीं. जातगंगा काय आहे मला माहीत नाहीं. आह्मी प्रार्थनेला एका ठिकाणीं जमतो. तेव्हां "पजंतनमुस्कलसे असान करो" असा मंत्र आम्ही म्हणत नाहीं. गिरिधर माझा आतेभाऊ हा सत्पंथी असून त्यांचा बाप सत्पंथी नाहीं. हें पाडळशाच्या पंचायतीच्या पूर्वींपासून आहे. त्याचा (गिरिधरचा) चुलता कृष्णा हा सत्पंथी आहे. सरवर साक्षीदार कापडाचा धंदा करतो.

फेरतपासणीः—कुटुंबनाकाइच्या आक्षेपाला उत्तर देण्याला कोणाला परवानगी नव्हती. कोणी बोलूं नये असें सांगितलें होतें. लेक्चरापूर्वी बोवाची व माझी ओळख होती. २४।२।२३

शिक्का.

SD जी. एस. राजाध्यक्ष.
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.
खरी नक्कल.
(सही इंग्रजी)
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

Pamphlet: Swadharm, Palan Karo

Ex No. 1 A.

स्वधर्म पालन करो.

अमदाबाद जमालपुर फाटकसे दक्षिण ७ कोसपर पिराणा [इमामपुर] १ गाँव है। वहाँपर सयद इमामसाहेब मुसलमान फकीरका दरगाह है। उसके पश्चिम तरफ ऊपर लोहके पंजापर और दर्शन करनेके दूसरे फाटकपर उर्दूमें कुराणका कल्मा [हक्कलाह इलिल्लाह मुहम्मदरसूल इलिल्लाह] ऐसा लिखा है। उसीतरफ छोटीसी कुटीमें लोहेके पंजेपर करीव पावसेर जानवा रक्खा है जोकि इमामसाहेबनें ब्राह्मण आदि लोगोंको सतपंथी बनाकर उतार लियाथा। यह समाचार मैंने कार्तिक शुक्ल ८ शनिवार सं. १९७९ मि. को अपने नेत्रसे देख आया हू। सैयद गुलामहुसेन मुकाम पिराणा रहनेवालेने देखाया। वहाँका धर्म जो लोग मानते हैं। वेलोग गुजरातमे मोमना कहते है। यह बात सनातनी पाटीदारोंने हमको कहा है। हिन्दू लोगोसे सतपन्थी लोगोका विवाह खानापिना कुछभी सबन्ध नहीं है। खानदेशमें बडा अधर्म हो रहा है। ये मोमना [सतपन्थीलोग] कहते है की हमाराभी धर्म हिंद है अथर्ववेदमें है। इससे भोले लोग इनके संग-विवाह, खाना, पिना आदि संबन्ध करते है। मेरा कहना है कि ऐसा अधर्म नहीं करना चाहिये। इस और सरकारकोभी ध्यान देना चाहिये। ये लोग जो कुछ कुराणमें लिखा है वही धर्म पालन करते है। इसमे कुछ सन्देह नहीं। भावसार लोगोके विवादमें धुलीया कोर्टसे भी ता. १३ मासे फरवरी सन १८८३ में मुसलमानी धर्म सिद्ध किया गया है। शुभम्॥

Janva =

Dhulia Court Case 13-Feb-1883, in which it was decided that Satpanth is Muslim religion

बदरिकाश्रम ज्योतीमठस्थ नंदवाल संप्रदायी आत्मानंद ब्रह्मचारी

खण्डेरावकी वाडी

मु. फैजपूर पूर्वखानदेश.

Ex No. 1 B.

जाहीर खबर.

आम्ही पीराणा येथील सद्गुरु हजरत इमामशाहा सूत नरअली महंमदशाहा बोवा यांच्या गादीचे अधिकारी व सत्पंथ धर्मांचे धर्मगुरु काका लक्ष्मण करमसी हे खानदेशाच्या सर्व लेवापाटीदार जातीच्या लोकांस सूचना करीत आहों कीं, ब्रह्मचारी म्हणवून घेणारा आत्मानंद यानें एक जाहिरात "स्वधर्म पालन करो"

https://archive.org/details/bk147/page/n38/mode/1up

या नांवाखालीं प्रसिद्ध केली आहे व त्यांत पुष्कळ खोट्या नाट्या गोष्टी छापल्या आहेत. हें आमच्या लक्षांत आल्यावरून त्या कारणानें सत्पंथधर्माच्या अनुयायांस वाईट वाटून क्षोभ होण्यासारखें असल्याकारणानें खालीं लिहिल्याप्रमाणें खुलासा करण्याची जरूर वाटून तसें करीत आहोंत.

१ ब्रह्मचारी पिराण्यास येऊन सैयद गुलामहुसेन जवळून जी माहिती मिळविल्याचें सांगतो ती गोष्ट खोटी व निर्मूळ आहे. सैयद गुलामहुसेन ब्रह्मचाऱ्यास भेटल्याचें साफ नाकारितो. त्याचप्रमाणें सदहू संस्थानचे साधू वगैरे सदहू इसम आल्याचें जाणत नाहींत यावरून खास वाटतें कीं, हा ब्रह्मचारी पिराण्यास आलाच नाहीं अथवा आला असेल तर सामान्य भिकारी व साधु लोकांना जे सदाव्रत दिलें जातें त्यांच्या सोबत आला असावा. खरोखर जर त्याला कांहीं हकीकत मिळविण्याची जरूरी होंती तर त्यानें आम्हांस रूबरू भेटून प्रत्येक बाबतीचा समक्ष खुलासा करावयाचा होता. परंतु तसें करण्याचा सरळ मार्ग सोडून असली खोटी हकीकत अपरोक्ष रीतीनें मनस्वी मिळवून छापणें हें जर तो ब्रह्मचारी असेल तर त्यास शोभत नाहीं.

२ गुजराथेंत सत्पंथी धर्माचे लोक ज्या जातीचे आहेत त्या जातीचेच म्हटले जातात; आणि जे लोक "मोमना" या नांवानें ओळखले जातात त्यांची अमदाबाद व इतर गांवीं निराळीच जात आहे. आणि त्या लोकांबरोबर दुसरे सत्पंथी, पाटीदार वगैरे लोकांचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार होत नाहीं हें इकडील प्रत्येक रहिवाशी जाणत आहे.

३ कुराण हा सत्पंथाचा धर्मग्रंथ नाहीं व कोणींहि सत्पंथी कुराणास स्वतःचा धर्मग्रंथ मानीतच नाहीं. परंतु सत्गुरु ईमामशहा बोवांनीं लिहिलेले ग्रंथ "शिक्षापत्री" मुळबंध" "गोरंवाणी" वगैरे ग्रंथच स्वतःचे जीवनाचें आदर्शरूप व ग्राह्य मानतात व सदहू ग्रंथांत कोणत्याहि धर्माचा आधार घेऊन बोध न करितां फक्त सत्य आणि शुद्ध नीतींचाच बोध करण्यांत आलेला आहे. हें ग्रंथ वाचणाऱ्यास समजेल असें आहे.

४ सद्गुरु इमामशहा बोवांचे जे वंशज आहेत त्यांच्याशीं ह्या धर्मांतील हिंदू अनुयायी लोकांचा कोणत्याहि प्रकारचा संबंध अगर व्यवहार होत नाहीं. इतकेंच नव्हे पण त्या लोकांनां पीराण्याचे भंडारगृहांत (स्वयंपाकघरांत) जेव-

ण्यास बसविले जात नाहीं. परंतु इतर मुसलमान लोकांप्रमाणें भंडारगृहाबाहेर अन्न वाटलें जातें एवढेंच नाहीं, पण ज्या ज्या धर्मक्रीया केल्या जातात त्यांत सुद्धां ह्या लोकांचा कोणताहि संबंध येत नाहीं.

आम्ही वर निवेदन केल्याप्रमाणें हकीकत असून अशी खोटी हकीकत छापून आमच्या धर्मांतील लोकांचीं आस्था व धर्मश्रद्धा कमी करून स्वतःचा नीच हेतू साधण्याचा असावा हें स्पष्ट दिसतें आणि ह्मणून आम्ही ह्मणवून घेणाऱ्या ब्रह्मचाऱ्यास एक नोटीस देऊन जाहीर रीतीनें क्षमा मागण्यास कळविलें आहे. त्याप्रमाणें त्याजकडून तसें न केलें गेलें तर आमच्या धर्मानुयायी लोकांच्या हिताकरितां आम्ही कायद्याप्रमाणें सल्ला मिळेल तसे उपाय लगेच योजण्याची तजवीज करूं. इतकेंच नव्हे तर अशा प्रकारचे दुसरे कोणीहि प्रयत्न करतील त्यांजवर देखील कायद्यानें योग्य ते उपाय योजिले जातील कारण अशा आक्षेपांची फिर्याद कित्येक वेळांपासून आमचे धर्मानुयायांकडून आम्हाकडेस येत आहे, आणि असल्या फाजील लोकांपासून त्यांचें रक्षण करणें हें आमचें कर्तव्य आहे कळावें.

काका लक्ष्मण करमशी सही दा. पोते.

Ex. No. 1 C.

जाहेर खबर.

अमो सैयद गुलामहुसेन मु. पीराणा आ लेख उपरथी जाहेर करीये छीये के कहेवाता बद्रिकाश्रम ज्योतीर्मठस्थ नंदलाल संप्रदायी आत्मानंद ब्रह्मचारी खंडेरावकी वाडी मु. फैजपुर (पूर्वखानदेश) नाये " स्वधर्म पालन करो " एवा मथाळा निचे बाबजी प्रिंटिंग प्रेस, जलगावमां छपावी जे पत्रीका याने जाहेर खबर छपावी छे ते अमोये वांची छे अने खात्रीपूर्वक जणावीये छीये के तेमां लखेली तमाम हकीकत खोटी छे अने खानदेशनां लेवा पाटीदारोमां तकरारो उभी करी पोतानो स्वार्थ साधवाना खोटा हेतुथी प्रसिद्ध करेली छे. अमो आ कहेवाता ब्रह्मचारीने ओळखता नथी, तेमज तेनी साथें कोई वखत जाई तेना लख्या मुजब पीराणाना दरगाहो उपरना लेख वंचाव्या नथी अने खात्रीपूर्वक अमो जणावीये छीये के उपर जणावेली पत्रीकामां जणाव्या प्रमाणेना कुराणना कलमा पीराणा दरगाहना दरवाजा अथवा पंजा उपर कोई ठेकाणे लखेला नथी, जे हरकोई माणस आवी जोई शके छे. वली सत्पंथना गुजराथमां

कहेता लेवा तथा कडवा पाटीदार विगेरे अनुयायीयोमां तेओनी नात जातमां छूटथी वेहेवार करवामां आवे छे अने ते लोको जे जातना होय ते जातनाज कहेवाय छे. सतंथी लेवा, कडवा पाटीदार लोग "मोमना" कहेवाता नथी. तेमज सदर लोकोना तमाम आचार विचार हिंदुनोज होय छे. ता. ३०-११-१९२२

सैयद गुलामहुसेन सही दा. पोते. मुकाम पीराणा.

Ex. No. I D.

स्वधर्म पालन करो.

जो मार्गशीर्ष शुद्ध ३ को पत्रिका निकली गयी है इसके पुष्टीमें गुजरात देशका मुख्य क्षेत्र संस्थान डाकोरजीसे वैदिक सनातनधर्माध्यक्ष श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य गुरुवर्य श्रीयुत स्वामी वामनाश्रम दामोदराश्रमजी महाराजने पिराणा (इमामपुर) के धर्मपालक प्रजाओंके लिये जो कुछ लिखे है सो अपने सनातन धर्मपालक प्रजाओंके आगे न्योछावार करता हूं.

मु. डाकोर श्री ता. १९-११-२२

ठे. आनन्दाश्रम मठ गोमती उपर

रा. रा. ब्रह्मनिष्ठ ब्रह्मचारीजी, आत्मानन्दजी, तथां आपना शिष्यसेवक मंडलमां आबाल वृद्ध मु० फैजपुर ली० स्वामी वामनाश्रम दामोदराश्रम ना नारायण स्मरणपूर्वक दीर्घायुष्य आशिर्वाद । तमारो वदी १० नो पत्र मल्या, वांची, लखवानु के हींमत राखी निःशंक होयके काम करो। कारण पिराणा नो धर्म, तदन मुसलमानीज छे । ते पंथमां बे शाखाओ छे । एक शाखामां हिंदुओ साधुतरीके काकाना नामथी माथे भगवुं वस्त्र बांधी होय छे । ने मंदिरमां घीनो अखंड दीवो राखे छे । ने धूपआरती लोहवानथी करे छे । देखाया मात्र हिंदू छे पण तेना आचारविचार तदन मुसलमान छे । ने तेमां केटलाक हलकी जातना हिंदुओ होय छे । जेवाके भील, मोची, देड, गोला, विगैरे तथा केटलाक सारा उच्च जातना माणसो हसे । पण ते विचारा खरी हकीकत जाणता नथी । माटे ते पंथमा मलेला छे । बीजी शाखा मुसलमानज छे । तेनो आचार विचार मुसलमान छे । आवावत जग जाहेर छे । ते पंथना पुस्तको मुसलमानीज छे । आ पंथमाटे आज पंथना माणसे जाहेर खबरो नोटिसो, केटलाक वखत वहार पाडेली हती । छतां केटलाक भ्रष्ट हिंदुओ आ धर्म पाले छे । आकरता सुन्नत करावी मुसलमान थई मुसलमान धर्म पाले ते सारो छे । ने तेमाज कल्याण

छे । माटे निडर रही काम करजो । राग द्वेष ते रहीत थईने ने राजराजेश्वर मुंबई छे । एम पेपरमां छे । सिरनामु मारे पासे नथी । आ पंथ मुसलमानी छे । ते जगजाहेर गुजरातमां छे । आ बाबतमां जेटली सलाह मदत जोइये तेटली लखवी द० पोतेना आशिर्वाद । मु० फैजपूर-रा. रा. ब्र० ब्रह्मचारीजी आत्मानन्दजी ने पहोचे ठे० खंडेरावनी वाडीमां पो० फैजपूर जिला पूर्व खानदेश स्टेशन-सावदा, भुसावल स्टेशनथी बीजा स्टेशन ।

ॐ

सनातन धर्म पालन प्रजांचा विजय

फौजदारी मुकदमा नं. ६७ सन १८८२

हरचंद दोधू व देवचंद लहानु रंगारी वरूती शिरपूर

हे सगळे मोमन लोक (सतपंथी फिर्यादी आहेत.)

भीकन गदु व शिवराम देवाजी व हमला कृष्णाजी व

रामचंद्र नथू व रामचंद्र सदू रंगारी

हे सगळे सनातन धर्म पालक हिंदु लोक आरोपी आहेत.

धुळें कोर्टांतून झालेला ठराव.

१ फिर्यादीतर्फे आमचें मत नास्तीपक्षी आहे.

२ आरोपीतर्फे आमचें मत जास्त पक्षी आहे. यावरून असा हुकूम होत आहे कीं, आरोपी यांनीं वरज केले आहे ते बरोबर आहे. व आरोपी यास वर्ज करण्यास अधिकार आहे. यास्तव असा हुकूम होत आहे कीं, आरोपी यांस कलम १२२ अन्वयें गुन्हा शाबित न झाल्यामुळें त्या सर्वांस निर्दोष सोडले आहे.

ता. १३ माहे फरवरी सन १८८३.

Ex. No. I E.

Prabodhchandrika

प्रबोधचंद्रिका

(जळगांव-तारीख ४ माहे डिसेंबर सन १९२२ चा अंक पान ६)

जळगांव

खानदेशांत कांहीं हिंदू म्हणविणारे व भावसार लोक सत्पंथी धर्माचे आहेत. परंतु हा धर्म मुसलमानी मताचा आहे अशा लोकांशीं (सतपत पंथाशीं)

खऱ्या हिंदुनीं व भावसार लोकांनीं संबंध ठेऊं नये. याबद्दल फैजपूर येथील रहाणारे आत्मानंद ब्रह्मचारी नांवाचे एक बैरागी गृहस्थ प्रतिपादन करीत आहेत. सतपंथी हा धर्म मुळींच हिंदू लोकांत नाहीं. हा धर्म निवळ मुसलमानी धर्मांचा भाग आहे, ही गोष्ट तारीख १३।२।१८८३ रोजीं धुळें कोर्टांत शाबिती झाली आहे. तेव्हां जे हिंदूलोक सतपंथाच्या लोकाशीं विवाह खाणें पिणें वगैरे गोष्टींनीं संबंध ठेवतात तो त्यांनीं ठेऊन अधर्माची प्रवृत्ति करूं नये अशी त्यांची विनंति आहे.

निशाणी नंबर २.

प्रॉसिक्यूशनतर्फे साक्षीदार नं. १ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं:—माझें नांव:—रामकृष्ण बापाचें नांव नारायण फडणीस. धर्म जात—ब्राह्मण उमर सुमारें २४ वर्षांची धंदा—छापखान्यांत मॅनेजर, बाबजी प्रिंटिंग प्रेस. राहण्याचा गांव जळगांव डि॰ पूर्व खानदेश.

सर तपासणी:—बाबजी प्रिंटिंग प्रेसचे मालक नारायण नृसिंह (नरसिंह) माझे वडील आहेत. मी मॅनेजरचें काम करितों. आमच्या छापखान्याच्यामार्फत प्रबोधचंद्रिका वर्तमानपत्र छापलें जातें. या पत्राचे प्रिंटर व पब्लिशर नारायण नृसिंह (नरसींह) हे आहेत. याशिवाय इतर जाहिराती वगैरे छापल्या जातात. (Ex. I A.) ची जाहिरात. 'स्वधर्म पालन करो' आमच्या छापखान्यांतून छापली गेली. हिच्यावर तारीख नाहीं. तरी पावतीबुकावरून सांगतों कीं २०।११।२२

ला छापली गेली. पैसे घेऊन काम द्यावयाचें त्याप्रमाणें त्यादिवशीं त्यांनां काम दिलें. आरोपी ओळखतों. महाराज (आरोपी) यांनींच ही जाहिरात छापण्यासाठीं मजकडे आणली.याच्या(आ०च्या)बरोबर कोणी नव्हतें. मी छपाईचा वगैरे करार महाराजांशींच (आ० शींच) केला. किती प्रती काढल्या हें मी पावतीबुकावरून सांगूं शकत नाहीं. अजमासें २०००।४००० प्रति काढल्या असतील ड्राफ्ट महाराजांनीं आणला. त्याबरहुकूम जाहिरात छापली. मी जास्त कमी मजकूर घातला नाहीं. मी प्रुफ तपासण्यासाठीं महाराज यांना दिलें नाहीं. या जाहिरातीचें ओरिजिनल(Ex. 1 A. चें)मजजवळ नाहीं.प्रुफकॉफी मी महाराज यांचे जवळून तपासून घेऊन त्यांच्या मजकुराबरहुकूम हें छापलें आहे; म्हणून त्यांवर महाराजांची सही घेतली आहे. ती मी हजर करितों.(Ex. 2 A.)* ही महाराजांनीं छापखान्यांतच तपासली. दुसरी स्वधर्म पालन करो ही जाहिरात(Ex. 1 D.)माझ्याच छापखान्यांत छापली आहे. ही छापून घेण्यास महाराजच आले होते. ड्राफ्टहि महाराज यांनींच केला.तो ड्राफ्ट मी यावल कोर्टांत हजर केला होता. तो ड्राफ्ट मी हजर करितों. (Ex. 2 B.)† यावर ३००० कॉपीज काढल्या असा शेरा आहे. यावेळींहि महाराज एकटेच आले होते. पैसे यांनींच चुकते केले. पावत्या त्यांनां दिल्या. त्याची काउं-

---

* पान १८ मध्यें दिल्याप्रमाणें 'स्वधर्म पालन करो' या मथळ्याची आरोपीनें प्रसिद्ध केलेली जी प्रत आहे, तिची छापखान्यांत दिलेली, आरोपीची सही असलेली मूळ प्रत.

† पान २१।२२ मध्यें दिल्याप्रमाणें 'स्वधर्म पालन करो' या मथळ्याची जी मोठी प्रत आहे तिचा आरोपीचें हस्ताक्षर असलेला ड्राफ्ट.

टर फाइल्स मजजवळ आहेत. ते मी हजर करितों(Ex. 2 C. & D.)* ExIE चे अंकांतील स्फुट लेख आह्मी हँडबिलें छापिलीं त्या माहिती-वरून आह्मी छापिला.

उलटतपासणी:—हा लेख लिहिण्याचा मला कोणी सांगितलें नाहीं. ४।५।२३

S. D. जी. एस्. राज्याध्यक्ष,
मुाा जळगांव मॅ. वर्ग १ पूर्वभाग

शिक्का

खरी नक्कल
(सही इंग्रजी)
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर ३.

प्रा० तर्फे साक्षीदार नं. २ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव महमद सरवर बापाचें नांव गुलमहमद धर्म मुसलमान जात मोमीन उमर सुमारें ४० वर्षांची. धंदा कपडे विकण्याचा रहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पूर्व खानदेश

---

* बाबजी प्रिंटिंग प्रेसचें पावती बुक. (रु. १२–०–० ची पावती) व (रु. १०–०–० ची पावती).

सर तपासणीः—फिर्यादी आरोपी ओळखतों. फैजपूरला बाजार-गल्लींत माझें दुकान आहे. त्या गल्लींत मी बोवांना एकदां पाहिलें होतें. ४।५ महिने झाले असतील बुधवार बाजारचा दिवस होता. हे ताशे वाजवीत आले व माझ्या दुकानासमोर चौक आहे तेथें आल्यावर ताशे बंद करून त्यांनीं लेक्चर दिलें. मला थोडें थोडें वाचतां येतें. मला आतां दाखविली Ex I A अशी, व एक लांब प्रत अशा दोन प्रती वाटीत वाटीत बोवा आले. लेक्चर दिलें व वाटीतच गेले. फिर्यादीचें घर मोठ्या बाजाराकडे आहे. " फैजपूरमें बडा अधर्म हो रहा है. सत्पंथी लोक मोमना ह्मणजे मुसलमान है. सत्पंथी लोक गोभक्षण करते है व हम लोक गोरक्षण करते है. हिंदु लोकोंसे यही विनंति है कीं, ये लोकोंका हमका खानापिना बेटीव्यवहार करना नहि," असें लेक्चर देऊन खंडेराव महाराजकी जय करून हे चालले. मोमीनलाच मोमना ह्मणतात. ही मुसलमान धर्मांतील जात आहे. हिंदूंत मोमीन अगर मोमना असल्याबद्दल मला आजपर्यंत माहीत झालें नाहीं. माझा सत्पंथी लोकांशीं आजपर्यंत रोटीव्यवहार बेटीव्यवहार कधीं झाला नाहीं. बाजारांत अगर मांस विकलें जातें तेथें एका तरी सत्पंथी इसमानें गाईचें मांस घेतलें असें मी पाहिलें नाहीं. मजजवळ एक नशिरखान रोहिला बसला होता. त्यानें दोन्ही जाहिराती वाचल्या व मी ऐकल्या. मी स्वतः वाचल्या नाहींत.

उलटतपासणीः—मुसलमान सत्पंथी असला तर त्याच्याशीं मी रोटीबेटी व्यवहार करणार नाहीं. मुसलमान लोकांत सत्पंथी असतात कीं नाहीं मला माहीत नाहीं. मुसलमानांत खां, पठाण, सय्यद वगैरे

पोटजाती आहेत. पोटजातीचे लोक त्यांच्या त्यांच्या जातींतच बेटीव्यवहार करतात. मुसलमान म्हणून पोटजातहि आहे. मुसलमान धर्म तर आहेच. पण शेख, पठाण याप्रमाणें मुसलमान हीहि एक पोटजात आहे. मोमीन म्हणजे विणणारे लोक. मोमन शब्द अलग आहे. मोमीन व मेमन अलग अलग आहेत. आम्हांला मोमना असें म्हणतात, मोमीन म्हणत नाहींत. मोमना व मोमीन एकच शब्द आहेत. पण मेमन हा शब्द निराळा आहे. मोमना म्हटल्यास मी माझा जातिवाला समजेन. शेख पठाण इतर जातिवाला समजणार नाहीं. महाराज २-३ मिनिटें लेक्चर देत होते. त्या जागेवर ५।७ मिनिटें (आरोपी) महाराज उभे होते. हँडबिल त्यांनीं तेथें वाचलें नाहीं. नुसतें वाटलें. मी वर सांगितलें इतकेंच व हेच शब्द महाराज तेथें बोलले. एकाच वेळेला हे शब्द ते बोलले. मला आतां शब्द बोलून दाखविले तर मी तेच शब्द बोलून दाखवील. ही हकीगत मी फिर्यादीजवळ सांगितली. मी होऊन त्यांना सांगितली. लेक्चरानंतर १-१॥ घंट्यांनीं सांगितली. अमुक अमुक लोक तेथें जमा झाले होते अशीं नांवें मी फिर्यादीला सांगितलीं नाहींत. ५-५० लोक जमा झाले होते. नशीर रोहिल्याची व माझी नेहेमीं बैठक असते. नशीरशिवाय आणखी तेथें कोण होते, याची मला आठवण नाहीं. आमच्यांत प्रेताचें डोकें गाडतांना उत्तरेस करतात. ताशेवाले वाजविणारे तिघेजण होते. कोणत्या गांवचे होते माझा ख्याल नाहीं. फिर्यादी म्हणाला त्यांनीं येथेंहि लेक्चर दिलें. मग त्यानें आणखी कांहीं सांगितलें नाहीं.

फेरतपासणी:—नाहीं

४।५।२३

SD जी. एस्. राज्याध्यक्ष.

मॅ. वर्ग १ पूर्वभाग

शिक्का

खरी नक्कल

सही (इंग्रजी)

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर ४.

प्रॉसिक्यूशनतर्फे साक्षीदार नं. ३ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं:—माझें नांव भुरा बापाचें नांव मुन्हा धर्म हिंदु जात लेवे उमर ५७।५८ वर्षांची. धंदा शेतीचा, रहाण्याचा गांव आमोदें डिस्ट्रिक्ट पूर्व खानदेश.

सर तपासणी:—फिर्यादी आरोपी ओळखतो. माझा श्रीराम पंथ आहे. फिर्यादीचें घर मी पाहिलें आहे. सुमारें ४॥ महिने झाले असतील, फिर्यादीचे घराजवळील आरोपी हे आठवडे बाजारांतून वाजंत्री व पुष्कळ समुदाय यासह आले. यांनीं येऊन हात वर करून वाजंत्री बंद केली. नंतर यांचे जवळ कांहीं कागद होते. ते त्यांनीं (आ०) वाचून दाखविले. नंतर ह्मणाले, " हिंदु लोगोंकू

हमारी ये विनंति है कीं ये सत्पंथी लोक मोमना ह्मणजे मुसलमान जातके है. ये गोभक्षक है." " आनंदा फिर्यादी त्यावेळीं समक्ष होता. " हम गोरक्षक है " असेंहि हे म्हणाले. नंतर आनंदाकडे हात करून हे आरोपी म्हणाले " उसमेका मुसलमानी जातमेका येभी आनंदा है. ये गोभक्षक है." आनंदा ह्मणाला " महाराज ऐसा कैसा आप बोलते हो " महाराज त्याला त्वेषानें ह्मणाले, ' अबी दो दिनमें इसका अजमास तेरेकू बताता हूं. पाडळसेमे तेरे जातवाले जमते है व्हा तेरेकू मुसलमीन ठराता हूं.' मला (Ex I A) ची जाहिरात दाखविली. ही जाहिरात व (Ex I D) ची आतां दाखविली ती, अशा जाहिराती दोन बोवांनींच तेथें वाटल्या होत्या. मी त्यावेळीं तेथें तांबटाचे घरीं दुपारी १२ चे सुमारास तांब्याला डाग देण्यासाठीं गेलों होतों. त्या दिवशीं बुधवार होता. फैजपूरचा बाजार बुधवारीं भरतो. फिर्यादीचें घर व तांबटाचें घर २० कदमावर ह्मणजे आमने सामने असून मधें फक्त रस्ता आडवा आहे. माझें व बोवांचें कांहीं भाषण झालें नाहीं. फिर्यादीचें व माझें बोलणें झालें. बोवा निघून गेल्यानंतर फिर्यादी मला ह्मणाला, " कांहो, पाटील हें तुह्मीं ऐकिलें कां काय बोवा ह्मणतात तें?" तेथें असलेल्या हजर लोकांनीं, हो आह्मीं ऐकिलें असें सांगितलें. मीहि हो म्हणालो. त्यानंतर दोन दिवसांनीं पाडळशाला पंचायत भरली होती. पंचायत होण्यापूर्वीं सत्पंथी व आम्ही इतर पंथी यांचेमध्यें रोटीबेटी व्यवहार होत असे. आमच्यांत अनेक पंथ आहेत. पण रोटीबेटी व्यवहार होतात. पंचायतींत ठरलें. जात अलग करून टाकली, याचें खाणेंपिणें बंद केलें, बोवांचें सांगणें

वरून. लेक्चरें दिलीं, जाहिराती वाटल्या त्यांवरून हे सत्पंथी मुसलमान असून गोभक्षक आहेत असें ठरवून यांचे व्यवहार बंद केले. पंचायतींत बोवा आले नाहीं. सत्पंथी लोकांनीं साहेबाकडे अधिकाऱ्याकडे तारा केल्या होत्या. दंगा होण्याची वेळ आहे ह्मणून तारा केल्या होत्या. महाराज यांना आमच्या पक्षाच्या लोकांनीं येऊं दिलें नाहीं. तारा केल्यावरून अधिकारी लोकांनीं काय केलें हें मला माहीत नाहीं. आतां आह्मी सत्पंथी लोकांशीं सोयरिका करूं शकणार नाहीं. पाणीसुद्धां पिणार नाहीं. ज्यांचा आमचा संबंध अलग करून टाकला त्याचेकडे आह्मी पाणी पिणार नाहीं. ज्या सत्पंथ्याकडे आमच्या मुली दिल्या त्या आह्मी माहेरवासाला आणणार नाहीं. त्या मुली आह्मांला मेल्या, आह्मी त्यांना मेलों.

उलट तपासणीः—तारा झाल्या, बोवांना आमच्या लोकांनीं पंचायतींत येऊं दिलें नाहीं, ही माझी बातमी ऐकीव आहे. प्रत्यक्ष माहितीची नाहीं. या गेल्या पंचायतीला मी गेलों होतों. पंचायत एक दिवस चालली. आमच्या पंचायतींत प्रत्येक मनुष्याला आपली बाजू पुढें ठेवण्यास अधिकार असतो. त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्य आपलें ह्मणणें उभें राहून पंचापुढें मांडतो. गेल्या पंचायतींत कोणी उभें राहून बोवांनीं लेक्चरें दिलीं वगैरे पंचांना सांगितलें नाहीं. या पंचायतींत ८०।९० घरें या सत्पंथीं धर्मामुळें आमच्या जातीपैकीं दूर झालेलीं आहेत. जे सत्पंथी पंथ सोडावयाला तयार असतील त्यांना जातींत घेऊं असें पंच ह्मणाले. सत्पंथी पंचायत झाली त्यावेळीं ८०।९० घरें होतीं व त्यांनांच पंचानीं तुह्मी पंथ सोडा नाहीं तर आम्हीं तुह्माला दूर करितों असें सांगितलें. त्या पंचायतींत सत्पंथ

कोणी सोडला नाहीं. त्यानंतर कोणी पंथ सोडला अशाबद्दल सह्या करून दिल्या कीं नाहीं मला माहीत नाहीं. मी स्वतः कधीं सत्पंथी नव्हतों. माझें कुटुंबहि नव्हतें. मकडू मुन्हा हा माझा सखा भाऊ आहे. तो पंचायतीला होता. तो पूर्वीं सत्पंथी नव्हता. एकाच कुटुंबांतील बापाला सत्पंथी होता येतें व मुलगा सत्पंथी होत नाहीं. ह्मणजे वाटेल त्याला हा पंथ स्वीकारतां येतो. मला स्वतःला या पंथाची माहिती नाहीं. हा पंथ मुसलमानी धर्म आहे असें बोवांनीं जाहिराती वाटल्या तोपर्यंत माझ्या ऐकिण्यांत नाहीं. संवत् १९६२ च्या पंचायतीला मी नव्हतों. पंचाचे ठराव, पंचायतींत कांहीं नियम झाले, तर गांवोगांव जेथें आमचे जातवाले आहेत तेथें माहितीसाठीं येतात. संवत् १९६२ चा ठराव—सत्पंथी मुसलमान आहेत वगैरे—आमच्या गांवाला आला होता कीं नाहीं माहीत नाहीं. त्यावेळीं माझी कारकीर्द नव्हती. दुसरे, गांवचे पंच होते. त्याकडे आला असल्यास माहीत नाहीं. बधू जानाचा दंड झालेला आहे ही गोष्ट मला माहीत नाहीं. मी आमोदें गांवचा जातीच्या पंचांपैकीं मुख्य, ५।७ वर्षांपासून आहे. त्यापूर्वीं वडील भाऊ आणखी दुसरे हे होते. तोताराम—साक्षीदार—हा बधू महाजनाचा मुलगा आहे. पंचायत भरावयाची आहे अशाबद्दल माहिती—आमंत्रण—पंचायतीपूर्वीं १।२ दिवस आलें होतें. चिठी आली होती किंवा तोंडी निरोप होता हे लक्षांत नाहीं. गांवाला आमंत्रण पंचायतीपूर्वीं १।२ दिवस अगोदर आलें होतें. हें मी दुसऱ्याच्या सांगण्यावरून प्रतिज्ञेवर सांगतों. कोणाच्या तक्रारी असल्या किंवा कांहीं नियम करावयाचे असले तर पंचायत भरली जाते.

गेली पंचायत सत्पंथी पंथाबद्दल तक्रारी अर्ज आल्यावरून भरली आहे, असें मला तेथें गेल्यावर कळलें. लेखी अर्ज मला तेथें दिसला नाहीं. भिका सवंदू पाटील यांनीं उभें राहून सांगितलें कीं, या सत्पंथाबद्दल अशा दूषित वार्ता येत आहेत व हे गोभक्षक आहेत, याबद्दल पंचांचें काय मत आहे सन १९१९ सालांत पंचायत झाली कीं नाहीं, मला माहीत नाहीं. आमंत्रण होतें कीं नाहीं हें स्मरणांत नाहीं. सन १९१९ सालचे ठराव आमच्या गांवाला सत्पंथाबद्दल आल्याचें मला माहीत नाहीं. गेल्या पंचायतींत मी मुख्य पंच ह्मणून भाग घेतला होता. या पंचायतीचे ठराव छापलेले आहेत. मला आतां दाखविले हेच ते पंचायतीचे ठराव आहेत. (Ex 4 A). संवत् १९६२ सालच्या पंचायतीची गोष्ट या पंचायतींत निघाली होती व त्या सालीं सत्पंथ हा हिंदुधर्मबाह्य आहे असा ठराव झाल्याबद्दल ह्या ठरावांत उल्लेख आहे. तें बरोबर आहे. ह्मणजे गेले पंचायतींत १९६२ सालच्या ठरावाबद्दल चर्चा झाली होती. बोवांनीं उच्चारिलेले ह्मणून मी वर जे शब्द सांगितले ते अगदीं तेच शब्द आहेत. मतलब नाहीं.

फेर तपासणीः—पंचायतींत तेथल्या तेथेंच कोणी सत्पंथ सोडल्याबद्दल सह्या दिल्या नाहींत. **पंचायतीबद्दल प्रसिद्धी लेखी तक्रार असल्यावांचून करतां येत नाहीं.** बोवांनीं हँडबिलें वाटलीं त्यावरून ही पंचायत भरली गेली. **विवक्षित व्यक्तींचा अर्ज नव्हता. संवत् १९६२ सालीं जरी सत्पंथाबद्दल ठराव झाला तरी गेल्या पंचायतीपर्यंत सत्पंथांतील लोकांच्या व आमच्या सोयरिका होत होत्या.** सत्पंथी लोकांनीं आपली बाजू लेखी

पंचायतींत लेखी मांडली होती. मला आतां दाखविला अशाच मजकुराचा अर्ज सत्पंथ्यांनीं केला होता. (Ex 4 B) ह्या अर्जांत शंकराचार्य जगद्गुरु यांचेकडे हा प्रश्न सोपवावा व ते निकाल करतील तो आह्मांला कबूल आहे ह्मणून त्यांनीं कळविलें आहे.

को० स०:—कुटुंबनाइकाकडे लेखी अर्ज आला होता कीं, नाहीं मला माहीत नाहीं. नुसती मीटिंग भरावयाची आहे हें माहीत आहे. संवत् १९६२ त ठराव झाला असून सोयरिका होत होत्या. मला स्वतःला हा ठराव गेल्या पंचायतीपर्यंत माहीत नव्हता. संवत् १९६२ त ठराव झाला असून आतांपर्यंत कसा पुढें आला नाहीं अशी चर्चा मी पंचायतींत काढली होती. पण माझ्याजवळ असलेल्या लोकांनीं "तुह्माला माहिती नसेल" असें सांगितलें. जातीमध्यें सर्व ठिकाणीं संवत् १९६२ नंतर लग्नें झालीं. ठराव माहीत नसेल ह्मणून लग्नें झालीं. लग्न झाल्यामुळें पंचाकडून कोणाला दंड किंवा जातिबाह्य केलें नाहीं. संवत् १९६२ पासून गेल्या पंचायतीपर्यंत ३।४ पंचायती झाल्या. मी फक्त गेल्या पंचायतीलाच गेलों होतों. मागील पंचायतींत काय ठराव झाले वगैरे मला आतां आठवत नाहीं. व मी या पंचायतींत गेलोंहि नव्हतों.

५।५।२३.

जी. एस्. राजाध्यक्ष,
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

चॅार्जनंतर पुन्हां प्रतिज्ञेवर उलट तपासणीः—मी फकीरखांच्या दुकानावर गेलों. नंतर १०।१५ मिनिटांनीं बोवा आले. मी गेलों तेव्हा आनंदा कोठें होता याकडे माझें लक्ष नव्हतें. बोवा आले तेव्हां हें काय वाजत आलें याबद्दल फकिराचें व माझें बोलणें झालें नाहीं. बोवा आल्यावर त्यांना हा आनंदा सत्पंथी बसला आहे असें बोवांना कोणी सांगतांना मी ऐकिलें नाहीं. बोवांनीं येऊन वर हात केले त्याबरोबर माझें त्यांच्याकडे लक्ष गेलें. त्यावेळींच आनंदाकडे माझें लक्ष गेलें नाहीं. तो कोठें आहे हें मी पाहिलेंहि नाहीं. प्रथम मला आनंदा दिसला तेव्हां तो आपल्या पायरीवर होता. मी प्रथम आनंदा पाहिला तेव्हां बोवा व आनंदा यांच्यामध्यें कांहीं लोक उभे राहिलेले होते. सुमारें ५।५० लोक उभे असतील. आनंदा लाकडाच्या दादराच्या पायरीवर बसला होता. आनंदाचें घर मी पाहिलें आहे. हा दादर दक्षिण दरवाजाला आहे. आनंदा पाटलाच्या घराला उत्तर व दक्षिण असे दोन दरवाजे आहेत. आनंदा पायरीजवळच उभा राहून बोवाशीं बोलला. फकीरखांशीं कांहीं बोलला नाहीं. माझ्याशीं बोलला त्या वेळीं दादर सोडून माझ्या बाजूस थोडासा आला. माझ्यापासून १५।१६ हाताच्या अंतरावर तो आला. तो फकीरखांशीं माझ्यासमोर बोलला नाहीं. कलालाच्या दारापुढें हँडबिल वाटलें असें फकीरखानें आनंदाला तेथें सांगितलें नाहीं. पंचायतींत भिकू पाटील बोलल्यावर सत्पंथ्यांपैकीं कोणी त्याला जबाब देऊं नये अशी कोणी मनाई केली होती किंवा कसें इकडे माझें लक्ष्य नव्हतें. बोवांनी लेक्चर देऊन पत्रिका वाटल्या त्या वेळीं आनंदा व बोवा यांची अदावत आहे व ह्मणून बोवा असें बोलतात असें मला बोवांच्या बोलण्यावरून वाटलें नाहीं. बोवांनीं

आनंदाला तो सत्पंथाचा ह्मणून दोष दिला. मी बोवाला याला आधार काय वगैरे विचारिलें नाहीं.

फेरतपासणीः—नाहीं

२४।९।२३

SD जी. एस्. राजाध्यक्ष.

मॅ. वर्ग १ पूर्वभाग

शिक्का

खरी नक्कल

सही (इंग्रजी)

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

Resolution passed by Leva Patidar Satpanth Samaj date 24-Dec-1922

Ex. No. 4. A.

(लेवापाटीदार लोकांनीं प्रसिद्ध केलेला छापील ठराव)

Resolution

श्रीगजानन प्रसन्न.

समस्त लेवा पाटीदार भोरगांवपंच मंडळी व कुटुंब नायक मुक्काम पाडळसे यांची मिा पौष शुाा ६ रोज रविवार शके १८४४ संवत १९७९ तारीख २४ डिसेंबर १९२२चें दिवशीं सभा होऊन ठराव करण्यांत आला तो येणेंप्रमाणेंः—

VSAK: 1876

संवत १९६२ सालामध्यें भोरगांवपंचाची सत्पंथी धर्मासंबंधानें सभा भरून त्यांत असें ठरलें होतें कीः—

"सत्पंथी धर्म हा वैदिकधर्मबाह्य आहे ह्मणून तो धर्म जातीच्या सर्व लोकांनीं सोडावा" त्या सत्पंथी धर्मानुयायी लोकांनीं सदरहू सत्पंथी धर्म सोडला आहे, अशाबद्दल कबूलीजबाब देऊन धर्म सोडला होता. परंतु त्यानंतर पुन्हां

कांहीं लोकांनीं सदरहू सत्पंथी धर्मांचा स्वीकार केल्यामुळें त्या सत्पंथी धर्म स्वीकारलेल्या लोकांना बहिष्कृत करण्यांत आलें होतें; व सदरहू सत्पंथी बहिष्कृत लोकांशीं दुसऱ्या कांहीं लोकांनीं अन्नव्यवहार केल्यामुळें त्यांनाहि बहिष्कृत केलें होतें. त्यामुळें बहिष्कृत केलेल्या लोकांशीं शरीरसंबंध असलेल्या लोकांचीं लग्नकार्यें वगैरे अडून राहिलीं आहेत. सबब ही लग्नकार्यांत आलेली अडचण दूर करण्यासाठीं पुन्हां आजरोजीं सभेंत ठराव झालें ते येणेंप्रमाणें:—

ठराव १ ला.

बहिष्कृत केलेल्या लोकांपैकी जे लोक सत्पंथी धर्म सोडून पंचांस शरण आले व ज्यांनीं केलेल्या अपराधाबद्दल माफी मागितली त्यांना जातीमध्यें घेऊन पंक्तीपावन केलें आहे. बाकी राहिलेले सत्पंथी बहिष्कृत लोक हे ह्या पुढें आपल्या समाजाच्या बाहेर आहेत असें ठरविण्यांत आलें आहे; आणि त्यांना जे सहाय्य होतील तेहि आपल्या समाजाचे नाहींत असें समजावें.

ठराव नंबर २

आजपर्यंत सत्पंथ धर्मानुयायी लोकांशीं ज्याचे कुवार सोयरीक संबंध झालेले आहेत, त्यांना ते संबंध मोडण्याबद्दल भोरगांवपंच व कुटुंबनायक परवानगी देत आहेत.

ठराव नंबर ३

सत्पंथ धर्मानुयायी जातीशीं संबंध असलेल्या लग्न झालेल्या आपल्या मुली कर्मधर्मसंयोगानें विधवा झाल्यास त्यांनां धर्मविधीप्रमाणें प्रायःश्चित्त देऊन त्यांच्या आईबापांस व नातेवाईकांस त्यांनां घरीं आणण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

ठराव नंबर ४

बहिष्कृत झालेल्या सत्पंथ धर्मानुयायी लोकांपैकीं जे लोक आज हजर नाहींत, त्यांनीं आठ दिवसांचे आंत म्हणजे तारीख २ जानेवारी १९२३ च्या आंत आपापल्या गांवपंचाकडे आपण होऊन शरण जाऊन त्यांनां धर्म सोडल्याबद्दल कबूलीजबाब दिल्यास त्यांना जातीमध्यें घेण्यांत येईल. अशा प्रकारें कबूलीजबाब ज्या ज्या पंचांकडे होईल त्यांनीं वरील मुदतीनंतर ३ दिवसांचे आंत भोरगांव पंचांकडे यादी रवाना करावी व पावल्याबद्दल भोरगांवपंचाच्या कुटुंबनायकांच्या सह्या घ्याव्या.

ठराव नंबर ५

प्रत्येक गांवपंचांनीं आपापले गांवीं वरील मुदतीच्या आंत पंचाईत भरवून आज रोजीं हजर नसलेल्या लोकांना झालेल्या ठरावांची समज द्यावी व त्यांत-त्यात्यांत या पंथाचे जे लोक अनुयायी आहेत किंवा लागे असतील अगर ज्यांचा पंचांना संशय असेल अशाहि लोकांना समक्ष बोलावून त्यांना समज द्यावी. व त्याबद्दल त्यांच्या व इतर सर्व लोकांच्या सह्या घेऊन आपापल्या दप्तरीं दाखल करून ठेवावे.

ठराव नंबर ६

वर लिहिल्याप्रमाणें ता० २ जानेवारी १९२३ रोजीं आलेल्या प्रत्येक गांव-पंचांच्या यादीप्रमाणें कुटुंबनायक यांनीं जे लोक सत्पंथ सोडण्यास तयार नाहींत असे अगर त्यांस मदत करतील अशाबद्दलचें गावपंचाकडून लिहून आलेवर लागलींच वळीतपत्र करण्यास कुटुंब नायकांस अधिकार दिला आहे व त्यांनीं तो लागलाच अमलांत आणावा.

टीपः—सोबतची यादी पहावी.

भोरगांव पंच मुक्काम पाडळसे ता। यावल यांच्या ठरावाबरहुकूम सत्पंथी धर्म न सोडणाऱ्या लोकांची गांवोगांवच्या पंचाकडून कुटुंबनायक पाडळसे यांचे-कडे आलेली यादी जातीच्या लोकांच्या माहितीकरितां पाठविली आहे. तरी गांवोगांवच्या पंचांनीं सभा भरवून लोकांस माहिती द्यावी. व त्या लोकांचा भोरगांव पंचाच्या ठरावाप्रमाणें बंदोबस्त ठेवावा.

जातीतून वगळलेल्या लोकांची गांववार नांववार व कुळवार यादी.

फैजपूर

१ तोताराम बध्धु भारंबे
२ रुपा अनू भारंबे
३ दामू खुशाल भारंबे
४ सदू भुसा नारखेडे
५ पंढरी दगडू नारखेडे
६ हिरामण नारायण भारंबे
७ दिना अवसू भारंबे
८ पांडू हिरा भारंबे
९ झिंगरू भिका भारंबे
१० चावदस मोतीराम भारंबे
११ भावडू गोविंदा नारखेडे
१२ यादव टिपू नारखेडे
१३ दोधू गोविंदा नारखेडे
१४ भगू चिंतामण नारखेडे
१५ जैराम बंसी लांडगे
१६ देवचंद तोताराम किरंगे
१७ विठू तोताराम किरंगे

१८ टिकाराम तोताराम किरंगे
१९ कृष्णा गोमा किरंगे
२० रावजी अर्जुन ढोला
२१ मिठाराम गुणा ढोला
२२ बारसू यादव भारंबे
२३ पुना लक्ष्मण भारंबे
२४ नारायण लक्ष्मण भारंबे
२५ दुला नारायण भारंबे
२६ राघो नारायण भारंबे
२७ ओंकार मिठाराम नारखेडे
२८ चावदस रामजी किरंगे
२९ धर्मा रावजी किरंगे
३० गिरधर नथू कोल्हे
३१ हरी सदू किरंगे
३२ टिकाराम सदू किरंगे
३३ लक्ष्मण मळजी किरंगे
३४ अनू लहानू किरंगे
३५ रामचंद्र लहानू किरंगे
३६ देवराम लहानू किरंगे
३७ चिमण धनजी किरंगे
३८ गोपीभ्रतार पाव्हनू किरंगे
३९ नथू सुका किरंगे
४० केशव पावजी किरंगे
४१ कृष्णा विठू कोल्हे
४२ केशव सोना लांडगे
४३ खंडू एको भिरूड
४४ झिपरु एको भिरूड
४५ हरी सोमा भिलानकर
४६ परशराम ओंकार चौधरी
४७ भिवसन दुला किरंगे
४८ उखर्डू केशव नारखेडे
४९ विश्राम राघो किरंगे
५० जंगलू शामू किरंगे
५१ आसाराप जावजी बायकोले
५२ काशीराम कचरू भिरूड
५३ सावित्री भ्रतार मलजी भिरूड
५४ सोना नारायण भारंबे
५५ टिकाराम वेडू भारंबे
५६ चिमण बापू भारंबे
५७ गोमा बापू भारंबे
५८ रामजी सांडू भारंबे
५९ गोविंदा विठू बोरले
६० गणपत उघडू कोल्हे
६१ बना केशव भिरूड
६२ तोताराम नथू भिरूड
६३ सोना पुंजो भिरूड
६४ काळू सोमा भिरूड
६५ लहानू बापु भिरूड

बाह्मणोद.

१ यमा शिवराम झोपे

उतखेडे.

१ लालू दिपा महाजन
२ नारायण दिपा महाजन
३ सखाराम सांडू महाजन
४ बुलाखी दगडु महाजन
५ शिवराम राघो महाजन
६ काशीराम सांडू महाजन

https://archive.org/details/bk147/page/n58/mode/1up

चिनावल.

१ सखाराम लक्ष्मण राणे
२ अवचित बुला राणे
३ हेमा नारायण राणे
४ केशव रायाजी राणे
५ पुंजो आसाराम राणे
६ शंकर नथू राणे
७ ताराचंद केशव राणे
८ मिठाराम भगवान महाजन
९ केशव फकिरा ठोंबरे
१ लक्ष्मण पांडू ठोंबरे
११ गणेशा श्रावण महाजन
१२ नाद्रू श्रावण महाजन मु. लिंगे ता. बऱ्हाणपूर
१३ मंगा श्रावण महाजन मु. लिंगे ता. बऱ्हाणपूर
१४ खुशाल फैजपूरकर वस्ती चिनावल
१५ रामजी फैजपूरकर वस्ती चिनावल
१६ सखाराम हरी नाःखेडे
१७ गंगाराम श्रावण महाजन
१८ कद्रीभ्रतार राघो ठोंबरे
१९ गणू रामा धांडे

Ex. No 4 B

Pamphlet Response By Satpanths

सर्व हिंदुधर्मांतील लोकांस नम्र विनंती.

खानदेश जिल्ह्यांतील सत्पंथी धर्मांतील लेवेपाटीदार अनुयायी यांचेतर्फे हिंदुधर्मांतील सर्व जातींतील लोकांना विनंतिपूर्वक कळविण्यांत येतें कीं, मुक्कास पाडळसे तालुके यावल येथें तारीख २४ डिसेंबर सन १९२२ इ संवत १९७९ मिति पौष शु० ६ रोजीं भवर गावचे लेवेपाटीदार लोकांची पंचाईत "सत्पंथी लोक ४ वर्षांपासुन सत्पंथधर्म पाळल्यामुळें बाहिष्कृत आहेत व ते आजपावेतों पंचास शरण आले नाहींत सबब त्यांच्याशीं असलेल्या सोयरिकीबद्दल विचार होण्याकरितां " जमली होती. पंचाईतींत लेवेपाटीदार लोकांचा त्याच जातींतील सत्पंथी धर्माचे अनुयायी लोकाच्या ठरलेल्या सोयरीकीसंबधानें विचार झाला. पंचाइतीनें ठराव केला कीं, सत्पंथी धर्मांतील लेवेपाटीदार हे बहिष्कृत आहेत. त्यांच्याशीं ठरलेले कुवारीसंबंध हे मोडून टाकावेत व सत्पंथी धर्मांतील लेवेपाटीदार लोकांशीं आतां आपलें जातीनें यापुढें कोणताहि संबंध म्हणजे रोटी-बेटीव्यवहार ठेवूं नये व त्यांचा आतां जातीशीं कांहीं संबंध राहिला नाहीं.

२ वर लिहिल्याप्रमाणें पाळसें मुक्कामीं ठराव झाला असल्याकारणानें व प्रबोधचंद्रिकेचे अंकांत मुकाम फैजपूर येथील आत्मानंद ब्रह्मचारी यांचे सांगण्या-वरून आमचे संबंधानें खोडसाळ व खोटा मजकूर प्रसिद्ध झाला आहे. सबब

हिंदू धर्मांतील आठरापगड जातींना आमचे धर्मांतील साधारण माहिती असावी व त्याचा आमच्याबद्दल विनाकारण गैरसमज होऊं नये म्हणून ही माहिती आम्ही देत आहोंत.

३ सदरहू पाडळसे येथील भरगांवचे पंचांसमोर आमचेपैकीं कांहीं इसमांनीं आपले सहीनें कलम ४ यांत लिहिलेल्या मजकुराचा अर्ज विनंतिपूर्वक दाखल केला. त्याचा योग्य विचार झाला नाहीं व पुरावा वगैरे न घेतां अगर तपास न करितां भरगांवचे पंचांनीं आमचे पंथासंबंधानें वर लिहिल्याप्रमाणें निकाल केला आहे.

४ (अ) पंचासमोर दिलेला अर्ज [मेहेरबान समस्त लेवापाटीदार भवरगांवचे पंच मुक्काम पाडळसे यांचे शेवेसी आम्हीं खालीं सह्या करणार सत्पंथ धर्माचे अनुयायी लोक विनंती अर्ज करितों कीं, गुजराथ, काठेवाड, कच्छ वऱ्हाड, नेमाड, खानदेश, पंजाब, सिंध, अफ्रिका वगैरे ठिकाणीं सत्पंथ धर्म बऱ्याच समाजास पाळला जात आहे. त्यांत मोठा भाग लेवापाटीदार लोकांचा आहे. सदरहू धर्माच्या पांच शाखा आहेत त्यांपैकीं पिराणा येथील ईमामशाही पंथाचे आह्मी अनुयायी आहोंत. आह्मी धर्म पाळितो तो येणेंप्रमाणें:—

(१) आह्मी लेवापाटीदार जातीचे असोन त्या जातीरिवाजाप्रमाणें वर्णाश्रमधर्म, वैदिक मतानुसार पाळीत आहोंत. व शुद्ध वर्तन करीत आहोंत. (२) आमच्या मान्यतेप्रमाणें आमचा धर्म वैदिक व सनातन आहे. आह्मी चारी वेद, मनःपुरसर प्रमाण गणून अर्थववेद प्राधान्यपणें मानतो (३) श्रीब्रह्मा श्रीविष्णू, श्रीमहेश, श्रीआदीशक्ति या आमच्या इष्टदेवता आहेत. श्री-विष्णुपरमात्म्याचे दहा अवतार आह्मीं पूज्य मानतो. (४) आम्हीं **कळसपाट व अखंड घृतदीप-ज्योत** यांची पुजा करून त्याद्वारें श्रीपरमात्म्याची आराधना करितों. (५) आम्हीं रामनवमी, गोकुळ अष्टमी, एकादशी, ध्रुवाअष्टमी, चतुर्दशी, अमावास्या, शुद्ध द्वितीया व चतुर्थी वगैरे दिवशीं व्रत करून शुद्ध आचरण करितों. व सदरहू दिवशीं आमचे संस्थानी मेळे भरतात. आम्हीं युगाप्रमाणें प्रत्येक शुद्ध द्वितीयेस उपोषण करितों. (६) आम्हीं हिंग, तंबाखू वगैरे त्याग करून सर्व मादक वस्तूंचाहि त्याग करितों. **"अहिंसा परमोधर्मः"** हें आमच्या धर्माचें तत्व आहे म्हणून अभक्ष्याभक्ष व अपेयपान करीत नाहींत

(७) आम्हीं कुलाचार पाळितों. स्पर्शास्पर्श याचा सूक्ष्म विवेक ठेवितों. सुतक वगैरे रितीनें पाळितों. (८) हा पंथ पुरातन आहे. मुळ स्थापक सत्पुरुष ईमामशाहा होते. त्यांचे नंतर गादीवर लेवापाटीदार साधु लोक आहेत. त्यांची नेमणूक सद्गुरु ईमामशहा यांनींच केलेली आहे. व ती गादी वंशपरंपरा लेवापाटीदार साधुलोक यांचे वहिवाटींत आहे. आमचे पंथांतील लोकांस दीक्षा व उपदेश हेच साधू देत असतात.

याप्रमाणें आह्मीं नीतीनें वागून आमच्या धर्माचा तपास न होतां केवळ गुरू ईमामशाहा हे असल्यानें धर्म मुसलमानी ठरविणें हे न्यायाचें दिसत नाहीं. कारण आपलें जातींत व ब्राह्मणवर्गांत ज्याप्रमाणें कबीर हे मुसलमान असून त्यांनीं हिंदुधर्माचा बोध केला व तो धर्म सर्व हिंदुलोकांत वापरला जात आहे. तसेच हल्लीं शिर्डीचे साईबोवा व नागपुरचे साईबोवा हे जातीचे मुसलमान असून त्यांचे शिष्य ब्राह्मण व इतर हिंदू आहेत. त्यामुळें त्यांचे हिंदुत्व कोणतेंहि प्रकारें जातींत कमी होत नाहीं. त्याप्रमाणें गुरु ईमामशाहा हे होऊन गेले. व त्यांनीं आह्मांस हिंदु धर्माचें वळण देऊन ते आह्मीं वडिलोपार्जित सनातन पाळीत आहोंत. व जातीकुळांत पूर्वीपासून आमचा सर्व व्यवहार सुरू असून हल्लीं नुसत्या शब्ददोषावरून एवढें प्रकरण वाढविलें आहे. त्याचा निःपक्षपातानें 'पंचपरमेश्वर" समजून आह्मी न्याय मागतों. आपले जातींत स्वामीनारायण, मानभावपंथ काढून टाकण्याबद्दल या सत्पंथाचे चर्चेबरोबर चर्चा चालली होती ती बंद होऊन हल्लीं याच धर्माविषयीं आह्मी गरीब असल्यामुळें वारंवार आक्षेप होतो. शिवाय इतर पुष्कळ प्रकारचे धर्म जातींत सुरू आहेत त्याचप्रमाणें सदरहू धर्म सुरू असावा असें आमचें ह्मणणें आहे. अगर सर्व लेवापाटीदार लोकांचा एकच धर्म ठरवीत असाल तर आह्मीहि तयार आहोंत व जर सर्व धर्म सुरू रहात असतील तर आमचाही धर्म सुरू असावा. आह्मी गुदस्त सालचे सभेत सत्पथधर्म श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्यमहाराज यांचेकडून तपासून आणण्याबद्दल विनंति केली होती त्याप्रमाणें हल्लीहि विनंति करीत आहोंत. ती पंच मान्य करतील अशी आशा आहे; व योग्य न्याय मिळावा अशी विनंति आहे. इतक्यावर जर योग्य न्याय न मिळाल्यास आमचा न्याय मिळण्याबद्दल आह्मी श्री जगन्नीयंता परमेश्वर यांची आराधना करूं व त्याची करुणा भाकूं सेवेशीं जाहीर होय हा अर्ज.]

(ब) या पंथाचे अनुयायी सर्व हिंदू आहेत व त्याबद्दल सरकारी माहिती ग्यॉझेटिअर बॅांबे प्रेसिडेन्सी व्हाल्यूम ४ पानें २८७।२८८ मध्यें दिलेली आहे. ती पहाण्याची वाचक कृपा करतील अशी आशा आहे.

५ कलम ४ यांत लिहिलेल्या अर्जांतील मजकुर हा आह्मी भवरगांवचे पंचांसमोर शाबीत करून देण्यास तयार होतो. अगर श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य महाराज यांचेकडून आमचे धर्मासंबंधानें निकाल करून घेण्यास तयार होतों. ही आमची विनंति पंचांनीं अमान्य केली आहे.

६ सबब सर्व हिंदुधर्मांतील लोकांना आमची नम्र विनंति आहे कीं, आतां आमचे धर्माबद्दल खोडसाळ व खोटा मजकूर विरुद्ध बाजूकडून प्रसिद्ध होण्याचा संभव आहे हें ध्यानांत आणून व आमचे धर्मांतील लोकांसा वंशपरंपरा बरीच शतके लेवेपाटीदार लोकांशीं रोटीबेटी व्यवहार होत आला आहे हें लक्ष्यांत ठेवून आमचे धर्मांतील लोकांशीं पूर्वीप्रमाणें चालू असलेलें वर्तन कायम ठेवतील व खोडसाळ व खोट्या विधानाकडे दुर्लक्ष करतील अशी आशा आहे.

आपला नम्र सेवक,

एक लेवेपाटीदार.

सत्पंथी अनुयायी.

निशाणी नंबर ५.

प्रा० तर्फे साक्षीदार नं. ४ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव फखीरखां बापाचें नांव भुरेखां धर्म जात मुसलमान उमर सुमारें २५ वर्षांची धंदा तांबटाचा रहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पू. खानदेश.

सर तपासणीः—फिर्यादी, आरोपी व साक्षीदार भुरा पाटील हे ओळखीचे आहेत. भुरा पाटील ४।५ महिने झाले असतील बुधवारीं माझ्या घरीं आले होते. फैजपूरचा बाजार बुधवारीं भरतो. वेळ दुपारची १२–१ ची होती. माझें घर व फिर्यादीचें घर १५।२० हातांवर आहे. दोघांचीं घरें समोरासमोर असून मध्यें सडक आहे. त्यादिवशीं बोवा बाजारांतून ताशा वाजवीत वाजवीत आले. व माझ्या अंगणांत रस्त्यावर उभे राहिले. नंतर त्यांनीं ताशा बंद केला. त्यावेळीं मी व भुरा पाटील दुकानावर माझ्या बसलों होतों. ताशा बंद केल्यावर बोवांनीं चिठ्या वाचल्या व लोकांना ह्मणाले, हम हाथ जोडके कहते है कीं हमारा भाषण सुनना. हे ह्मणाले, हिंदु लोगोंसे हमारा कहना है कीं, 'ये सत्पंथी लोक मोमना ह्मणजे मुसलमान है ये लोगोंसे किसीनें रोटी बेटी व्यवहार करना नहीं.' हे ह्मणाले—आनंदाकडे बोट करून हे ह्मणाले—'ये भी सत्पंथी है. ये गाय भक्षक है व हम गोरक्षक है.' आनंदा उभे राहून बोलले, "महाराज, तुम ये क्या कहते है?" महाराज ह्मणाले "हम सच कहते है कीं तुम लोक गाय खाते है. तुमहि क्या सब सत्पंथी लोक गाय खाते है." इतके ह्मणून त्यांनीं (आ॰ नीं) चिठ्या वाटल्या. मी खालीं उतरून २ चिठ्या घेतल्या. बोवा खंडेराव महाराज की जय बोलून चालले गेले.

उलट तपासणीः—माझ्या भावाचें नांव नूरखां आहे. नूरखानें इदुवर प्रेत अडकविल्याबद्दल फिर्याद केली होती. त्या खटल्यांत मी एक दिवस खटल्याचे तारखेस राजिनामा झाला त्या दिवशीं गेलों होतों. आनंदाहि होता. एकंदर बोवांच्या लेक्चराला ५०।६० लोक

जमा झाले होते. त्यांचीं नांवें सांगतां येणार नाहीं. आमच्या गांवचे लोक असतील. पण माझा ख्याल राहिला नाहीं. तासेवाले तीन होते. तासेवाले हिंगोण्याचे होते. बोवांनीं जसे शब्द उच्चारिले तसेच मी सांगितले. मतलब सांगितला नाहीं. बोवा येण्याच्या अगोदरपासूनच आनंदा आपल्या ओठ्याच्या पायरीवर बसला होता. बोवा शब्द बोलत होते तेव्हां त्याचा अर्थहि करून सांगत होते. हिंदुस्थानी भाषेंतच अर्थ करून सांगत होते. भक्षण व रक्षण या दोन शब्दांचा अर्थ बोवांनीं करून दाखविला. गोभक्षण व गोरक्षण असे दोन शब्द बोवांनीं वापरले होते. गोभक्षक रक्षक असे शब्द बोवांनीं वापरले नाहींत. आनंदानें विचारल्यावर बोवा म्हणाले, "तुम सत्पंथी है इसवास्ते गोभक्षण करते ऐसा हम बोलते है. सत्पंथी गोभक्षण करते है." महाराज तेथें अर्धा घंटा राहिले असतील. (होयगे). आनंदा सत्पंथ्यांपैकीं म्हणून त्याचेवर गोभक्षक वगैरे असें बोवा बोलले असें मला त्या वेळीं वाटलें. हँडबिल प्रथमच वाटलें.

फेर तपासणीः—नाहीं.

मु॥ जळगांव — जी. एस्. राजाध्यक्ष

५।५।२३ — मॅ. वर्ग १ पूर्वभाग

चार्जानंतर पुनः प्रतिज्ञेवर उलट तपासणीः—बोवाच्या येण्याच्या पूर्वीं मी माझ्या दाराशीं बसलो होतों. भुरा पाटील पूर्वींच आले होते. आम्ही सुमारें अर्धा घंटा बसलों होतों. मी अर्ध्या घंट्याच्याहि आधीं बसलों होतो. भुरा पाटील मात्र अर्ध्या घंट्यापासून बसला होता. माझ्या दाराचे पुढें लेक्चर दिलें. त्यापूर्वी

किंवा नंतर बोवांनीं कोठें लेक्चर दिलें हें मला माहीत नाहीं. कोणाचें तोंडून मी ऐकलेंहि नाहीं. सरवर व त्याचे भाऊ विभक्त रहातात किंवा कसें मला माहीत नाहीं. सरवर हा घरचा भाजीपाला आणतो व पोर सांभाळतो. याशिवाय त्याचा दुसरा धंदा नाहीं. माझ्यासमोर ताशा बंद झाल्यावर हा आनंदा सत्पंथी आहे असें कोणी बोवाला सांगतांना मी ऐकिलें नाहीं. आनंदा ह्मणाला, बोवा हें काय सांगतां ? तेव्हां बोवा ह्मणाले, २ दिवसांनीं पाडळशाला पंचायत होणार आहे, तेव्हां तुह्मांला मी मुसलमान ठरवीन. (ठैरा देंगे) बोवाचें लेक्चर झालें तेव्हां आनंदा त्याच्या पायरीवर (शिडीवर), मी सडकेवर, व भुरा पाटील माझ्या दुकानांत बसले होते. बोवा निघून गेल्यावर आनंदाची व माझी कांहीं बातचित झाली नाहीं. यावल दिवाणी कोर्टांत माझा व इदुचा दावा चालला होता त्या कामांत आनंदा माझा साक्षीदार नव्हता. तो यावलला आला होता. माझ्या-बरोबर मुकदम्यासाठीं तो आला नाहीं. आनंदाची व भुरा पाटलाची बोवा गेल्यावर बातचित झाली. ते आपापल्या जागेवरूनच बोलत होते. कलालाच्या घरापुढें बोवांनीं हँडबिल्स वाटलीं असें मी आनंदाला सांगितलें नाहीं. ताशा बंद झाला तेव्हां मी भुराला ह्मणालों " हे क्या है ? क्यूं चिठ्या बाट रहे है " भुरा पाटील म्हणाले "कांहीं नाटक बिटक आलें असेल. तूं आपलें काम कर." आनंदा बोवा येण्यापूर्वींच त्याचे पायरीवर बसला होता. तेथें येऊन बसण्याची त्याची नेहमीची वहिवाट (आदत) आहे. भुरा पाटील माझे दुकानावर आले तेव्हां आनंदा त्याचे दादरवरच बसला होता.

फेर तपासणीः—नाहीं.

२४।२।२३

शिक्का.

SD जी. एस्. राज्याध्यक्ष.
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.
खरी नक्कल.
(सही इंग्रजी)
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर ६

प्रा० तर्फे साक्षीदार नं. ५ यांची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं:—माझें नांव दामू बापाचें नांव निळोबा, धर्म जात जैन, शिंपी उमर सुमारें २८ वर्षांची धंदा शिंप्याचा, रहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पूर्वखानदेश.

सर तपासणीः—जैनांत २ पंथ. डिंगबर व श्वेतंबर असे दोन पंथ आहेत. मी डिंगबरीपैकीं आहे. या पंथाचा मुख्य हरीकेशी नांवाचा चांडाळ होता. श्वेतांबरी पंथाचा मुख्य कोण मला माहीत नाहीं. आमच्या दोन्ही पंथांत रोटीव्यवहार चालत नाहीं. फिर्यादी आरोपी ओळखीचा आहे. माझें आठवडे बाजारांत दुकान आहे. सुमारें ४॥ महिने झाले, बुधवारीं १२॥ च्या सुमारास फैजपूर आठवडे बाजारांत लक्कंड डेपोच्या बाजूनें वाजतगाजत बोवा आले व माझ्या

दुकानासमोरच थांबले. वर हात करून हे ह्मणाले सत्पंथी हा मोमना ह्मणजे मुसलमान आहे. हे गोभक्षक आहेत व आह्मी गौंचे पालन करणारे आहों. पुढें बोवांनीं प्रती वाटल्या. लेक्चर दिलें त्या वेळीं ताशा बंद होता. मला आतां (Ex. 1 A. & 1 D.) च्या प्रती दाखविल्या त्याच प्रती बोवांनीं वाटल्या, मलाहि प्रती मिळाल्या. त्या मी मामलेदारापुढें साक्षीच्या वेळीं हजर केल्या आहेत.

उलट तपासणीः—चांडाळ गुरु हिंदु जातीचा होता. चांडाळ भंगी जेवढे असतील तेवढे आह्मी गुरुची जात समजतों. आमचा व लेवे पाटीदार यांचा रोटीबेटी व्यवहार नाहीं. गुरुच्या जातीच्या सर्व लोकांना आह्मी पूज्य मानीत नाहीं. आनंदा संध्याकाळीं माझे दुकानीं कपडे घेण्यास आला होता. त्याला सगळी हकीगत सांगितली. मला हिंदुस्तानी भाषा समजते. बोवांचे मी शब्द सांगितले नाहींत. सारांश सांगितला.

फेर तपासणीः—नाहीं.

मुा जळगांव
५।५।२३.

S. D. **जी. एस्. राजाध्यक्ष,**
मॅ. वर्ग १ पूर्वभाग

खरी नक्कल

(सही इंग्रजी)
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

शिक्का

निशाणी नंबर ७.

प्रा० तर्फे साक्षीदार नं. ६ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं:—माझें नांव तोताराम बापाचें नांव बधू धर्म हिंदु, जात लेवेपाटीदार उमर सुमारें ३९ वर्षांची धंदा व्यापार, रहाण्याचा गांव फैजपूर. तालुका यावल.

सर तपासणीः—मी सत्पंथी आहे. आनंदा हाहि सत्पंथी आहे. आनंदा व मी एकाच शाखेचे आहोंत. आमचा गुरु, मूळ स्थापक ईमामशाहा. संस्थानचे सध्याचे गादीवर असलेले गुरु काका लक्ष्मण करमसी हे आहेत. काका हे लेवेपाटीदार आहेत. ईमामशहाचे वंशज आमचे गुरु नाहींत. आरोपी माहितीचे आहेत. त्यांनीं २२।११।२२ ला स्वधर्म पालन करो या नांवाची जाहिरात फैजपूर गांवांत वाटून प्रसिद्ध केली. Ex I A ची हीच जाहिरात ती आहे. तारीख ४।१२।२२ ला प्रबोधचंद्रिकेंत एक लेख आलेला आहे. त्यांत त्याचें नांव आहे. तारीख २०।१२।२२ ला पुनः एक स्वधर्म पालन करो Ex. I A & I D या दोन जाहिराती वाटल्या. व वाजंत्री लावून लेक्चर दिलें. ताशे वाजवीत वाजवीत आठवडे बाजारांतून आरोपी हे आले. व शामजी भाई भाटे याचे दारासमोर उभे राहून वाजंत्री बंद केली व भाषण केलें. "ये सत्पंथी लोक मोमना ह्मणजे मुसलमान है, ये गोभक्षक है म्हणजे गौवा खानेवाले है. हम गोरक्षक ह्मणजे गौवा पालन करनेवाले है. इनके सभ (संग) जात जातके लोकोनें अन्नव्यवहार बेटी व्यवहार करना अच्छा नहीं. वैसा करना बडा अधर्म है. २ दिनसे ये सत्पंथी लोकके जातमें पाडळसेकू पंचायत होनेवाली है. वहां ये सत्पंथीकू मुसलमान ठैरायेंगे" नंतर



श्रीयुत तोताराम बधु महाजन, फैजपूर.

' खंडेराव महाराज की जय ' ह्मणून वाजंत्री सुरू करून शामजी भाईच्या दारापुढून आमच्या दारापुढें आले. त्या ठिकाणींहि वाजंत्री बंद करून पुन: वर सांगितलेलें लेक्चर दिलें व पुन: दोन्ही प्रती वाटल्या. नंतर खंडेरावकी जय करून वाजंत्री वाजवीत चालते झाले. त्यानंतर २।३ दिवसांनीं आमची पंचायत झाली. पंचायतींत मी गेलों होतों. आरोपी बुवा हे आले नाहींत. सत्पंथी लोकांनीं सरकारांत तारा केल्या होत्या. त्यानंतर पो० स० इ० (यांनीं)बोवाला (आ०) बोलाविलें. त्यांनीं कांहीं बंदोबस्त केला असावा ह्मणून बोवा आले नसावे. २।३ दिवस आधीं पंचायतीचें बोलावणें आलें होतें. पंचायतींत आमच्या पंथाच्या लोकांनीं अर्ज दाखल केला होता. Ex 4 B यांतील कलम ४ अ पासून तो ६ पर्यंतचा आमचा अर्ज पंचायतीपुढें केलेला होता. या अर्जाचा कांहीं विचार केला नाहीं. आमच्या बाजूनें कोणाला बोलावयाची परवानगी तेथें दिली नव्हती. किंवा आमची बाजू मांडावयाची सवलतहि दिली नाहीं. ठिकठिकाणीं बोवांनीं अशा जाहिराती वाटल्या आहेत. तेव्हां या लोकांशीं रोटी बेटीव्यवहार करूं नये असें बोलणें चाललें होतें. त्याप्रमाणेंच अखेर ठरलें. त्यांच्याशीं रोटीबेटी व्यवहार करूं नये, सोयरीक संबंध ह्मणजे कुवारी संबंध—लग्न न झालेले मोडून टाकावें, लग्न झालेल्या पोरी जर विधवा झाल्या तर त्यांना घरीं आणून प्रायश्चित्त द्यावें, ज्या मुली दिलेल्या आहेत त्या आपल्याला मेल्या असें समजावें, ह्मणून ठराव झाला. असा ठराव झाल्यानें आमच्या पंथाची फार अब्रु कमी झाली. बोवांच्या लेक्चरामुळें आह्मांला फार वाईट वाटलें. त्या दिवशीं झोप सुद्धां आली नाहीं. लेक्चरामुळें सर्व व्यवहार (रोटी बेटी) बंद

झाल्यानें आमची अब्रु कमी झाली. प्रती वाटल्यामुळेंहि तसाच प्रकार झाला. या बोवाकडून मला दोन पत्रें Ex. 7 A. व B. ची आतां दाखविलीं हीं पत्रें आलीं होतीं. Ex. 7 A. चें पत्र आधीं कार्तिक महिन्यांत आलें. हें पत्र मजजवळ एका साळ्यानें आणिलें होतें. या चिठ्ठीवरून त्यांनीं शहाबादी फरशी मागितली होती. मी त्याप्रमाणें ४ दगड धर्मार्थ दिले. मी शहाबादी दगडाचा व्यापार करितों. ह्मणून मजकडे मागणी केली असेल. दुसरें Ex. 7 B. चें पत्र बोवांनीं स्वतःच आणून दिलें. व "ये नीट बाचके देखो और अच्छे ध्यानमें लाव." Ex. 7 B. चें पत्र आतां मी हजर केलें त्या पाकिटांतूनच मला महाराजांनीं दिलें. Ex. 7 C. या पत्रांत लिहिल्याप्रमाणें एक नाथ मजकडे कपाशी मागायला आला होता. सर्वच व्यापाऱ्यांकडे तो आला होता. मी त्याला कपाशीं दिली नाहीं. बोवा आमच्या समजुतीप्रमाणें धर्म करण्याच्या लायक नाहींत असें मी सांगितलें. बकरीद मोहरम या दिवशीं सत्पंथी लोकांत सण नसतो. आटेका गौबछडा करके खाते है, असें पत्रांत (Ex.7B) दिलेलें आहे. त्याप्रमाणें सत्पंथी खात नाहींत. उलट गाय तेहि पूज्य मानितात. मांस खात नाहीं किंवा दुसरें कोणतेंहि अभक्ष्य आम्ही करीत नाहीं. गोमुत्राची निंदा आम्ही करीत नाहीं. प्रायश्चित्ताचे वेळीं किंवा सुतक फिटायचे वेळीं आम्ही गोमुत्र घेतों. Ex7B चें पत्र लिहिलें त्यावेळीं बोवांची समजूत मी सत्पंथी नसावा अशी झालेली असावी. या ठरावापर्यंत—पंचायतीपर्यंत—आमच्यांत व लेवेपाटीदारांत (सत्पंथी नव्हत असे) रोटी बेटी व्यवहार होत असे. लेवे पाटीदारांत पुष्कळ पंथ आहेत. मानभाव, स्वामीनारायण, माळकरी, नाथसांप्रदायी,

सत्यसमाज वगैरे पुष्कळ पंथ आहेत. त्या पंथांचे आमच्या जातींत एकमेकांशीं रोटीबेटीव्यवहार होतात. आमच्यांत शुद्ध द्वितीया दर महिन्याची, गोकुळ अष्टमी, रामनवमी, ध्रुवाष्टमी याप्रमाणें उपोषण असतात. एकादशीहि आह्मी (सत्पंथी) पाळतों. कोणी १२ महिन्यांच्या करतों, कोणी मोठ्या दोन एकादशा करतात. सत्पंथी नाहींत असें पाटीदार लोकहि याप्रमाणेंच निरशन करतात. आम्ही प्रेत कांहीं जाळतों व कांहीं गाडतों. याप्रमाणेंच सत्पंथी नाहींत अशा लेवेपाटीदारांची पद्धत आहे. आमचा धर्मग्रंथ कुराण नाहीं. रामायण, भागवत हे आह्मी धर्मग्रंथ मानतों. प्रार्थना करण्याची पद्धत मुसलमानांप्रमाणें नाहीं. लग्नाची पद्धतहि सर्व सारखीच ह्मणजे सत्पंथी नव्हत त्यांचेप्रमाणेंच आहे. कोर्टांतून मुसलमानी धर्म आहे असें ठरलें ह्मणून ह्मटलें आहे. त्याप्रमाणें मी तपास केला. शिरपुरला जाऊन तपास केला तर हें ह्मणणें खोटें आहे असें कळलें. रंगाऱ्यांचे जजमेंटचे नकलेबद्दल अर्ज केला. पण कागद फाटले अशा प्रकारचा जबाब मिळाला. मी एक क्षमापत्र आणलें आहे. तें व गिरिधर बापु रंगारी यानें काढलेलें विनंतिपत्र मी हजर करितों.

मी पिराणा येथें जाऊन चौकशी केली. पण Ex I A यांत 'लोहोके पंजेपर वगैरे' लिहिल्याप्रमाणें कांहींहि आढळून आलें नाहीं. जानवींहि ठेवलेलीं नाहींत. गुजराथेंत सत्पंथाला मोमना असें ह्मणत नाहींत. त्या बाजूला सत्पंथी असला तरी जातींतल्या जातींत रोटीबेटीव्यवहार होतो. आमच्या पंथाची फैजपूरला २०।४० घरें आहेत. बाकी लेवेपाटीदारांचीं ७।८ शें घरें आहेत. आमच्या पंचायतींत एक ठराव मांडून दुसरा त्याला दुजोरा देतो असे प्रकार होत नाहींत.

५।२५ मुख्य मुख्य आपापसांत सल्ला करून ठराव करतात व सर्वांना कळवून देतात. तोंडींच जाहीर करतात. मागाहून मग लेखी ठराव लिहितात. सत्पंथी लोक हिंदु आहेत याबद्दल सरकारी Gazetteer मध्यें पुरावा आहे.

उ० तपासणी तहकूब.

मु॥ जळगांव — Sd. जी. एस्. राजाध्यक्ष

१५।५।२३ — मॅ. वर्ग १ पूर्वभाग

पुन्हां प्रतिज्ञेवरः—मी फैजपूर म्युनिसिपालिटीचा व्हाईस प्रेसिडेंट आहे. मी१२।१३ वर्षांपासून म्युनिसिपल कौन्सिलर असून सारा ७००।८०० रुपये व इनकम टॅक्स२७५ रुपये भरतो. चारी वर्गांमध्यें (वर्णांमध्यें) सत्पंथी आहेत. फक्त लेवेपाटिदारांतच आहेत असें नाहीं.

उलट तपासणीः—मला गुजराथी वाचायला येतें. मी वडिलापासून सत्पंथी आहे. मी हा पंथ कधीं सोडला नव्हता. जमाखर्च वडिलांच्या वेळेपासून मजजवळ आहेत. या पंथाबद्दल आमच्या जातींत ४।५ वर्षांपासून खरी चळवळ आहे. हा पंथ मुसलमानी धर्माचा आहे अशाबद्दल चळवळ ४।५ वर्षांपासून आहे. यापूर्वींचो चळवळ सर्व पंथांची म्हणजे मानभाव, स्वामीनारायण वगैरे या पंथांबरोबर सत्पंथाचीहि होती. ह्मणजे हे पंथ काढून टाकावेत अशी चळवळ सुरू होती. ही चळवळ सरासरी संवत् १९६२ पासून सुरू आहे. संवत् १९६२ मध्यें सत्पंथ हा बहिष्कृत झालेला नव्हता. सर्व पंथांची चळवळ—चर्चा सुरू होती. सत्पंथ सोडावा असा ठराव आमचे जातीचा संवत् १९६२ सालांत तूर्त झाला होता. एकच पंथ ठेवावा या हेतूला अनुसरून कांहीं लोकांनीं सत्पंथ सोडला

होता. संवत् १९६२ त सत्पंथांपैकीं कोणाचाहि दंड झाला नाहीं. त्या पंचायतींत या पंथाबद्दल माझ्या वडिलांना कांहीं पैसे द्यावे लागले नाहींत. २१३५ रुपये आमच्या वडिलांनीं त्या पंचायतींत भरले नाहींत. चिमण विष्णा पाटील मयत आहे. त्याची सही मीं पाहिलेली नाहीं. संवत १९७५ सालांतहि सर्व जातीची पंचायत झालेली होती. या पंचायतींत संवत् १९६२ पासून जे जे लोक सत्पंथ पाळीत होते त्या लोकांची पंचायत झाली. संवत् १९७५ च्या पंचायतींत कांहीं सत्पंथी बहिष्कृत झाले. या पंचायतीनंतर मी व कांहीं फैजपूरच्या लोकांनीं बहिष्कृत केलें. सत्पंथी लोकांशिवाय आणखी सत्पंथी आहेत त्यांनाही बहिष्कृत करावें असा अर्ज कुटुंबनायकाकडे केला नाहीं. खुशाल हरी हे फैजपूरला ऑ॰ मॅजिस्ट्रेट असून म्यु॰ प्रेसिडेंटहि आहेत. मला आतां दाखविलेले Ex 7D चे कागदावर खुशाल हरी यांचे खालीं माझीहि सही आहे. या अर्जावरून (Ex 7D) जे लोक बहिष्कृत झाले आहेत त्यांच्याबरोबर दुसरे लोक जेवले ही माहिती आह्मी कुटुंबनायकास दिली होती. या अर्जाचें कोणकोणत्या गांवाला सत्पंथी आहेत ते कळवावें ह्मणजे पुढें त्याच्याबद्दल विचार करूं असें उत्तर आलें कीं नाहीं मला आठवत नाहीं. मला आतां दाखवली ती Ex 7E वरील सही माझीच आहे. कुटुंबनायकाकडून या अर्जाचे (Ex. 7 D.)जें उत्तर आलें त्याची नक्कल घेतल्याबद्दल मी Ex. 7 E. वर सही केली आहे. त्यानंतर जी पंचायत झाली ती गेल्या पौषांत झाली. या पंचायतींत सत्पंथी लोकांवर बहिष्कार घातला. गुजराथेंत गिरमथा गांवचे शिवेंत अगर जवळपास पिराण्याची वसाहत झालेली आहे. हें पिराणा ईमामशाहा यांनीं वसाहत केलेलें आहे कीं नाहीं

मला माहीत नाहीं. ईमामशहा सत्पंथाचे मुख्य गुरु आहेत. इराण-मधून ते आले कीं नाहीं मला माहिती नाहीं, त्या वेळीं अहमदाबादच्या राजानें त्यांना आपली मुलगी दिली होती कीं नाहीं मला माहीत नाहीं. ईमामशाहाचे वंशज पिराण्याला आहेत. त्यांना सय्यद म्हणतात व ते मुसलमान आहेत. अनवरे हिदायत या (Ex. 7 F.) पुस्तकांतील दुसऱ्या पानावर लिहिलेले इमामुद्दीन हेच आमचे गुरु ईमामशाहा आहेत कीं नाहीं मला माहीत नाहीं. काका लक्ष्मण करमसी यांना सय्यदाच्या वंशजांनीं दिलेली नोटीस मला दाखविली, त्या नोटीसीबद्दल मला माहिती नाहीं. मला आतां तारीख १७–९–१९२१ ची नोटीस दाखविली त्याबद्दल मला कांहीं माहिती नाहीं. ज्या नोटीसीचें ४–६–२१ चें उत्तर काका यांनीं दिलेलें मला आतां दाखविलें त्याबद्दलहि मला कांहीं माहिती नाहीं. काका लक्ष्मण करमसी व ईमामशाहाचे वारस यांच्यामध्यें इस्टेटीसंबंधानें कोर्टांत दावा चाललेला आहे. संस्थानच्या इस्टेटीसंबंधानें दावा चालू आहे. पिराण्याला काकालोक जे मरतात त्यांच्या मुसलमानाप्रमाणें कबरी बांधलेल्या नाहींत. पिराण्याला या संस्थानच्या ५ मुख्य गाद्या आहेत.इतर ठिकाणीं असतील तर मला त्याची माहिती नाहीं. बहादरपुरला सत्पंथी गादी आहे, पण तो निराळा भाग आहे.आमच्या पंथाच्या लोकांना—ईमामशाही सत्पंथी लोकांना उत्पन्नाचा १० वा भाग पिराण्याच्या गादीला द्यावा लागतो. मी ईमामशाहा सत्पंथ्यांपैकींच आहे. शिक्षापत्री हा एक मुख्य ग्रंथ आमच्या पंथाचा असून हा ईमामशाहाचा हस्तलिखित ग्रंथ आहे. शिक्षापत्री मला माहिती आहे. गतगंगा हा विधि नाहीं. गतगंगा हा शब्द शिक्षापत्रींत आढळतो. गतगंगा

ह्मणजे सर्व धर्मबंधूंनीं परमेश्वराच्या पूजेसाठीं एकत्र जमा होणें, यालाच आह्मी गतगंगा ह्मणतो. पाखंड मतासंबंधानें आमच्या शिक्षापत्रींत उल्लेख आढळत नाहीं. मजजवळ शिक्षापत्री आहे. घरीं आहे. आरोपीचें व माझें वांकडें नाहीं. फैजपूरला रंगारी जातींत हल्लीं सत्पंथी आढळत नाहींत. मला समजतें तेव्हांपासून आढळत नाहींत. २५।३० वर्षांपासून आढळत नाहींत. फैजपूरला गुजराथी वाणी पूर्वीं २०।२५ वर्षांपूर्वीं सत्पंथी होते. ते आतां मेले. त्यांचे वारस सत्पंथ पाळीत नाहींत.

पुना कोळंबा सत्पंथी नव्हता. पुना कोळंबा आमच्या गांवाला एकच होता. तो सत्पंथी होता. वर नव्हता असें सांगितलें ते पुना वायकोला ह्मणून सांगितलें. पुना कोळंब्याची बायको मेल्याचें मला आठवत नाहीं. कारण त्या घराचा माझा इतका निकट संबंध नव्हता. सत्पंथी दुल्लभ शेट याला जाळलें होतें. देवराम नारखेडा चिनावल-कर, महादू मंगा सरोदा मस्कावद यांनाहि जाळलें होतें. त्यांच्या-बद्दल मला माहिती आहे. मी स्वतः नव्हतों. गुमास्ता होता. दुसरे सत्पंथी जाळलेले मी डोळ्यांनीं पाहिले आहेत. पण त्यांचीं नांवें मला आतां आठवत नाहींत.

शामजी भाव्याचें घर—जेथें बुवांनीं लेक्चर दिलें ती जागा—माझ्या घरून दिसते. मोठ्यानें बोललें तर त्या जागेचें भाषण आमच्या जागे-पाशीं ऐकूं येतें. मी बोवांचें लेक्चर माझ्या घरूनच ऐकिलें. यावलचे मॅजिस्ट्रेट साहेबांनीं मला खटल्याची हकीगत विचारली होती. त्यांना माझ्या दारापुढें व शामजी भाव्याच्या दारापुढें लेक्चर झाल्याचें सांगि-तलें. या दोन्ही लेक्चरांमध्यें बोवांनीं ज्या ज्या जातींत हा पंथ असेल

त्या त्या जातीच्या लोकांनीं या पंथाचे लोकांशीं रोटीबेटी व्यवहार करूं नये असें सांगितलें. आमच्या जातींतले लोक फैजपूरला सत्पंथी आहेत. त्यावरून "ये सत्पंथी गोभक्षक है" अशा बोवांच्या बोलण्यावरून हे आह्मांला (लेवेपाटीदार सत्पंथी) उद्देशून आहे अशी माझी समजूत झाली. बोवांच्या बोलण्यांत " ये सत्पंथी लोक " असा शब्द होता. लेवे पाटीदार किंवा दुसरा उलगडा त्यांनीं केला नाहीं. **या भाषणामुळें मला वाईट वाटलें. त्याबद्दल मी उपाय केला नाहीं. कारण तें माझ्या इच्छेवर आहे.** मी बोवांना भेटून कोणत्या लोकांना (लोकांबद्दल) तुह्मी बोलला, गोभक्षक ह्मणजे काय, याबद्दल मी उलगडा करून घेतला नाहीं. Ex 7B चें पत्र बोवांनीं मला बंद केलेल्या लखोट्यांत दिलें. त्यावेळीं ते बोवा व मीच होतों. त्या पत्राबद्दलहि मी बोवाकडून खुलासा करून घेतला नाहीं. 'ये मोमन लोगोंके कहनेसे आप उदास नहीं होइये' या त्यांच्या लिहिणेवरून हें सत्पंथी लोकानांच लिहिलें आहे असें मी समजतों. मी पाडळशाला पंचाकडे केलेल्या अर्जांत बोवाचें पत्र, लेक्चर वगैरे याचा मी संबंध आणिला नाहीं. पंचायतींत आमच्या मंडळींना बोलण्याची परवानगीच दिली नाहीं. ह्मणून मीं बोवांच्या लेक्चराबद्दल गोष्ट काढिली नाहीं. आम्हीं भिकु पाटील, खुशाल भाऊ, हुना महाजन वगैरे पंचांनां परवानगी मागितली होती. पंचायतींत माझे किंवा फिर्यादीचे कोणी खाजगी अदावती होते असें मला वाटत नाहीं. माझ्या पंथाचे तिरस्कार करणारे होते किंवा नव्हते हें मी माझ्यासमोर कोणी तिरस्कार केला नाहीं तर काय सांगूं ? सत्पंथी लोकांना धर्मशाळेंत जाण्याबद्दल कधीं

कोणी आडकाठी केली नाहीं. पूजेच्या वेळीं दुसऱ्या पंथांच्या लोकांनाहि जाण्याची परवानगी असते. गुरुमंत्र तेवढा गुप्त असतो. बाकी सर्व उघड उघड पूजा होते. गुरुमंत्र ह्मणण्याला अर्ध्यापासून एक तासपर्यंत वेळ लागतो. गुरुमंत्र ह्मणतांना कांहीं पूजा किंवा विधि नसतो. गुरुमंत्र ह्मणजे परमेश्वराची प्रार्थना ! या गुरुमंत्राच्या वेळीं आह्मी कणकेची गाय करून मारतो असा लोकांचा आमचेवर आक्षेप नाहीं. सर्व वेदांत अथर्ववेदाला आह्मी प्राधान्य मानीत नाहीं. सर्वच वेद मानितों. अथर्ववेदाप्रमाणें आमची पूजा असते. आमच्या जातींत पुनर्विवाहाची चाल आहे. गुजराथेंतील लेवा व कडवा पाटीदार यांचा व आमचा रोटीव्यवहार आहे. बेटीव्यवहार नाहीं. खानदेशांत कुणब्यालाच लेवा पाटीदार ह्मणतात. सर्वच कुणब्याला लेवा पाटीदार ह्मणत नाहींत. तर कुणब्यांमध्यें कांहीं लेवापाटीदार आहेत. सत्पंथी लोकांत मान दिला असला तर रमजानचे उपवास करतात. खानदेशांत करीत नाहींत. गुजराथेंत सत्पंथी कणकेची गाय करून खात नाहींत, हें मला माहीत आहे. मी तपास केला आहे. ईमामशाही पंथांत मतिया कुणबी नाहींत. पांच शाखा सत्पंथाच्या आहेत. प्रत्येक पंथाला काका आहेत. प्रत्येक गादीवर एक एक काका असतो. मी स्वतः ईमामशाहीच्या पंथाचा आहे. काका लक्ष्मण करमसी हे ईमामशाहाच्या गादीवर आहेत. या पांचहि शाखांचा प्रथम (Founder) ईमामशाहा आहे. **या पांचहि शाखेंत मतभेद आहेत. त्यांच्या तत्वांत, वहिवाटींत, विधींत, पूजेंत, वागण्यांत, प्रत्येक गोष्टींत मतभेद आहेत.** त्यांपैकीं कांहीं कांहीं मला माहिती आहे. सत्पंथी पंथांत वैष्णव मतिया व

पिराणा मतिया असे (भेद) नुरशाही दुसरी शाखा सत्पंथांत आहे तींत आहे. वैष्णव मतिया लोकांनीं सत्पंथ सोडला आहे. मुसलमानी पंथ ह्मणून किंवा काय ह्मणून सोडला हें मला माहीत नाहीं. गुजराथेंत मुसलमान सत्पंथी नाहींत.

गुजराथेंत नूरशाही सत्पंथाला मोमना असें ह्मणतात. गुजराथेंत मोमना याचा अर्थ काय मला माहीत नाहीं. खानदेशांत मोमना ह्मणजे मुसलमान ह्मणतात.

गिरमथाचा शिवलाल डायाभाई ओळखीचा नाहीं. 'कुणबी क्षत्रिय उत्पत्ति अने इतिहास' हा ग्रंथ मी वाचला नाहीं. पुरुषोत्तम पारीख यानें केलेला हा इतिहास मी वाचला नाहीं.

बहादरपूरला खानदेशचे कुणबी सत्पंथी लोकांनीं एक इमारत बांधली आहे. ही सर्व मिळून (खानदेश वऱ्हाड वगैरे) बांधिली आहे. बहादरपूरला पिराणशहाची (पिराणा शाखेची) गादी नाहीं. ही इमारत माझ्यादेखत बांधली नाहीं. बापाच्या वेळची असेल. तेथें उरूस भरतो. आमच्या धर्मशाळेंत धर्माकाका आहेत. त्यांनां वाटलें तर ते बहादरपूरच्या व इतर उरुसालाहि जातात. उरुसाला जाणें हें सत्पंथी पंथांत पूज्य मानिलेलें नाहीं. हें इच्छेवर आहे. एखाद्या पिराच्या मरणाच्या दिवसाचा उत्सव ह्मणजेच मी उरुस समजतों. मुसलमानी साधूला फकीर ह्मणतात. हिंदु साधू ह्मणतात.

फेर तपासणीः—संवत् १९६२ पासून शेवटच्या पंचायतीपर्यंत ज्या सत्पंथी लोकांना वाळीत टाकलें होतें, त्यांच्याशीं रोटीबेटी-व्यवहार चालू होता. जे लोक बहिष्कृत झालेल्या लोकांबरोबर जेवले म्हणून आह्मी कळविलें, त्यांना आतांपर्यंत बहिष्कार घातलेला नाहीं. बहादरपूरची इमारत बापाच्या वेळची असेल असें मीं सांगितलें

त्याचा अर्थ बापाच्या कारकिर्दीत बांधली गेली, त्यांनीं बांधलेली अशी नाहीं. अनवरे हिदायत हा ग्रंथ आमच्या पंथांत नसून मला तें पुस्तक माहितहि नाहीं.

मु॥ जळगांव Sd. **जी. एस्. राजाध्यक्ष,**
९।६।२३ मॅ० वर्ग १ पूर्वभाग.

चार्जानंतर पुन्हां प्रतिज्ञेवर उलट तपासणी:—फकीरखाचें घर पाहिलें आहे. आनंदाचें घरहि पाहिलें आहे. फकिराच्या घराच्या पलीकडे आनंदाचें घर आहे. आनंदाचीं रहातीं घरें दोन आहेत. एक रस्त्याच्या पलीकडे आहे व दुसरें या घरापासून बोळ टाकून २।३ घरांपलीकडे पश्चिमेला आहे. रस्त्यावरील घराला पूर्वेला दरवाजा आहे. लाकडाचा जिना दरवाजाच्या घराला आहे किंवा नाहीं हें मी बारकाईनें पाहिलें नसल्यानें सांगतां येणार नाहीं. वाजवून पत्रिका वाटल्या त्यापूर्वीं महिना तीन वार एक पत्रिका बोवांनीं वाटली होती ही हकिकत मी आनंदाजवळ कधीं सांगितली नाहीं. खानदेशांतील सत्पंथ्यांपैकीं मी व आणखी कांहीं लोक पुढारी आहेत. वाजा वाजवून पत्रिका वाटल्या ही हकीकत त्यानें फिर्याद करावी म्हणून मी आनंदा याला सांगितली नाहीं. सांगण्याचें मला कारणच नाहीं. बोवांनीं मला २ पत्रें पाठविलीं ही हकीकत मी आनंदा याला सांगितली नाहीं. या पत्रासंबंधीं किंवा हँडबिल्ससंबंधानें माझी व आनंदाची कांहीं सल्लामसलत झाली नाहीं. फिर्याद करण्यापूर्वीं आनंदानें या पत्रासंबंधीं व हँडबिलससंबंधीं कांहीं विचारलें नाहीं. पत्राबद्दल गोष्ट मी माझ्या दुकानांत १०।५ लोकांसमक्ष काढली, त्यावेळीं माझ्या पंथांतले लोक तेथें होते. विरुद्ध पंथांतले लोक तेथें नव्हते. ही गोष्ट फिर्यादीच्यापूर्वीं

काढली कां नंतर काढली हें मला आठवत नाहीं. हँडबिल पहिल्यानें वाटलें त्याबद्दल मी दुकानावर गोष्टी केल्या. २ हँडबिलें वाटल्याबद्दलही गोष्ट दुकानावर काढली होती. त्यावेळीं इतर जातीचे व आमच्या जातीपैकीं सत्पंथी लोक तेथें होते. ही गोष्ट हँडबिल वाटलें त्या दिवशींच काढिली. गोष्ट काढली त्यावेळीं आरोपीवर फिर्याद करण्याची गोष्ट निघाली नाहीं. मी सत्पंथी लोकांकडून या तक्रारीसाठीं ५००|५०० रुपयांच्या प्रॉमिसरी नोट्स करून घेतल्या नाहींत. काकाची साक्ष झाली त्यावेळीं मी अहमदाबादला होतों. फिर्यादी आनंदा तेथें आला होता कीं नाहीं मला माहीत नाहीं. पाडळशाला पंचायतींत भिकू पाटलानें हा पंथ (सत्पंथ) गोभक्षक मुसलमान आहे असें भाषण केलें नाहीं. मी पंचायतीला गेलो होतों. हा पंथ वर्ज करण्याबद्दल जेव्हां पंचायतींत गोष्टी निघाल्या तेथें मी हजर होतों. Ex7D पाहून सांगतों संवत् १९७५ मध्यें सत्पंथी लोकांना बहिष्कृत केलें होतें. बहिष्कृत ह्मणजे जेवण बंद. सोयरिका सुरू ठेविल्या होत्या. लग्नकार्यें सुरू होतीं. १९७५ च्या ठरावाप्रमाणें सत्पंथी लोकांशीं रोटीव्यवहार बेटीव्यवहार बंद केला नव्हता. मग बहिष्कार काय काय घातला होता त्यासंबंधानें उल्लेख माझ्या समोर झाला नाहीं. धर्मशाळेंत मूर्तीची पूजा होत नाहीं. गतगंगेच्या वेळीं "पंजतन मुस्कलसे असान करो" असा मंत्र ह्मटला जात नाहीं. पिराणा येथील सय्यद लोक जातीचे मुसलमान आहेत. ते सत्पंथ पाळीत नाहींत. गतगंगेंत सत्पंथ्यांशिवाय दुसऱ्यांनांहि येण्याची मोकळीक आहे. त्यांत भाग घेणें किंवा न घेणें हें ज्याच्या त्याच्या मर्जीवर आहे. भाग घेऊं नये अशी मनाई नाहीं. गिरिधर बापू

जळगांवचा ओळखतो. गिरिधर नथू फैजपूरचा यास ओळखतों. त्याचा बाप किंवा कोणीहि सत्पंथी नव्हता. गिरिधरच पहिला सत्पंथी आहे. घटांत मातीची गोळी टाकलेली नसते. मला दाखविलेला फोटो पिराण्याचा आहे किंवा कसें खात्रीनें सांगतां येणार नाहीं.

फेरतपासणीः—

धर्मशाळेंत आह्मीं मूर्तीची पूजा करीत नाहीं. घृतज्योत व कलश यांची पूजा करितों.

२४।९।२३

Sd. **जी. एस्. राज्याध्यक्ष.**

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

शिक्का.

खरी नक्कल.

(सही इंग्रजी)

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

Ex. *No* 7 A.

(आरोपीनें तोताराम बधु यांना पाठविलेलें पत्र १ लें)

श्री हरिः

श्रीमान सेठजी । आशीर्वाद ।

मालूम हो कि एक आसन भरके जगह बनाया है । उसमे कुछ पत्थर लगेगा । सो यदि आपकी इच्छा हो तो चार पत्थर पतले पतले दिजियेगा

आत्मानन्द ब्रह्मचारी

खंण्डेराव फैजपूर.

Ex. No. 7 B

(आरोपीनें तोताराम बधु यांना दिलेलें पत्र २ रें)

श्री.

श्रीमान शेटजी आशीर्वाद. आप सामान्य पुरुष नही है. एक भाग्यवान जीव होकर सहसा कोई धर्मकार्यको बन्द करना अच्छा नहीं. यह आपको शोभा नही देता है. करोडपति पुरुष ऐसे दयाळू होकर आने हमारे उपर अप्रसन्न कैसे होगये है. यह बात समजमे नहीं आती है. बडे लोक जिसके उपर एकवार जैसा व्यवहार करते है वैसा हमेशा पालते है. आपने पहिले कितना प्रेम हमारे उपर किया है अब कुच उदाससे देख पडते है. इससे मेरा कहेना है की आपको ईश्वरने दान धर्म दया करनेके लिये करोडपति बनाया है. आपके धर्ममेभी दया करना श्रेष्ठ माना है. आप पहिलेसेभी श्रीमान धन संपन्न होगये है. इह आपका पुराकृत पुण्यका फल है आगे जैसा करेंगे वैसा मिलेंगा. दुःखकी बात है की आज हमारा एक नाथ कपास मागने गयाथा उसने कहा कीं, शेटजी खुद कह दिये कीं चले जावो, ठीक है हमको क्या हमलोक दसघर भिक्षा करकेभी दीन निकालेंगे. परंतु आपके परंपरासे कपास देना धर्म है सो अब नहि देंगे तो हमारा क्या सामर्थ्य है.आपकी इच्छा है पर हमारा भूल क्या है ? हमने कुछ अपराध किया है. उसदीन प्रेमसे आपको बुलाया था तोभी नही आये. ये मोमन लोकोके कहनेसे आप उदास नहि होइये. बकरीद, मोहरम औरभी इनका प्रयोजन होता है ये आटेका गउ बछडा बनाकर खाते है बाहर कहते है कीं, हम कांदा लसणभी नही छुठे है. आपकी इच्छा येही जाननेकी हो तो हम कहवा दे सकते इनमेंसे निकल गया है उन लोकोसे इसलिये हमने ईनका पिछा किया है. साधुसंत धर्म मर्यादा नहीं चलावेंगे तो कोन करेंगा. आपने हिंदु लोग गोमाताका रक्षक है और ये लोक भक्षक है. गोमुत्रका निन्दा करता है. पारशी दादाभाई नवरोजी भी गोमुत्रका आचमन करते थे. हिंदुमात्र गोभक्त है फीर ये लोक कैसे निंदा करता है. हमारे साथ बातचीत नहीं करते. गुप्त गइबी पत्र बिना पताका दीया है लिखा है तुमको मार डालेंगे क्या आप कह सकते है की यही धर्म हिंदू लोंगोका है. ये मोमना नहीं तो फीर क्या कहे जावेंगे. आपको खुद माळुम होगा सब समाचार मै क्या कहुं. थोडे दिनका जीवन है. इस असार संसा-

रमें इसलीये खुब नाम करीये दया धरम दान पुण्य करीये हमारे लिये चाहे दीजिये चाहे नहीं. आपकी मर्जी शुभम्.

मार्गशीर्ष कृ. गुरुवार ११

आत्मानंद ब्रह्मचारी
खंडेरावकी वाडी
फैजपूर.

बाल बच्चेसहीत सुखसे जीवो आनंद करो. एही आशीर्वाद है.

Ex No 7 C

Ex No 7 B चें पत्र ज्या पाकिटांत घालून दिलेलें होतें तें पाकीट.

Ex. No. 7 D.

श्री

रा. रा. कुटुंबनायक मौजे पाडळसें यांसी समस्त पंचमंडळी फैजपूर यांचा रामराम विनंति विशेष. लिहिण्यास कारण कीं, फैजपूरकर ५।६ इसमांनीं नवीन सत्पंथ धर्म स्वीकारला त्याबद्दल त्यांना संवत् १९७५ मिति वैशाख व॥१ रोजीं भरलेल्या भोर गांवच्या सभेंत बहिष्कृत केलें आहे. त्यांत असें ठरलें आहे कीं, या लोकांना जो सहाय्य होईल तोहि भोर गांवांत बहिष्कृत समजला जाईल. त्याप्रमाणें त्या इसमांनीं (वर्ज्य केलेल्या) यांनीं संवत् १९७५ मिति ज्येष्ठ व॥ १२ रोज बुधवार सत्पंथ्यांचे धर्मशाळेंत पंगत करून जेवण त्या ठिकाणीं केलें व त्यांच्या पंक्तीस जे इसम जेवले त्यांची यादी.

हिरामण नारायण भारंबे
सोना नारायण भारंबे
नारायण लक्ष्मण भारंबे
चिमण बापू भारंबे
रामजी सांडू भारंबे
नथू याधो भारंबे
दुला नारायण भारंबे
राघो नारायण भारंबे
टिकाराम वेडू भारंबे
गोमा बापू भारंबे
खुशाल ओंकार भारंबे
चावदस मोतीराम भारंबे
दिना अवसू भारंबे
झिंगरू भिका भारंबे
गोविंदा विठू बोरले
सोना पुंजो भिरूड
झिपरु एको भिरूड
लहानू बापु भिरूड

विठू तोताराम किरंगे	विश्राम राघो किरंगे
अनू विठोबा भिरूड	काळू सोमा भिरूड
देवराम ल्हानू किरंगे	गंगाराम भिका किरंगे
टिकाराम सदू किरंगे	कृष्णा गोमा किरंगे
गोपीअवतार पाल्हनू किरंगे	पुंजा मर्द मिठाराम भिरूड
दोधू गोविंदा नारखेडे	लक्ष्मण मळजी किरंगे
भिवसन दुला किरंगे	धर्मा रावजी किरंगे
पंढरी दगडू नारखेडे	याधो टिपा नारखेडे
भिवसन दुला किरंगे	उखर्डू केशव नारखेडे
मिठाराम गुणा होले	जंगलू शामू किरंगे
जयराम बनसी बोरोले	आसाराम जावजी वायकोळा
देवचंद तोताराम किरंगे	टिकाराम तोताराम किरंगे
हरी सदू किरंगे	बना केशव भिरूड
उंदरू पांडू होले	रामचंद्र ल्हानू किरंगे
पांडू हिरामण भारंबे	ओंकार मिठाराम नारखेडे
पुना लक्ष्मण भारंबे	रावजी अर्जुन होला
तोताराम नथू भिरूड	चावदस रामजी किरंगे
मनसाराम मलजी भिरूड	भावडू गोविंदा नारखेडे
खंडू एको भिरूड	शामू सोमा किरंगे
केशव सोना बोरोले	* धोंडू परशराम वायकोला

---

५७ इसम

*ता. २८ रोजीं फैजपूर एथील पंचमंडळींनीं सांगितल्यावरून सदरहू इसमाचें नांव कमी करण्यांत आलें आहे.

याशिवाय इतर गांवची मंडळी तेथें जेवण्यास होतीं त्या गांवचीं नांवें खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ मौजें आमोदें १ मौजें विवरें १ मौजें उटखेडें १ मौजें राजोरें १ मौजें चिनावल १ मौजें मदुखेडें (प्रांत वऱ्हाड).

येणेंप्रमाणें वर लिहिलेले इसम बहिष्कृत केलेल्या ५।६ बरोबर जेवण करून सामील झाले आहेत. झालेली हकीगत आपणास विदित केलेली आहे. कळावें.
ता० २६ जून १९१९.

सही–खुशाल हरी चौधरी
सही–तोताराम बध्धु महाजन
सही–सोना सांडू महाजन, फैजपूर
सही–लहानू आसाराम चौधरी
सही–खंडू मोतिराम चौधरी
सही–तुकाराम लक्ष्मण चौधरी
सही–लक्ष्मण काशिराम

सही–लहानू तापिराम भोळा
सही-मनसाराम नारायण चौधरी
सही–आनंदा भवानी
सही–धोंडू शामा महाराज फैजपूर
सही–भगवान महादू चौधरी
सही–परशराम बाबूराव चौधरी, फैजपूर
सही–नागो बापू चौधरी

शिक्का

दाखल ता० २६।६।१९
खरी नक्कल
(सही इंग्रजी)
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

Ex. No 7 E.

श्री.

रा. रा. कुटुंबनायक मौजे पाडळसें यासीं समस्त पंच मंडळी फैजपूर यांचा राम राम वि. वि. लिहिण्यास कारण कीं, फैजपूरकर पांच सहा इसमांनीं नवीन सत्पंथी धर्म स्वीकारला त्याबद्दल त्यांना संवत् १९७५ मिति वैशाख व॥ १ रोजीं भरलेल्या भोरगांवचे सभेंत बहिष्कृत केलें आहे. त्यांत असें ठरलें आहे कीं या लोकांना जो साह्य होईल तोहि भोरगांवांत बहिष्कृत समजला जाईल. त्याप्रमाणें त्या इसमांना वर्ज केलें आहे. त्यांनीं संवत् १९७५ जेष्ठ व॥ १२ रोज बुधवारीं सत्पंथ्यांचे धर्मशाळेंत पंगत करून त्या ठिकाणीं जेवण केलें. व त्यांचे पंगतीस जे इसम जेवले त्यांची यादी लिहिल्याप्रमाणें:––

१ हिरामण नारायण भारंबा
२ सोना नारायण भारंबा
३ नारायण लक्ष्मण भारंबा
४ चिमण बापू भारंबा
५ रामजी विठू भारंबा
६ नथू यादव भारंबा
७ दिना अवसू भारंबा
८ झिंगरू भिका भारंबा
९ गोविंदा विठू बोरोला
१० सोनू पुंजो भिरूड
११ झिपरू येको भिरूड
१२ लहानू बापू भिरूड
१३ दुला नारायण भारंबा
१४ राघो नारायण भारंबा
१५. टिकाराम वेडू भारंबा
१६ गोमा बापू भारंबा
१७ खुशाल ओंकार भारंबा
१८ चावदस मोतिराम भारंबा
१९ पांडू हिरा भारंबा
२० पुना लक्ष्मण भारंबा
२१ तोताराम नथू भिरूड
२२ मनसाराम मलजी भिरूड
२३ खंडू येको भिरूड
२४ केसो सोना बोरोला
२५ विठू तोताराम किरंगा
२६ अनू विठू भिरूड
२७ देवराम लहानू किरंगा
२८ टिकाराम सदू किरंगा
२९ गोपी मर्दपावनू किरंगा
३० दोधू गोविंदा नारखेडा
३१ भिवसन दुला किरंगा
३२ मिठाराम गुणा कोल्हा
३३ जयराम बनसी बोरोला
३४ देवचंद तोताराम किरंगा
३५ उंदरू पांडू कोल्हा (होला)
३६ हरी सदू किरंगा
३७ पंढरी दगडू नारखेडा
३८ ओंकार मिठाराम नारखेडा
३९ इश्राम राघो किरंगा
४० काळू सोमा भिरूड
४१ गंगाराम भिका किरंगा
४२ कृष्णा गोमा किरंगा
४३ पुंजा मर्द मिठाराम भिरूड
४४ लक्ष्मण मलजी किरंगा
४५ धर्मा रावजी किरंगा
४६ यादव टिपा नारखेडा
४७ उखर्डु केशव नारखेडा
४८ जंगलू शामू किरंगा
४९ आसाराम जावजी वायकोळा
५० टिकाराम तोताराम किरंगा
५१ वना केशव भिरूड
५२ रामचंद्र लहानु किरंगा
५३ चावदस रामजी किरंगा
५४ भावडु गोविंदा नारखेडा
५५ शामू सोमा किरंगा
५६ रावजी अर्जुन कोल्हा (होला)

फैजपूरकर इसम ५६ व मागील सहा असें मिळून ६२. याशिवाय इतर गांवची कांहीं मंडळी त्याठिकाणीं जेवणास होती. त्या गांवचीं नांवें खालीलप्रमाणें:—

आमोदें, राजोरें, विवरें, चिनावल, उटखेडें, मदूखेडें (प्रांत वऱ्हाड) फैजपूरखेरीज सद्दा गांवचे इसम सदरील इसमांबरोबर धर्मशाळेंत जेवणास होते. अशाबद्दल फैजपूर येथील पंचांच्या सह्यांनिशीं पत्र आहे. त्यावरून सदरचे गांवीं तपास पंचांमार्फत केला असतां तेथील गांवपंच उत्तर देत नाहींत. म्हणून ते तपासणींत शिल्लक राहिले आहेत. पुढें सर्व पंचांनुमतें विचार करून व्यवस्था करण्यांत येईल. कळावें. मिति आषाढ वा। १ संवत् १९७५

पाडळसें

सही रावजी बापू पाटील
सही भिकू सोंदू पाटील दा। खु।
सही जैराम नारायण पाटील दा। खु।
सही अवसू ओंकार चौधरी दा। खु।
सही रामजी उखर्डू चौधरी दा। खु।
सही उखर्डू वा। विठो महाजन
सही भगवान वा। खुशाल चौधरी.

ता. १३।७।१९ सदर ठरावाची नक्कल घेतली.

फैजपूर

सही खुशाल हरी चौधरी, फैजपूर दा। खु।
सही धोंडू शामा महाजन, दा। खु।
सही लहानू आसाराम चौधरी फैजपूर
सही आनंदा भवानी दा। खु।
सही सोना सांडू महाजन फैजपूर
सही तानु वा। पुना महाजन, दा। खु।
सही रंगू खुशाल
सही लक्ष्मण जैराम चौधरी
सही सुपडू कचरू दा। खु।
सही तोताराम बधू महाजन, फैजपूर
सही लक्ष्मण वा। कासिराम,
सही परशराम बाबूराव चौधरी,
सही मनसाराम नारायण चौधरी,
सही तुकाराम लक्ष्मण चौधरी दा। खु।
सही भगवान महादू चौधरी,

शिक्का

दाखल ता० ९।६।२३

खरी नक्कल

सही (इंग्रजी)

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

Ex. No. 7 F.

अनवरे हिदायत नांवाचें गुजराथी पुस्तक.

---

https://archive.org/details/bk147/page/n89/mode/1up

Ex. No. 8.

प्रा० तर्फे साक्षीदार नं. ७ याची जबानी

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव मिठाराम बापाचें नांव गुणा, धर्म हिंदु, जात लेवेपाटीदार. उमर सुमारें ३५ वर्षांची, धंदा नोकरी खासगी रहाण्याचा गांव फैजपूर, डिस्ट्रिक्ट पू० खा०

सर तपासणीः—मी लेवेपाटीदार असून माझा पंथ सत्पंथ आहे. पूर्वखानदेशांत सत्पंथी लेवेपाटीदारांचीं ८०।७५ घरें असतील. सत्पंथी लोक हिंदु धर्माचेच आहेत. पाडळशाला आमची पंचायत भरली होती. त्या पंचायतींत सत्पंथी लोकांच्या विरुद्ध ठराव केला. सर्व लोकांना आमचीं तत्त्वें कळावीं म्हणून मी आयवैभवांत "सर्व हिंदुधर्माचे लोकांसनम्र विनंति" अशी मी जाहिरात दिलेली आहे. याशिवाय याच नोटशीच्या निराळ्या प्रती काढून वाटल्या आहेत. या नोटिशींत आमच्या सत्पंथी लोकांचे आचारविचार सर्व निवेदन केले आहेत. तो अंक मी हजर करितों. (Ex. 8 A.)

उलट तपासणीः—मी या खटल्याच्या १ ल्या तारखेस मात्र होतों. पाडळशाला या पंथासंबंधानें गेल्या पौष महिन्यांत एक वेळाच चर्चा झाली. त्यापूर्वी पाडळशाला पंचायत होऊन हा पंथ हिंदुधर्मबाह्य ठरलेला आहे हें मला माहीत नाहीं. मला आतां कागद दाखविला त्यावर (Ex. 8 B.) माझी सही आहे. मला आतां दुसरा कागद दाखविला त्यावर (Ex. 8 C.) ही माझी सही आहे. Ex. 8 B. यांत संवत् १९६२ सालांत सत्पंथी धर्म सोडल्याबद्दल मी सही केलेली आहे. त्या सालीं हा सत्पंथ धर्मबाह्य ठरविल्याबद्दल ठराव झालेला आहे. या ठरावांत सत्पंथ सोडावा असा ठराव झालेला असून मी त्यावर

https://archive.org/details/bk147/page/n90/mode/1up

सही केलेली आहे. Ex. 8 B. वर देवचंद तोताराम यानें सही केलेली आहे.

Ex. 8 C. चा अर्ज मला आतां वाचून दाखविला. आमच्या लोकांची पूर्वीं धर्मशाळा (Ex. 8 C.) मध्यें सांगितल्याप्रमाणें होती. त्या धर्मशाळेंत सत्पंथी लेवे पाटीदारशिवाय इतर जातीचा संबंध होता कीं नाहीं आठवत नाहीं. Ex. 8 C पाहून सांगतों इतर जातीचा संबंध होता कीं नाहीं, तें मला माहीत नाहीं. संवत् १९६२ सालांत सत्पंथी धर्म सोडण्याचा ठराव झाला हें आतां मला Ex. 8 B पाहून माहीत झालें. हा पंथ मी संवत् १९६२ सालांत सोडला होता. हा सत्पंथ मी पुनः आज १० वर्षें होतील तेव्हांपासून धरला. माझे वडीलहि सत्पंथीच होते. या पंथाबद्दल मला थोडी थोडी माहिती आहे. मी गुजराथेंत कधीं गेलों नाहीं. Ex 8 C चा अर्ज पाहून मला आठवतें कीं, बधू महाजनाचा या पंथाबद्दल दंड होऊं नये ह्मणून हा अर्ज पाठविला होता. Ex. 8 C च्या अर्जांत लिहिलेला मुलगा ह्मणजे धर्मकाका होत. सत्पंथी लोकांचे कांहीं मुर्दे गाडतात व कांहीं जाळतात.पुना कोळंबे याची आई जाळली होती. ज्याच्या घरांत मेलें असेल त्याला उपवास करावा लागत नाहीं. धर्माकाकाचे कपडे भगवे असतात.**आमच्या पंथाचा मुख्य ग्रंथ शिक्षापत्री आहे.** तो ग्रंथ छापील मिळत नाहीं. हातीव व जो आमच्या पंथाचा मनुष्य आहे त्यालाच हा ग्रंथ देतात. मी हा ग्रंथ वाचलेला आहे. पाठ येत नाहीं. हा ग्रंथ माझे घरीं नाहीं. संस्थानांत असेल. "पंचायतन मुसाफू असान करो " असें त्या ग्रंथांत नाहीं. या ग्रंथाचा महत्त्वाचा भाग मला आठवत नाहीं. गुरु ईमामशहा बोवानें १००

नियम बांधून दिलेले आहेत. ते त्या बुकांत आहेत. हें नियम 'कसे चालावे' याबद्दलचे आहेत. विष्णूची दया मिळवा असें या ग्रंथांत लिहिलें आहे कीं नाहीं मला नक्की सांगतां येत नाहीं. फैजपूरला रंगाऱ्यांचीं १००।१२५ घरें आहेत. त्यांच्यामध्यें सत्पंथी लोक नाहींत. पूर्वीं १०।५ वर्षांपूर्वीं होते कीं नाहीं मला माहीत नाहीं. बाप व मुलगा जोपर्यंत एकत्र आहेत तोंपर्यंत ते एकाच पंथाचे असतात. विभक्त झाल्यावर निरनिराळ्या पंथाचे होऊं शकतात. आमच्या पंथाची फैजपूरला धर्मशाळा आहे. या धर्मशाळेंत आमच्या पंथाशिवाय दुसऱ्या लोकांनां येण्याची परवानगी नसते, व पूजेच्या वेळीं काय करावें लागतें हें आह्मांला बाहेर सांगण्याची परवानगी आहे. आह्मी दुसऱ्या लोकांना आंत येऊं देत नाहीं त्यामुळें आह्मी कणकेची गाय करून खातों असा अपवाद लोकांचा असल्याचें मला माहीत आहे. संवत् १९६२ पूर्वीं आमच्या पंथाचीं घरें हल्लीं-पेक्षां जास्त होतीं किंवा कमी होतीं तें आठवत नाहीं.

फेरतपासणी:—मला या पंथाबद्दल जी माहिती आहे ती मी सर्व हिंदुधर्मास विनंति यांत प्रसिद्ध केली आहे. मी पंथ स्वीकारल्यापासून—दहा वर्षांपासून—मला जातीनें बहिष्कृत केलें नाहीं. आमचे रोटीबेटी व्यवहार सुरू होते. शिक्षापत्रींतील १०० नियमांपैकीं हिंदुधर्माशीं विरोध येईल असा एकहि नियम नाहीं. कणकेची गाय खातों असा लोकापवाद आहे. पण खरी वस्तुस्थिति तशी नाहीं. पूजेंतील प्रकार हिंदुधर्मबाह्य असे कधींच नसतात.

मु॥ जळगांव — SD. जी. एस्. राजाध्यक्ष.
ता. ८।९।२३ — मॅ० वर्ग १ पूर्वभाग

चार्जानंतर पुनः प्रतिज्ञेवर उलटतपासणीः—आनंदा यास ओळखतों. त्याचें घर पाहिलें आहे. फकीरखांचें दुकान पाहिलें नाहीं. आनंदाच्या घराच्या पूर्वेला दक्षिणोत्तर जाणारी सडक आहे. या घरापासून १०।१५ हात अंतरानें सडक आहे. या घराचा दरवाजा उत्तरेस आहे. एकच दरवाजा आहे. त्या घराला २॥–३हात रुंदीचा दरवाजा आहे. डहलजीसारखा मोठा दरवाजा नाहीं. लांकडाचा जिना दादर वर चढायला नाहीं. या घराच्या दक्षिण बाजूला लागून कोणाचें घर आहे किंवा मोकळी जागा आहे एवढें लक्ष नाहीं. या घराला मजला नाहीं. दरवाजा जमिनीपासून १ हात किंवा बिल्लास उंच आहे.

फेरतपासणीः—आनंदाचीं रहातीं घरें किती आहेत हें मला आठवत नाहीं. फकिराचें दुकान माहीत आहे. याच्या दुकानाच्या दुसऱ्या बाजूला आनंदाचें घर आहे. म्हणजे दुकान व घर यांत फक्त सडक आडवी आहे. या घराला दोन दरवाजे आहेत.

कोर्टसवालः—हे दोन्ही दरवाजे उत्तर दिशेला आहेत.

२४।९।२३

SD. **जी. एस्. राजाध्यक्ष.**

मॅ. वर्ग १ पूर्वभाग

(शिक्का)

खरी नकल

सही इंग्रजी,

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

———

Ex. No. 8 A.

आर्यवैभव-धुळें-तारीख २८ डिसेंबर सन १९२२ चा अंक.

सदरहु अंकांत Ex. No. 4 B. ची जी जाहीर विनंती आहे तीच छापलेली असून त्यावर खालील इसमांच्या सह्या आहेत त्या याप्रमाणें:—

१ सही—मीठाराम गुणा मौजे फैजपूर दस्तुर खुद्द.
१ सही—हिरामण नारायण मौजे फैजपूर दस्तुर खुद्द.
१ सही—देवचंद तोताराम किरंगे फैजपूर दस्तुर खुद्द.
१ सही—अवचित बुला महाजन मौजे चिनावल दस्तुर खुद्द.

(यांतील सविस्तर मजकूर ३९ ते ४२ पानांवर पहावा.)

Ex. No. 8 B.

समस्त पंच मौजे फैजपूर व भोरगांव पाडळसें मुक्कामीं सत्पंथी धर्माविषयीं ठराव झाला. व फैजपूर येथील पंचांनीं लहान मोठे मिळून सर्व लोकांस पाडळसें मुक्कामी जो ठराव झाला तो लहान थोर सर्व लोकांस सुनावणी केली. त्यांत सत्पंथी धर्माबद्दल जे ठराव झाले ते तेथील लहान थोर सर्व मनुष्यांस स्पष्ट करून सांगितलें. ते खालीं सही करणार सत्पंथी धर्मांतील पाडळसें येथील पंचांसमोर ज्यांनीं सह्या केल्या त्यांशिवाय इतर सर्व लोक सांगितल्याप्रमाणें कबूल आहेत. राहिलेले (फाटले) लोकांच्या सह्या मिति आषाढ वा। ३० संवत १९६२.

VSAK: 21-Jul-1876

१ डोंगर सांडू वायकोळा दा। खु।
१ परशराम मिठाराम वायकोळा नि। खु। द॥ डोंगर सांडू
१ तोताराम राघो वायकोळा नि। खु। दा। डोंगर सांडू
१ सोमा देवाजी वायकोळा नि। खु। दा। डोंगर सांडू
१ उखर्डू शामा वायकोळा नि। खु। दा। डोंगर सांडू
१ मिठाराम गुणा होला दा। खु।
१ वेडू सुका होला
१ रावजी अर्जुन होला
१ धनू चिंतामण
} दा। मिठाराम होला
१ ओंकार तापिराम भिरूड दा। खु।
१ गोविंदा विठू बोरोले दा। खु।
१ बारसू बावधन होला दा। खु।
१ मोतिराम वा। श्रावण होला दा। खु।
१ झिपरू पांडु किरंगे दा। खु।
१ शामा सोमा किरंगा दा। झिपरु
१ चिमण धनजी किरंगा दा। झिपरू
१ झेंडू सोमा किरंगा दा। झिपरू
१ आत्माराम टिकाराम भिरूड दा। पुंजो नथु.
१ दगडू बापू वायकोळा दा। डोंगर
१ ओंकार चिंधू भारंबे दा। खु।
१ सेनू हुला भारंबे दा। खु।

१ देवाजी भगा भारंबा दा। ओंकार
१ गणू झुबा भारंबा दा। ओंकार
१ आवसु लक्ष्मण भारंबा दा। खु।
१ आत्माराम यादव भारंबा दा। खु।
१ नारायण लक्ष्मण भारंबे दा। हिरामण
१ मोतिराम तुकडू वायकोला दा। व्यंकू दगडू
१ देवचंद तोताराम किरंगा दा। खु।
१ काशिराम कचरू महाजन दा। खु।
१ विठू तुकाराम भिरूड दा। कशिराम
१ भिका मुकुंदा किरंगा दा। हरि भिलाणकर
१ इश्राम राघो किरंगा दा। हरि भिलाणकर
१ रामु

१ कृष्णा लक्ष्मण भारंबा दा। दिना
१ खुशाल भिकारी भारंबा दा। ओंकार चिंधू
१ हिरामण विठू भारंबा दा। ओंकार
१ मंगू सोमा भारंबा दा। ओंकार
१ पुंजा वा। कचरू भारंबा दा। ओंकार
१ चिमण बापू भारंबा दा। खु।
१ टिकाराम वेडू भारंबा दा। खु।
१ यादो बुधो भारंबा दा। खु।
१ पुना लक्ष्मण भारंबा दा। खु।
१ भादू सांडू भारंबा दा। दिना
१ मोतिराम बुधो भारंबा दा। दिना
१ ओंकार मिठाराम नारखेडा दा। खु।
१ चावदस रामु किरंगा दा। तुकाराम

शिक्का

खरी नक्कल

मॅ. वर्ग १ पूर्वभाग

Ex. No. 8 C

श्री.

रा. रा. कुटूंब नाईक मौजे पाडळसें तालुके यावल यांस.—

खालीं सह्या करणार पंच मौजे फैजपूर यांचा रामराम विनंती विशेष. लिहिण्याचें कारण कीं, आमचे येथें वाद नव्हता, त्यापूर्वी गांवासंबंधीं कांहीं कामाकरितां पंच जमा झाले होते. त्यावेळीं बधू जाना महाजन यांना कांहीं मंडळीनें म्हटलें कीं, सत्पंथाचा निकाल झाला तरी ते मंदीर आपले गांवास सार्वजनिक लोकोपयोगी द्यावें त्यावर त्यांनीं सांगितलें कीं, त्या मंदिरांत निवळ आपलीच जात नाहीं. पुष्कळ जातींचा संबंध असल्यामुळें देतां येत नाहीं. व माझ्या एकट्याच्या स्वाधीन ही गोष्ट नाहीं. त्यावर कांहीं लोक म्हणाले कीं, सर्व बधू

महाजन आडवे येतात. तें मंडळीच्या मनांत होतेंच. त्यावर पुढें आमच्या गांवांत हळासंबंधीं व खतासंबंधीं व रखवाल्यासंबंधीं दुफळी झाली. त्या दुफळींत बधू महाजन आमचेकडे असल्यानें त्या मंडळींस वाईट वाटून त्यांचें कांहीं तरी नुकसान व्हावें अशा हेतूनें त्यास तिकडील मंडळीनें त्यांच्या तटांत वर्ज केलें. हें आह्मांस कबूल नाहीं. याचें कारण असें कीं भोरगांवची सभा झाल्यादिवसा-पासून बधू महाजन व सर्व सत्पंथी लोकांपैकीं कोणीहि त्या धर्मशाळेंत जात नाहींत. ठरलेल्या ६ महिन्यांच्या मुदतीचे आंत तेथें दिलेला मुलगा व त्याचा बाप हे त्याच्या गांवीं मंदिरास कुलुपें लावून गेले. मात्र देवघराच्या पूर्वेकडील बाजूस गुरें बांधण्याचें खपरेल आहे. तें बापानें बधू महाजन यास सरकी भरण्यास दिलें. तें त्यानें गांवांतील सर्व पंचांस विचारल्यावरून सांगितलें कीं, सरकी भरण्यास कांहीं हरकत नाहीं. मंदिरास पूर्वीचीं कुलुपें लाविलेलीं अद्याप जशींच्या तशींच कायम आहेत. व वर लिहिलेल्या खपरेलाचा रस्ता अलग आहे. व सरकी भरण्यास बधू महाजन स्वतः कधींच येत नाहीं. त्याचे नोकर येतात. सरकी भरण्यास सहा महिने झाले. इतके दिवसपर्यंत त्याची कांहींच गोष्ट नव्हती. दुफळीमुळें त्यांनीं बधू महाजन यांस वर्ज केलें तें आमचेकडील लोकांस माहीतसुद्धां नाहीं. त्यांचे तटांतच वर्ज केलें तें निवळ अदावतीनें केलें हें पंचाच्या ध्यानीं यावें. कळावें, लोभ असावा ही विनंति. मिति श्रावण शु० १३ संवत् १९६३ दस्तुर काशिराम कचरु महाजन वस्ती फैजपूर.

सह्या.

१ मनसाराम नारायण चौधरी दस्तुर खुद
१ तोताराम वा। हिरा चौधरी फैजपूर दस्तुर खुद्द
१ ओंकार बकसु भारंबा दा। खु।
१ आत्माराम टिकाराम भिरूड नि।। दा। काशिराम
१ सोना दशरथ
१ आनंद वा। कृष्णा महाजन दा। खु।
१ मलजी वा। रामजी भिरूड नि।। दा। काशिराम भिरूड
१ उखर्ड्र वा। नारायण महाजन वस्ती मौजे फैजपूर
१ गोविंदा वा। विठोबा दा। खु।
१ सोना काशिराम चौधरी दा। खु।
१ भगू वा। चिंतामण महाजन दा। खु।
१ टिपा गोविंदा नारखेडा
१ भावडू वा। गोविंदा दा। खु।
१ ओंकार वा। मिठाराम नारखेडा दा। खु।
१ दगडू वा। गणु नारखेडा दा। खु।
१ उखर्ड्र वा। केसो नारखेडा दा। खु।

१ परशराम बाबूराव चौधरी दा। खा।
१ सदु वा। भुसा नारखेडा दा। खा।
१ काशिराम कचरू महाजन दा। खा।
१ विठोबा वा। टिकाराम भिरूड नि। खा। दा। काशिराम कचरु
१ चांगो वा। पांडू फैजपूरकर
१ मनसाराम खंडू दा। खा।
१ तानू वा। पुना महाजन दा। खा।
१ गणपत वा। मोतिराम
१ नारायण वा। उखर्डू दा। खा।
१ तुकडू वा। रामजी चौधरी दा। खा।
१ रामु वा। हुना चौधरी दा। खा।
१ महारू वा। पुना महाजन दा। खा।
१ पुंजो गणा भारंबा नि। खा। दा। महारू
१ कचरू गना भारंबा नि। महारू
१ सोमा उमा चौधरी नि। महारू
१ गणपत उघडु कोल्हा नि। दा। खा। गणपत
१ नथु विठोबा कोल्हा नि। दा। गणपत
१ टिकाराम वा। वेडू भारंबा, फैजपूर दा। खा।
१ गोमा वा। बापू भारंबा नि। दा। टिकाराम
१ कृष्णा व॥ लक्ष्मण भारंबा नि। खा। दा। टिकाराम
१ पुना वा। लक्ष्मण भारंबा नि। दा। टिकाराम
१ भादू वा। सांडू भारंबा नि। खा। दा। टिकाराम
१ गरबड वा। दगडू बोरला वा। फैजपूर दा। खा।
१ धोंडू वा। विठोबा कोल्हा नि। दा। गरबड
१ काशिराम वा। विठोबा कोल्हा नि। खा। दा। गरबड
१ काळू सोमा भिरूड
१ रंगु वा। सदु चौधरी दा। खा।
१ हुना वा। सुपडू चौधरी दा। खा।
१ केसो वा। पाहूजी किरंगा दा। खा।
१ मलजी सुपडू नि। केसो
१ नथु वा। सुका किरंगा नि। दा। केसो
१ हरी सोमा भिलाणकर दा। खा।
१ जैराम वा। बनसी बोरला दा। खा।
१ देवचंद वा। तोताराम दा। खा।
१ पुरसो वा। रामजी चौधरी दा। खा।
१ सखाराम कृष्णा नारखेडा नि। दा। सदु भुसा
१ भिका कृष्णा नारखेडा दा। भुसा
१ झिपरू वा। भिका बोरला दा। खा।
१ मदु वा। रामजी जमादार
१ भुरा वा। रामजी दा। गबा
१ चावदस वा। रामजी किरंगा नि। दा। केसो
१ ईश्राम वा। राघो किरंगा नि। खा। दा। केसो
१ शामु वा। राघो किरंगा नि। खा। दा। केसो
१ दारकू आबा
१ लक्ष्मण वा। जयराम चौधरी दा। खा।
१ पुना हुना चौधरी दा। खा।
१ लहानू बापू भिरूड
१ लहानू खुशाल चौधरी नि। खा। दा। कासिराम

१ गरबड खुशाल चौधरी नि। दा। काशिराम
१ रामु ईष्णा नारखेडा दा। खु।
१ माधव सुका चौधरी नि। दा। महारू
१ भिका वा। रामजी बोरला नि। दा। भिका
१ महारू वा। कृष्णा बोरला नि। दा। भिका
१ धांगो वा। नारायण बोरला दा। खु।
१ नथू वा। हरी बोरला दा। खु।
१ बारसु वा। नारायण बोरला दा। खु।
१ बुधो वा। आबा बोरला
१ भगु वा। गोविंदा बोरला नि। दा। नथु
१ खुशाल वा। दुला बोरला नि। नथु
१ सखाराम तापिराम चौधरी नि। दा। नथु
१ नागो बापू चौधरी नि। खु। दा। लहानू
१ सखाराम मोतीराम नि। दा। लहानू
१ गरबड वा। पांडु नि। दा। लहानू
१ भादू ईष्णा नि। दा। लहानू
१ देवाजी सोनू चौधरी दा। खु।
१ मोतिराम वा। रावण बोरला नि। महारू
१ देवाजी वा। नारायण नि। दा। चुडामण
१ देवाजी वा। पांडु नि। दा। चुडामण
१ खुशाल वा। नारायण बऱ्हाटा नि। दा। चुडामण
१ बुधो वा। गणु चौधरी दा। खु।
१ उखर्डू तापिराम चौधरी नि। खु। दा। मोहन
१ दगडू वा। तुकाराम फैजपूर दा। खु।
१ मिठाराम वा। गुना होला दा। खु।
१ रावजी वा। अर्जुन होला दा। मिठाराम गुणा
१ धनु वा। चिंतामण होला दा। मिठाराम होला
१ वेडू वा। सुका होला दा। मिठाराम
१ बारसू वा। मोहोन होला दा। खु।
१ चुडामण वा। काळू होला दा। खु।
१ काशिराम वा। गणु होला दा। खु।
१ लहानू वा। पांडू भिरूड दा। खु।
१ यादो वा। पांडू भिरूड दा। खु।
१ भिका वा। शामा बढा नि। दा। लहानु
१ लहानू ईष्णा पाटील दा। खु।
१ काळू सेनू चौधरी
१ भुसा हरी भारंबा नि। खु। दा। तानु
१ भुरा वा। तापिराम नि। खु। दा। तानु
१ परसो वा। सोमा नि। खु। दा। तानु
१ नथू बापू चौधरी नि। खु। दा। बुधो

खरी नक्कल

शिक्का

सही इंग्रजी

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर ९

प्रा. तर्फे साक्षीदार नं. ८ याची जबानी

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं:—माझें नांव गिरधर, बापाचें नांव बापू, धर्म हिंदु, जात भावसार, उमर सुमारें ५५ वर्षांची, धंदा सुतारीचा, रहाण्याचा गांव जळगांव. डि. पू. खानदेश.

सर तपासणी:—मला आतां Ex. 9 A. ची 'हिंदुधर्मास विनंति' ही जाहिरात दाखविली आरोपींनीं जीं हँडबिलें काढलीं त्यांवरून मला ही जाहिरात काढावी लागली. Ex. I D. ची जाहिरात प्रसिद्ध झाल्यावर मी ही जाहिरात काढली आहे. Ex. I D. त नमुद केलेले खटल्या-बद्दल मला माहीत आहे. मी त्यावेळीं १६।१७ वर्षांचा होतों. जी हकिकत होत होती ती मला माहीत होत होती. हा खटला प्रांताचे साहेबासमोर होता व निरनिराळ्या मुा चालला. मी स्वतः खटला ऐकण्याला गेलों होतों. या खटल्याचा निकाल आरोपीला तोंडी ताकीद देऊन सोडून दिलें. साहेबदीन यांचे जे स्टांपावर माफीपत्र झाले त्या माफीपत्राच्या शिळाप्रेसवर प्रति काढून त्या वाटल्या गेल्या. माफिपत्र काय आहे हें लोकांना कळावें म्हणून प्रती वाटल्या. फिर्यादी हरचंद दोधू हे सत्पंथी होते. व भिकन गदू वगैरे हे कर्मी पंथाचे होते. हरचंद दोधू देवचंद रंगारी या लोकांनीं सत्पंथी पंथ सोडून कर्मी पंथ स्वीकारला नाहीं. रामचंद्र नथु हा मात्र कर्मी पंथ सोडून धर्मी पंथांत आला.

उलट उपासणी:—भिकन गदूचा नातु, रामचंद्र नथूचा नातू व रामचंद्र सदूचा मुलगा हे हल्लीं हयात आहेत. भिकन, रामचंद्र, रामचंद्र सदू हे मयत आहेत. या लोकांचे वारस सत्पंथी सोडून

आहेत. म्हणजे यांनीं पंथ सोडला आहे. हरचंदचे मुलगे २ आहेत देवचंदला मुलगा नाहीं. हरचंदचीं मुलें सत्पंथी आहेत. फैजपूर मी पाहिलें नाहीं. फैजपूरचे रंगारी ओळखीचे नाहींत. आमच्या जातींत या पंथाबद्दल चर्चा झाली होती. धुळ्याचे फिर्यादी अगोदर सत्पंथी लोक निजाम पढतात, मुसलमानी धर्म चालवितात, अशा सबबीवर वाळींत टाकलें होतें. आमच्यांत अद्यापहि सत्पंथी असून अजून वाद सुरू आहे. मी सत्पंथी आहे. आमच्यांत पंथी व कर्मी असे तट आहेत. सोनारांत आहेत कीं नाहींत मला माहीत नाहीं. सत्पंथी ठिकाण नवसारी, इराणा (पिराणा) व बहादरपूर या ठिकाणीं आहे. आणखीं कांहीं ठिकाणें आहेत. पण मला माहीत नाहीं. मला बहादरपूरच्या ठिकाणाचीं तत्वें माहीत आहेत. बाकीच्या ठिकाणचीं माहीत नाहींत. आमच्यांत कांहीं मुर्दे जाळतात, कांहीं गाडतात. गाडते वेळीं प्रेताचें डोकें दक्षिणेला ठेवितात. शुक्रवारीं शुद्ध बीजला जर चंद्रदर्शन आलें तर आह्मी उपोषण करितों. आमची कांहीं चूक झाल्यास त्याबद्दल पंच निकाल करितात. काका धर्मगुरु यांचें काम फक्त दीक्षा देण्याचें आहे. बहादपूरच्या गादीचा शिक्षापत्री धर्मग्रंथ नाहीं. आमचे धर्मग्रंथ मूळबंधन व गौडवाणी हे दोन ग्रंथ आहेत. मला सहीपुरतें बालबोध येतें. धर्मासंबंधीं मूळबंधन व गौडवाणी हे दोन ग्रंथ माहीत आहे. बाकी माहीत नाहींत. या ग्रंथांतहि काय आहे तें मला सांगतां येणार नाहीं. Ex 9 A मधील माहिती आह्मी त्यांत दिल्याप्रमाणें करीत नाहीं ह्मणून मी प्रसिद्ध केली आहे. सांईबाबाच्या शिष्यासंबंधीं ऐकण्यांत आहे. स्वतः माहिती नाहीं. बहादरपुराला वर्षांतून एक उरूस होतो. त्या

उरुसाला मी ५।६ वर्षांपूर्वी मी जात होतों. या उरुसाला बहादरपूरच्या गादीचेच लोक येत होते. दुसरे लोक येत नव्हते. माझ्या माहितींतील ग्रंथांत सहदेवाची वाचा लिहिलेली आहे. त्यांतील कलमा मला माहीत नाहींत. कलमा माझ्या वाचण्यांत नाहींत. कलमा मुसलमानी असतात. गुरुमंत्र सांगायला आमच्या धर्माची हरकत आहे. गुरुमंत्र संस्कृत भाषेंत आहे. हा मंत्र काकांनीं दिलेला आहे. हे काका कर्जोतला आहेत. त्यांचें नांव देवराम बोत्रा आहे.

फेरतपासणी:—आमच्यांत बीजेशिवाय गुरुवार, कोणी एकादशीहि करितात. आमच्यांत—कर्मी धर्मी लोकांत सोयरिका होतात. आह्मी निमाज पढतों असा आरोप होता. पण खरोखर आह्मी निमाज पढत नाहीं.

शिक्का

मुा जळगांव
८।६।२२

Sd. **जी. एस्. राज्याध्यक्ष**
मॅ० वर्ग १ पूर्वभाग.
खरी नक्कल.
सही इंग्रजी.
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

Ex No 9 A.

सर्व हिंदु धर्मांतील लोकांस नम्र विनंति.

फैजपूर येथील खंडेरावचे वाडींतील ब्रह्मचारी म्हणवून घेणारा आत्मानंद यानीं 'स्वधर्म पालन करो'या मथाळ्याची दोन हस्तपत्रकें छापून तीं सर्व लोकांत वाटलीं आहेत. त्यांमध्यें सत्पंथी लोकांबद्दल जगांत गैरसमज करण्याचा यत्न केलेला आहे. तो असा कीं हे लोक कुराणामध्यें जो धर्म लिहिला आहे तो पालन करितात, ते मोमना आहेत, त्यांच्याशीं भोळे हिंदुलोक खाणेंपिणें, लग्न करणें

वगैरे संबंध करितात; असा अधर्म करूं नये. धुळें कोर्टांत ता. १३।२।१८८३ रोजीं मुसलमानी धर्म भावसार लोकांचें वादांत सिद्ध केलेला आहे वगैरे खोटी व खोडसाळ विधानें केलीं आहेत. त्याचप्रमाणें जळगांव येथील प्रबोधचंद्रिकेचे ता. ४।१२।२२ चे अंकांत कांहीं भावसार लोक सत्पंथी धर्मचे आहेत; तो धर्म मुसलमानी मताचा आहे सबब हिंदु लोकांनीं व भावसार लोकांनीं या लोकांशीं खाणें पिणें वगैरे संबंध ठेवूं नये असें प्रसिद्ध केलें आहे तें निव्वळ खोटें व खोडसाळ विधान केलें आहे यामुळें सर्व जातींत सतपंथी लोकांबद्दल गैरसमज होत आहे तो होऊं नये सबब खरी हकीकत कळविण्यांत येतें ती येणेंप्रमाणें.

१ धुळें कोर्टांत सत्पंथी भावसार लोकांचा खटला फौजदारी मु॥ नंबर ६७ सन १८८२ निकाल तारीख १३।२।१८८३ चा मे. फ. क. मॅजिस्ट्रेट वर्ग १ यांचे समोरील

हरचंद दोधू व देवचंद लहानु रंगारी वस्ती शिरपूर } फिर्यादी (सत्पंथी उर्फ धर्मी लोक)

भिकन गदु, शिवराम देवाजी, हेमला कृष्णाजी व रामचंद्र नथु व रामचंद्र सदु रंगारी वस्ती शिरपूर } आरोपी (कर्मी लोक)

सदरहू मुकदम्याचे ठरावांत सत्पंथी लोकांचा धर्म मुसलमानी ठरलेला नाहीं व तसें कोर्टानीं कोणतेही प्रकारें धाचीत धरलेलें नाहीं व ठरावांत त्या संबंधानें कांहीं एक वर्णिलेलें नाहीं फक्त कर्मी आरोपीच्या लेखांनीं धर्मी म्हणजे सत्पंथी फिर्यादीची जातीत बहिष्कृत केल्यामुळें त्यांची अब्रू कमी झालेली नाहीं असें ठरवून आरोपींनां सदरहू खटल्यांत सोडलेले आहेत सदरहू ठरावांत कोर्टानें गुरुसाहेबदीन यांचे जबानीवर पूर्ण विश्वास ठेवून आरोपींनां सदरहू गुरुबद्दल खोडसाळ विधानें केल्याबद्दल फार दोष दिला आहे व तसें पुढें करूं नये अशी त्यांनां ताकीद दिली आहे.

२ सदरहू गुरु यांनीं वरील खटल्यांतील आरोपीपैकीं भिकन गदु व रामचंद नथु व रामचंद सदु रंगारी वस्ती शिरपूर यांचेवर मे० बेन्स साहेब फर्स्ट क्लास मॅ. वर्ग १ जिल्हा खानदेश यांचे कोर्टांत फिर्याद केली होती सदरहू फिर्याद भावसार सत्पथी लोकाबद्दल कर्मी भावसार लोकांनीं जे खोटे लेख लिहीले होते त्यांवरून सदरहू गुरूंची आब्रू कमी केल्याबद्दल त्या कामांत वरील आरोपींनीं वरील कोर्टांत फिर्यादी गुरु यांची लेखी दस्तऐवजावर माफी मागीतली.ती माफी

त्यांनीं उदार मनानें मान्य करून ता. ९।६।८४ रोजीं वरील फिर्याद काढून घेतली व माफी मागितलेला दस्तऐवज छापून सर्व लोकांत प्रसिद्ध केला गेला.

३ धुळें कोर्टाचा फौजदारी मु॥ नंबर ६७ सन १८८२ तील आरोपींपैकीं रामचंद नथु भावसार (कर्मी) यानें सदरहू खोटीं विधानें केल्याबद्दल पश्चात्ताप पावून सत्पंथी धर्माच्या खरेपणाबद्दल पूर्ण खात्री झाल्यामुळें त्यानें पुढें स्वतः सहकुटुंब सत्पंथी धर्म स्विकारून आयुष्य पूर्ण केलें, ही गोष्ट सर्व हिंदु व भावसार लोकांना माहिती आहे. इकडे वाचकवर्ग पूर्ण लक्ष देतील अशी विनंती आहे.

४ येणेंप्रमाणें खरी हकीकत असतां सदरहू आत्मानंद यानें सर्व मजकूर खोडसाळपणाचा व खोटा प्रसिद्ध केला आहे. भावसार जातीचे सत्पंथी लोक हे जातीनें व धर्मानें हिंदु आहेत व ते हिंदुचालीरिती व सण व कुळाचार वगैरे पाळितात. त्यांचें सर्व वर्तन हिंदुधर्माप्रमाणेंच आहे. फक्त मुळगुरु सय्यद मुसलमान होता, येवढ्यानें त्याचें हिंदुत्व जात नाहीं. कबीर, शिरडीचे साईबुवा, नागपूरचे सांईबाबा हे जातीनें मुसलमान असून त्यांचे अनुयायी व शिष्य हे ब्राह्मण वगैरे हिंदु लोकांच्या श्रेष्ठ वर्णांत हल्लीं आहेत. त्यांना कोणी त्यांचें जातीबंधु वाळींत टाकीत नाहींत अगर मुसलमान गुरु मानल्यामुळें त्यांचेशीं खाणें पिणें व लग्न करणें वगैरे संबंध कोणीं तोडीत नाहींत. ही गोष्ट सर्व हिंदु लोकांना माहिती आहे. सबब विनंती कीं, सदरहू ब्रह्मचारी ह्मणविणारा आत्मानंद यानें खोडसाळ व खोटा मजकूर छापून प्रसिद्ध केला आहे. त्यामुळें इतर जातींनीं आमचेबद्दल गैर समज करून घेऊं नये, व आमचे धर्मातील लोकांशीं पूर्वींप्रमाणेंच चालू असलेलें प्रेमाचें वर्तन कायम ठेवावें अशी या पत्रिकाद्वारें खालीं सही करणार नम्र विनंती करीत आहे.

सह्या भावसार सत्पंथी

सही गिरधर बापु भावसार शिरपुरकर हल्ली वा। जळगांव द. खु.
सही रघुनाथ सखाराम द. खु.

Court Case No

EX. No. 10.

Deposition of Witness No. 9 for the prosecction. (In the Court of District Magistrate of Ahmedabad, by Commission).

I do hereby on solemn affirmation state that :--
My name is Kaka Laxman Father's name Karamsi
My religion :aste—Sadhu
My age about 60, Occupation–Religion
Residence—Pirana, District Ahmedabad.

EXAMINATION-IN-CHIEF:—

I belong to caste of Leva Patidars. My religion is Hindu. My sect is called Satpanthi. I am the Guru of that sect. Original Guru was Imamshah. His descendants are not Gurus. The followers of Satpanthi are Hindus. They do not follow the Kuran. They do not practise circumcision nor Namaz. They believe Vedas and in Puranas, Ramayan etc. The specially respected books of the Panth are Shiksha patri, Mulbandh, and Guruwani. There are the words of Imamshah. They are mass, (written by hand) and not printed. The words of Imamshah's descendants are not taken as guide, nor do the followers believe in them. There is no book called Anware Hidayat respected by us. The forms of worships, marriage, death etc. are those of Hindus. The dead are buried by some and cremated by some. It is not that directions given by Imamshah must be observed by all. If they do not observe them they will not be called Satpanthi. But customs vary in different localities. We do not observe Bakrid, Ramzan, Moharam. We observe all the Hindu festivals. They observe fasts of Ekadeshi etc. They believe in ten Avatars. They look upon on cow as sacred and think it meritorious to save it from slaughter. Cow urine is regarded as sacred.



Pirana Gadipati
Kaka Laxman
Karamshi

गुरुवर्य—काका लक्ष्मण करमसी, संस्थान पिराणा.

Satpanth includes Hindus of various castes i. e. Brahmins, Banias, Kolis, Sonars, etc. They are known by their usual castes. They do not eat together nor intermarry. All the social intercourse is within the caste. Brahmins who are not Satpanthis associate in all ways with Satpanthi Brahmins.

No Mahomedan is in the Satpanth. Satpanthis do not commit "Himsa." It is false that Satpanthis are beef eaters. One called me a beef eater I should feel disgusted.

(Above question objected to by accused's pleader)

Cow made from flour

Satpanthis do not make cows of flour and eat them. I published document Ex.3(Ex.10-B).Satpanthis of Khandesh came to me and spoke to me of Ex.2(Ex. 10-A). I therefore published Ex. 3. I spoke to Gulam Husen and he published Ex. 4(Ex. 10-C). Statements in Ex. 3 are true, so also Ex. No. 4 is true. As per Ex. 2 it is not true that the words Hakhallah etc. are written on the gate. It is not true that Brahmins' threads taken by Imamshah are stored in the Darga. The pieces of thread in the Darga are merely votive offerings by visitors. The Satpanthis are not Mominas. It is not true that Hindus refuse marriage etc, with Satpanthis. I do not know Marathi. I got it translated by Mr. A. G. Pandit. I signed it.

CROSS :—

Imamshah's tomb is in Dargah (not temple) at Pirana

Imamshah founded the Satpanth sect. He is never called Imamuddin. Pirana is within village of Gujrath. There is a wall round Pirana. There are tombs therein. Imamshah's tomb is in the Darga. There is Roza of Sayad Khani near that tomb. I do not know if Bismillah etc. is written over that Roza. There is no Panja to my knowledge in a hault near there. 30 years ago I saw there a trishul

NOTE :—Ex. 2, 3 & 4 are the same Exhibits, No, 1-A, 1-B & 1-C of Jalgaon Court.

(trident) with some pieces of ordinary thread. They were long there. I have seen a Brahmin's sacred thread. Those were not sacred threads. I examined them at the time. Satpanthis are generally Kacchis. The Gadi is at Pirana, at other places Dharmashalas, There is no Dharmashala at Navsari.

There is one Mirpuare (Mr. Pyare)Saheb at Navsari. He is a leader of Satpanthis. There is Dharmashala at Fazipur. It is in charge of one man. At Ahmedabad there is a Dharmashala. I am the head at Ahmedabad. There are sayads at Pirana and here. They claim the gate at Pirana. They are Musalmans. There is a mosque near Sd. Khani's tomb. (Roza).

There are 5 subseccts of Satpanthis--Panchia, Satia Athia, Imamshahi, Nurshahi. These 5 subsects have different rules.

The Panchias and Satias do not believe in Imamshah. Imamshah's followers are not in these five sects. Nor do they believe in his successors. They believe in Bala Mahmad Saheb and other descendants of Imamshah. Kunbis are found among Panchias, Satias and Athias. Navasari K. are called Matias. Kakas are called at burials. I do not use the words, "Loban Jale" etc. We offer prayers in verses of Imamshah in Gujarathi. I do not use words Bismillah etc.

Ceremonies at child birth etc. are performed by Kakas. There is no image of gods or pictures in the compound at Pirana. I do not perform Namaz. I do not carry Tabut. I do not fast Ramzan. I have dined with Patidars but not for 2 years past. I cannot give names. I do not know any example of a marriage between Patidar and a Satpanthi patidar. I cannot give example of dining together. There was no dispute with H. H. Agakhan. I believe in Atharva Veda. I cannot give instance of its princiiples. Kakas are buried and no stone is placed. I gave notice to accused that I would prosecute him for

defamation. I know Pandit. Pandit addressed the envelope. (Ex. 5) i. e. (Ex. 10-D)*. The Notice (Ex. 6) i. e. (Ex. 10-E)† is signed by me.

I have seen no advertisement in Gujarathi Panch of 24-6-23. I know Shivlal Dayabhai. I have seen his printed notice (Ex. 7) i. e. (Exh. 10-F). It is addressed in interest of Patidars. There is a dispute about Satpanthi sect as to whether it is Hindu or Mahomedans.

(Refused to allow pleaders to call for the 3 sacred books as they are relevant to this case).

I do not pray in Imamshah's tomb but in a separate hall. Secrecy is observed. We make ceremony of "Gatganga', Saiyads say the Mantra 'Panjetan Muskalho asankaro' we do not say it. We perform Kalaspuja. Mantras are spoken. The Satias use the word Bismillah etc. We do not. I do not know if Satias are Hindus or Musalmans. They are Shekhs. I invoke Imamshah and Bhagwan. I have been Kaka for 20 years. I have been in Gujarath for 40 years. I do not meet Patidars other than Satpanthis.

RE-EXAMIMATION:—

We do not offer Namaz in Roza at Pirana. There are Satpanthis from other parts of India besides Katch Mirpyare (Mr. Pyare) Saheb is head of Nurshahi Dharmashala, not ours. I have come in touch with non-satpanthis but I do not associate with them.

5th July 1923.

(Sd.) District Magistrate, Ahmedabad.

Seal.

True copy

Sd. G. S. RAJADHYAKSHA,

Sub-Divisional Magistrate

E. D. East Khandesh.

---

* Registered envelope of the Notice, addressed to the accused, by Kaka Laxman Karamsi.

† The Notice, given by Kaka Laxman Karamsi, to the accused.

निशाणी नंबर ११

प्रा. तर्फे साक्षीदार नं. ९ याची जबानी.

ડીસ્ટ્રીક્ટ માજીસ્ટ્રેટ કોરટ અમદાબાદમા કમીશનઉપર લીધેલી જુબાની.

હું આ ઉપરથી પ્રતીજ્ઞા કરી કહું છું કે મારૂં નામ કાકા લખમણ કરમશી ધર્મ સતપંથી જાત સાધુ ઉમર આસરે સાઠ વરસની ધંધો ધર્મ ઉપદેશનો રહેવાના ગામ પીરાણા ડી૦ અમદાબાદ

સર તપાસણી:—મારી જાત લેવા પાટીદાર છે. મારો ધર્મ હીંદુ છે. મારો પંથ સત્‌પંથ કહેવાય છે. હું સતપંથનો ગુરૂ છું. સતપંથના મુળગુરૂ ઈમામશહા છે. ઇમામશહાના વંશજો ગુરૂમા નહી. **સતપંથી લોકો હીંદુ કહેવાય છે. તેઓ કોરાનને માનતા નથી. સતપંથી લોકો સુન્નત કરાવતા નથી તેઓ નિમાજ પઢતા નથી. હિંદુઓના વેદ ગ્રંથોને આ લોકો માને છે. તેમ ભાગવત રામાયણને પણ માને છે.** આ પંથના લોકો જે ગ્રંથોતરફ **માનતી લાગણીથી** જુએ છે **તે શીક્ષાપત્રી, મુળબંધ અને ગુરૂવાણી છે.** આ ત્રણે પુસ્તકો ઇમામશાહાના લખેલા છે. આ ગ્રંથો હસ્તલિખિત છે. ઈમામશાહાના વંશજોએ લખેલા ગ્રંથો ધાર્મીક પુસ્તકો ગણાતા નથી. તેમજ તેમના અનુયાયીઓ તેને માનતા નથી. અનવરે હીદાયત નામનો અમારો ધર્મગ્રંથ નથી. અમારા પંથના માણશો લગ્ન-મરણ પ્રસંગે હીંદુ રીતરીવાજો પાળે છે. **અમારા પંથના માણશો કેટલાક સબને દાટે છે અને કેટલાક બાળે છે.** આના સંબંધમા જે સુચનાઓ ઇમામશાહાએ કરેલ છે તે પાળવી જોઇએ એમ નથી. આપ્રમાણે નહી પાળે તે સતપંથી કહેવાય નહી. બાળવું અગર દાટવું તે દેશના રીવાજપ્રમાણે થાય છે. સતપંથી લોકો રમજાન, બકરીદ અને મોહોરમ પાળતા નથી. **સતપંથી લોકો એકાદશી, રામનોમી, ગોકલઆઠમ વિગેરે હીંદુ તહેવારો પાળે છે.** સતપંથી લોકોપૈકી જેની મરજીમા આવે તેઓએ એકાદશી, રામનોમી વિગેરે દિવસોએ અપવાસ કરે છે. સતપંથી લોકો હીંદુની માફક દસ અવતાર માને છે.

સતપંથી લોકોને ગાય પાળવાની છે. ગાયોને પુજ્ય તરીકે ગણે છે. અને ગૌમુત્રને પવીત્ર પ્રાયશ્ચિત્ત વિગેરેમા માને છે. સતપંથમા ધણી કોમના હીંદુઓ છે. **સતપંથમા બ્રાહ્મણ, વાણીઆ, પાટીદાર, સોની, કોલી હોય** છે. એ લોકો સહુ સહુની જાતથી ઓળખાય છે. સતપંથના વાણીઆ, બ્રાહ્મણ અંદરોઅંદર જમતા નથી. તેમ કન્યા આપતા નથી તેમની જાતમાજ બધા વ્યવહાર થાય છે. સતપંથી બ્રાહ્મણ સતપંથી સીવાયના બ્રાહ્મણ સાથે વ્યવહાર રાખે છે, એટલે જમે છે, કન્યા આપે છે. બ્રાહ્મણ વિશે મેં કહયું તેજ પ્રમાણે બીજી જાતો વર્તે છે. **સતપંથમાં કોઈ મુસલમાન નથી. સતપંથી હીંસા ધર્મ માનતા નથી. અહીંસા માને છે.** સતપંથી લોકો ગૌભક્ષક છે તેમ કોઇ કહેતું હોય તો તે ખોટું છે (કોઇ મને ગૌભક્ષક કહે તો મારૂં માથા વાઢ્યા બરાબર લાગણી થાય.) Note, (આ સવાલનો તો મતદાર તરફથી વાંધો લેવામાં આવે છે.) સતપંથીમા લોટની ગાય કરીને ખાવાનો રીવાજ નથી. મને બતાવી તે બર મરાઠીની એકઝી.જાહેરખ ૩ (Ex. 10 B.)તે મેં છપાલી છે. ખાનદેસના સતપંથીઓએ મારીપાસે આવીને તોમતદારે કાઢેલી જાહેરખબર Ex. ૨ (Ex. 10 A.) બાબત કહયું તેથી મેં Ex. ૩ ની જાહેરખબર કાઢી. મેં આ બાબત ગુલામ હુસેનને કહી અને તેણે Ex. ૪ (Ex. 10 C.)ની જાહેરજબર પ્રસિદ્ધ કરી. Ex. ૩ ની હકીકત ખરી છે. Ex. ૪ ની પણ ખરી છે. પીરાણાની દરગાહની પશ્ચીમ તરફના લોઢાના દરવાજાઉપર એકઝ. ૨ મા લખ્યા મુજબ કલમા લખેલી નથી. તેમજ બ્રાહ્મણોની ઇમામશાહે ઉતારી લીધેલી જનોઇઓ દરગામા રાખીલી નથી. સુતરના કકડા બાધા મુકવા આવે તેના દરગામા પડેલા છે. અહીં જે મુમના લોકો છે તે સતપંથી નથી. સતપંથી લોકો મુમના કહેવાતા નથી. સતપંથી લોકોના સંબંધ તેમની જાતમા છે. નથી એમ જે કહે છે તે ખોટું છે. કુરાણમાં લખેલું સતપંથી માને છે એ વાત ખોટી છે. એકઝી. ૨ નો જવાબ એકઝી. ૩ મા આપ્યો છે તે મરાઠીમા છે. હું મરાઠી જાણુતો નથી. મી. એ. જી. પંડીતે જે એન્જીનીઅર છે, અને મારા મકાનમા રહે છે, તેમને મેં

ગુજરાથીમાં હકીકત કહી તે પ્રમાણે તેમને મરાઠીમા લખાણ કરયું. તે પછી મને વંચાવ્યુ અને તે પછી મેં તેનાઉપર સહી કરી.

ઉલટ તપાસણી—ઇમામશાહા સત્પંથનો સ્થાપનાર છે તેઓ ઇમામુદ્દીન કહેવાતા ન હોતા. પીરાણા ગીરમથાની હદમા આવેલું છે. પીરાણાની આસપાશ કોટ છે. તેની અંદર હાલ પણ ઘણી કબરો છે. અને ઇમામશાહાની કબર પણ રોજામા છે. ઇમામશાહાની કબરની ડાબી બાજુએ ઇમામશાહાના વડવા સૈયદખાનનો રોજો છે. તે દરવાજા ઉપર કલમા છે કે નહી તે હું જાણતો નથી. કારણ કે હું ત્યાં જતો નથી. સૈયદખાનીના રોજાની આથમણી બાજુ વીસત્રીસ ફૂટના છેટે ઘુમટ જેમા ધાતુનો પંજો છે એવું હું જાણતો નથી. ત્રીસેક વર્ષ ઉપર એક ત્રીશુળ ઉપર સુતરના કકડા મેં જોયા હતા. તે જનોઇઓ ન હોતી. આ સુતરના કકડા ઘણા વખતથી છે. બ્રાહ્મણો જનોઇ પેહેરે છે તે મેં જોઇ છે. તે સુતરના કકડા જનોઈ નથી. તે વખતે મેં આ કકડા જોયા હતા. તે જનોઇ ન હોતી. સતપંથીનો વધારે ભાગ કચ્છનો છે. નવસારીમા પીરાણાની ધર્મશાળા નથી. નવસારીમા મી. મીર પ્યારેસાહેબ છે. તે ત્યાંના સતપંથીના આગેવાન તરીકે છે. બરાનપુરમા ધર્મશાળા નથી. ફેજપુરમા એક છે. ત્યાં માણસ રહે છે. અમદાબાદમાં ધર્મશાળા છે. અમદાબાદમાં હું આગેવાન છું. અને પટાવાલો રહે છે. ઇમામશાહાના વંશજો સૈયદ કહેવાય છે. અને તેઓ પીરાણામા રહે છે. પીરાણાની ઈમામશહાની માલકી તેઓ ધરાવે છે તે બાબતની તકરાર છે. તેઓ મુસલમાન ધર્મ પાળે છે. સૈયદખાનીના રોજાની આથમણી બાજુ મસીદ છે. સતપંથમા પાંચીયા, સાતીયા, આઠીયા, નુરશાહી અને ઇમામશાહી એ રીતે પાંચ પેટા વિભાગ પડેલા છે. પાંચેના નીયમો જુદા જુદા છે. પાંચીયા ને સાતીયા ઇમામશહાને માનતા નથી. ઈમામશાહાને માનનારા આ પાચમાં છે નહી. પાંચીમા ઈમામશાહાના વંશજોને માનતા નથી.તેઓ (પાંચીયા) બાલામહમદશાહાને માને છે. સાતીયા બીબી રાજે બાઇને માને છે. બને ઇમામશાહાના વંશજો છે. કચ્છીયો ઇમામશાહાને માને છે. ગુજરાતના કણબી વિગેરે પાંચીયા સાતીયા વિગેરેની હવેલીઓ માને છે. ગુજરાતના કણબી મતીયા કહેવાતા નથી. નવસારીના મતીઆ કહેવાય

છે. મરણપ્રસંગની ક્રીયા વખતે કાકા અગર તેમના માણુશની જરૂર ખરી. અમે "લોબાન જલે, કુલબલાટલે, દીન જાગે અને કફન માગે" એ શબ્દો બોલતા નથી. ઇમામશાહે કહેલા શબ્દોની પ્રાર્થના કરે છે. તે ગુજરાથીમા કરીએ છીયે. "બીસમિલ્લા અલ્લા રહેમાન રહીમ સતગોર પાત્ર બ્રહ્મા ઈંદ્રિ ઈમામશાહા આદ વિસનવ નીરંજન નરઅલી મહમદશાહા તુમારી દોઆ" એ શબ્દોની મને માહીતીજ નથી. સુવાવડના પાપની નિવારણ માટે ક્રીયા કરવામાં આવે છે. અને તે અમે કરીએ છીએ. અગર અમારા સાધુ કરે છે. ક્રીયા કરવામાં ત્રેત્રીસ કરોડ દેવતાનું આરાધન કરીને પાણી છાંટવામાં આવે છે. અને ત્યારથી તે છોકરૂં પંથનો ગણાય છે. પીરાણાના મકાન અગર કમ્પાઉંડ ઉપર કોઇપણ સ્થલે દસઅવતારની મુર્તી નથી. કાકા તરીકે મારે નીમાજ પઢવાની નથી. તાબુત ઉચકવા પણ હું જતો નથી. રમજાન મહીનામા અપવાસ પણ હું કરતો નથી. મારી જાતના પાટીદાર જેઓ સતપંથી નથી તેઓની સાથે હું જમ્યો છું, પણ પાછલી બે વરશમા નહી. જમ્યા પછી મારે ક્રીયા કરવી પડે છે. સતપંથી પાટીદાર સાથે સતપંથી શીવાયના પાડીદારને કન્યા આપવાનો દાખલો હું આપી શકું તેમ નથી. તેમની સાથે બેસીને જમવાનો પ્રસંગ હું બતાવી શકું નહી. બે ત્રણ વર્ષ પહેલા આગાખાન સાથે સતપંથીઓને તકરાર હતી, પણ તેનો નીકાલ થઇ ગયો છે. હાલ કાંઇ તકરાર નથી. આગાખાન સાથે તકરાર થઈ નથી. અબુતાલમના રોજા સાથે તકરાર થઈ હતી. સ્વધર્મવર્ધક મંડળ નામની સંસ્થા સ્થપાયાની મને માહીતી નથી. હું અથર્વવેદ અને સતપંથને માનું છું. અથર્વવેદનો કોઇ પણ સિદ્ધાંત સતપંથમા આવે છે તે હું જોયાશીવાય કહી શકું નહી. કાકા મરી જાયે ત્યારે તેના સબ ઉપર કબર કરવામા આવતી નથી. તોમતદારને અમારાઉપર આક્ષેપ કર્યાબાબત ફરીયાદી કરવાની નોટીસ આપેલ હશે. ફૈજપુરના તોતારામ બધુને હું ઓળખું છું. તે નોટીસ તોતારામે લખી ન હોતી. પણ મી. પંડીતે લખી હતી. નોટીસના કવ્હર એકઝી. ૫* ઉપર ઠેકાણું મી. પંડીતે લખ્યું હતું. એકઝી. ૬+ની

---

*आत्मानंद यांस काका लक्ष्मण करमसी यांनीं दिलेल्या नोटीशीचें रजिस्टर पाकीट.

+ आत्मानंद (आरोपी) यांस काका लक्ष्मण करमशी यांनीं दिलेली नोटीस.

નોટીસ ઉપર મારી સહી છે. તેથી તે મારી આપેલી હસે. સતપંથના ધર્મ સંબંધમા તા. ૨૪-૬-૧૯૨૩ ના ગુજરાતી પંચમાની છપાએલી હકીકત મારા જાણવામા આવેલી નથી. ગીરમથાના શિવલાલ ડાહ્યાભાઇને હુ ઓળખું છું. શિવલાલ ડાહ્યાભાઇએ છપાવેલી જાહેરાત એકઝી. ૭* ની મારા જાણવામા છે. સૈયદોના લાભ માટે પાટીદારોને ખબર આપવા માટે આ જાહેરાત છે પ્રસિદ્ધ થયેલી છે. દાવો થયો ત્યારથી આ ધર્મ ઉપર તે મુસલમાની છે એમ એટેક થયો છે તેમ હું જાણું છું. તે પહેલા કાંઇ પણ આક્ષેપ (એટેક)થયો ન હોતા. Note, (ધાર્મીક પુસ્તકો રજુ કરવા અને જોવાને વકીલ માગણી કરે છે પણ કોરટે ના પાડી છે.)

રોજામા પ્રાર્થના થતી નથી. પણ અલગ ઓરડામા કરવામા આવે છે. તે ગુપ્ત રીતે કરવામા આવે છે. 'ગતગંગા'ની ક્રીયા કરવામા આવે છે એટલે કે સતપંથીઓને એકજ જગ્યાએ ભેગા કરવામાં આવે છે. "પંજે તન મુશકીલકું આસાન કરો" એ મંત્ર સૈયદો બોલે છે, અમે બોલતા નથી. ઇમામશાહાના ધર્મ જે અમોપાળીયે છીયે તે સૈયદો પાળતા નથી. તેઓ મુસલમાની ધર્મ પાળે છે. કળસપુજા કરવામાં આવે છે તે વખતે મંત્રો બોલાય છે. સાતીઆ લોગો બિસમિલ્લા વિગેરે શબ્દો કલશ પુજા વખતે વાપરે છે. કારણ કે તેઓ સેખ છે. અમે વાપરતા નથી. સાતીઆ હીંદુ છે કે મુસલમાન તે હું જાણતો નથી. દુવાના પહેલા સબ્દ "આધ્યનારાયણ આદી બ્રહ્મા" વિગેરેથી શુરૂ થાય છે. ઉઠતી વખથે "હે ઇમામશાહ, હે ભગવાન" એ શબ્દો બોલવામા આવે છે. વીશ વર્ષથી હું કાકા તરીકે છું. ચાલીસ વર્ષથી ગુજરાતમા છું. સતપંથી કણબી પાટીદારના સંબંધમા હું આવેલ છું. બીજાના સંબંધમા નથી આવ્યો. કન્યા આપવા સંબંધમા મારે કંઇ પણ વાટાઘાટ તેમની સાથે કરવાનો પ્રસંગ આવ્યો નથી.

ફરી તપાસ—પીરાણાના રોજામા અમારે નમાજ પઢવાની છેજ નહી. સતપંથી કચ્છ સીવાય હીંદુસ્તાનના બીજા ઘણા ભાગોમા છે. નવસારીમા મી. મીર પ્યારાસાહેબ નુરશાહી રોજાના આગેવાન છે.

* Ex. 10 F.

અમારા નથી. સતપંથસીવાય લેવા પાટીદારના પરીચયમા હું આવેલો છું પણ તેમની સાથે સંબંધમા આવ્યો નથી.

તારીખ ૫–૭–૧૯૨૩

સહી ઈંગ્રેજીમા
ડીસ્ટ્રીકટ માજીસ્ટ્રેટ સાહેબ
અમદાબાદ.

Ex. 10 F.

અમદાબાદ કોરટની એકઝી. ૭

પીરાણાના ઈમામશા બાવાની જગ્યાના જુના શેઠ શા. લલુભાઇ ગણેશજીના પુત્ર ડાહ્યાભાઇના પુત્ર શીવલાલ ડાહ્યાભાઈ તરફથી જાહેરાત.

પીરાણા સતપંથ ધર્મના માનનાર તમામ મહેરબાન મુમન ભાઈ,

હું આપને જાહેર કરૂં છું કે પીરાણાના હજરત પીર ઈમામશા સુત નરઅલી મહમદશાની ઓલાદના સાદાતો ખાવે ખવરાવે બહુજ ચોખ્ખા ને પવિત્ર છે. અને જે પોતાનો સતો ધર્મ સારી રીતે જાળવે છે તેવુ અમો તથા અમારા વડીલો જે દીવસથી ગીરમથા ગામે રહ્યા ત્યારથી એવીજ વર્તણુક તેમની જોતા આવ્યા છીએ ને હાલ પણ તેવીજ રીતે ચોખ્ખાપણાથી વર્તે છે અને તે ખાસ સૈયદ છે. એજ

લી.
શા. શીવલાલ ડાહ્યાભાઈ સહી દા. પોતે
મુ. ગીરમથા.

निशाणी नंबर ११

सन १९२३ च्या क्रिमिनल रजिष्टरांतील मु० नंबर १२

आरोपीची जबानी.

मॅजिस्ट्रेट साहेबांसमक्ष हजर होऊन लिहून देतों जेः—

माझें नांव आत्मानंद आहे. माझ्या बापाचें नांव गुरु प्रेमानंद आहे. माझी उमर सुमारें ३० वर्षांची आहे. माझी जात ब्राह्मण आहे. मी खंडेराव संस्थानच्या चालकाचा धंदा करितों. मी फैजपूर येथील रहाणारा आहें.

सवालः—फिर्यादीतर्फेचा पुरावा ऐकिलास काय ?

जबबाः—होय.

स०:— फैजपूर गांवांत Ex. I A. & I D. या दोन जाहिराती तुह्मी प्रसिद्ध केल्या काय ?

ज०:—होय. या जाहिराती मीच प्रसिद्ध केल्या असून यांतील मजकूर मीच लिहिलेला आहे. Ex. I D. & I A. मधील मजकूरहि मीच लिहिलेला आहे.

स०:—ता० २० ला तुम्ही गांवांत जाऊन वाजंत्री वाजवून लेक्चर दिलें काय ?

ज०:—मी गांवांत मिरवीत जाऊन लेक्चर दिलें नाहीं. मी माझ्या संस्थानांतच जे जे लोक येत त्यांनां त्यांनां उपदेश करी व हस्तपत्रिका वाटो. मी माझा लेखी जबाब हजर करितों.

स०:—तुह्मी फिर्यादी यास ओळखतां काय ?

ज०:—नाहीं.



This Sadhu Shri Atmanandji fought against Satpanthis

आरोपी—आत्मानंद.

स०:—तुह्मी फिर्यादीला यांच्या जातीचे लोक गोभक्षक असून ोमना म्हणजे मुसलमान आहेत; त्यांच्याशीं खाणें पिणें, लग्न वगैरे ्यवहार करूं नये असें त्यांचेकडे बोट करून म्हटलें काय ?

ज०:—मी असें फिर्यादीकडे बोट करून ह्मटलें नाहीं.मी त्याला ोळखीत नाहीं.

स०:—आणखी कांहीं सांगणें आहे काय ?

ज०:—नाहीं.

(सही) आत्मानंद ब्रह्मचारी दा खु॥

समक्ष

जी. एस्. राजाध्यक्ष.

मॅ. वर्ग १ पूर्वभाग

१४।८।२३

स०:—नि॥ ७ बचें पत्र तुमचे हातचें आहे काय ?

ज०:—होय. मी हें पत्र लिहून माझ्या आसनावर ठेविलें होतें. कोणाला दिलें नाहीं. मग कोणाला ठाऊक हें कसें बाहेर गेलें ?

स०:—नि॥ ७ Cचें पत्राचें पाकीट तुमचे हातचें आहे काय ?

ज०:—होय.

स०:—नि॥ ७ A चें पत्र तुमचे हातचें आहे काय ?

ज०:—होय. पण मी हेंहि पत्र कोणाला दिलें नाहीं.

(सही) आत्मानंद ब्रह्मचारी दा खु॥

समक्ष

जी. एस्. राजाध्यक्ष.

मॅ० वर्ग १ पूर्वभाग

स०:—चार्ज वाचून व समजाऊन सांगितला. तो समजला काय?

ज०:—होय.

स०:—गुन्ह्यास कबूल आहे काय?

ज०:—नाहीं.

स०:—झाले त्या साक्षीदारांची उलट तपासणी करणें आहे काय?

ज०:—होय. सर्वांची उलटतपासणी करणें आहे.

स०:—तुमचा पुरावा आहे काय?

ज०:—होय. वकील २।३ दिवसांत यादी हजर करतील.

(सही) आत्मानंद ब्रह्मचारी

समक्ष

SD. जी. एस. राजाध्यक्ष

मॅ० वर्ग १ पूर्वभाग

२८।८।२३

शिक्का

खरी नक्कल

सही इंग्रजी.

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

मे. मॅजिस्ट्रेट वर्ग १ साहेब बहादुर पूर्वभाग पूर्वखानदेश.

आनंदा किरंगा वाा फैजपूर [फिर्यादी.
आत्मानंद ब्रह्मचारी वाा फैजपूर [आरोपी.

जबाब आरोपी याचा.

१ फिर्यादीनें केलेली फिर्याद कबूल नाहीं. व मी कोणताहि फौजदारी गुन्हा केलेला नाहीं.

२ हँडबिल वाटलें तें संस्थानावरच वाटलें.

३ फैजपूर येथें श्री खंडेरावाचें संस्थान आहे. व मी तेथील गादीवर मालक आहे. हिंदु धर्माचा सर्व जातींशीं संबंध आहे. मी श्रीक्षेत्र काशी येथें संस्कृत वेद वगैरे पुष्कळ अभ्यास केला आहे व ब्रह्मचारी असून धर्मप्रसारकाचें व हिंदु लोकांस त्यांचा धर्म पाळण्याबद्दल शिकविण्याचें काम करितो. गुजराथेंत पिराणा येथें मी गेलों होतों. मी तेथें जें पाहिलें व त्या देशांत मला जें समजलें त्याप्रमाणें सत्पंथी धर्म हा पुष्कळ अंशीं मुसलमानी धर्म आहे अशी माझी प्रामाणिक समजूत झाली. व त्याप्रमाणें हिंदुधर्म संरक्षणासाठीं मी प्रसिद्ध केली आहे. कोणत्याहि व्यक्तीशीं माझा वांकडेपणा नाहीं. व कोणत्याहि व्यक्तीचें किंवा जातीचें नुकसान करण्याचा केव्हांहि हेतु नव्हता व नाहीं.

४ फिर्यादीस मी गोभक्षक बोललों नाहीं. तो मजकूर मुद्दाम मला फौजदारी गुन्ह्यांत आणण्यासाठीं खोटा लिहिलेला आहे. त्याप्रमाणें माझें बोलण्यानें लेवापाटीदार समाज गोळा होऊन बहिष्कार घातला ह्मणून जें ह्मणणें आहे तेंहि खोटें आहे.

५ लेवापाटीदार लोकांनीं सुमारें १५।१६ वर्षांपासून खानदेशांत सत्पंथी धर्म वैदिक धर्मबाह्य आहे असें ठरवून बहिष्कार घातला आहे. तत्रापि कांहीं लोक वरपंगीं धर्म सोडून चोरून व लपून पाळीत होते व त्यासंबंधानें सुमारें ८ महिन्यांपूर्वी पुनः पंचायत भरली होती. त्यांत पुनः हा धर्म बहिष्कार घातला गेला ही गोष्ट कांहीं लोकांस वाईट वाटून त्यांनीं फिर्यादीस पुढें करून त्यांच्या पंथाचा निर्णय होण्यासाठीं हल्लींची खोटी फिर्याद मजवर केली आहे. परंतु तसा निर्णय इकडे होऊं शकत नाहीं. मेहेरबान साहेबांस जाहीर व्हावें.

१४।८।२३



(सही) आत्मानंद ब्रह्मचारी दा। खु।

खरी नक्कल.

(सही इंग्रजी)

फ. क्रा. मॅ. पूर्वभाग.

Chargesheet

Ex. No. 12.

CHARGE.

I, G. S. Rajadhyaksha, Magistrate I Class and Sub-Divisional Magistrate E. D. hereby charge you Atmanand Brahmachari of Badrikashram of Faizpur as follows:

That you on or about the 11th day of November 1922 and 20th Decemeber 1922 by certain words which you

spoke on 20th December 1922 and by visible representation which you made on 11-11-22 and 20-12-22 defamed one Ananda by making and publishing imputation concerning him viz.

(1) that Satpanthis to which sect Ananda belongs do not interdine and intermarry with Hindus,

(2) that Satpanthis whom you call Momana in the handbills are followers of religion laid down in Kuran,

(3) that he was a Momana

(4) that he ate cow's flesh,

(5) that it was against Hindu religion to interdine and intermarry with satpanthis to which sect Ananda belongs, and thereby committed an offence punishable under Section 500 of the Indian Penal Code and within my cognizance

And I hereby direct that you be tried by me on the said charge.

Dated this 28th day of August 1923.

Sd. G. S. Rajadhyaksha,
Magistrate First Class E. D.,
East Khandesh,

True Copy.

Sd. G. S. Rajadhyaksha,
Sub-Divisional Magistrate,
E. D. E. K.

शिक्का.

निशाणी नंबर १२.

चार्ज

(क्रि० प्रो० को० कलम २२१–२२२ व २२३)

मी जी. एस्. राजाध्यक्ष, स. डी. मॅ० पूर्वभाग व पहिल्या वर्गाचा मॅजिस्ट्रेट, तूं आत्मानंद ब्रह्मचारी रहाणार फैजपूर याजवर यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें चार्ज ठेवितों—

तूं सन १९२२ चे नवंबर महिन्याचे व डिसेंबर महिन्याचे २० तारखेस अगर त्या सुमारास मौंजे फैजपूर तालुका रावेर, जिल्हा पूर्वखानदेश येथें ता० २०।१२।२३ रोजीं कांहीं शब्द बोलून व ता० ११।१२।१९२२ आणि ता० २०।१२।२२ रोजीं तुम्ही केलेल्या दृश्य अशा विनंतिपत्रानें खालीलप्रमाणें फिर्यादी आनंदा याचेवर आरोप करून व प्रसिद्धि करून तुम्ही त्याची अब्रू घेतली.

(१) सत्पंथी लोक—ज्या पंथापैकीं फिर्यादी आनंदा हा आहे, त्या लोकांशीं हिंदु लोकांचा रोटीबेटी व्यवहार होत नाहीं.

(२) सत्पंथी लोक, ज्यांना तुम्ही हस्तपत्रिकेंत मोमना असें ह्मटलें आहे, ते कुराणांत सांगितलेल्या धर्माचे अनुयायी आहेत.

(३) सदरचा आनंदा मोमना आहे.

(४) सदरचा आनंदा हा गोभक्षक आहे.

(५) सत्पंथी लोक, ज्या पंथाचा आनंदा हा आहे त्या लोकांशीं रोटीव्यवहार बेटी व्यवहार करणें धर्मबाह्य आहे आणि त्यायोगें ज्या अपराधास हिंदुस्तानचें पिनलकोड कलम ५०० यांत शिक्षा सांगितली आहे व त्याचा इन्साफ करण्याचा अधिकार यास आहे तसा अपराध तूं केलास.

आणि मी यावरून फर्मावितों कीं, सदरहू चार्जाबाबत तुझा इन्साफ करावा.

शिका

आज तारीख २८ माहे आगस्ट सन १९२३
Sd.: जी. एस्. राजाध्यक्ष.
मॅजिस्ट्रेट वर्ग १ पूर्वभाग.

खरी नक्कल
सही इंग्रजी.
मॅ० वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर १३.

आरोपीतर्फे साक्षीदार नं. १ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव धोंडू धांगो उमर ४२ वर्षांची, जात लेवे पाटीदार. धंदा स० इ०, रहाण्याचागांव फैजपूर.

सर तपासणीः—मी नकाशा काढलेला हजर करितों. (Ex13A).* नकाशा काढला त्यावेळीं फिर्यादी बरोबर होता. आरोपी बरोबर नव्हता. घराची, जागेची, व रस्त्याची वस्तुस्थिति होती त्याप्रमाणें नकाशा काढला. लाल रंगानें दाखविलेलें घर गिरिधर नाटूचें (नथूचें) असून गिरिधर नाटू (नथू) हाच रहातो. लाल रेघा मारलेलें घर फिर्यादी आनंदा याचें आहे. अ, ब, याठिकाणीं अनुक्रमें फकीरखां व भुरा पाटील हे बसले होते व क ठिकाणीं फिर्यादी होता. अ, ब, ठिकाणापासून क हें ठिकाण दिसतें. अ, ब ठिकाणापासून नकाशांतील आनंदा लहानूचें घर दिसत नाहीं.

उलट तपासणीः—गिरिधरचें घर (लाल रंगानें दाखविलेलें) कागदोपत्रीं कोणाचें नांवानें लागलें आहे हें मला माहीत नाहीं. हें घर माझें आहे असें फिर्यादी नकाशा काढण्याच्या वेळीं बोलला. मी गिरिधर नथूमध्यें रहातों असेंहि फिर्यादी बोलला होता. आनंदाचा चुलता लक्ष्मण मलजी मला माहीत नाहीं. या घराची कमेटी कोण भरतो हेंहि मला माहीत नाहीं. नकाशा काढणेस गेलों तेव्हां गिरिधर नथू घरीं नव्हता. मी आजुबाजूला चौकशी केली व स्वतःची मला माहिती होती त्यावरून गिरिधर नथूचें घर आहे असें मी लिहिलें. मी गेलों तेव्हां हें घर उघडेंच होतें. या घरांत कोणी मनुष्य नव्हतें. सामानसुमान होतें मी घरांत शिरलों नाहीं. दारांतूनच आंत पाहिलें. माझी जात लेवेपाटी-दार आहे. ज्या जातीनें सत्पंथी वाळींत केले त्यांची व माझी

* फिर्यादीचे घराचा नकाशा.

जात एकच आहे. गिरिधर नथूच्या पायऱ्यावर मी लेक्चर बोवांनीं दिलें तेव्हां बसलों होतों; असें फिर्यादीनें मला सांगितलें. हा नकाशा मी सरकारी हुकूमावरून काढला. माझ्या समन्सांतच मला नकाशा काढण्याबद्दल हुकूम दिला होता. समन्साप्रमाणें फिर्यादी व आरोपी सांगतील त्या जागेची वस्तुस्थिति नकाशांत दाखवावयाची असा हुकूम मला होता, ह्मणून माझी कल्पना झाली. आरोपीला या घरांत कोण रहातो असें विचारिलें नाहीं. आरोपी हा तेथें नव्हता. गिरिधर नाटू (नथू) फिर्यादीचा कोण आहे मला माहीत नाहीं. गिरिधर हा लहानपणापासून माझ्यांत रहातो असें फिर्यादी ह्मणाला होता. मी स्वतः फैजपूरच्या चावडींत अगर सर्कल-मध्यें असतों. माझी मंडळी सांगवीला रहाते. मुलें जळगांवला रहातात. गिरिधरच्या घराबद्दल मला स्वतःची माहिती होती. मला माहिती असून खात्री करून घेण्यासाठीं आजूबाजूच्या लोकांना मी विचारिलें. आमच्या जातीनें या खटल्यांत आरोपीच्या बचावासाठीं फंड काढिला नाहीं व मी वर्गणीहि दिली नाहीं.

फेर तपासणीः—मी लोकांचे जबाब घेऊन ठेविले नाहींत. फिर्यादीनें जागा दाखविल्या ह्मणून अ, ब, क या जागा मी दाखविल्या. जातीच्या तंट्यांत मी कांहीं भाग घेतला नाहीं.

ता. १०।१०।२३

Sd. **जी. एस्. राजाध्यक्ष,**

मॅ० वर्ग १ पूर्वभाग

शिक्का.

खरी नक्कल

सही इंग्रजी.

मॅ० वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर १४

आरोपीतर्फे साक्षीदार नं. २ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं:—माझें नांव पुना बापाचें नांव रामजी धर्म जात लेवे पाटीदार उमर सुमारें ३७ वर्षांची धंदा शेती व व्यापार, रहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पूर्व खानदेश.

सर तपासणी:—मी तहशील १५ रुपये भरतों. मी वैष्णव पंथापैकीं आहें. ५।६ वर्षांपासून या पंथांत मी आहे. यापूर्वी मी सत्पंथी होतों. सत्पंथांत गुपचूप होतों. अजमासें १२।१३ वर्षें मी याप्रमाणें गुपचूप सत्पंथी होतों. १२।१३ वर्षं पूर्वी उघड उघड सत्पंथी होतों. संवत् १९६२ मध्यें भोरगांवचे पंचाचा ठराव झाला होता. व त्यावेळीं माझी सर्वांनीं सत्पंथ सोडून द्यावा अशी कबुलायत दिली होती. सत्पंथ मुसलमानी धर्माप्रमाणें आहे म्हणून सोडून द्यावा असें ठरलें. या पंथाचे मुख्य पुढारी बधू महाजन हे होते. बधु महाजन हल्लीं मयत आहे. अजमासें १२।१३ वर्षें झालीं ते वारले असतील. त्यानंतर तोताराम महाजन पुढारी झाले. पुढारी म्हणजे धर्मशाळेचे उत्पन्नाबद्दल चौकशी व पंथाबद्दल माहिती देणें हें काम असतें. आम्ही सत्पंथी असतांना फैजपूर गांवांत धर्मशाळेंत जमत होतों. सुमारें ३००।४०० लोक आमच्या जातीचे जमत होते. सर्व सत्पंथी जमत होते. दुसऱ्या पंथाचे लोक कोणी येत नव्हते. रंगारी, कोष्टी वगैरे लोकहि येत होते. रंगारी वगैरे इतर जातीचेहि १००।१५० लोक येत होते. १९६२ सालच्या पंचायती-पासून इतर जातीचे लोक बंद झाले. धर्मशाळेंत येण्याचें बंद केलें.

जातीचा अपवाद आपल्यावर जास्त येईल यासंबंधानें त्यांना बंद केलें. कांहीं मंडळी धर्मशाळेंत रोज येतात व उटासनाला सर्व मंडळी जमतात. उटासन ह्मणजे मेलेल्या मनुष्याचा ४० वा दिवस. गतगंगा माहीत आहे. एका प्याल्यांत पाणी ठेवून त्यावर खतम पढावयाचे. खतम ह्मणजे मुसलमानासारखा मंत्र आहे व खतम ह्मटल्यावर तें पाणी सर्वांनीं तीर्थ ह्मणून घ्यावयाचें याला गतगंगा ह्मणतात. पाणी विहिरीचें आणतात. सत्पंथी धर्मशाळेचे विधी नेहमीं रात्रीं होतात. दिवसा होतच नाहींत.

मेलेल्या मनुष्याच्या ४०व्या दिवशीं ईमामशाहाच्या वचनाची पोथी कुराणासारखी असते ती—वाचतात. व सर्व मिळून खाना खातात. रमजान महिन्यांत सत्पंथी उपास करतात. बकरीद मोहरमच्या आधीं येतो. बकरीदच्या दिवशीं सत्पंथी उपास करितात. रात्रीं दार बंद करून खाना खातात. त्या ठिकाणीं दुसऱ्याला येऊं देत नाहींत. धर्मशाळेंत कलश असतो. कलशांत पाणी असतें. त्या पाण्यांत पिराण्याहून कबर धुवून गोळी येते, ती कालवतात. धर्मशाळेंत नमाज पडतात. मुसलमान लोकाप्रमाणें नमाज पढतात. मीहि नमाज पढलों आहे. या पंथाचे महत्त्वाचे २।४ मंत्र मला माहीत आहेत. पैकीं एक ' अल्ली अल्ला फजल करो,' ' सुभान अल्ला फत्ते करो,' ' तोबा तोबा ' याप्रमाणें आहे. या पंथांत कलमा असतो तो असा—

' हक् लाहे हिल्लीला, महमद रसूल इल्लीला.' सत्पंथी लोकांत मूर्तिपुजेचें नांव नाहीं. प्रेतें मुसलमानाप्रमाणें उलटीं गाडतात. आपलें डोकें दक्षिणेकडे असून पूर्वेकडे तोंड असतें. या पंथांत डोकें उत्तरेकडें असून तोंड पश्चिमेस असतें. या पंथाचा ग्रंथ आहे तो मी

https://archive.org/details/bk147/page/n129/mode/1up

आणला आहे. हजर करितों. Ex. 14 A. * हा ग्रंथ मला तोताराम महाजन यांनीं ६।७ वर्षांपूर्वी दिला. सत्पंथी लोक काशी प्रयाग वगैरे यात्रा ओळखीत नाहींत. बहादरपूर व पिराणा येथें उरुसाला जातात.

उलट तपासणी:—जन्मापासून आजे पणजे यांचेपासून याच पंथांत होतों. मी १२ वर्षेपर्यंत उघड सत्पंथी होतों. १९ वर्षांचा होई तों उघड सत्पंथी होतों. मी सत्पंथी असतां मी मुसलमानी धर्माचा पंथ हा आहे असें समजत होतों. **मी स्वतःला त्यावेळीं मुसलमानच समजत होतों.** आमच्या तीन पिढ्यांत मुसलमानाच्या सोयरिका झाल्या नाहींत. आतांपर्यंत कोणीहि सत्पंथी मनुष्यानें मुसलमानाला आपली मुलगी दिली नाहीं किंवा आपण मुसलमानाची केली नाहीं. **लेवे पाटीदार यांच्याशीं आमच्या सोयरिका होत होत्या.** माझ्या वाडवडिलांनीं किंवा मीं गाईचें मांस कधीं खाल्लें नाहीं. मी उघड सत्पंथी असतांना हिंदु देवाचें नांव कधीं घेत नव्हतों किंवा उपवास हिंदुंचे करीत नव्हतों. रोज रात्रीं निमाज पडत होतों. आमच्या तीन पिढ्यांत शेंडी कधीं कोणाची गेली नाहीं किंवा कोणी दाढी ठेविली नव्हती. बायकांनीं किंवा पुरुषांनीं कधीं मुसलमानी पेहेराव केला नाहीं. **हल्लीं मी हिंदु आहें. मी ३२ वर्षांचा होईतोंपर्यंत मी माझ्या समजुती-प्रमाणें मुसलमान होतों. ७४ सालांत मी हिंदु होतों. मला मुसलमानाचा हिंदु करण्यासाठीं शंकराचार्यांचें शुद्धिपत्र आणिलें नव्हतें. भटजीनें शेण व गोमुत्र दिलें होतें. हल्लीं** आम्हीं जानवें घालतों. सत्पंथीं असतांना जानवें घालीत नव्हतों.

* ‘ सत्पंथी शास्त्र ’ ह्मणून दाखल केलेलें एक पुस्तक.

https://archive.org/details/bk147/page/n130/mode/1up

हल्लीं माझ्या गळ्यांत जानवें नाहीं. ज्याची इच्छा असेल तो घालतो. **मी सत्पंथी असतांना मुसलमानाबरोबर खाना खाल्ला.** मुसलमानाबरोबर खाना खाल्ला ह्मणजे तो मुसलमान झाला अशी माझी समजूत झाली. आमच्या जातीनें सत्पंथी पावन करून घेतलें. ६२ सालच्या पंचायतींत मी होतों. या सालांत ज्यांनीं पंथ सोडला त्यांची यादी पंचाजवळ आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. सत्पंथ सोडल्याबद्दल या सालीं मी सही दिली होती. ती सही आतांपर्यंत मी पुनः पाहिली नाहीं. मी फैजपूरचा रहाणारा आहें. फैजपूरला सत्पंथ सोडल्याबद्दल सर्वांनीं सह्या दिल्या. त्यांत माझी सही होती. मी फक्त पाडळशाला एक सही दिली. जे पाडळशाला हजर नव्हते त्यांच्या सह्या फैजपूरला झाल्या. ६२ सालापासून मी गुपचूप (चोरून) सत्पंथी होतों. **सही केली तरी मी सत्पंथी राहिलों.** सर्वच लोक गुपचूप सत्पंथी होते. ६२ नंतर ७५ सालीं दुसरी बैठक झाली. या वेळीं सत्पंथ सोडावा असा विषय पाडळशाला निघाला कीं, नाहीं मला माहीत नाहीं. ठरावासंबंधानें मला कांहीं आठवत नाहीं. पण फैजपूरच्या पंचांनीं सांगितलें कीं, धर्म (पंथ) सोडला तर जातींत या नाहीं तर जातीबाहेर रहा. मी पंचापुढें हात जोडून आजपासून हा पंथ सोडला, मला पावन करा असें सांगितलें. मला माझ्या एकट्याबद्दल माहीत आहे. मला पंचांनीं पावन करून घेतलें. **मला गोविंदबुवा यांनीं शेणगोमुत्र दिलें. बापाचें नांव माहीत नाहीं. हा रहाणारा फैजपूरचा आहे. हल्लीं फैजपूरलाच रहातो. हा विधि माझ्या घरींच झाला. त्यावेळीं पंच तेथें नव्हते. पंचांनीं नुसतें पावन**

केलें. आमच्या तिन्ही पिढ्यांत चोरून सुंता केली नव्हती. १९६२ सालीं जे सत्पंथ सोडणार नाहींत त्यांना वाळींत टाकावें व त्यांच्याशीं रोटी बेटी व्यवहार करूं नये असा ठराव झाला होता; पण १९७५ सालापर्यंत याची अमलबजावणी झाली कीं नाहीं हें मला माहीतनाहीं. पंचांना माहीत आहे. **माझे स्वतांचे १९७५ सालापर्यंत इतर पाटीदार लोकांशीं जेवणखाण वगैरे होत होतें.** मी उघड सत्पंथी होतों त्यावेळीं पिराण्याला कधीं गेलों नाहीं. पिराण्याचे काका लक्ष्मण करमसी माझ्या पाहाण्यांतले नाहींत. त्यांना नांवानें ऐकत होतों. हे सत्पंथी लोकांचे धर्मगुरु आहेत असें नांवानें ऐकत होतों. सत्पंथी लोकांच्या सर्व शाखा माहीत नाहींत. सत्पंथ्यांपैकीं तेली किंवा रंगारी यांच्याशीं आमच्या तिन्ही पिढ्यांत बेटी व्यवहार झाला नाहीं. रेवे-पाटीदार सत्पंथ्यांपैकीं कोणाचाहि सत्पंथी रंगारी किंवा इतर जात यांच्याशीं बेटी व्यवहार झाल्याचें ऐकिलें नाहीं. मूळबंध, गोदवाणी व शिक्षापत्री असे सत्पंथाचे धर्मग्रंथ आहेत. काका लक्ष्मण करमसी यांना मी मुख्य धर्मगुरु मानीत नव्हतों. काम करणारे असें मानीत होतों. गुरु ईमामशहा यांना मानीत होतों. मी स्वामी नारायण, विठ्ठलपंथ या पंथांत नव्हतों. प्रथम सत्पंथी व आतां वैष्णव पंथी याप्रमाणें २ पंथांतच मी होतों. बोवा हल्लीं गांवांत शिष्य करितात. लेवे पाटी-दारांत किती शिष्य झाले हें मला माहीत नाहीं. अजमासें ५।२५ झाले असतील. बोवा गांवाला नुकतेच आलेले आहेत. मी स्वतः बोवांचा शिष्य झालों नाहीं. माझ्या मार्फतीनेंहि कोणी शिष्य झाले नाहीं. परवां फैजपूरला पंचायत भरली नव्हती. राम-मंदिरांत पंचायत भरली नाहीं. ५।६ दिवसांपूर्वीं भरली कीं नाहीं

मला आठवत नाहीं. आह्मी सांगतों त्याप्रमाणें साक्ष दिली नाहीं तर जातींतून काढून टाकूं असें मला पंचांनीं सांगितलें नाहीं. आरोपीच्या बचावासाठीं आमच्या जातीनें फंड केला नाहीं. प्रथम १ व नंतर १० याप्रमाणें मी वर्गणी दिली नाहीं. आरोपीच्या बचावासाठीं प्रत्येक घरावर कर बसविला नाहीं. हा ग्रंथ ७ वर्षांपासून मजजवळ आहे. या ७ वर्षांत तोताराम महाजनांनीं परत मागितला नाहीं. या ग्रंथावर तोतारामची सही किंवा हस्ताक्षर असल्याचें मला माहीत नाहीं. हा ग्रंथ धर्मशाळेंतून त्यांनीं दिला. मी हें सर्व पुस्तक वाचिलें नाहीं. फक्त ७ महिने वाचिलें. सत्पंथाचीं दुसरीं पुस्तकें मी वाचिलीं नाहींत. धर्मशाळेंत जेवढा भाग वाचला जात असे तेवढाच मी ऐकिला. गतगंगा ह्मणजे पूजा होतच नाहीं. धर्मशाळेंत कळशपूजा होत नाहीं. पंजा त्या ठिकाणीं असतो कीं नाहीं, माळा घालतात कीं नाही, हें माझ्या लक्षांत नाहीं. बाप एका पंथाचा व मुलगा दुसऱ्या पंथाचा अशीं उदाहरणें आमच्यांत आहेत कीं नाहींत मला आठवत नाहीं. सोना लक्ष्मण किरंगा ओळखीचा आहे. अनु विठोबा ओळखीचा आहे. तो सत्पंथी आहे. त्याचीं मुलें सत्पंथी नाहींत. मी धर्मशाळेंत कुराण कधीं पढलों नाहीं. सत्पंथी धर्मशाळेंत घृतज्योत नसते. मी सत्पंथी असतांना धर्मशाळेंत मुसलमान आले होते. मुसलमानी सत्पंथी कोणी धर्मशाळेंत आले नाहींत. बहादरपूरचे गुरु मी मानीत नाहीं. बहादरपूरला मी उरुसाला जात होतों. हिंदु लोक ताबुतामध्यें नवसापुरती फकिरी घेतात, हा प्रकार मला माहीत नाहीं. शिरडीचे सांई बाबा मला माहीत नाहीं. त्यांची जात कोणती होती हें मला माहीत नाहीं. माझी आजी, आई, व बायको सत्पंथीच होते. आमच्या

बायका निमाज पढत नव्हत्या. अल्ली अल्ला वगैरे वर सांगितलेले मंत्र आमच्या बायकाहि म्हणत होत्या. रोज संध्याकाळीं मी धर्मशाळेंत जात असें. नमाज पढावयाचा मंत्र मला माहीत नाहीं, गुरूला माहीत आहे.

फेरतपासणीः—नमाजाचे वेळीं सर्व सत्पंथी लोकांपुढें गुरु उभे रहात होते. बहादरपूरचे पिरजादे मुसलमान हे धर्मशाळेंत येत असत. अनु विठोबाचे मुलांना जातीनें सांगितलें कीं, तुह्मी बापाप्रमाणें सत्पंथी व्हाल—बापाकडे जाल तर जातीबाह्य व्हाल ह्मणून ते बापाकडे न जातां आजाकडे राहिले.

१०।१०।२३

Sd **जी. एस्. राजाध्यक्ष,**
मॅ० वर्ग १ पूर्वभाग
खरी नक्कल
सही इंग्रजी
मॅ० वर्ग १ पूर्वभाग

शिक्का

निशाणी नंबर १५

आरोपीतर्फे साक्षीदार नं. ३ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं:—माझें नांव आनंदा बापाचें नांव भवानी धर्म हिंदु जात लेवे पाटीदार उमर सुमारें ४७

वर्षांची धंदा शेतीचा व सरकीचा व्यापार. रहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पूर्व खानदेश.

सर तपासणी:——सारा १० रुपये भरतों. माझें सरकीचें दुकान फैजपूरच्या आठवडे बाजारांत असतें. आठवडेबाजारांत फैजपूर गांवांतून जाण्याचा रस्ता पिंपरूड दरवाजावरून असतो. पौष शु० प्रतिपदेला आज १० महिने झाले असतील. सत्यनारायण केला होता त्यांत वाड्यांतले लोक होते. बुधवारीं आठवडे बाजारांत दुसरे दिवशीं सत्यनारायणानंतर दुकान नेलें होते. त्यादिवशीं बाजारांत कोणी ताशे वाजविले नाहींत. नाटक आलें म्हणजे किंवा मोहरममध्यें ताशे वाजविले जातात. आमच्या गावांत फाल्गुन महिन्यांत नाटक आलें होतें. एकाच वेळीं नाटक आलें होतें. माझ्या दुकानावरून दरवाजांतून ताशा वाजवीत गेल्यास समजण्यासारखें आहे. गिरिधर नथू यास ओळखतों. त्याला राहण्यास घर आहे. त्याचें स्वतःचें घर आहे. हें घर ८ हात लांब व ८ हात रुंद अजमासें आहे. या घराचे पूर्वेस सडक आहे. पश्चिमेस रस्ता आहे. उत्तरेस महादू किरंगा याचें घर बोळ टाकून आहे. पश्चिमेला लक्ष्मण मलजी किरंगा याचें घर आहे. फिर्यादीला घर आहे. हें घर आनंदाच्या घरापासून ४।५ घरांच्या अंतरानें आहे. गिरिधरच्या घरांत फिर्यादी आनंदा कधीं राहिला नाहीं. आनंदा आपल्या स्वतःच्या घरांत राहतो. भुरा मुऱ्हा पाटील आमोदेंकर यांना ओळखतों, हा हल्लीं आमच्या जातीत आहे. पूर्वीं सत्पंथ्याकडे होता. सत्पंथी लोकांना आमच्या जातींत प्रतिबंध झालेला आहे. या लोकांचा व आमचा रोटी व्यवहार बेटी व्यवहार नाहीं. ४।५

वर्षांपासून नाहीं. त्यापूर्वी होता. ५ वर्षांपूर्वी ४।५ जणांनीं सत्पंथ स्वीकारला. त्यापूर्वी सत्पंथ नव्हताच. त्यापूर्वी १०।१२ वर्षे नव्हता. १०।१२ वर्षांपूर्वी सत्पंथ नव्हता. पंचांनीं या लोकांना बोलावून विचारिलें, हा पंथ ठेवतां कां जातीकडे येतां ? तर त्या लोकांनीं जातीकडे येतों ह्मणून सांगितलें. ह्मणून हा धर्म १०।१२ वर्षांपूर्वी नव्हता.

उलटतपासणीः——सोना लक्ष्मण ओळखतो. तो फिर्यादीचा कोण आहे मला माहीत नाहीं. सोना लक्ष्मणच्या मुलाशीं माझ्या मुलीची सगाई झाली होती. ६ वर्षांपूर्वी झाली होती. ती सगाई आतां यंदा मोडली. हा पंथ सोडीत नाहीं, आह्माला तुमच्या जातीची जरूरी नाहीं, असें सर्व सत्पंथी लोकांनीं सांगितलें ह्मणून सगाई मोडली. सोना लक्ष्मण १९७५ सालांत सत्पंथी लोकांना सामील झाला. आमची सोयरीक ७५ च्या अगोदर ठरली होती. हा सत्पंथी लोकांना सामील झाला तेव्हांच ही सोयरीक मोडली नाहीं. मोडायला १० महिने झाले. बोवांच्या बचावासाठीं आम्ही फंड काढिला नाहीं. दर घरामागें वर्गणी ठेविली नाहीं. आतांपर्यंत ११ रुपये मी वर्गणी दिली नाहीं. गिरिधर रहातों तें घर कोणाच्या नांवानें आहें मी कमेटींत जाऊन पाहिलें नाहीं. घरपट्टी कोण भरतो माहीत नाहीं. बोवांना १॥ वर्षांपासून मी पहातों. शिष्य करायला बोवा लागले आहेत. किती दिवसांपासून हें माहीत नाहीं. शिष्य किती झाले आहेत मला माहीत नाहीं. हें खंडेरावाच्या वाडींत रहातात. माझ्याकडे सत्यनारायण झाला त्या सुमाराला हँडबिल वाटल्याचें मला माहीत नाहीं. आजपर्यंत एकहि हँडबिल मला वाचायला मिळालें नाहीं. Ex. I A & I D.

या ' स्वधर्म पालन करो ' अशा मथळ्याच्या जाहिराती वाटल्याचें आजपर्यंत माझ्या पाहण्यांत कधीं आलें नाहीं. मी केव्हां केव्हां खंडेरावच्या वाडींत बोवांच्या दर्शनास जातों. बोवा येण्याच्यापूर्वीं मी खंडेरावाच्या वाडींत जात होतों. तसाच बोवा आल्यावरहि जातों. बोवांनीं मजजवळ किंवा मी असतांना सत्पंथी लोकांविरुद्ध असें कांहींच भाषण केलें नाहीं. किंवा हँडबिलहि मला दिलें नाहीं. खटला होईपर्यंत बोवांच्या तोंडून सत्पंथ्याविरुद्ध मीं कांहीं ऐकिलें नाहीं. मी बोवांचा शिष्य झालों नाहीं. बोवांची शिष्यमंडळीं तेथें कांहीं कांहीं असते. १०।५ पोरें शिष्य ह्मणून मीं पाहिलीं. या शिवाय आणखी कांहीं असतील तर मला माहीत नाहीं. ५।४ दिवसांपूर्वीं राम-मंदिरांत पंचायत भरली नाहीं. खुशाल हरी माहितीचे आहेत. त्यांच्या घरीं आमच्या जातीचे लोक बोवांना पैशाची व पुराव्याची मदत करण्याकरितां जमले नाहींत. मी समन्स लागण्या-पूर्वीं फक्त एका तारखेला माझ्या कामासाठीं म्हणून आलों तेव्हां खटला ऐकायला बसलों होतों. हल्लीं बोवांचा खर्च बोवाच करितात.

फेरतपासणी नाहीं.

१०।१०।२३

Sd जी. एस्. राजाध्यक्ष.
मॅ० वर्ग १ पूर्वभाग

शिक्का.

खरी नक्कल
सही इंग्रजी
मॅ० वर्ग १ पूर्वभाग

निशाणी नंबर १६

आरोपीतर्फे साक्षीदार नं. ४ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव नथू बापाचें नांव जयराम धर्म हिंदु जात कुणबी उमर सुमारें ४० वर्षांची धंदा शेतीचा व लांकूड काटणेंचा, राहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पूर्व खानदेश.

सर तपासणीः—–फिर्यादी ओळखतों. फैजपूरला मी सासऱ्याचे घरांत राहतों. १०।१२ वर्षांपासून राहतों. हें घर फिर्यादीच्या घरापासून २ घरांचे अंतरावर आहे माझ्या सासऱ्याचें नांव भानू आहे. त्याच्या बापाचें नांव माहीत नाहीं. मी रहातों त्या घराच्या पूर्वेस नथुचें व पश्चिमेस हरीचें घर आहे. नथूच्या घराच्या पूर्वेस केशवचें घर आहे व केशवच्या पूर्वेस चिमणचें घर आहे.

मी सारा ८—१५—० भरतों. लांकूड कापण्यांत भवानी भारंबा हा माझा भागीदार आहे. ९।१० महिन्यापासून भवानी जोडीदार आहे. त्यापूर्वी फिर्यादी हा ९।१० महिने माझा जोडीदार होता. आम्ही कांहीं लहानूचीं व कांहीं मजुरीनें लांकडें कापलीं. आमच्या गांवांत बुधवारीं मजुरी मिळते. मला भोर सभेचें बुधवारीं बोलावणें होतें. बुधवारीं बोलावणें आलें. शुक्रवारीं सभा आहे असें तो म्हणाला. त्यावेळीं फिर्यादी अनु हाहि होता. मी व फिर्यादी त्या दिवशीं गांवांत पैसे मागत फिरलों. आम्ही १०।११ च्या सुमारास पैसे मागावयाला गेलों तों ४।५ वाजतां परत आलों. तोंपर्यंत अनु माझ्याबरोबरच होता. गिरिधर नथू ओळखतों. गिरिधरचें घर माझ्या घरापासून ४।१ घरांच्या आड आहे. गिरिधरच्या घराच्या

पूर्वेस सडक आहे. या घरांत—८।९ वर्षांपासून बांधिलें तेव्हांपासून—गिरिधर हाच रहातो. मला लिहितां वाचतां येत नाहीं. फिर्यादी या घरांत कधीं रहात नव्हता. याचें घर निराळें आहे.

उलट तपासणीः—फिर्यादी हा माझ्याबरोबर मजुरी करावयाला येत होता. दोघां मिळून एक दीड रुपया मजुरी मिळत असे. फिर्यादी रहातो हेंच त्याचें घर मी समजतों. त्याच्या मालकीचीं किती घरें आहेत मला माहीत नाहीं. गिरिधर रहातो त्या घराला नांव कोणाचें आहे, पट्टी कोण भरतो मला माहीत नाहीं. पैसे मागण्याला गणपत, नारू सुपड्र, एक सुतार महारू, श्रीपत सुतार या चौघांकडे पैसे मागावयाचे होते. आम्ही दोघेहि प्रत्येक ठिकाणीं बरोबरच गेलों. हे एका गांवांतच पण निरनिराळ्या पेठेंत रहातात. यापैकीं गणपतनें २ रुपये, नारायणनें ४ रुपये दिले. बाकी लोकांनीं पैसे दिले नाहींत. या चार घरीं पैसे मागण्याला आह्मांला ४।५ घंटे लागले. आरोपी बोवा यांना ओळखतों. यांनीं गांवांत २।४ महिने झाले शिष्य केले आहेत. किती शिष्य झाले मला माहीत नाहीं. **बोवांच्या बचावासाठीं मी कांहीं फाळा दिला नाहीं. गांवांत फाळा मागितला, ज्यानें दिला त्याचा घेतला.** प्रत्येक घरावर फाळा बसविला किंवा कसें हें मला माहींत नाहीं. फाळा किती जमला हें मला माहीत नाहीं. मला समन्स लागलें तेव्हां साक्ष द्यावी लागेल असें मग कळलें. त्यापूर्वीं मला कोणी कळविलें नाहीं. किंवा विचारिलें नाहीं. आतां वकिलांनीं मला विचारिलें. तें पूर्वीं मी वकिलांना सांगितलें नाहीं. माझी साक्ष कां दिली असें मी कोणास विचारिलें नाहीं. कोर्टांत येईपर्यंत माझी, वकिलाची, किंवा आरोपीची कोणाचीहि

गांठ पडली नाहीं. किंवा कोणी कांहीं विचारिलें नाहीं. गिरिधर आनंदाचा फुईभाऊ आहे. मजुरी मागावयाला गेलों तेव्हां तिळ-संक्रान्त व्हावयाची होती. किती दिवसांनीं संक्रान्त आली हें मला माहीत नाहीं. आतांपर्यंत अमुक दिवशीं आनंदा तुझ्याबरोबर होता काय ? असें कोणी विचारिलें नाहीं. फाळा किती कोणी दिला मला माहीत नाहीं.

फेर तपासणी:—–पैसे मागावयाला गेलों. कोणी भेटले कोणी भेटले नाहींत. घटकाभरानें या असें ह्मणत. ह्मणून दिवस चालला गेला.

१० १०।२३

Sd **जी. एस्. राजाध्यक्ष.**
मॅ० वर्ग १ पूर्व भाग

शिक्का

खरी नक्कल
सही इंग्रजी
मॅ० वर्ग १ पूर्व भाग

निशाणी नंबर १७

आरोपीतर्फे साक्षीदार नं. ९ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव नथू बापाचें नांव विठोबा धर्म हिंदु जात लेवे पाटीदार उमर सुमारें ५५ वर्षांची धंदा शेतीचा रहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पू. खा.

सर तपासणी:—मला लिहितां वाचतां येत नाहीं. सही येत नाहीं. सारा १५।१६ रुपये भरतों. गिरिधर माझा मुलगा आहे. गिरिधर यास यादवहि ह्मणतात. गिरिधरची आई मेली आहे. गिरिधरचें वय ३० वर्षांचें आहे. तो माझ्यांत रहात नाहीं. १०।११ वर्षांपासून विभक्त रहातो. त्याला जमिनींत हिस्सा दिला आहे. घर त्यानें निराळें घेतलें. त्याबद्दल मी त्यास ५० रुपये दिले. वेगळा होण्याचे आधीं तो माझ्याजवळ रहात होता. मी स्वतः सत्पंथी नाहीं. मी सत्पंथी कधींहि नव्हतों. मुलगाहि पूर्वी सत्पंथी नव्हता. आतां झाला आहे. ४ वर्षें झालीं सत्पंथी झाला आहे. आणखी पांच जण सत्पंथी झाले. गिरिधर नथू, गणपत उघडू, हरी सोमा, परशराम ओंकार, व कृष्ण विठोबा असे पांच सत्पंथी झाले. कृष्णा विठोबा हा माझा भाऊ आहे. बाकी कोणी नातेवाईक नाहीं. माझें व मुलाचें पूर्वी खाणें पिणें होतें. सत्पंथी झाल्यापासून नाहीं. गिरिधर रहातो त्या घरांत फिर्यादी आनंदा हा कधीं रहात नाहीं. फिर्यादी अनु हा माझा भाचा आहे. मुलाकडे माझें जाणें येणें असतें. पाडळशाच्या पंचायतीला मी गेलों नाहीं. मला पंचायतीचें बोलावणें आलें होतें. बुधवारीं ठाकूर बोलावण्यास आला होता. पंचायत शुक्रवारीं होती. त्या बुधवारीं मला माझ्या मुलानें गिरिधरनें बोलावणें पाठविलें होतें. ह्मणून ११ च्या सुमाराला गेलों. तेथें मी १२ वर पांच वाजेपर्यंत दिवसा बसलों होतों. मला मुलगा ह्मणे 'आतां पंचायत आहे. तूं कशाला तिकडे रहातोस ? सत्पंथांत येऊन जा.' म्हणून त्यानें मला बोलावणें पाठविलें. मी सांगितलें मला सत्पंथाकडे

जाण्याची जरूरी नाहीं. मी गिरिधरकडे असतांना आरोपी वाजा घेऊन तेथें आले नाहींत. मी वाजा पाहिला नाहीं. फिर्यादी अनु हाहि तेथें आला नव्हता. मी तेथून घरीं आलों व मग मळ्यांत गेलों. माझा मळा मोर नदीकडे आहे. मी मळ्यांत जातांना खंडेरावच्या वाडीवरून गेलो. तिकडून रस्ताच आहे. मी खंडेरावाच्या पायां पडलों. माझा जीव विरमून गेला. तेव्हां आरोपी बोवा ह्मणाले, नथू असा विरमलास काय ? मी त्यांना सांगितलें, बोवा माझा वडील मुलगा आहे. त्याला मी पुष्कळ सल्ला त्याच्या घरीं, सत्पंथाकडे जाऊं नकोस अशी सल्ला दिली. पण तो ऐकत नाहीं.

उलट तपासणीः—गिरिधरची आई सत्पंथी होती. मी हल्लीं दुसरी बायको केली आहे. ती नागो नारखेडे याची मुलगी आहे. ती सत्पंथ्याची मुलगी आहे. माझ्या मुलाचें लग्न झालें त्याला २०।२२ वर्षें झालीं असतील. दुला भारंबा याची मुलगी माझ्या दुसऱ्या मुलाला यादवला केली आहे. पुनः सांगतों त्या मुलाचें नांव माधव आहे. यादव नाहीं. दुला भारंबा हा सत्पंथी आहे. माधवच्या लग्नाला ८ वर्षें झालीं असतील. दुला भारंबा हा पूर्वींपासून सत्पंथी आहे. माधवचें लग्न झालें तेव्हां माझी पहिली बायको मेली होती. गिरिधर व माधव हे सख्खे भाऊ. माझी पहिली बायको म्हणजे यांची आईच. १९६२ सालांत पंचायत झाली होती कां नव्हती माहीत नाहीं. त्यावेळीं सत्पंथी लोक जातीबाहेर टाकले होते. दुला भारंबा ६२ च्या नंतर सत्पंथी झाला. दुलाची मुलगी मी माझ्या मुलाला केली म्हणून मला जातीबाहेर टाकलें नाहीं. मी नाथपंथी आहें. मी गिरिधर यास वडिलार्जित इस्टेटीचाच हिस्सा दिला. गिरिधर रहातो तें घर गिरि-

धरच्या मालकीचें आहे. मी गिरिधरचें खरेदीखत किंवा म्युनिसि-पालिटींत हें घर कोणाच्या नांवें आहे हें पाहिलें नाहीं. घरपट्टी कोण भरतो हेंहि पाहिलें नाहीं. फिर्यादीचा चुलता लक्ष्मण हा माहितीचा आहे. हें घर लक्ष्मणच्या नांवावर आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. आनंदा कमेटी या घराबद्दल भरतो हें मला माहीत नाहीं. पाडळशाला पंचायत झाली त्याला आज १०।१२ महिने झाले असतील. नक्की सांगतां येत नाहीं. पौष महिन्यांत झाली. वद्य पक्षांत झाली किंवा शुद्ध पक्षांत झाली हें मला समजत नाहीं. पौषाच्या पहिल्या आठ-वड्यांत झाली त्यापूर्वीं ५।७ वेळां मला मुलानें सत्पंथांत येण्याबद्दल सांगितलें व ही गोष्ट मजजवळ काढूं नकोस असें मी त्याला ५।७ वेळां सांगितलें, या बुधवारच्या पूर्वीं किति दिवस अगोदर त्यांनीं मला सांगितलें हें सांगतां येणार नाहीं. ५।७ वेळां सांगितलें तें कोणत्या महिन्यांत, कोणत्या वारीं सांगितलें तें मला सांगतां येणार नाहीं. भाऊ कृष्णा यानें सत्पंथी होण्याबद्दल कधीं आग्रह केला नाहीं. ४ वर्षांपासून मी कृष्णाकडे खात नाहीं. त्याचीं बायकापोरें माझ्या घरीं येत नाहींत; व या पांच जणाला जातीबाहेर टाकण्याबद्दल पंचाचा ठराव झाला होता. आमच्या गांवाला आला होता. बुधवारीं हेंच सांगावयाला मला मुलानें बोलाविलें. याशिवाय दुसरें बोलणें झालें नाहीं. बोवांना गादीवर बसले त्या दिवसापासून एक वर्ष झालें ओळखतों. मी बोवांचा उपदेश घेतला नाहीं. बोवा गांवांत शिष्य करितात कीं नाहीं मला माहीत नाहीं. मी वाडींत गेलों तर बोवाच्याकडे महिन्यां-तून एखादे वेळीं जाऊन बसत असें. सत्पंथी लोक मुसलमान आहेत,

गोमांस खातात, त्यांना जातीबाहेर टाका, असें बोवा ह्मणत नव्हते. मुलगा कधीं नमाज पढतो कीं नाहीं माहीत नाहीं. या अल्ला तोबा करीत नाहीं. सासराहि कधीं नमाज पढला कीं नाहीं माहीत नाहीं. माझ्या भावाची शेंडी कायम आहे. कृष्णाला लहान मुलगा आहे. त्याची सुंता झालेली नाहीं. आरोपीनें सत्पंथी लोक मुसलमान आहेत, गोमांस खातात अशा प्रकारची जाहिरात बोवांनीं मला कधीं वाटली नाहीं. मी जेव्हां जेव्हां बोवाकडे गेलों तेव्हां ते सत्पंथी लोकांबद्दल कांहींच बोलले नाहींत. त्यांनीं गोष्टच काढली नाहीं. मी विरमून बसलों. त्यादिवशींहि बोवानें सत्पंथ मुसलमानी आहे वगैरे सांगितलें नाहीं. आणखी त्याला समजूत देऊन पहा असें बोवा ह्मणाले. त्यानंतर मी समज दिली नाहीं. या बुधवारच्या नंतर संक्रांत यावयाची होती. संक्रांत त्या नंतर २।३ हाटानें आली. नक्की माझ्या ध्यानांत नाहीं. संक्रांत कोणवारीं होती हें ध्यानांत नाहीं.

फेर तपासणी—माधोचें लग्न झालें त्या दिवशीं दुला भारंबा सत्पंथी झालेला नव्हता.

११।१०।२३

Sd. जी. एस्. राजाध्यक्ष
मॅ. वर्ग १ पूर्वभाग

शिक्का

खरी नक्कल
सही इंग्रजी
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर १८

आरोपीतर्फे साक्षीदार नं. ६ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव नारायण बापाचें नांव सुपडू पाा धर्म हिंदु जात लेवे पाटीदार उमर सुमारें २९ वर्षांची धंदा व्यापार व शेती राहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पूर्व खानदेश.

सर तपासणीः——आरोपी यांनां ओळखतों. मी ५१ रु० सारा भरतों. माझें किराणा मालाचें दुकान आहे. बाजारपेठेंत दुकान आहे. हजिरा माझ्या दुकानच्या पश्चिम बाजूला आहे. अमीर मुाा याचें कापडाचें दुकान माझ्या दुकानच्या पूर्व बाजूला आहे. माझें घर नवीन आहे. बांधण्यास सुरवात नागदिवाळीला केली. या नागदिवाळीला वर्ष होईल. घर बांधणेस लागलों तेव्हां एक ऋषि नांवाचा नोकर ठेविला होता. ऋषि हा खंडेरावच्या वाडींत रहात होता. हा कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून ३ महिने माझ्याकडे होता. मजुरांची हजेरी, मजुरांची मजुरी, कांपणाऱ्यांची मजुरी हें त्याचें काम होतें. त्याला कामापुरतें लिहितां वाचतां येत होतें. माझ्याकडे लांकडें कापण्यास नथू व अनू किरंगा हे दोघे होते. या दोघांनीं ४ आठवडेपर्यंत काम केलें. त्यानंतर नथू व भवानी नांवाचा इसम असे कामाला आले. नथु व अनू यांची मजुरी शेवटची मी बुधवारीं दिली. पाडळशाला पंचायत झाली ती मला माहीत आहे. मी त्यांना मजुरी दिली त्यानंतर ४।५ दिवसांनीं ही पंचायत होणार होती. मजुरी मागावयाला नथू व अनू आले होते. ते माझ्या दुकानावर दुपारीं १२ वाजेपासून १॥–१॥। तास थांबले होते. मी

मजुरी दिली तेव्हां टिपण ऋषिजवळ होते. तो घरून यादी घेऊन आला होता. मजुरी दिली तेव्हां हा यादी घेऊन आला होता. हा ऋषि खंडेरावाच्या वाडींत बोवाजवळ (आ०) स्वयंपाक पाणी करतों. सरवर मुा यास ओळखतों. अमीर मुा सरवरचा भाऊ आहे. हे दोघे भाऊ विभक्त आहेत. कापडाचें दुकान अमीरचें आहे. सरवर धंदा करीत नाहीं. राडांच्या घरीं पडतो. बोवा (आ०) खंडेरावाच्या वाडींत रहातात. हे वाडींत भागवत वाचतात. धर्मोपदेश करितात. वाडींत ब्राह्मण, वाणी, शिंपी, सोनार, सर्व जातींचे लोक जातात.

उलट तपासणीः—मला आतांपर्यंत (सवाल विचारिला तोंपर्यंत) काय मुद्यावर माझी साक्ष आहे ही गोष्ट मला माहीत नव्हती. समन्स लागण्यापूर्वी अमुक गोष्ट तुम्हाला माहीत आहे काय? असें विचावयास कोणी आला नाहीं. समन्स लागल्यावर तुमची अमुक मुद्यावर साक्ष दिली आहे. तुम्हाला याबद्दल कांहीं माहिती आहे काय? असें कोणी विचारिलें नाहीं. मी आज सकाळीं वकिलांच्या घरीं गेलों नाहीं. वकिल किंवा कोणी पंचांनीं या बाबतींत आज सकाळीं कोणाचें बोलणें झालें नाहीं. टांचण वगैरे मजजवळ नसल्यानें अनु कोणत्या वारीं आला हें मीं धरून निवतांना पाहून आलों नाहीं. मी आठवणीवरून सांगतों. माझ्या कामाला ३ सुतार व ६।७ मजूर होते. हे सुतार व मजूर कोणकोणत्या दिवशीं आले होते, कोण कोण गैरहजर होते हें सांगतां येणार नाहीं. या १०।१२ महिन्यांत कोण मजूरर केव्हां कोणत्या वारीं आला हें मला नक्की सांगतां येणार नाहीं. बोवा वाडींत येण्यापूर्वी जळगांवला होते किंवा कसें हें मंला माहीत नाहीं. यांना प्रथम फैजपूरला मी नेलें नाहीं

यांची खावटी महिनाभर मी चालविली नाहीं. याची खाण्याची व्यवस्था करण्यासाठीं माझा मनुष्य ऋषि मी ठेविला नाहीं. बोवांचा मी शिष्य नाहीं. आतांपर्यंत बोवांनीं होढ ओंकार, गोविंदा झबू हे दोघे शिष्य केल्याबद्दल मला माहीत आहे. बाकी जास्त माहिती नाहीं. मी ७ इयत्तेपर्यंत मराठी व इंग्रजी ३ री पर्यंत शिकलों. मी स्वतःला वैश्य समजतों. लेवेपाटीदार शूद्र असल्याबद्दल हायकोर्टाचा ठराव झाला आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. सत्पंथी लोकांना पंचांनीं जातीबाहेर टाकल्याचें मला माहीत आहे. बोवांच्या बचावासाठीं फंड काढला आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. मी पहिल्या वेळीं १ व नंतर १० रुपये भरले नाहींत. मी एखादेवेळीं बोवाकडे दर्शनाला जातों. सत्पंथी लोक मुसलमान आहेत, गोमांस खातात असें बोवा मी गेल्यावेळीं कधीं बोलले नाहींत किंवा अशी जाहिरातहि त्यांनीं मला दिली नाहीं. मंगळवारीं पंचायत ऑ० मॅ० कडे भरली होती कीं नाहीं मला माहीत नाहीं व मी गेलोंहि नाहीं. फैजपुराहून मी एकटाच आलों. पंच व मी बरोबर आलों नाहीं. कोर्टांत साक्षीला येईपर्यंत पंचांचें व माझें बोलणें झालें नाहीं.

फेर तपासणी नाहीं.

११।१०।२३

Sd. **जी. एस्.राजाध्यक्ष,**
मॅ० वर्ग १ पूर्वभाग.

शिक्का

खरी नक्कल.
सही इंग्रजी.
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर १९

आरोपी तर्फे साक्षीदार नं. ७ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव माधव बापाचें नांव खंडू, धर्म हिंदु, जात लेवेपाटीदार, उमर सुमारें ४५ वर्षांची धंदा शेतीचा रहाण्याचा गांव फैजपूर डि. पूर्व खानदेश.

सरतपासणीः—स्वतःची शेती आहे. सारा १० रुपये भरतों. हरशी पुनशीकडे गाड्याच्या ठेक्याचें काम करितों. कापूस, शेंगा, वगैरें वाहण्याबद्दल ठेक्याचें काम करितों. शामजी भाटे याच्या घराजवळ माझें घर आहे. दरम्यान फक्त ८।१० हातांचा बोळ आहे. गेल्या मार्गशीर्ष व पौषमध्यें माझ्या ठेक्यांत १००।१२५ गाड्या होत्या. व्यापारी लोकांकडून मी गाडीभाडें अमावास्येला घेतों. व माझ्या ओसरींतच मी मजुरी वाटतों. ५।५० लोक मजुरीला येतो. पौष महिन्यांत मी मजुरी वाटली. मार्गशीर्षमध्येंहि वाटली. मी मंगळवारीं रात्रीं हिशेब करून बुधवारीं बाजारच्या दिवशीं मजुरी वाटतो. मार्गशीर्ष किंवा पौष महिन्यांत बोवांनीं वाजंत्री वाजवून शामजी भाट्याचे घरासमोर लेक्चर दिलें नाहीं. दिलें असतें तर मला तेव्हांच कळलें असतें. ९ महिन्यांपूर्वीं ५।७ वर्षें सत्पंथीं लोक माझ्यामध्यें गवांदी व गाडीवान होते. सत्पंथी जयराम लांडगा, टिपा नारखेडा हे भागीदार होते. मी हिंदुधर्माचे उपास करितों. ते लोक, जयराम व टिपा हे गुरुवार व रोजे पाळीत. रोजे डोल्याचे दिवसांत १० दिवस व बकरीदच्या वेळीं रोजे करीत. जयराम व टिपा यांच्यांत मी जेवणखाण करीत नव्हतों.

उलटतपासणीः—लांडगा व नारखेडा हे संध्याकाळीं नमाज पढतात. या अल्ला तोबा करितात. संध्याकाळ झाली म्हणजे हे नमाज

पढत. व या अल्ला तोबा करीत. हें मी पाहिलेलें आहे व शब्दहि ऐकिले होते. यांना शेंड्या होत्या. दाढी वाढलेली नव्हती. यांच्या मुलांची सुंता झालेली मला माहीत नाहीं. यांच्या बायका नमाज पढतात कीं नाहीं मला माहीत नाहीं. सत्पंथी गाडीवाले ठेवलेस तर तुझ्या गाड्या आह्मी घेणार नाहीं असें पंचांनीं मला सांगितलें नाहीं. गाड्या यांच्या सांगण्याप्रमाणें बंद केल्या ह्मणून मी पंचांना मेजवानी केली नाहीं. या खटल्याची चौकशी यावलला चालली कीं नाहीं मला माहीत नाहीं. बोवा व त्यांच्याबरोबर येणाऱ्या मंडळीला मी फैजपूर तें स्टेशनपर्यंत गाड्या फुकट देत नाहीं. बोवा गादीवर बसले तेव्हांपासून २।३ वर्षांपासून ओळखतों. बोवांनीं आमच्या जातीचे शिष्य केले कीं नाहीं माहीत नाहीं. बोवाच्या बचावासाठीं जातीनें फाळा काढिला कीं नाहीं माहीत नाहीं. मी बोवाजवळ जाऊन बसत नाहीं. माझा भाचा किसन हंबर्डीचा, बोवाचा शिष्य झाला किंवा नाहीं तसेंच त्याला बोवांनीं जानवें घातलें किंवा नाहीं हें मला माहीत नाहीं. मी गेल्या वर्षापासून गांवाबाहेर बैठकींत गाडीभाडें चुकवीत नाहीं. भाडें केव्हां, कोणाला, कसें दिलें याबद्दल टांचण नाहीं. आठवणीवरून माहिती सांगितली. कोणाला कधीं व किती मजुरी दिली हें मला तोंडी सांगतां येणार नाहीं.

फेरतपासणी नाहीं.
११।१०।२३

SD. जी. एस्. राजाध्यक्ष.
मॅ. वर्ग १ पूर्वभाग

शिक्का

खरी नकल
सही इंग्रजी,
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर २०

आरोपीतर्फे साक्षीदार नं. ८ याची जबानी

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव तुकाराम बापाचें नांव आसाराम, धर्म हिंदु, जात लेवेपाटीदार उमर सुमारें २१ वर्षांची, धंदा शेतीचा रहाण्याचा गांव फैजपूर डि० पूर्वखानदेश.

सरतपासणीः—मी सारा खतःचा १५।१६ रुपये भरतो. मी जळगांव हायस्कूलमध्यें इंग्रजी ६ वी पर्यंत शिकलों आहे. कार्तिक महिन्यांत शाळा सोडली. माझे गुरु खंडेरावाच्या वाडींतले बोवा आरोपी हे आहेत. माझे वडिलांचे गुरु पूर्वीचे बोवा खंडेरावच्या वाडींतील हे होते. वडील गेल्या कार्तिकमध्यें वारले. गेल्या पौष शुद्ध प्रतिपदेला मी गुरु केले. चावदस गिरिधर व मी असे दोघे शिष्य झालों. गुरु केल्यावर गुरुभोजन करावें लागतें. मी दुसऱ्या दिवशीं ह्मणजे बुधवारीं खंडोबाच्या वाडींत गुरुभोजन केलें. आम्ही दोघे सकाळीं ८ वाजतां वाडींत गेलों. तों परत संध्याकाळीं ७।८ वाजतां आलों. बोवा (आ०) तेव्हां वाडींतच होते. वाडी सोडून त्या दिवशीं बोवा बाहेर गेले नाहींत. सत्पंथासंबंधानें मला माहिती आहे. सत्पंथी लोकांचा सोयरीक संबंध असून शिवाय शेजारीं आहेत ह्मणून मला माहिती आहे. हा पंथ मुसलमान धर्म आहे असें सांगतात. हे ४० चाळिसावा दिवस करितात. कणकेची गाय करून खातात. हिंदुधर्माच्या उलट यांचें सर्व असतें. या गोष्टी मी वाड्यांतल्या मंडळींजवळ व बोवाजवळ सांगितल्या होत्या. बोवाजवळ मार्गशीर्ष महिन्यांत या गोष्टी काढल्या होत्या. बोवांनीं या पंथासंबंधीं हॅंडबिलें वाटलीं तीं मला माहीत आहेत. Ex. I A. & I D. हीं हॅंडबिलें

बोवांनीं वांटलीं. जो तेथें वाडींत येईल त्याला त्यांनीं दिलीं. मला मुलांनीं हीं हँडबिल्स् दिलीं होतीं. माझा सासरा व मेहुणा ह्मणजे बायकोचा भाऊ याच ह्मणजे सत्पंथी पंथाचे आहेत. माझा व सासुरवाडीच्या लोकांचा रोटीव्यवहार नाहीं. ४।५ वर्षांपासून नाहीं. यापूर्वीं होता. आमची भोरगांवची पंचायत भरली व त्यावेळीं त्यांना (सत्पंथी) बाहेर टाकलें. या गोष्टीला चार वर्षें झालीं. तेव्हांपासून खाणेंपिणें बंद आहे.

उलट तपासणी:—मी जळगांवला १ वर्षपर्यंत इंग्रजी शिकावयाला होतों. फी नोव्हेंबर महिन्यापर्यंत भरली. नांव काढण्याबद्दल मी मास्तरला लेखी कळविलें नाहीं. डिसेंबरमध्यें एकहि दिवस शाळेंत गेलों नाहीं. माझे वडील नोव्हेंबरमध्यें आजारी पडले असतील. कार्तिक सांगतां येतो. पण इंग्रजी नोव्हेंबर महिनाच होता कीं कसें हें नक्की सांगतां येत नाहीं. डिसेंबरची फी भरली नाहीं. मी नोव्हेंबर १५ पर्यंत शाळेंत असेन. नक्की आठवत नाहीं. शपथेवर खोटें सांगितलें तर खटला होतो हें मला माहीत आहे. २० डिसेंबरला मी शाळेंत नव्हतों. डिसेंबरमध्यें एकहि दिवस शाळेंत गेलों नाहीं. बोवा वाडींत आले त्याला १॥ वर्ष झालें असेल. मी गुरु केले तें इंग्रजी महिना (साक्षीदारानें महिने मोजले) कोणता नक्की सांगतां येत नाहीं. आज सुमारें १०।११ महिने झाले असतील. मी बोवांकडे गुरु करण्यापूर्वीं जात येत होतो. माझे वडिलहि जात येत होते.

बोवा आल्यापासून मी गुरु करी तोंपर्यंत बोवांनीं मला सत्पंथी मुसलमान आहेत, गोभक्षक आहेत, असें सांगितलें नाहीं. हिंदु-

धर्मांतला हा पंथ नाहीं, किंवा यांच्याशीं रोटी बेटी व्यवहार करणें म्हणजे आपला धर्म बुडविणें होय असेंहि त्यांनीं सांगितलें नाहीं.

सत्पंथी लोक बहिष्कृत केले त्याला आज ४ वर्षें झालीं. गुरु कोणत्या तारखेला केलें सांगतां येत नाहीं. वार सांगतां येतो. सोनू पुंजो माझा मेहुणा—बायकोचा भाऊ आहे. माझ्या लग्नाला ७।८ वर्षें झालीं असतील. पंचायत ४ वर्षांपूर्वी झाली. त्यापूर्वी सत्पंथी जाती-बाहेर नव्हते. त्यांच्याशीं खाणेंपिणें व रोटी व्यवहार होत. माझें लग्न झालें त्या वेळीं माझा मेहुणा व सासरा हे सत्पंथी नव्हते. ठरावापूर्वी त्यांच्याशीं रोटीव्यवहार करण्यास हरकत नव्हती. पंचायतीनंतर माझी बायको माहेरी गेली नव्हती. ४ वर्षांपूर्वीची पंचायत व मागील सालची पंचायत या दरम्यान कोणाची सोयरिक झाली कीं नाहीं मला माहीत नाहीं. रोटीव्यवहार नव्हता हें मी शपथेवर सांगूं शकतों. मी स्वतः कधीं सत्पंथी नव्हतों. गुरुपदेश दिल्यावरहि बोवांनीं सत्पंथी हे मुसलमान आहेत असें सांगितलें नाहीं. माझे सासरे व मेहुणे यांना शेंडी आहे. भोरगांवच्या पंचायतीपूर्वी सासरे व मेहुणे हे नमाज पढत होते कीं नव्हते मला माहीत नाहीं. सत्पंथी कणकेची गाय खातात असें बोवांनीं मला सांगितलें नाहीं. मी ऐकलेलें नाहीं. मी कोणाच्या ४० व्याला हजर नव्हतों. ४० वा करितात असें ऐकलेलें आहे. सत्पंथ्याच्या प्रेताबरोबर मी गेलों होतों. खांदा दिला नव्हता. तेव्हां मला याचा मुर्दा हिंदुसारखा गाडीत नाहींत असें आढळून आलें. आमच्यांत मुर्दे जाळतात. दुसरे हिंदु जे मुर्दे गाड-तात त्यांच्या प्रेतयात्रेला मी गेलों नाहीं. हिंदूंनीं मुर्दे कसे गाडावे याबद्दल कोठें धर्मशास्त्रांत मी वाचलेलें नाहीं. मी कळविणेंपूर्वी

बोवांना सत्पंथाबद्दल माहिती होती. पण त्यांनीं ती मला सांगितली नाहीं. Ex. I A & I D. चीं हँडबिलें मी बोवांना सत्पंथाबद्दल सांगितल्यानंतर बोवांनीं काढलीं. याचा खर्च कोणी केला माहीत नाहीं. हँडबिलें बोवांनीं छापून आणलीं व मुलांजवळ वाटण्यास दिलीं ह्मणून मुलांनीं वाटलीं. जे दर्शनाला येत तेवढ्यांच लोकांना हँडबिलें वाटीत असत. मग तो ब्राह्मण, सोनार कोणीहि असो. बोवा आले तेव्हां त्यांना शिधासामुग्री आह्मी देत नव्हतों. ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र, वैश्यांपैकीं माझी वैश्य (जात) समजतों. हायकोर्टानें शूद्र ठरविलें हें मला माहीत नाहीं. मी हिंदुधर्माचीं कांहीं पुस्तकें वाचलीं नाहींत. मुसलमानाचींहि कांहीं वाचलीं नाहींत. कोणत्या विशेष गोष्टी-वर श्रद्धा असली ह्मणजे त्याला हिंदु ह्मणतां येईल हें मला माहीत नाहीं. हिंदूंचे बाह्योपचार ह्मणजे रीतभात मात्र मला समजते. मुसलमानांनीं सुंता केलीच पाहिजे अशी रीत आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. **वेदाचा ग्रंथ एकच आहे. त्याला रामायण हें नांव आहे.**

फेरतपासणी:—मीं शास्त्री पुराणिक झालों नसून शास्त्र कधीं वाचलें नाहीं. हिंदुधर्माच्या तत्त्वावर मी कधीं प्रवचनें दिलीं नाहींत. आतां शेतीचा धंदा करितो.

मुा जळगांव १२।१०।२३ Sd **जी. एस्. राजाध्यक्ष.**

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

शिक्का

खरी नक्कल

सही (इंग्रजी)

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर २१.

आरोपीतर्फे साक्षीदार नं. ९ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव खंडू, बापाचें नांव मोतीराम, धर्म हिंदु, जात लेवे पाटीदार उमर सुमारें ४० वर्षांची धंदा व्यापार राहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पूर्व खानदेश.

सरतपासणी:—आमच्या जातींत सत्पंथी लोक आहेत हें मला माहीत आहे. यांच्याशीं आमचा रोटीबेटीव्यवहार ५।६ वर्षांपासून नाहीं. फिर्यादी अनु याच्या बापाचें नांव लहानु आहे. फिर्यादी हा बापांतून वेगळा रहातो. हे तिघे भाऊ असून तिघेहि ८।१० वर्षांपासून निरनिराळे रहातात. अनुचा चुलता लक्ष्मण हा तिघा भावांतून पुष्कळ वर्षांपासून वेगळा आहे.

खंडोबाची गादी आमच्या गांवाला आहे. तिला सालाचे १००० १२०० रु० उत्पन्न आहे. एक शेत आहे व होळीच्या यात्रेचें उत्पन्न आहे. शिवाय व्यापाऱ्याकडून कपाशीचा शेर मिळतो. हें उत्पन्न पूर्वींपासूनच आहे. मी ८।१० महिने झाले वाडींत जेवावयाला गेलों होतों. तुकाराम साक्षीदार व चावदस हे बोवाचे (आ०) चेले झाले होते ह्मणून मी जेवावयाला गेलों होतों. सुमारें ११-११॥ ला जेवावयाला गेलों व घरीं परत ४-४॥ ला आलों. तोंपर्यंत बोवा वाडींतच होते. कोठें बाहेर गेले नव्हते. त्यावेळीं मला Ex I A. & I D. चीं हँडबिल्स एका पोरानें दिलीं.

उलट तपासणी:—बोवाविरुद्ध खटला आहे ही गोष्ट मला समन्स लागले त्यावेळीं कळली. बोवाला समन्स लागलें त्यावेळीं ह्मणजे सुमारें ६।७ महिने झाले असतील कळली. प्रथम यावलला चौक-

शीला काम गेलें. तेव्हां मी मामलेदार कचेरींत गेलों नव्हतों. या कचेरींत मी आजच आलों. साहेबांच्या बंगल्यावर तोतारामची जबानी झाली त्यावेळीं मी तेथें नव्हतों. मला बुधवारीं समन्स लागलें. तारीख लक्षांत नाहीं. समन्स लागल्यापासून आतांपर्यंत बोवा किंवा त्यांच्या वतीनें कोणी मला भेटायला आलें नाहीं. माझी साक्ष काय मुद्द्यावर आहे हें आतां सवाल विचारिलें तोपर्यंत मला माहीत नव्हतें किंवा याबद्दल कोर्टांत येईपर्यंत कोणाचें बोलणें झालें नाहीं. मी मराठी ४।५ इयत्तेपर्यंत शिकलों आहे. मी गांवपंचांपैकीं एक पंच आहे. पाडळशाला मागले सालीं पंचायत झाली. त्या पंचायतीला मी गेलों होतों. ४ वर्षांपूर्वीं झाली त्या वेळीं मी गेलों नव्हतों. आम्ही वैश्य समजतों. (प्रश्न—हायकोर्टांत तुमची जात शूद्र ठरली कीं नाहीं ?)

[Objection taken by the defenec pleader. Disallowed. The defence pleader's objection is that the question is irrelevent and offensive.]

मी किंवा माझा भाऊ आरोपीचा शिष्य नाहीं. सोना सांडू हा माझा सोयरा नाहीं. व खुशाल हरी हे भाऊबंद नाहींत. बोवांच्या बचावाला मी २६ रुपये वर्गणी दिलेली नाहीं. मला कर्ज ६।७ हजार रुपये असेल. केशवजी भाटे याला माझ्या इस्टेटीचा कांहीं भाग गेले सालीं ७ हजाराला गहाण करून दिला. या इस्टेटीशिवाय मला मालकीची शेती आहे. इंग्रजी कोणत्या महिन्यांत व तारखेला जेवावयाला गेलों हें मला सांगतां येणार नाहीं. बोवांनीं पिराण्याहून कांहीं फोटो आणिले त्याचें बिल माझ्या नांवावर आलें होतें. पिराण्याला फोटो घेतले तेव्हां मी पिराण्याला गेलों नव्हतों. अगोदर अहमदा-

बादला गेलों होतों. काकाची साक्ष चालू होती, त्याच्या अगोदर अहमदाबादला गेलों होतों. मी कोर्टांत गेलों नव्हतों. बोवांनीं मला सांगितलें " तो माझ्या नांवावर फोटो पाठवीत नाहीं. मजजवळ पैसे नाहीं. ह्मणून तुमच्या नांवावर मागवा." आणि ह्मणून मी माझ्या नांवावर फोटो मागविले. जाहिराती बोवांनीं छापल्या. वाडींत सर्व जातीचे लोक जमतात. जाहिराती सर्व जातीच्या लोकांना वाटल्या. किती प्रति काढल्या व बिल कोणी दिलें मला माहीत नाहीं. जेवावयाला जाण्यापूर्वीं खंडेरावाच्या वाडींत मागें एखादे वेळीं गेलों असेल. हे बोवा आल्यापासून मी जेवावयाला गेलों तेव्हांच एकदां वाडींत गेलों.

फेर तपासणीः—फोटोचे पैसे बोवांनीं मजजवळ आणून दिले व मी व्ही. पी. सोडविली. बोवांच्या पूर्वींच मी माझ्या कामाकरितां अहमदाबादला गेलों होतों. सारा १५ रुपये व घरपट्टी ३५ रु० भरतों.

१२।१०।२३

शिक्का

S d जी. एस. राजाध्यक्ष.
मॅ० वर्ग १ पूर्वभाग
खरी नक्कल
सही इंग्रजी
मॅ० वर्ग १ पूर्वभाग

निशाणी नंबर २२

आरोपीतर्फे साक्षीदार नं. १० याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव शंकर, बापाचें नांव बापू धर्म हिंदु जात लेवेकुणबी उमर सुमारें ३६।३७ वर्षांची धंदा शेती व नोकरी. रहाण्याचा गांव फैजपूर डिस्ट्रिक्ट पू० खा०

सरतपासणीः—सारा ८ रुपये भरतो. माझे कापडाचें दुकान फैजपूरला बाजारपट्टींत हजिऱ्याजवळ आहे. माझें दुकान आठवडे बाजारांत नसतें. गावांत असतें. गेल्या १२ महिन्यांत बोत्रा ताशें वाजत्रीत कधीं माझ्या दुकानावरून गेल्याचें आठवत नाहीं व गेलेहि नाहींत. हजिऱ्याजवळ जर कोणी व्याख्यान दिलें तर माझ्या दुकानावर ऐकूं येईल. गेल्या १२ महिन्यांत बोत्रांनीं सत्पंथी लोकां-बद्दल भाषण केल्याचें मला माहीत नाहीं. महमद सरवर मोमीन यास ओळखतों. त्याचें कापडाचें दुकान फैजपूरला नाहीं. त्याचा भाऊ अमीर याचें दुकान आहे. अमीर व सरवर हे विभक्त रहातात. सरवर घोड्याचा धंदा करितो. फिर्यादी अनु व त्याचे भाऊ माहितींतले आहेत. हा व याचे भाऊ ५।७ वर्षांपासून वेगळे रहातात. यांचा चुलता लक्ष्मण १५।१६ वर्षांपासून वेगळाच रहातो. खंडोबाच्या वाडींत गेल्या १२ महिन्यांत एका वेळीं गेलों होतों. एक लहान व एक मोठी अशा २ जाहिराती मला त्या वेळीं सत्पंथी धर्मासंबंधानें मला आतां दाखविल्या (Ex. I A. & I D.) अशाच मिळाल्या होत्या. एका पोरानें दिल्या. वाडीला १०००।१२०० चें उत्पन्न सालीना आहे. शिवाय शेती आहे.

उलट तपासणीः—हीं हॅंडबिल्स मुलाजवळ वाटावयास कोणी दिलीं मला माहिती नाहीं. हीं महाराज यांनीं काढलीं हें आतां माहीत झालें. बोवांचें व माझें सत्पंथाबद्दल प्रत्यक्ष बोलणें झालें नाहीं. हे मुसलमान आहेत, गोमांस खातात, असें बोवांच्या तोंडून मी ऐकलें नाहीं. बोवांचा शिष्यसमुदाय असेल पण तो किती आहे, काय आहे मला माहीत नाहीं. बोवांच्या बचावासाठीं फाळा काढला नाहीं, व मी त्याला १० रुपये दिले नाहींत. मी हल्लीं गुलाबचंदाकडे गुमास्ता आहे. पूर्वीं चुडामण विठूकडे होतो. ती नोकरी मी होऊन सोडली. त्यांनीं मला काढलें नाहीं. सरवर बाजारपट्टींतच रहातो. फिर्यादी व त्याचे भाऊ हे इस्टेटीतून वेगळे आहेत किंवा कसें हें मला सांगतां येत नाहीं. पण जेवणखाण वेगळे करतात. व त्यांचीं वेगळीं घरें आहेत. यांचा चुलता लक्ष्मण १५।१६ वर्षांपासून मी इस्टेटीसुद्धां वेगळा पहातों. मी खटला ऐकावयाला आजपर्यंत कधींच आलों नाहीं.

फेरतपासणी नाहीं.

१२।१०।२३

Sd **जी. एस्. राजाध्यक्ष.**
मॅ० वर्ग १ पूर्वभाग

शिक्का.

खरी नक्कल
सही इंग्रजी
मॅ० वर्ग १ पूर्वभाग

———

निशाणी नंबर २३

आरोपीतर्फे साक्षीदार नं. ११ याची जबानी.

मी यात्रखून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव धोंडू, बापाचें नांव शामा, धर्म हिंदु, जात लेवेपाटीदार, उमर सुमारें ५२ वर्षांची. धंदा सावकारी, व्यापार, शेती. रहाण्याचा गांव फैजपूर. डिस्ट्रिक्ट पूर्वखानदेश.

सरतपासणीः—I. T. (इन्कमटॅक्स) १६१ रु. भरतों. व सारा २५० रु. भरतो. मी म्युनिसिपालिटींत मेंबर आहे. आमच्या जातींत सत्पंथ्यांसंबंधानें ४।५ पंचायती झाल्या. संवत् १९६२ मध्यें सर्व गांवचे सत्पंथी लोकांनीं सत्पंथ सोडल्याबद्दल कबूल केलें. फैजपूर, चिनावल राजोरें, अमोदें व आणखी एक गांव आहे, नांव आठवत नाहीं, या गांवाला सत्पंथी आहे. आमच्या गांवाला सत्पंथी धर्मशाळा आहे. ६२ सालच्या पंचायतींत हा पंथ मुसलमानी ठरला. हा पंथ जो स्वीकारील त्याला पंचाच्या खावटीबद्दल खर्च द्यावा लागेल असें ठरलें व त्याला जातीबाहेर टाकावें असेंहि ठरलें. आम्ही या धर्मशाळेंत जाणार नाहीं असें ६२ सालच्या पंचायतींत सर्व सत्पंथी लोकांनीं कबूल केलें. या पंचायतीनंतर धर्मशाळेला कुलूप होतें. तोतारामचा बाप बधू जाना यास ओळखतो. हे त्या पंचायतीच्या वेळेस हयात होते. त्यांचा पंचांनीं २१३५ रुपये दंड केला. दंड वसूल करतों त्याला आह्मी पंचांचा खावटी खर्च असें ह्मणतों. ६२ सालच्या पंचायतीनंतर बधू महाजन यांनीं धर्मशाळेंत प्रवेश केला ह्मणून त्याला दंड झाला. व धर्मशाळेला पुनः कुलूप लावलें. ही धर्मशाळा पुनः ७५ च्या सालीं सुरू झाली. तोंपर्यंत कोणी सत्पथं वागत्रीत नव्हते.

गिरिधर नथू कोल्हा, हरी भिलाणकर, परशराम चौधरी व आणखी दोन इसम नांव आठवत नाहीं असे ५ इसम ७५ सालीं या पंथांत पुनः गेले. त्याबद्दल पाडळशाला पंचायत झाली. त्या लोकांनीं पंथ सोडीत नाहीं असें सांगितल्यावरून पंचांनीं त्यांना वर्ज्य केलें. वर्ज्य केल्यानंतर या लोकांना आमच्या येथील निदान ५०।६० लोक सहाय्य झाले. आम्ही त्यांनां आमच्या गांवांत बहिष्कृत केलें व कुटुंबनायक यांना कळविलें. त्याच्यानंतर १९०० (१९७९) सालांत पंचायत झाली. त्याला आज ९।१० महिने झाले. आमच्या भोरगांवच्या सर्व सभा पाडळशाला होतात. बहिष्कृत लोकांच्या मुली मोठाल्या झाल्या याचा कांहीं तरी निकाल करावा ह्मणून ही सभा बोलाविली. त्या वेळीं बहिष्कृत लोकहि हजर होते. सुमारें ४।५ हजार लोक हजर होते. त्या वेळीं १ दिवस सभा तहकूब ठेविली; व या बहिष्कृत लोकांना "आतां तरी पंचांत या, ताटातूट करूं नका," असें समजाऊन सांगितलें. पण हे ह्मणाले "**आमचा पंथ ठेवून जातींत घ्याल तर आह्मी येतों, नाहीं तर आह्मांला पंचांची जरूरी नाहीं.**" मग पंचांनीं सोयरिका मोडाव्या असें ठरविलें. १९६२ सालीं सत्पंथी राहिला तर सोयरिका मोडाव्या असें ठरलें होतें. पंचायतींत बोवांच्या जाहिरातीसंबंधानें (Ex. I A & I D.) (साक्षीदारास दाखविल्या) किंवा भाषणासंबंधानें कांहीं बोलणें निघालें नाहीं. सत्पंथी हे मुर्दे उलटे ठेवितात. हिंदु धर्मांत डोकें दक्षिणेस व पाय उत्तरेकडे तर हे पाय दक्षिणेस व डोकें उत्तरेकडे ठेवितात. हे रमजान वगैरे करीत होते. माझे सासरे चिनावलचे सखाराम महाजन हे सत्पंथी होते. **सत्पंथ्यांबद्दल प्रश्न निघ-**

ण्यास मूळ कारण चिनावलपासून झालें. चिनावलला ठोमरा नांव आठवत नाहीं, त्यानीं दारावर ' ईमामशाही की जय ' असें लिहिलें होतें. त्यावरून प्रश्न उत्पन्न झाला. मकडू मुऱ्हा, भुरा मुऱ्हा यांना ओळखतो. हे मूळचे सत्पंथी होते.

उलट तपासणी:—मी पंचांपैकी एक आहे. गांवांतला एक पंच आहे. **मुख्य पंचांपैकीं नाहीं.** कुटुंब नायकाकडून माझ्याकडे हुकूम येत नाहीं. सत्पंथ किती पिढ्यांपासून आमच्या जातींत आहे हें सांगतां येणार नाहीं. १९६२ च्या पूर्वी किती वर्षांपासून हा पंथ आहे हें मला सांगतां येणार नाही. माझी बहीण धना किरंगा याला दिलेली आहे. तो फिर्यादीचा चुलत आजा. हा सत्पंथी होता. सखाराम चिनावलकरांची नात माझ्या पुतण्याला दिली. या सोयरिकीला १५।२० वर्षें झालीं असतील. धनाचा मुलगा सखाराम सत्पंथीच होता. त्याला वारण्यास १८।२० वर्षें झालीं असतील. याचें उत्तरकार्य ७५ च्या सालीं मी धर्मशाळेंत यांच्या पंथाप्रमाणें करविलें नाहीं, किंवा करावयाला सांगितलें नाहीं. हा पंथ मुसलमानी आहे अशाबद्दल निर्णय करून शंकराचार्याकडून आज्ञापत्र कोणी आणल्याचें माझ्या माहितींत नाहीं. शंकराचार्याकडे हें काम पाठवा ते आह्मांला निकाल देतील तो कबूल आहे असें सत्पथी लोकांनीं गेल्या पंचायतींत सांगितलें नाहीं. पंचांनीं निकाल दिला तो शंकराचार्यांचे निकालावर लावला कीं कसें हें मला माहीत नाहीं. प्रकरण शंकराचार्याकडे गेलें आहे असें मला माहीत नाहीं. शास्त्री पंडितां कडून शास्त्राधार आणवले आहेत कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. मी फैजपूरच्या जातीच्या पुढाऱ्यां-पैकींएक आहे. **आह्मी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र पैकीं**

आह्मांला वैश्य ह्मणवितों. हायकोर्टांतून आमची जात शूद्र ठरली हें मला माहीत नाहीं. आजपर्यंत पंचायतीपुढें हा प्रश्न आला नाहीं. सत्पंथी लोकांना गोमांस खातांना पाहिलें नाहीं. सुंता केल्याचेंहि ऐकिलें नाहीं. बायका सुद्धां सत्पंथी असतात कीं नाहीं मला माहीत नाहीं. हिंदूंनीं प्रेतें कशीं पुरावीं हें मी धर्मग्रंथांत वाचलेलें नाहीं. आमच्या समजुतीविरुद्ध जर एखाद्या हिंदूनें प्रेत पुरलें तर त्याला आह्मी मुसलमान ह्मणूं. ताबुतांत हिंदू फकिरी घेतात हें मला माहीत नाहीं. शिरडीचे सांईबाबा माहीत नाहींत. ते मुसलमान होते हें मला माहीत नाहीं. कबीर या नांवाचा पंथ मला माहीत नाहीं. कबीर नांवाचा संत होऊन गेला हें मला माहीत नाहीं. सत्पंथी लोकांना शेंडी असते. ते दाढी वाढवीत नाहींत. प्रेतें पुरण्याची पद्धत व रोजे सोडून दिले तर सत्पंथी आणि आह्मी या दोघांच्या बाकीच्या वहिवाटींत कांहीं फरक नाहीं. ते एकादशी शिवरात्र करीत नाहींत. पुष्कळ हिंदूहि एकादशी शिवरात्र करीत नाहींत. मुर्दे पुरणें व रोजे या लोकांनीं सोडलें तर व जर सर्व जातींनीं यांना पावन केलें तर मीहि यांना जातींत घेईन. आमच्या जातीचा मनुष्य मुसलमानाबरोबर जेवला तर त्याला मुसलमानच समजलें जाईल व त्या इसमाला आह्मी पावन करूं शकणार नाहीं. सत्पंथी मुसलमानाबरोबर जेवतांना मी पाहिलें नाहींत. पुना वायकोळा मुसलमानाबरोबर जेवला ही गोष्ट मला माहीत नाहीं. आतांपर्यंत त्यांनीं कोणाला सांगितलें नाहीं. बधू महाजनाला विनाकारण जातीबाहेर टाकलें असा ५।५० सह्यांचा अर्ज आल्याचें

मला माहीत नाहीं. Ex. 8 c मी वाचून पाहिला. हा अर्ज कुटुंब-नायकाकडे गेलेला दिसतो. पण असा अर्ज आला होता कीं नाहीं मला माहीत नाहीं. ६२ च्या नंतर एकसुद्धां सत्पंथी नव्हता. ६२ सालचा ठराव मी पाहिला असेल, नक्की सांगतां येत नाहीं. तो ठराव अस्सल पंचाच्या दप्तरीं आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. बोवाला फैजपूरला यावयाला १॥ वर्ष झालें. यांनीं १०।२५ शिष्य केले असतील. मी वर्षांतून होळीच्या दिवशीं एकदां वाडींत जातों. बोवांनीं वाटलेल्या जाहिराती पंचायतींत मला दिसल्या नाहींत. किंवा वाटल्याहि गेल्या नाहींत. गेल्या पंचायतींत पंचांपैकीं कांहींनीं पिराण्याला जाऊन खात्री करून घ्यावी व मग पंचांना रिपोर्ट करावा असा ठराव झाला नाहीं. भुरा मुऱ्हानें सत्पंथ सोडल्याबद्दल कोठें सही केली आहे कीं नाहीं हे माझ्या माहितींत नाहीं. विठ्ठल भवानी सावद्याचे माहितींतले आहेत. यांनीं नवसाकरितां ताबूत केल्याचें पाहिलें नाहीं. मला माहीत नाहीं. **ताबूत केल्यास त्याला मी धर्मबाह्य समजेन. जातीबाहेर टाकावयाचें कीं नाहीं हे पंच ठरवितील त्याप्रमाणें होईल.**

फेरतपासणी नाहीं.

१२।१०।२३

Sd. **जी. एस्. राजाध्यक्ष.**

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

शिक्का

खरी नक्कल

सही (इंग्रजी)

मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर २४.

आरोपीतर्फे साक्षीदार नं. १२ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव हुना बापाचें नांव मनसाराम, धर्म हिंदु, जात लेवे पाटीदार. उमर सुमारें ७० वर्षांची, धंदा शेती, व व्यापार, राहाण्याचा गांव कोळवद डिस्ट्रिक्ट पूर्व खानदेश.

सर तपासणीः—मी सारा ८००।९०० रुपये, इनकमटॅक्स २०० रुपये भरतो. मी २५ वर्षांपासून तालुका लोकलबोर्ड मेंबर आहे. सत्पंथ आमच्या जातींत मुसलमानी ठरलेला आहे. हा पंथ जे स्वीकारतील त्यांना जातीबाहेर ठेवावें, त्यांच्या सोयरिका मोडाव्या असें पंचांनीं ठरविलें. असा ठराव संवत् १९६२मध्यें झाला. त्या पंचायतींत या पंथाबद्दल चौकशी झाली त्यावेळीं हिंदुधर्म व या पंथांत पुष्कळ फरक कळले. या पंथाचे लोक इमामपुरी व बहादरपूर येथें जातात. उटासन करितात. कोणत्याहि जातीचे लोक या पंथापैकीं असले तर एके ठिकाणीं प्रसाद करून जेवतात आणि बहादरपूरचा यांचा बोवा मलिदा करून सर्वांना प्रसाद देतो. मलिदा ह्मणजे पोळ्या, गूळ, तूप यांचा काला. अशा गोष्टी त्यावेळीं नजरेस आल्या. आणखी कांहीं माझ्या लक्षांत नाहीं. १९६२ सालांत बधू महाजन जिवंत होते. **त्या वेळीं आमच्या जातीनें शंकराचार्यांची सल्ला घेतली नाहीं.** बधू महाजन व दुसरे लोक या पंथांतील यांनीं आमचा धर्म मुसलमानी आहे म्हणून आम्ही हा पंथ सोडून देतो असें कबूल केलें. म्हणून सल्ला घेतली नाहीं. त्या वेळीं सर्वांनीं हा पंथ सोडला. फैजपूरला या पंथाची धर्मशाळा आहे. ती धर्मशाळा बंद ठेवण्याबद्दल सत्पंथी लोकांनीं कबूल केलें. नंतर ४।५ महिन्यांनीं तक्रार आली कीं, फैजपूरचे हे

https://archive.org/details/bk147/page/n164/mode/1up

सत्पंथी लोक पुनः धर्मशाळेंत जातात. ह्मणून पंचांनीं विचारणा करतां बधू महाजन वगैरे लोकांनीं ती गोष्ट कबूल केली आणि ह्मणून त्याचा २१३५ रु० दंड केला. आमच्यांत दंडाला पंचाची खावटी खर्च ह्मणतात. ६२ सालच्या पंचायतीला सत्पंथी लोक आले होते. चिनावलला सत्पंथी आहेत. सखाराम महाजन चिनावलचा व आणखी दुसरे सत्पंथी आले होते. आमोद्याला सत्पंथी होते. आमोद्याचे भुरा पाटील व मकडू पाटील हे सत्पंथी आले होते. हे दोघे भाऊ असून त्यांच्या बापाचें नांव मुन्हा आहे. ब्राह्मणोद व राजोरें येथें सत्पंथी आहेत. ब्राह्मणोदचे लाल्ल सटवा व राजोरें येथील नथू पाटील, श्रावण पाटील हे सत्पंथी हजर होते. या पंथासंबंधानें ७५ सालांत पुनः पंचायत झाली. फैजपुरच्या पांच इसमांनीं हा धर्मपंथ स्विकारला व धर्मशाळेंत गेले म्हणून त्यांना बोलाविलें, ते पंचायतीला हजर होते. या पंचांतील बधू महाजन हयात नव्हते. मयत झाले होते. व त्यांचा मुलगा तोताराम महाजन हे हजर होते. व त्यांनीं पंचायतींत भाग घेतला होता. तोताराम महाजन यांनीं या पांच इसमांना सांगितलें, "हा पंथ मुसलमानी धर्म असून, आम्ही सोडला. तुह्मी तरी कां धरतां." हे पांच इसम तरीसुद्धां पंथ सोडायला तयार नव्हते. ह्मणून त्यांना जातिबाह्य केलें. या ५ इसमांचीं नांवें लक्षांत नाहींत. यांच्याशीं सोयरीक किंवा खाणेंपिणें करूं नये, बहिष्कृत ठेवावें असें पंचांनीं ठरविलें. त्यानंतर १९०० (१९७९)सालांत पुनः पंचायत झाली. त्याला आज ८।९ महिने झाले. पंचायत पाडळशाचा कुटुंबनायक भिकु पाा, रावजी पाा, डुबा, व महादु पाा जयराम पाा हे बोलावतात. भिकु पाा व तोताराम महाजन हे व्याही आहेत. या पंचायतींत कांहीं सत्पंथी लोकांनीं हा पंथ

https://archive.org/details/bk147/page/n165/mode/1up

सोडला, कांहींनीं सोडला नाहीं. ज्यांनीं सोडला त्याचें लेखी पत्र घेतलें. जो आपल्या जातींत आठ दिवसांत येईल त्याला जातींत घ्यावें व जो येणार नाहीं त्याचा सोयरीकसंबंध तोडून टाकावा, खाणेंपिणें बंद ठेवावें, असा ठराव पंचांनीं केला. तोताराम महाजन यांचें बरोबर २ वकील देवकर व बापट हे आले होते. तोताराम महाजन यांनीं आणलें होतें. ते आमच्या जातीपैकीं नसल्यानें त्यांना पंचांनीं पंचायतींत बोलण्याची परवानगी दिली नाहीं. आमच्या पंचायतींत जे रुपये जमा व खर्च होतात त्याची वही ठेविली आहे. ती मी आणली आहे. ही वही सावद्याहून चिमणा विष्णाकडून गेल्या पंचायतीच्या वेळीं आली. चिमण विष्णा २।३ वर्ष झाले मयत झाले. ही वही हिशेब पहाण्याकरितां मजजवळ आली. ही वही १९६२ सालाचे जेष्ठ शु० प्रतिपदेपासून सुरू आहे. मी ती वही हजर करितों. Ex. 24 A.* या वहींत १९६२ आश्विन शुद्ध द्वितियेला २१३५ रुपये २०–१०–१९०६ बधुजानाचे जमा आहेत. ही रकम माझ्या स्वतःच्या हातची जमा केली आहे. हा हिशेब त्या वेळेचा तपासल्याबद्दल पंचांच्या सह्या झालेल्या आहेत. माझ्यासमक्ष त्याच वेळीं सह्या झालेल्या आहेत. मयत चिमणा विष्णा याची सहीहि त्यावर आहे. दुसरा सही करणारा गणु व्यंकु ४।५ वर्षांपूर्वी व नारायण बापू २।३ वर्षांपूर्वी मयत आहे.

उलट तपासणीः—१९६२ सालचा अस्सल ठराव दप्तरीं आहे की नाहीं लक्षांत नाहीं. बधु महाजन यांनीं धर्म सोडल्याबद्दल सही केलेला कागद दप्तरीं असेल. मी पाहिला नाहीं. माझ्या लक्षांत पाहिल्याचें राहिलें नाहीं. जमाखर्च दंडाबद्दलचा माझ्या हातचा आहे. मी दंड भरला अशाबद्दल बधू महाजनचा लेख असेल, मला

* पाडळसें भोरगांव पंचांची जमाखर्चाची वही.

माहीत नाहीं व वहीवर बधू महाजनची सही घेतलेली नाहीं. बधू महाजन यांना निष्कारण अदावतीमुळें जातीबाहेर टाकलें असा अर्ज त्यावेळीं आला होता कीं नाहीं लक्षांत नाहीं. Ex. 8 C चा कागद मला दाखविला तो मी वाचून पाहिला. हा अर्ज आला होता कीं नाहीं लक्षांत नाहीं. व याचा पंचांनीं काय निकाल केला तेंहि माझ्या लक्षांत नाहीं. **सत्पंथ व हिंदुधर्म यांतील वर सांगितलेल्या फरका-शिवाय आणखी फरक माझ्या लक्षांत नाहीं.** भुरा पाा व मकडू पाा यांच्या धर्मपंथ सोडल्याबद्दल सह्या आहेत कीं नाहींत लक्षांत नाहीं. कदाचित् असतील. भोरगांव पंचांनीं हा पंथ मुसलमानी धर्माचा आहे अशाबद्दल **शंकराचार्याकडून आज्ञापत्र आणलें नाहीं. शास्त्री पंडित यांचेकडून आधार आणवून पंचांनीं निकाल केला नाहीं.** आह्मी स्वतःला वैश्य समजतों. शूद्र ह्मणजे वैश्यांपेक्षां आह्मी कमी समजतों. भिकू पाा चांगदेकर यांच्या केसमध्यें **हाय-कोर्टानें शुद्र ठरविलें कीं नाहीं** मला माहीत नाहीं. **त्याच्यापुरतें ठरविलें असेल.** आह्मी शूद्र नाहीं. वैश्य आहोंत असें शंकराचार्याकडे जाऊन ठरविलें नाहीं. सत्पंथी लोकांनीं शंकराचार्याकडून हा पंथ मुसलमानी आहे कीं कसें हें ठरवून ध्यावें असा अर्ज केला कीं नाहीं लक्षांत नाहीं. मी पंचायतीला हजर होतों. वकील हाच अर्ज घेऊन आले होते किंवा कसें माझ्या लक्षांत नाहीं. Ex. 4 B मधील खूण केलेल्या प्याऱ्यामधील मजकूर मी वाचला. **अशा मजकुराचा अर्ज पंचायतीत आला होता. या अर्जाबद्दल चौकशी करून रिपोर्ट करावा ह्मणून पंचायतींत कमेटी नेमली नाहीं. अर्जांतल्या गोष्टीप्रमाणें सत्पंथी वागत नाहींत अशाबद्दल लेखी पुरावा**

घेतला नाहीं. या अर्जाप्रमाणें तुह्मी वागतां अशाबद्दल पुरावा असल्यास हजर करावा अशी लेखी नोटीस सत्पंथी लोकांना दिली नाहीं. पंचांचा जमाखर्च लिहावा अशाबद्दल माझी नेमणूक झालेली नाहीं. ही वही घेऊन हजर व्हावें असें समन्सांत मला लिहिलें होतें. ही वही कुटुंबनायकापाशीं रहाते. वही समन्साप्रमाणें नेऊं काय? असें कुटुंबनायकाला मी लेखी विचारिलें नाहीं. पूर्वीं सांगितलें तेच हल्लीं कुटुंबनायक आहेत. यांच्यापैकीं कोणाला साक्षीला बोलाविलें कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. माझा स्वामीनारायण पंथ आहे. (Obgection was raised to the Question but it was disallowed)

प्रश्नः—स्वामीनारायण पंथ हा शंकराचार्यांनीं हिंदुधर्मबाह्य ठरविलेला आहे कीं नाहीं? **होय. मला आतां ठरावाची नक्कल दाखविली;असें शंकराचार्यांनीं ठरविलें होतें.** पण आमच्या गुरूनें काशीचे शास्त्री वगैरे जमवून आमचा हा पंथ वेदबाह्य नाहीं असें ठरविलें. स्वामीनारायण पंथांत मुसलमान लोक नाहींत. मोची, मांग, धेड आमच्या पंथांत आहेत कीं नाहींत माहीत नाहीं. हेमा रघू मोची भेंडीबाजार मुंबई हा माझा गुरुबंधु आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. आमच्या पंथांतील देवळांत सर्व जातीच्या लोकांनीं एकत्र प्रसाद घेण्याची वहिवाट नाहीं. मोची, मांग, धेड, हे स्वामीनारायणाच्या देवळांत येत नाहींत. प्रेमचंद इच्छाराम सावदेकर आमच्या पंथांतला आहे. हल्लीं हा पिराचें मकान बांधतो कीं नाहीं मला माहीत नाहीं. **सत्पंथी लोकांशीं आमच्या लोकांच्या पुष्कळ सोयरिका झालेल्या आहेत.** सीमंतपूजनाचे वेळीं मारुतीच्या देवळांत जाण्याची वहिवाट आहे. सीमंतपूजा नवरीचा बाप करतो. सत्पंथी लोकांच्या मुली आमच्याकडे दिलेल्या

आहेत. यांचें सीमंतपूजन मारुतीच्या देवळाखालीं बाहेर होतें. कोठें कोठें देऊळ नसल्यास खुल्या जागेंत होतें. सीमंतपूजनाचे वेळीं कांहीं सत्पंथी मारुतीच्या दर्शनास जात असतील, कांहीं जात नसतील. **सत्पंथी लोकांचें लग्न हिंदुधर्माप्रमाणेंच लागतें. सर्व रिवाज लग्नांतले हिंदुधर्माप्रमाणेंच आहेत.** आमच्या जातींत मानभाव पंथ आहे. हा पंथ हिंदुधर्मबाह्य आहे असें शंकराचार्याचें आज्ञापत्र आलें होतें, कीं नव्हतें लक्षांत नाहीं. **मानभावी पंथाचे लोक मुर्दे पुरतात.** यांची मुर्दे पुरण्याची पद्धत व सत्पंथ्यांची पद्धत एकच आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं.

फेरतपासणी:—स्वामी नारायणामध्यें मूर्तिपूजा आहे. मानभावांत श्रीकृष्णाची मूर्तिपूजा करतात. सत्पंथी लोकांत पूजेला मूर्ति नसते. जातीबद्दल ठराव करतांना शंकराचार्य किंवा शास्त्री पंडित यांचा आधार घेण्याची वहिवाट नाहीं. पंचायतीमध्यें लेखी जबान्या घेण्याची वहिवाट नाहीं. कुटुंबनायकाला वही नेतो असें मी तोंडीं कळविलें होतें. लग्नामध्यें आमच्या पद्धतीपेक्षां जास्त सत्पंथी कांहीं करतात किंवा नाहीं मला माहित नाहीं.

१२।१०।२३

Sd. **जी. एस्.राजाध्यक्ष,**
मॅ० वर्ग १ पूर्वभाग.

शिक्का


खरी नक्कल.
सही इंग्रजी.
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर २५

आरोपीतर्फे साक्षीदार नं. १३ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं,—माझें नांव सदू, बापाचें नांव नथू महाजन, धर्म हिंदु, जात लेवेपाटीदार उमर सुमारें ५७।५८ वर्षांची. धंदा शेती, रहाण्याचा गांव सांगवी बु॥ डिस्ट्रिक्ट पूर्व खानदेश.

सरतपासणीः—सारा ४५ रु. भरतों. मी भालोदच्या एका शेटकडे नोकर आहे. मी सुमारें ३॥ महिन्यांपूर्वीं अहमदाबादला गेलों. माझ्या मालकाचा मिलमध्यें भाग आहे म्हणून मी गेलों होतों. मी २।४ दिवस तेथें होतों. तेथें मि० बारजिभे वकील हे आले होते. ब्रह्मचारी बुवाच्या खटल्यासाठीं आले होते. मी पिराणा पाहिला आहे. मी, आरोपी व बारजिभे वकील यांच्या बरोबर पिराण्याला गेलों, तेथें बाबा सय्यद जातीचे मुसलमान हे भेटले. ते ह्मणाले, 'हें पिराणा संस्थान आमचें असून आह्मीच याचें मालक आहोंत.' मी ईमामशहा बोवाचा दर्गा पाहिला. दर्ग्यासमोर सैयद खानी रोजा आहे तो पाहिला. घुमट पाहिला. त्यांत पंजा व त्यावर एक जानवें पाहिलें. बाबा सय्यद ह्मणाले 'ब्राह्मणांनीं हा पंथ स्वीकारला व ईमामशहांनीं त्यांना काशी दाखविली. ह्मणून त्यांनीं जानवीं काढून ठेविलीं.' काका लोकांच्या कबरी मी पाहिल्या. त्या कबरींवर नांवें होतीं. आणखी तेथें कांहीं सत्पंथी मुसलमान लोकांच्या कबरी होत्या. त्यांचें स्वयंपाकघर पाहिलें. त्यांत डेगा मुसलमान लोकांप्रमाणें मोठमोठाल्या होत्या. उरुसाचे वेळेस प्रसाद देण्याकरितां



Ex. No. 25-B.




Ex. No. 25-C.




Ex. No. 25-D.



Ex. No. 25-E.



Ex. No. 25-E.



या डेगा आहेत असें मला तेथें कळलें. त्याच आवारांत मशीद आहे. वर सांगिलेलें सर्व एकाच आवारांत पण इमारती निरनिराळ्या आहेत. मी गेलों तेव्हां मशिदींत नमाज पढत होते. त्यांत कांहीं हिंदु कांहीं मुसलमान होते. पिराण्याला सत्पंथी लोक जातात. मला आतां दाखविला तो ईमामशाहाचा दरग्याचा फोटो आहे (Ex 25 A). दुसरा फोटो ईमामशहाच्या कबरेचा व त्यावरील कुराणाचा आहे (Ex. 25 B)· तिसरा फोटो सय्यदखानी रोझ्याचा फोटो आहे. (Ex. 25 C). चौथा फोटो पंजा, घुमट व जानवें आहे, त्या जागेचा फोटो आहे. (Ex. 25 D). पांचवा फोटो ईमामशहाच्या दरग्यासमोरील पटांगणांत ज्या कबरा आहेत त्या कबरांचा फोटो आहे (Ex. 25 E). सत्पंथ आमच्या जातींत मुसलमानी धर्म ठरला आहे. आमच्या जातींतला एखादा मनुष्य सत्पंथी आहे असें सांगेल तर त्याच्याशीं मी रोटीव्यवहार बेटीव्यवहार करणार नाहीं, असें संवत् १९६२ पासून ठरलें. अहमदाबादला सत्पंथी लेवा पाटीदार व बिन सत्पंथी लेवा पाटीदार असे लोक आहेत. या दोघांची पंगत तिकडे निरनिराळी होते. मी आतांपर्यंत ४।५ वेळां अहमदाबादला गेलों आहे.

उलट तपासणीः—मी अहमदाबादला बोत्रांच्या बरोबर गेलों नव्हतों. पिराण्याला जाण्याचा सर्व खर्च माझा मीच केला. त्यापूर्वीं मी पिराण्याला गेलों नव्हतो. वकिलांनीं बोलाविलें नसतें तर मी पिराण्याला गेलों असतो. माझा विचार होताच. मला नेलें तेव्हां साक्ष देणार आहेस, नीट पाहून ठेवा असें

सांगितलें नव्हतें. समन्स कोर्टापर्यंत माझी साक्ष होणार ही कल्पनाच मला नव्हती. हे फोटो मी काढावयाला लावले नाहींत. माझ्या समक्ष काढले नाहींत. वस्तुस्थितीपेक्षां या फोटोंत जर फरक केले असले तर ते मला सांगतां येणार नाहीं. Ex. 25 B मधील फोटोंत कांहीं भाग दिसला जाऊं नये म्हणून पडदा धरलेला मला दिसत नाहीं. हे फोटो आतांपर्यंत दाखविले नव्हते. जानवें मी पाहिलेलें आहे. Ex. 25 D मधील पंजाबराव दादूलाला कशाच्या सुताच्या माळा असतात तशा माळा नसून जानवीं आहेत हें मी सांगूं शकतो. त्याला एक एक गांठ आहे. जानवीं सुमारें एक मापाचेर आहेत. किती अंतरीत सांगतां येणार नाहीं. जानवें ४ पदराचें असतें. कांहीं जानवीं ४ पदराचीं व कांहीं ५ पदराचीं जानवींहि होतीं. कापसापासून जुनें सूत जानव्याचें आहे. काका लक्ष्मण करमली यांची साक्ष घेण्या-साठीं वकील आले आहेत, हें त्यांनींच—वकिलांनीच—सांगितलें. ही साक्ष होण्यापूर्वीच आम्ही मिळण्याला गेलों. ज्या दिवशीं आम्ही मीर-ज्याला गेलों त्याच दिवशीं साक्ष होणार होती. साक्ष झाली त्या दिवशीं सकाळीं आम्ही मिळण्याला होतों. फोटो त्या दिवशीं काढले नाहींत. किती दिवसांनीं काढले माहीत नाहीं. बाबा सय्यद यांनीं माहिती सांगितली ती मी लेखी घेतली नाहीं. वकिलांनींहि घेतली नाहीं. त्यांचें माझें बोलणें झालें तेव्हां वकील तेथेंच होते. माझ्या देखत ही जानवीं काढून घेतलीं असें बाबांनीं सांगितलें नाहीं. किती दिवसांची ही गोष्ट आहे. त्याचप्रमाणें संस्थान किती दिवसांचें आहे हें मी बाबांना विचारिलें नाहीं. काकाची साक्ष झाली तेव्हां मी कोर्टांत नव्हतों. मिळण्याहून वकील व मी १०—१०॥ ला कोर्टाकडेच परत

आलों. बाबा सय्यद आमच्याबरोबर अहमदाबादला आले नाहींत. मी नंतर अहमदाबादला २।४ दिवस राहिलों. त्या मुदतींत बाबाची व माझी भेट झाली नाहीं. संस्थानच्या उत्पन्नाच्या बाबतींत काका व बाबा यांच्यांत तंटा असल्याचें मला माहीत नाहीं. सत्पंथी लोकांच्या शाखा किती आहेत मला माहीत नाहीं. रेवे पाटीदार सत्पंथी हे आह्मी ईमामशाही शाखेचे आहोंत असें ह्मणतात. आणखी शाखा किती आहेत हें मी बाबा यांना विचारलें नाहीं. मला पिराण्याला अखंड घृतज्योत दिसली नाहीं. त्या ठिकाणीं ब्रह्मा, विष्णू, महेश यांचे कळस दिसले नाहींत. Ex 25 B मध्यें चवऱ्या मला दिसत नाहींत. काका लक्ष्मण करमसी पूजा करितात ती जागा मी पाहिली नाहीं. काका करमसीची जागा कोणती आहे अशी चौकशी मी केली नाहीं. त्या वेळीं काका तेथें नव्हते. मला उर्दू, गुजराथी वाचतां येत नाहीं. मी कुराणाला हात लाविला नाहीं. तें समोरच होतें. माझा वारकरी पंथ आहे. मानभाव पंथ नाहीं. वारकरी ह्मणजे माळकरी. **आमच्या गावांत मानभावपंथांतले आमच्या जातीचे लोक आहेत, ते प्रेतें पुरतात.** यांच्या स्मशानयात्रेला मी गेलों होतों. हे आमच्याप्रमाणेंच ह्मणजे उत्तरेस पाय व दक्षिणेस डोकें करून प्रेत पुरतात. **प्रेत कसें पुरतात असें मी कोणत्या धर्म-ग्रंथांत पाहिलें नाहीं.** वहिवाटीवरून माहीत आहे. बोर्वांच्या बचा-वासाठीं फंड काढल्याचें मला माहीत नाहीं. व मी ११ रुपये भरले नाहींत. मी खटला ऐकायला आलों नाहीं. तोताराम महाजनची साक्ष ऐकावयाला मी बंगल्यावर आलों नाहीं.

फेरतपासणी नाहीं.
१३।१०।२३

Sd. जी. एस्. राजाध्यक्ष
मॅ. वर्ग १ पूर्वभाग
खरी नक्कल
सही इंग्रजी
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

शिक्का

निशाणी नंबर २६

आरोपीतर्फे साक्षीदार नं. १४ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं:—माझें नांव गणू बापाचें नांव राघो, धर्म हिंदु, जात लेवेपाटीदार उमर, सुमारें ७० वर्षांची, धंदा शेती, रहाण्याचा गांव चिखली खु॥ डि० पू० खान्देश.

सरतपासणी:—सारा १०० रुपये भरतों. सत्पंथाबद्दल संवत् १९६२ सालीं ठराव झाला आहे व हा धर्म मुसलमानी ठरला आहे. या पंथांत जे लोक रहातील त्यांच्याशीं रोटीबेटीव्यवहार बंद केला आहे. हा ठराव वऱ्हाड खानदेश आमच्या जातीच्या सर्वांच्या एकमतानें पास झाला. संवत् १९६२ च्या आश्विन शु०२ च्या हिशेबावर मी सही केली आहे. मला आतां Ex. 24 A. वरील सही दाखविली ती माझीच आहे. माझे सोयरे राजोऱ्याचे आहेत.

राजोरें चिखलीहून एक मैलापेक्षां कमी आहे. राजोरेनजीकच माझें एक वावर आहे. राजोरें येथें माझें नेहेमीं जाणें येणें होतें. माझा सासरा १९६२ च्या अगोदर मेला. त्याच्या स्मशानयात्रेला मी गेलों, तेव्हां त्याचें प्रेत दक्षिणेस पाय, उत्तरेस डोकें व पश्चिमेस तोंड असें ठेविलें. धूप लावला व कानांत बोटें घालून नमाज पढले. माझा सासरा सत्पंथी होता. १९६२ च्या पूर्वीं सासरचे सर्व माणसें सत्पंथी होते. त्यांचा गुरु बहादरपूरचा मुसलमान येत होता. ते पिराणा, ईमामपूर व बहादरपूर येथील उरूस करीत असत. सासऱ्याची क्रिया ४० व्या दिवशीं झाली. फैजपूरच्या धर्मशाळेंत झाली. १०–११–१२ व्या दिवशीं क्रिया झाली नाहीं. माझ्या सासऱ्याचे घरांत १९६२ च्या पूर्वीं मूर्तिपूजा नव्हती. माझ्या घरीं मूर्ति आहेत. माझा सासरा एकादशी, शिवरात्र, असे उपवास करीत नव्हता. मुसलमानी रोजे करीत होता. श्रावण महिन्यांत आम्ही ब्राह्मणांना जेऊं घालतों. माझा सासरा फकीर जेऊं घालीत असे. माझा सासरा मरण्यास २० वर्षें झालीं असतील. ६२ च्या पंचायतीला १७।१८ वर्षें झालीं असतील. मी ६२ च्या पंचायतींत वरील सांगितलेली हकिगत कळविली होती.

उलट तपासणी:—माझा सासरा हिंदु होता. पण तो मुसलमानी पंथाचा होता. **मुसलमानी पंथाचा होता तरी तो माझ्या मतें हिंदूच होता.** मुलांची सुंता वगैरे करींत नव्हते. त्यांच्या शेंड्या कायम होत्या. दाढी ठेवीत नव्हते. मुसलमानाच्या मुलींशीं माझ्या सासऱ्याच्या पिढीनें कधीं सोयरीक केली नाहीं. सत्पंथ्यांपैकीं मुलगी आजपर्यंत मुसलमानाला दिली नाहीं. सासू मुसलमानाप्रमाणें

गोषा पाळीत नव्हती. बाया नमाज पढतांना कधीं पाहिल्या नाहींत. सासऱ्याला नमाज पढतांना पाहिलें आहे. ते ईमाशशहा, अबदुल हुसेन असे शब्द बोलत असत. भिका सवंदु माझे मेहुणे आहेत. ह्मणजे बहिणीचा नवरा आहे. याची मुलगी नाटू देवराम–तोतारामचा पुतण्या–याला दिली आहे. या लग्नाला किती दिवस झाले लक्षांत नाहीं. मी या लग्नांत जेवावयाला नव्हतों. वर्षें किती झालीं लक्षांत नाहीं. हें लग्न १९६२ च्या नंतर कां पूर्वीं झालें हें स्मरण नाहीं. खुशाल हरीची मुलगी माझ्या नातवाला दिलेली आहे. माझी बायको सत्पंथ्याची मुलगी हिला नमाज पढतांना मी कधीं पाहिलें नाहीं. रामजी लोटू बाह्मगोद-कर याची मुलगी आमच्या भाऊबंदाकडे दिलेली आहे. या लग्नाला ७ महिने झाले असतील. रामजी लोटू लग्नाच्या वेळीं सत्पंथी नव्हता. त्यानें सत्पंथ सोडला होता, लग्न झाल्यावर पुनः सत्पंथी झाला. ओंकार दुला रा० नसिराबाद यानें माझ्यावर दिवाणी कोर्टांत फिर्याद केली होती. फिर्यादीचें समन्स लागलें होतें. पण मी कोर्टांत गेलों नाहीं. भोरगांवच्या जातीवाल्यांनीं जातीबाहेर टाकलें ह्मणून त्यानें फिर्याद केली होती. त्याला पुनः पंचांनीं जातींत घेतलें, ही पंचायत ७८ सालीं झाली. **७८ सालीं तोताराम महाजन यांनीं सत्पंथ शंकराचार्याकडून तपासून घ्यावा असा अर्ज आणलेला भिकु सवंदुनें वाचला.** पण लांबून चांगलासा मला ऐकूं आला नाहीं. मी तपासाला पाठविण्याची जरूर नाहीं व शंकराचार्यांची आमच्या-पुढें किंमत नाहीं असें बोललों नाहीं. **मी ५।४ वर्षांचा असतांना माझें लग्न झालें असेल.** आजपर्यंत सत्पंथ्याशीं झालेल्या लग्नाला

मी कोठेंच गेलों नाहीं. मी साल्याच्या घरीं लग्नाला जात होतों त्यामुळें लग्न हिंदूप्रमाणें अगर मुसलमानाप्रमाणें झालें मला माहीत नाहीं.

फेरतपासणी नाहीं.

ता. १३।१०।२३

शिक्का.

Sd. **जी. एस्. राजाध्यक्ष,**
मॅ० वर्ग १ पूर्वभाग
खरी नक्कल
सही इंग्रजी.
मॅ० वर्ग १ पूर्वभाग.

निशाणी नंबर २७

आरोपीतर्फे साक्षीदार नं. १९ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं, माझें नांव अमीनोद्दीन बापाचें नांव अबदुल बसीद धर्म जात मुसलमान उमर सुमारें २९ वर्षांची धंदा डेप्युटी चिटणीस. रहाण्याचा गांव जळगांव डि० पूर्वखानदेश.

सर तपासणीः—ला ईलाही ईलील्ला महमद रसु उल्ला या वाक्याचा अर्थ ईश्वर जगांत एकाशिवाय कोणी नाहीं व महंमद त्याचा जासुद आहे. याला कलमा म्हणतात. कलमा म्हणजे शिकवण. हें कुराणांतलें आहे. बिसमिल्ला म्हणजे ईश्वराच्या नांवामध्यें असा अर्थ आहे.

Ex. 25 C. मधील फोटोंतील पहिली ओळ मुसा या शब्दापासून लिहिली आहे. दुसरे ओळींत ईनलल्ला या शब्दानें आहे. इनलल्ला म्हणजे There is God असा आहे. हें वाक्य कुराणांतलें आहे. कोणत्या भागांतलें आहे हें मात्र सांगतां येणार नाहीं.

Ex. 25 D मधील पंज्यावर कांहीं लिहिलेलें दिसत नाहीं. Impressions फक्त दिसतात.

Ex. 25 C. मधील फोटोंत 'तारीख रौजे मनोवर' लिहिलें आहे. याचा अर्थ थडग्याची तारीख असा आहे. दुसऱ्या ओळींत 'सय्यद ऊल मोरसलीन' असे 'हजरत मिय्यां नूरमहंमद' असे शब्द आहेत. 'हजरत मिय्या नूर महंमद'असें असावें.हे शब्द नीट उमटलेले नाहींत याच्यापुढें तारीख दिलेली आहे. सन ९२९ किंवा २२९ असावा.

Ex25A मधील फोटोंत कांहीं लिहिलेलें आहे असें मला वाटत नाहीं. अक्षरें दिसत नाहींत. सांगतां येत नाहीं. त्यावर कांहीं लिहिलें नाहीं असें वाटतें.

रसूल ह्मणजे जासूद, ईश्वरानें पाठविलेला असा अर्थ आहे.

उलट तपासणी:—मशिदींत कुराण ठेवितात. तें वर कोनाड्यांत साधारण ठेवितात. **पादुका कधीं मशिदींत ठेवीत नाहींत.** मशिदींत समया लावण्याची पद्धत खेड्यांतून कोठें कोठें आहे. **तुपाची समई लावीत नाहींत.** संस्थान वगैरेंसारख्या मोठ्या ठिकाणीं समया नसतात. पिरांच्या कबरेवर फुलांच्या माळा घालण्याची पद्धत आहे. (Ex 25 B) **मधील फोटोंत दोन माणसांनीं कांहीं तरी धरलेलें दिसतें.**

मशिदींत वनगाईच्या चवऱ्या कधीं ठेवीत नाहींत. (Ex 25 B) मध्यें चवरीसारखें कांहीं आहे कीं नाहीं सांगतां येत नाहीं. कांहीं तरी फेर आहे. **कुराण कबरीच्या पायथ्याशीं कधींहि ठेवीत नाहीं.**

फेरतपासणीः—मशीद व दरगा या निरनिराळ्या वस्तू आहेत. (Ex. 25 B) मधील पडदा आहे किंवा काय धरलेलें आहे हें मला सांगतां येणार नाहीं. तो मुद्दाम धरला आहे किंवा आहे तसाच पूर्वींचा आहे हें सांगतां येणार नाहीं. कुराण वाचावयाला कधींकधीं खालीं काढतात.

कोर्ट सवाल—**दरग्यांतसुद्धां कुराण** Ex 25 B **मध्यें दाखविलें त्या पोझिशनमध्यें कधीं ठेवीत नाहीं.** वाचावयाचे वेळेस फोटोंतील पोझिशनप्रमाणेंच कुराण ठेविलेलें असतें.

१५।१०।२३

Sd **जी. एस्. राजाध्यक्ष,**
मॅ० वर्ग १ पूर्वभाग

शिक्का

खरी नक्कल
सही इंग्रजी
मॅ० वर्ग १ पूर्वभाग

निशाणी नंबर २८

आरोपीतर्फे साक्षीदार नं० १६ याची जबानी.

मी यावरून प्रतिज्ञा करून सांगतों कीं:—माझें नांव जानकीराम, बापाचें नांव एकोबा, धर्म हिंदु, जात भावसार, उमर सुमारें ६० वर्षांची धंदा नोकरीचा, रहाण्याचा गांव पारोळें, डिस्ट्रिक्ट पूर्व खानदेश.

सर तपासणी:—समन्सांत लिहिल्याप्रमाणें कागद आणिले आहेत. हे कागद मी भावसारपैकीं प्रमुख असून कागद सांभाळणेचें काम माझेकडे नेमलें आहे ह्मणून मी सांभाळतों. आमच्या जातींत सत्पंथी लोक कांहीं आहेत. त्या लोकांना आह्मी धर्मी आणि अधर्मी समजतों. स्वतःला आह्मी कर्मी ह्मणवितों. आमच्या जातीचीं घरें खानदेशांत १५००।२००० असतील. (भावसार रंगारी). सत्पंथी धर्म मुसलमानी आहे. या लोकांची एके ठिकाणीं जमण्याची जागा असते. तिला धर्मशाळा ह्मणतात. फैजपूरला आतां आमच्या जातीचे लोक नाहींत. पूर्वी होते. ४० वर्षांपूर्वी ४०।४५ घर होतें. सत्पंथी सर्व जातीचे धर्मशाळेंत गोळा होतात. फैजपूर सत्पंथी रंगाऱ्यांच्या फैजपूर व बहादरपूर अशा २ धर्मशाळा होत्या. मी फौजदारी खटला नं. ६७ सन १८८३ मधील जजमेंटची नक्कल हजर करितों. मॅ० वर्ग १ यांचे कोर्टांतील हा ठराव आहे.

मी २ समापत्र आणिले आहेत. रंगारी जातीचे हें समापत्र आहेत. आमच्या जातींत सत्पंथी व बिनसत्पंथी यांचेमध्यें ४० वर्षांपासून रोटीबेटीव्यवहार नाहीं.

उलटतपासणीः—पंचायत सन १८८३ मध्यें झाली. त्यावेळीं मी २० वर्षांचा होतों. त्यावेळीं माझे वडील कारभार पहात होते. मला स्वतःला प्रत्यक्ष माहिती नाहीं. मी किंवा माझे वडील सत्पंथी नव्हते. **सत्पंथी लोकांच्या किती शाखा आहेत याची मला माहिति नाहीं.** धर्मी अधर्मी लोक शेंडी ठेवीत होते. मुलांची सुंता करीत नसत. आमच्या जातींतील सत्पंथी लोकांच्या गुरूंनीं सन १८८३ सालांत बेअब्रूची फिर्याद केली होती कीं नव्हती मला माहीत नाहीं. रामचंद नथू भावसार मागून सत्पंथी झाला कीं नाहीं मला माहीत नाहीं. गुलाबचंद रुपचंद हा सत्पंथी होता. त्याला आमच्या जातींत पावन करून घेतलें. लग्नापूर्वीं ५।७ वर्षें त्याला जातींत घेतलें. व मग त्याला मुलगी दिली. मुलीच्या लग्नाला १५।२० वर्षें झालीं. माझ्या मुलीच्या शेजारींच शिवलाल शेट रहातात. ते अद्याप धर्मी अधर्मीच आहेत. त्यांचेकडे मी जेवावयाला गेलों नाहीं. पारोळ्याला मोमीन आहेत. त्यांना शेंडी नसते. दाढी असते. धर्मी लोकांचा मुसलमानांशीं खाणेंपिणें वगैरे संबंध नसतो. **धर्मी लोकांत मांस खाण्याची बंदी आहे.** धर्मी लोक गोमांस खातात कीं नाहीं माहीत नाहीं. समन्सापूर्वीं होळू रंगारी बोवांचा शिष्य आला नव्हता. मला स्वतःचें घर शेती वाडी नाहीं. कर्ज कोणाचेंहि नाहीं. कर्ज पाव आणाही नाहीं. **वेडू उखा भावसार यानें मला दिवाणी कोर्टाचें कैदी वारंट काढलें होतें.** पण मी ४० रु. लागलीच देऊन टाकले. दगडू कर्मी ओळखीचा आहे. **भिका शेट सत्पंथी यांनां २ वर्षां-पूर्वीं आम्ही जातींत घेतलें. नंतर त्याच्या मुलाशीं दगडूचें लग्न झालें.** किसन लालचंद माहितीचा नाहीं. मोतिलाल शेट शहादेकर ओळखीचे आहेत. २ वर्षांपूर्वीं मोतिलाल शेटच्या मुलीशीं किसनचें लग्न

झालें कीं नाहीं आणि यापैकीं कर्मी कोण हें मला माहिती नाहीं. Ex. 9 A चें हँडबिल मी वाचलेलें नाहीं.

फेरतपासणीः— कैदी वारंट वेड्ड याचें निघण्याला ३ वर्षें होऊन गेलीं.

SD. **जी. एस्. राजाध्यक्ष.**
मॅ. वर्ग १ पूर्वभाग

शिक्का

खरी नकल
सही इंग्रजी,
मॅ. वर्ग १ पूर्वभाग.

JUDGEMENT.

In the Court of Mr. G. S. Rajadhyaksha, Magistrate First Class and Sub-Divisional Magistrate E. D., East Khandesh.

Case No. 12 of 1923.

Emperor.

Vs.

Atmanand Guru Premanand Brahmachari of Faizpur.

Section 500 I. P. Code.

The accused has been charged with having committed an offence under Section 500 of the Indian Penal Code in as much as he published and uttered some imputations against Satpanthi caste in general and the complainant Ananda Kiranga in particular. The first two statements mentioned in the charge are contained in Ex. 1-A which the accused is alleged to have published. The other three statements are alleged to have been made by the accused on 20th December 1922 in the course of a certain series of lectures delivered by the accused in the Faizpur Bazar.

The story for the prosecution is as follows :—The complainant and others belonging to his sect are Kunbis usually called Leva Patidars. As such they are Hindus. There are various sects among the Kunbis—Manbhav, Swaminarayan, Satpanth and others. The complainant and others of his creed belong to Satpanth. There are four or five sub-sects of Satpanth, but these are immaterial for the purpose of the present case. This Satpanth was founded by one Imamshah who lived in Ahmedabad District at Giramthi village. It is believed that owing

to some miraculous powers exhibited by Imamshah various Hindus adopted him as their Guru but never forsook their former Hindu religion. Imamshahi sub sect is one of the subsects of Satpanth. The head of this particular branch of Satpanth is a Leva patidar called Kaka Laxman Karamsi the decendant of Imamshah having no claim to be the religious head of Satpanth. The head seat of this Panth is at Pirana in Ahmedabad District.

It is concended by the prosecution that although the complainant and the people of his sect admit the founder of the sect to be a Mehomedan and pay homage to him, still they are Hindus in all essential particulars. As such there used to be interdining and inter-marriages between Leva Patidars of this Panth and those of other Panthas. On 22nd of November the accused published pamphlet Ex. 1—A. Later on, in the 20th of December, the accused, accompanied with some tom-toming paraded through the streets of Faizpur. It was a Bazar day. He stopped at certain places viz.

(1) In front of the complainant's house.
(2) Near the house of Shivdin Kalal.
(3) Near Totaram Badhu's house.
(4) Near Hajarya.
(5) In front of Shamji Bhate's house.

In every place he called upon the followers of Hindu religion to save the Hinduism, said that the Satpanthis were Mahomedans and that they ate cow's flesh and that he was out to protect cows and that it was against Hindu religion to inter-dine or inter-marry with Satpanthis. When he was in front of the complainant's house, and saw the complainant sitting on the steps of his house, he said " This Ananda is a Satpanthi, he eats cow's flesh". Three days later there was caste Panchayat at Padalsa, where

the Satpanthis were decided to be outside Hinduism. Since then all betrothals have been broken, the Satpanthis have been boy-cotted. The publication of the pamphlet Exh 1—A and the lectures delivered at Faizpur on 20th December 1922 have given the cause for action.

The accused admits that he published Ex. 1—A and therefore admits the responsibility for making the first two allegations mentioned in the charge. As regards the other three allegations, the line of defence taken is extraordinary in a criminal case—so far as can be judged from the defence evidence. Apparently the first contention is :—

1. The complainant was not present that day in the bazar at all.
2. If he was present, he was at his own house and not where he is alleged to have sat, as it is not his house at all.
3. Even if it is assumed that he was present there, the accused delivered no lecture, as he was in his Math.
4. If it is proved that the complainant was present and the lectures were delivered, whatever the accused said was truth and for the public good therefore Exception 1 applied.
5. If it was held that it was not true, the accused honestly believed it be so and said it in good faith as the head of the caste therefore Exceptions 7 and 9 applied.

The statements are pure defamatory and the following points arise for decision :—

1. Did the accused publish the statements in Ex. 1—A and utter words as detailed in charge during the course of lectures ?
2. If so, have his actions proved to come within

any of the exceptions to Section 499 I. P. Code ?

3. If they do, is the privilege waived or lost by any unjustifiable publication ?

I decide the points as follows :—

1. Yes.
2. No.
3. The publication was unjustifiable.

My reasons are as follows :—

I. The publication of Ex. 1—A is admitted by the accused so nothing requires to be proved about it. The accused has put forward a curious defence about the delivery of lectures. There is nothing to prevent the accused from putting forward one defence, which goes contrary to his other defences, but it must be admitted that putting forward of such defences weakens the whole case for the accused.

I hold that the accused did give lectures that day in the Bazar. I do not think that the delivery of the lectures in front of Hajirya's house is proved. The complainant says he was informed of it by Fakira. Fakira Ex. 5 denies it. Bhura Ex. 4 says that he never heard Fakira tell the complainant about the lecture in front of the house of Hajirya. Thus I cannot hold that delivery of lecture near Hajirya is proved. I think the giving of lectures in other places is fairly well established. The persons who come to depose to this have not the slightest interest why they should come and tell in favour of the complainant and against the accused. Bhura Ex. 4 though a Hindu belongs to Shri-ram panth. Fakirkhan is a Mahomedan. Totaram Badhu though belonging to Satpanth is a man of position and respectability. He is the Vice President of Faizpur Municipality and I can accept his statement as regards the delivery of lectures.

All these witnesses differ slightly as to the exact words uttered but they are all agreed that the accused did call the complainant and his caste men—"Momnas" and translated it as meaning "Mahomedans" said that the Satpanthis were cow-eaters and that he was out to protect cows.

The attempt to challenge this evidence is made in various ways.

I. The house where the complainant is alleged to have stood is some-body-else's house, this is sought to be proved from the evidence of the Circle Inspector who has shown the house as belonging to Girdhar. The Circle Inspector admits that the complainant did tell him that he always lived with Girdhar, but he has noted this fact in the map he has drawn. He says he was certain the house belonged to Girdhar, still he made inquiries. This is suspicious The Circle Inspector belongs to the same caste as that of the accused and has an interest in protecting it. But even if it is granted that the house belonged to Girdhar all that we are concerned here is whether the complainant was there or not; the evidence of the prosecution in this respect is not impugned by that of the Circle Inspector.

II. It is further alleged that the complainant could not be there as he was away at that time with some-body else. The evidence on this point is that of Ex. 16 and Ex. 18. Ex. 16 Nathu Jairam alleges that he and the complainant were partners in wood business and that on the day in question they went out about 10 a.m. and returned about 5 p. m. after collecting their dues. Among the persons from whom the money is alleged to have been

collected is Narayan Supdu Exh. 18 who deposes that the two persons came to him for collecting money about 12 noon. As the lecture is alleged to have been delivered by the accused then the complainant could not be present where he is alleged to have been. Firstly both these witnesses are Reva Patidars and among the persons who have out-casted the complainant and his sect and therefore interested in giving evidence against the comlainant. Further Ex. 16 states that they collected money from 4 people only and it is ridiculous to suppose that this collection from four persons in a small village requires 7 hours. The explanation is that they sat in each place for some time; even then that does not account for seven hours. Again neither have produced accounts to show that Exh. 16 collected and Exh. 18 paid the money on that day. Further more it appears curious that both these witnesses should remember this particular transaction when they have hundreds to deal with every years. The only way in which these witnesses could remember the transaction would be by reference to some accounts. But as these witnesses deny that they ever consulted accounts and say that they remember it from memory and also that they had no intimation till they came to the Court as to what they were going to depose about, I must conclude that the witnesses are not telling the truth.

III. The third attempt to challenge evidence on this point is to prove that the accused was not in the bazar at all, but in the Math all day. The witnesses on this point are Exh. 15 Ananda, Exh. 17 Nathu Vithoba, Exh. 19 Madhav Khandu, Exh. 20

Tukaram Asaram, Exh. 21 Khandu Motiram. First three of these witnesses state that they were in the bazar about the time when the accused is alleged to have given the lecture and that they never heard any lecture being given. Thus there are three or four prosecution witnesses who state that the accused came and gave the lecture. While three defence witnesses state there never was any lecture. The question is how ought to be believed ? I have little hesitation in accepting evidence for the prosecution as true. In the first place I think I should take allowance for caste bias. All the defence witnesses are of the caste of the accused while the prosecution witnesses are from various religions. Again there is the maxim that when certain witnesses come and depose to a certain incident occuring and others also come forward and give a negative evidence to the effect that if that incident had occurred they would have noticed it, more credance should be attached to the former rather than the latter. Further there is very little to show why the witnesses remember this particular occasion when nothing unusual occurred on that date. One can understand prosecution witnesses saying that they heard that the accused gave lectures, as if it did occur at all, it was an unusual incident; but one finds it difficult to realize why witnesses who have purely negative evidence to give should remember a particular Wednesday, on which according to their version nothing particular occurred. These remarks also apply to the evidence of Exh. 19.

Then come the next two witnesses who state that

on that particular day—Poush Pratipada as Exh 20 states there was a dinner in accused's Math in honour of Exh. 20 having made the accused Guru and Exh. 21 Khandu Motiram attended the dinner. I believe Exh. 20 is a tutored witness. He is a witness who has learnt upto English VI standard. One could reasonably expect him to give the English date as to when his father died and when he made the accused his Guru. As it is, he states, the date of his leaving school, the date of the death of his father and the date of making the accused his Guru in Vernacular. Being a desciple of the Guru he is obviously interested in protecting his Guru. The other witness is also interested in the accused, as shown by the fact that certain photographs obtained for the purposes of this case were sent by V. P. P. to the witness, though ordered by the accused.

Thus considering all the evidence I have come to the clear conclusion that the accused did diliver the lecture and uttered the words idcluded in the charge.

II. Now I come to the second point and consider whether the words of the accused can be covered by one of the exception to Section 499 I. P. Code.

In all cases where the matter is defamatory in its nature the onus of proving truth of the statement or at least that he had reasonable ground for believing it to be true and was actuated in making such statement not by malicious motives but by intelligent zeal for the public interest, so as to show that the imputation was made in good faith, lies on the person making the statement. Section 105 of the Indian Evidence Act also lays on the accused the

burden of proving that his action comes within one of the exceptions. This principle is not modified by the judgement of Mr. Justice Ranade in 24 Bombay 13. It is laid down that if the parties have a duty in the matter, the occasion is lawful and when on such occasions the right is properly exercised, the good faith is to be presumed and the complainant must establish malice. In this case I think this dictum does not apply. Even assuming that the party had a duty in the matter, the occasion was not lawful. The proper occasion for the utterance was the Panchayat as was the case in reference quoted. Again the right was not properly exercised in as much as the other party had no occasion to rebut it at the time. The occasion not being lawful and the right not having been properly exercised, the onus of proving truth or good faith lies on the accused.

The statement in order to come under exception one must be true and for the public good. Let me examine the first of these propositions.

I shall summarise the points in the defence evidence and see if the points there established, rebut any of the allegations in the charge as substantiated by prosecution evidence.

The defence evidence is to the following effect. The question whether the Satpanth is Mahomedan sect or not arose in Sanvat 1962 when it was decided in a Panchayat that the Satpanth was outside Vedic religion. After that people gave up the Panth or practised it on the sly. Then one Badhu Mahajan joined the Dharmashala of the Panth for which act he was fined 2136 rupees. Then in Sanvat 1975 some people openly took up the Panth and others followed suit. They were boy-cotted and then again there was a Panchayat last December when they were

again boycotted. It is further alleged that some of the practices of the Satpanthis are allied to Mahomedan practices—they bury the dead the wrong way, they observe Ramzan and Mahomedan fasts. They do Namaz, they observe the 40th day after the death of a relative. They visit Pirana which is the Mahomedan shrine. They utter Kalmas from Kuran. These are the defence contentions.

The first item in the charge is obviously false statement on the part of the accused. It is clear from both the prosecution and defence evidence that marriage did use to take place till last year. That there was inter-dinning. Bhika Patil the Kutumb Naik of the Reva Patidars is himself related to Totaram Badhu a Satpanthi (Exh. 24). Further according to the defence the Satpanthis were under banner continuously since 1962. But some of the defence witnesses (24, 25 and others) admit relationship with Satpanthis. Further if there were no inter-marriages and inter-dinning, what was the object of the accused in carrying on the propoganda. Ex. 14 states that he was a Satpanthi on the sly for 12 years. This is ridiculous. He says everybody was a Satpauthi on the sly then, but their inter-marriages did use to take place. It is difficult to be Satpanthi on the sly when according to defence the principle ways of showing that one is Satpanthi is by observing Mahomedan fast, going to Dharmashala etc. This could be easily noticed. Even the defence witnesses do not state that Satpanthis eat cow's flesh. Ex. 14 even says that he has dined when he was a Satpanthi with Mahomedan but never ate cow's flesh. This statement to a Hindu is highly defamatory and the truth of this allegation has not been established by the defence. The mental attitude of the accused in this respect is shown by his letter to Totaram Badhu in which he says that Satpanthis eat cow's

flesh. If he thought this, it is not surprising if he said this in open without having any justification.

The other three allegations I shall deal in a general discussion whether the Satpanthi are Hindus or not. Here I must refer to the evidence of Kaka Laxman Karamshi the head of the Satpanthis. His evidence was taken on commission. He says that Satpanthis are Hindus. They do not follow Kouran. They do not practice circumcision or Namaz. They belive in Vedas, Puranas and Ramayan. Their respected books are Shikshapatri, Mulbandh, and Guruwani. The form of worship and marriage are those of Hindus. Some bury and some cremate the dead. They observe fasts of Ekadashi and believe in 10 Awatars. They do not eat cows made of flour. They do not fast at Ramzan.

The question of what is a Hindu is discussed at some length in 31 Cal. 12. Some of the observations made in there are relavant. "Hindu religion is marveleously catholic and elastic. Its theology is marked by electicism and tolerance and unlimited freedom of private worship. Its social code is much more stringent, but amongst its different castes and sections exhibits wide diversity of practice. No trait is more marked of a Hindu Society than its terror of using meat of a cow. Yet Chamars who profess Hinduism eat beef and are included within its pale however low. It is easier to say who are not Hindus".

Thus certain difference as regards actual practice do not make one cease to be a Hindu, whether a deadbody is buried or cremated, if it is buried in the Hindu fashion or other fashion is immaterial. "There is extreme tolerance in matters of pure belief, Profession of Brahmoism whos customs differ from those of arthodox Hinduism does not

make a man cease to be a Hindu unless he abjures social rules of a Hindu and declares himself not to be a Hindu.'' If a Hindu admires principles of Christianity and attend Church, does he cease to be a Hindu—does his personal law cease to be binding without Baptism; No."

Observing Ramzan fasts does not make one a Mahomedan. I believe the principle test would be belief in Kuran. This is expressly denied by Kaka Karamsi. One witness for the defence (Ex. 14) states that he used to follow Kuran when he was a Satpanthi—but one of the sayings he learnt from the Kuran was "Toba Toba" which is ridiculous. Another defence witness (Ex. 23) states if the Satpanthis give up observing Rozas and the method of burying the dead then there would be no difference between Satpanthis and other Hindus. If this is the only diffice it would not expel a man from Hinduism. The form of marriage according to the witness (Ex. 24) between Satpanthis are those of Hindus. Several of the defence witnesses and their relatives have married into Satpanthi families.

Pirana photographs of which are produced by Ex. 25 is a tomb of Imamshah. Imamshah was a Mahomedan so he was buried as such and buildings erected in his honour are Mahomedan buildings. Satpanthis have reverence for Imamshah personally but that does not mean they become Mahomedan automatically. Kabir was a Mahomedan saint respected by Hindus, Hindus did not become Mahomedans thereby. Further there is some doubt if the photographs are genuine. They were not taken in the presence of the witness Ex. 25. Kuran is placed at the foot of the tomb—a position which Ex. 27—the Deputy Chitnis says is contrary to Mahomedan religion. Ex. 25-B also shows two boys holding a curtain behind. The

Quran / Kuran

precise significance of this is not known—perhaps to hide certain parts or perhaps it may be to screen away the light.

Thus on all this evidence I cannot come to the conclusion that the Satpanthis are not Hidus or that they are Mohomedans. This being decided all the allegations become defamatory. As truth is not established the question whether it is for public good or not does not arise.

Now I come to Exceptions 7 and 9. The point to be decided is about good faith. Exception 7 requires that the person making the imputation had lawful authority. With what authority is the accused vested? He has come to Faizpur only a year or so ago. It is not proved by the defence that he is as it were the Shankaracharya of the Leva Kunbis. It is not proved that the interest of Hinduism were in his keeping. In 22 Cal. 46, where defence under exception 7 was admitted, it was clear that it was a custom of the Guru as the spiritual guide of the caste to decide disputes of the kind in question and the statements contained in the *Letter* had been made in good faith for social and spiritual interests of the community of which the accused was the Guru and the censure was justified by the authority with which the accused was vested as spiritual head of the community. As no such authority can be traced in this case I hold that exception 7 does not apply. Further exception 7 requires good faith, a proposition which I shall presently discuss.

The essence of exception 9 is the proof of good faith. Good faith has been defined in 4 Cal. 124 as "due care and attention." What is the defence evidence in support of "good faith". All the witnesses on this point state that they never had any talk with the accused on this point. Therefore it is to be presumed that the accused

knew the history of the Satpanth when he made the statement. Until the last Panchayat, inter-dining and inter-marrying was common. If it was otherwise there would have been no necessity of the Panchayat decreeing a boycott. If this was so who came and told the accused that there was no inter-dining and inter-marriage. The Satpanthis may be observing certain customs which savour of Mahomedanism. They read Shikshapatri etc., But does that justify the accused in saying that the complainant and the Satpanthis are Mahomedans ? Or that they follow religion as laid down in Kuran ? Does jumping to this conclusion disclose due care and attention ? As regards the eating of cow's flesh, there is not a shred of evidence on which the good faith could be founded. The pleader in his argument stated that the accused believed the complainant was a Mahomedan and therefore inferred that he must be eating cow's flesh. This is not due care and attention."

I have been asked to refer to the Gazetteers of Gujarath (B G. Vol. IX part 1). It is doubtful whether it is admissible in evidence. But even here the statements are not such as to warrant sweeping assertions in the charge. It is noted that they observe Ramzan fast and utter Kalmas. But it is also stated therein they observe Hindu holidays of Holi, Akshatritiya Diwali. It is also noted therein that they follow the fourth Veea (Atharva). Their secred book is said to be not Kuran but Shikshapatri, The Gazetteer of Ahmedabad (pages 288 290) says that none of the Satpanthis are Mahomedans and they observe Hindu holidays, obey caste rules, read their own religious books,—except that there reverence for Imamshah leads them after burning their dead to bury the bones at Pirana. they are like other Hindus. Their common prayer is "Shivoham"—I am Shiva (a Hindu God) and Kakas say

Imam Kevalah I am Imam, They consider Imamshah only as a religious teacher."

Another book to which I am referred by the Learned pleader for the defence is "Tribes and castes of Bombay Vol. II page 155. That also states that the Momna Kunbis do not associate with Mahomedans, eat no flesh, do not circumcise, say no five daily prayers and do *not* keep Ramzan fast". It further goes on to say that "the tendency among Momna Kunbis is not to be called Mahomedans even in name. They style themselves as Leva Patidars and except for a few touch of their religion which are Mahomedans—are in all respects Hindus. Further "Momnas profess a religion which is neither strictly a Hindu or Musalman but they are very particular about being called Hindus." Well this leaves the subject if the accused did ever read this before making his statements at least doubtful. Dogmatising from such doubtful information and dub a particular sect as being Mahomedans and eater of cow-flesh is very far from exercising due care and attention. Thus from the information the accused had then he had not any plansible ground for making the allegation such as would entitle him to the protection of exceptions 7 and 9. Thus I have come to the conclusion that the accused has made defamatory statement and is not protected by any of the exception to Section 499 I. Pe Code.

III. This being so the further question whether the privilege has been exceeded or not does not arise. But I discuss it here because that is another ground why I convict the accused even if it is held that the words were privileged. It has been held that defamatory communication which is previleged should be limited to the people concerned. In 3 B. L. R. page 158 it was laid down "that even if the allegation was for the benefit of the portion of the

public, there would be no privilege if the fact was disseminated to a circle of readers other than those who can possibly be interested in the facts communicated". In 6 Madras 381 the same principle was adopted. In 19 Bom. 703, every ingredient of privilege was present but it was vitiated by excessive and undue publication. Similarly in the present case if the accused had made the allegation in the Panchayat and if they had been held to fall under one of the exception, the privilege would have been complete but here the allegation came to the notice of persons not interested e. g. Mahomedans and others. The Learned pleader for the defence said that it was a bazar day and as people from various villages had come to Faizpur it was appropriate that the lecture was given in the bazar. But the proper way to collect people was to hold a Panchayat of the caste men. In fact one was to be held a few days later. Under such circumstances, the privilege, if it had existed, would certainly be held to have been abused and this is another reason why I convict the accused under Section 500 Indian Penal Code.

Sentence :—I do not think a sentence of imprisonment is called for. **The accused is sentenced to a fine of Rs. 500 in default to undergo simple imprisonment for three months.** The accused is allowed 10 days within which the fine should be paid.

15th November 1923 (Sd.) G. S. RAJADHYAKSHA.
Magistrate I Class and Sub Divisional
Magistrate E. D. East Khandesh.

Seal

True copy,
(Sd.) G. S. RAJADHYAKSHA,
Magistrate I Class E. D. East
Khandesh.

जळगांव कोर्टांतील जज्‌मेंटचें मराठी भाषांतर.

मेहेरबान जी. एस्. राजाध्यक्ष, मॅजिस्ट्रेट वर्ग १ व प्रांत मॅजिस्ट्रेट पूर्वभाग खानदेश यांचे कोर्टांत.

खटला नंबर १२ सन १९२३.

सरकार

विरुद्ध

आत्मानंद गुरु प्रेमानंद ब्रह्मचारी वस्ती फैजपूर.

कलम ५०० इं. पी. कोड.

आरोपीनें सत्पंथी जातीविरुद्ध सामान्यतः व विशेषतः फिर्यादी आनंदा किरंगा याचेविरुद्ध कांहीं निंदास्पद शब्द उच्चारले व छापून प्रसिद्ध केले ह्मणून इं. पी. कोड कलम ५०० प्रमाणें गुन्हा केल्याचा आरोप आरोपी याजवर ठेवण्यांत आला आहे. आरोपांत म्हटलेलीं पहिलीं दोन विधानें जीं आरोपीनें छापून प्रसिद्ध केलीं असें ह्मटलें आहे तीं निशाणी १ अ यांत आहेत. दुसरीं तीन विधानें आरोपीनें फजपूर बाजारांत तारीख २० डिसेंबर १९२२ रोजीं दिलेल्या कांहीं व्याख्यानांतून केलेलीं आहेत.

फिर्यादपक्षाचें म्हणणें आहे तें असें:—फिर्यादी व त्याचे पंथाचे इतर लोक हे लेवा पाटीदार या नांवानें नेहमीं संबोधिले जाणारे कुणबी आहेत. या दृष्टीनें ते हिंदू आहेत. कुणब्यांत निरनिराळे पंथ आहेत. ते असेः—मानभाव, स्वामीनारायण,सत्पंथ व इतर. फिर्यादी व त्याचे पंथाचे इतर लोक सत्पंथी आहेत. सत्पंथाचे चार, पांच उपपंथ आहेत. परंतु ते या खटल्याचे कामीं महत्त्वाचे नाहींत. हा सत्पंथ

अहमदाबाद जिल्ह्यांतील गिरमथी खेड्यांत रहाणाऱ्या ईमामशहा नांवाचे इसमाकडून स्थापन केला गेला. असें समजतात कीं ईमामशहानें कांहीं अलौकिक शक्ती दाखविल्यामुळें पुष्कळ हिंदूंनीं त्यांनां गुरु केले. परंतु त्यांचा पूर्वीचा हिंदुधर्म सोडला नाहीं. सत्पंथाचा एक उपपंथ ईमामशाही हा आहे. सत्पंथाच्या या विशिष्ट शाखेचा मुख्य काका लक्ष्मण करमसी नांवाचा लेवा पाटीदार आहे. कारण ईमामशहाचे वारसास सत्पंथाचा धर्मगुरु होण्याचा हक्क नव्हता. या पंथाचें आद्यपीठ अहमदाबाद जिल्ह्यांत पिराणा येथें आहे.

फिर्यादपक्षाचें असें ह्मणणें आहे कीं, जरी फिर्यादी व त्याचे पक्षाचे लोक आमचा पंथ स्थापन करणारा मुसलमान आहे व त्यास आम्हीं मान देतों असें कबूल करतात तरी ते सर्व महत्वाचे बाबींत हिंदूच आहेत. या दृष्टीनें या पंथाचे लेवा पाटीदार व इतर पंथाचे लेवा पाटीदार यांचे दरम्यान रोटी व बेटी व्यवहार होत असत. नोव्हेंबर महिन्याचे २२ तारखेस आरोपीनें निा १ अ चें पत्रक प्रसिद्ध केलें. पुढें २० डिसेंबर रोजीं फैजपूरचे रस्त्यांतून काढलेल्या मिरवणुकीचे बरोबर आरोपी होता. तो बाजाराचा दिवस होता. तो कित्येक ठिकाणीं उभा राहिला. तीं ठिकाणें येणेंप्रमाणें:—

(१) फिर्यादीचे घरासमोर.
(२) शिवदीन कलालाचे घराजवळ.
(३) तोताराम बधूचे घराजवळ.
(४) हजिऱ्याजवळ.
(५) शामजी भाटे यांचे घरासमोर.

प्रत्येक जागीं त्यानें हिंदुधर्मांचे अनुयायांस हिंदुधर्माचें रक्षण करण्यास बोलाविलें व ह्मटलें कीं, सत्पंथी मुसलमान आहेत. ते गाईचें मांस खातात. मी गाईचें रक्षण करण्याकरितां आलों आहे. सत्पंथी लोकांशीं रोटी व बेटीव्यवहार करणें हें हिंदुधर्माचें विरुद्ध आहे असें म्हटलें. जेव्हां आरोपी फिर्यादीचे घरासमोर आला व फिर्यादीस त्याचे घराचे पायऱ्यांवर बसलेला पाहिला, तेव्हां तो ह्मणाला, "हा आनंदा सत्पंथी आहे. तो गाईचें मांस खातो." तीन दिवसांनतर पाडळसें येथें जातपंचायत झाली. तेथें सत्पंथी हे हिंदुधर्माचे बाहेर आहेत असें ठरविण्यांत आलें. तेव्हांपासून सर्व सगाई मोडल्या गेल्या व सत्पंथी लोकांस जातीचें बाहेर टाकण्यांत आलें. निा १ अ चें पत्रकाची प्रसिद्धी व तारीख २० डिसेंबर १९२२ रोजीं फैजपूरला दिलेलीं व्याख्यानें हीं फिर्याद करण्यास कारणीभूत झालीं आहेत.

निा १ अ प्रसिद्ध केल्याचें व ह्मणून आरोपांत म्हटलेलीं पहिलीं दोन निंदास्पद विधानें केल्याबद्दलची जबाबदारी आरोपी कबूल करतो. दुसऱ्या तीन निंदास्पद विधानांबद्दल स्वीकारलेला बचावाचा मार्ग, आरोपीपक्षाचे पुराव्यावरून पहातां, फौजदारी खटल्यांत विलक्षण आहे. पहिलें ह्मणणें दिसतें तें असें:—

(१) फिर्यादी त्या दिवशीं बाजारांत हजरच नव्हता.

(२) हजर असला तर तो त्याचे स्वतःचे घरीं होता. व जेथें तो बसला होता असें ह्मटलें आहे तें घर त्याचें नसल्यामुळें तो तेथें नव्हता.

(३) जरी असें गृहीत धरलें कीं तो तेथें होता तरीसुद्धां आरोपीनें मुळींच व्याख्यान दिलें नाहीं. कारण तो त्याचे मठांत होता.

(४) जर असें सिद्ध करण्यांत आलें कीं, फिर्यादी हजर होता व व्याख्यानें दिलीं गेलीं तर जें जें आरोपी बोलला तें तें सत्य होतें व सार्वजनिक हिताकरितां होतें. ह्मणून अपवाद १ लागू होतो.

(५) जर असें धरलें कीं, तें सत्य नव्हतें तर तें सत्य आहे अशी आरोपीची प्रामाणिक समजूत होती व जातीचा पुढारी ह्मणून सरळपणानें तो तें बोलला. ह्मणून अपवाद ७ व ९ लागू होतात.

तीं विधानें स्पष्टपणें अब्रुनुकसानकारक आहेत. व पुढील प्रमाणें मुद्दे निवाड्यासाठीं निघतातः—

(१) आरोपीनें निा १ अ यांतील विधानें प्रसिद्ध केलीं काय व आरोपांत विस्तृतपणें ह्मटल्याप्रमाणें शब्द व्याख्यानांत उच्चारले काय ?

(२) जर असें असेल तर त्याचीं कृत्यें इं. पी. कोड कलम ४९९ च्या अपवादापैकीं कोणत्याहि अपवादांत येतात काय ?

(३) जर तीं येत असतील तर तो हक्क सोडून दिला आहे काय अथवा अयोग्य प्रसिद्धीमुळें गेला आहे काय ?

मी पुढीलप्रमाणें मुद्यांचा निकाल देतोः—

(१) होय.
(२) नाहीं.
(३) प्रसिद्धी अयोग्य होती.

माझीं कारणें आहेत तीं येणेंप्रमाणें:—

(१) निा १ अप्रसिद्ध केल्याचें आरोपी कबूल करतो ह्मणून त्या बाबतींत कांहींच सिद्ध करण्याची जरूरी नाहीं. दिलेल्या व्याख्यानां-

बद्दल बचावाकरितां आरोपीनें एक विलक्षण विधान केलें आहे. आपल्या इतर बचावाचे विधानांविरुद्ध जाणारें दुसरें एखादें बचावाचें विधान करण्यास आरोपीस कशाचीहि आडकाठी नाहीं, परंतु असलीं बचावाचीं विधान करण्यानें आरोपीची सर्व बाजू डळमळीत होते हें कबूल करणें भाग आहे.

आरोपीनें त्या दिवशीं बाजारांत व्याख्यानें दिलींच असें मी ठरवितो. हाजीऱ्याचे घरासमोर व्याख्यानें दिल्याचें शाबीत झालें आहे असें मला वाटत नाहीं. फिर्यादी ह्मणतो कीं, फकिरानें मला त्याबद्दल सांगितलें. निा ५ मध्यें फकीरा तें नाकबूल करतो. निा ४ यांत भुरा ह्मणतो कीं हाजीऱ्याचे घरासमोरील व्याख्यानाबद्दल फिर्यादीस सांगतांना फकीराला मी केव्हांही ऐकिलें नाहीं. यावरून हाजीऱ्याजवळ व्याख्यानें दिल्याचें सिद्ध झालें आहे असें मला ठरवितां येत नाहीं. इतर ठिकाणीं व्याख्यानें दिल्याचें चांगलें शाबीत झालें आहे असें मला वाटतें. हें सांगण्यास जे इसम आले आहेत त्यांनीं फिर्यादीचें बाजूनें व आरोपीचे विरुद्ध सांगण्यांत त्यांचा यत्किंचितहि फायदा नाहीं. निा ४ भुरा हा जरी हिंदू आहे तरी श्रीराम पंथाचा आहे. फकीरखान हा मुसलमान आहे. तोताराम बधू हा जरी सत्पंथी आहे तरी तो लायक व प्रतिष्ठित असा मनुष्य आहे. तो फैजपूर म्युनिसिपालिटीचा व्हाइस प्रेसिडेंट आहे. व व्याख्यानें दिल्याबद्दल त्याचें ह्मणणें मला मान्य आहे. या सर्व साक्षीदारांचा नक्की उच्चारलेल्या शब्दांबद्दल फार थोडा मतभेद आहे. परंतु फिर्यादी व त्याचे जातीचे लोक यांस आरोपीनें 'मोमीन' असें ह्मटलें व मुसलमान असा त्याचा अर्थ केला. सत्पंथी हे गोभक्षक आहेत व मी गाईचें

संरक्षणार्थ आलों आहे असें आरोपी ह्मणाला, याबद्दल सर्वांचें एकमत आहे.

हा पुरावा उलथून पाडण्याचा प्रयत्न निरनिराळ्या मार्गांनीं केला आहे.

(१) जेथें फिर्यादी उभा होता असें ह्मटलें आहे तें घर दुसरें कोणाचें आहे हें सर्कल इन्स्पेक्टराचे पुराव्यावरून सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. तें घर गिरिधरचें आहे असें तो दाखवितो. सर्कल इन्स्पेक्टर कबूल करतो कीं, फिर्यादीनें मी नेहमीं गिरिधरचे येथे रहातों असें मला सांगितलें. परंतु त्यानें स्वतः काढलेल्या नकाशांत ही गोष्ट नमूद केली आहे. तो म्हणतो कीं, तें घर गिरिधरचें आहे अशी माझी खातरी आहे तरी सुद्धां मी चौकशी केली. हें संशय येण्यासारखें आहे. सर्कल इन्स्पेक्टर आरोपीचेच जातीचा आहे आणि त्या जातीचें रक्षण करण्यांत त्याचें हित आहे. परंतु तें घर गिरधरचें होतें असें जरी धरलें तरी सुद्धां फिर्यादी तेथें होता किंवा नव्हता एवढ्याशींच आपला येथें संबंध आहे. फिर्यादपक्षाचा याबद्दलचा पुरावा सर्कल इन्स्पेक्टराचे पुराव्यावरून नाशाबीत होत नाहीं.

(२) आणखी असें म्हटलें आहे कीं, फिर्यादी तेथें असणें शक्य नव्हतें. कारण त्यावेळीं दुसऱ्या कोणाबरोबर तो बाहेर गेला होता. या मुद्यावरील पुरावा निा १६ व १८ हा आहे. निा १६ नथु जयराम सांगतो कीं, फिर्यादीची व माझी लाकडाचे व्यापारांत गवांद होती. व त्या दिवशीं आम्हीं दोघे सकाळीं १० वाजतां बाहेर गेलों व संध्याकाळीं ५ वाजतां वसूल गोळा करून परत आलों. ज्या इसमां-

https://archive.org/details/bk147/page/n213/mode/1up

पासून पैसा वसूल केला असें म्हणण्यांत आलें आहे, त्या इसमांपैकीं निा १८ नारायण सुपड्डु नांवाचा इसम आहे. तो सांगतो कीं हे दोघे इसम माझेकडे पैसे गोळा करण्याकरितां दुपारीं सुमारें १२ वाजतां आले. ज्याअर्थी आरोपीनें त्याचवेळीं व्याख्यान दिलें असें म्हटलें आहे त्याअर्थी फिर्यादी जेथें होता असें म्हटलें आहे तेथें तो असणें शक्य नव्हतें. प्रथमतः हे दोघे साक्षीदार रेवा पाटीदार आहेत व ज्या लोकांनीं फिर्यादीस व त्याचे पंथाचे लोकांस जातीबाहेर टाकलें आहे अशा लोकांपैकीं ते आहेत. म्हणून फिर्यांचे विरुद्ध साक्ष देणें त्यांचे फायद्याचें आहे. पुढें निा १६ चा साक्षीदार सांगतो कीं, आह्मी फक्त चार इसमांपासून पैसे गोळा केले व एका लहानशा खेड्यांत चार इसमांपासून पैसे गोळा करण्यास सात तास लागले असें मानणें हास्यास्पद आहे. याचा खुलासा असा केला आहे कीं ते प्रत्येक ठिकाणीं थोडा वेळ बसले. तरीसुद्धां सात तास कसे लागले याचा खुलासा होत नाहीं. आणखी निा १६ नें पैसे गोळा केले व निा १८ नें पैसे दिले असें दाखविणारा जमाखर्च दोघांपैकीं एकानेंहि हजर केला नाहीं. याहीपेक्षां आणखी असें कीं या दोघां साक्षीदारांना दरवर्षी शेंकडो व्यवहार करावे लागत असल्यामुळें हाच विशिष्ट व्यवहार त्यांचे लक्षांत रहावा हें चमत्कारिक दिसतें. कांहीं जमाखर्चाच्या वह्या पहाणें हाच केवळ या साक्षीदारांस या व्यवहाराची आठवण होण्याचा मार्ग आहे. परंतु ज्याअर्थी हे साक्षीदार ह्मणतात कीं आम्ही जमाखर्च मुळींच पाहिले नाहींत, आह्मी आठवणीवरून तें सांगतो व काय सांगावयाचें याबद्दल कोर्टांत येईपर्यंत आह्मांस कांहींच माहीत नव्हतें, त्या अर्थी हे साक्षीदार खरें सांगत नाहींत असेंच अनुमान मला काढलें पाहिजे.

(३) या मुद्यावरील पुरावा उलथून पाडण्याचा तिसरा प्रयत्न आरोपी बाजारांत नव्हताच परंतु सर्व दिवस मठांत होता हें सिद्ध करून दाखविण्याचा होय. या मुद्यावरील साक्षीदार निा १५ आनंदा, निा १७ नथु विठोबा, निा १९ माधव खंडू, निा २० तुकाराम आसाराम, निा २१ खंडु मोतीराम हे आहेत. या साक्षीदारांपैकीं पहिले तीन साक्षीदार सांगतात कीं, ज्यावेळीं आरोपीनें व्याख्यान दिलें असें ह्मटलें आहे, त्यावेळीं आम्ही बाजारांत होतो व आम्ही मुळींच व्याख्यान ऐकीलें नाहीं. त्याचप्रमाणें फिर्यादी-पक्षाचे तीन चार साक्षीदार सांगतात कीं आरोपी आला व त्यानें व्याख्यान दिलें; परंतु आरोपीपक्षाचे तीन साक्षीदार सांगतात कीं, मुळींच व्याख्यान झालें नाहीं. कोणावर विश्वास ठेवावा हा प्रश्न आहे. फिर्यादपक्षाचा पुरावा खरा मानण्यास मला मुळींच हरकत वाटत नाहीं. प्रथमतः मला वाटतें मी जातीचा ओढा विचारांत घ्यावा. आरोपीपक्षाचे सर्व साक्षीदार आरोपीचे जातीचे आहेत परंतु फिर्यादपक्षाचे साक्षीदार निरनिराळ्या धर्माचे आहेत. आणखी असा न्याय आहे कीं जेव्हां कांहीं साक्षीदार येऊन अमुक एक गोष्ट घडली असें सांगतात व दुसरें पुढें येऊन नकारात्मक पुरावा देतात कीं, ती गोष्ट घडली असती तर आम्हांला दिसली असती, अशा वेळीं दुसऱ्यापेक्षां पहिल्या साक्षीदारांवर अधिक भरंवसा ठेवावा. आणखी त्या दिवशीं कांहींएक विशेष घडलें नसल्यानें तेवढ्याच विशिष्ट प्रसंगाची साक्षीदारास कां आठवण रहावी हें दाखविण्यास मुळींच पुरावा नाहीं. आरोपीनें व्याख्यानें दिलीं असें आम्ही ऐकिलें असें फिर्यादीपक्षाचें साक्षीदार म्हणतात. त्याचा अर्थ समजणें शक्य आहे. कारण जर तसें घडलें असतें तर ती विशेष गोष्ट होती.

परंतु जे साक्षीदार फक्त नकारार्थी पुरावा देतात त्यांनीं ज्या दिवशीं त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें कांहींएक विशेष घडलें नाहीं असा एक बुधवार लक्षांत ठेवावा हें समजणें कठीण वाटतें. निा १९ याचे पुराव्यासहि हेंच ह्मणणें लागू आहे.

नंतर दोन साक्षीदार सांगतात कीं, त्या विशिष्ट दिवशीं—पौष प्रतिपदा निा २० ह्मणतो त्याप्रमाणें आरोपीचे मठांत निा २०यानें आरोपीस गुरु केल्याबद्दल जेवण होतें. व निा २१ खंडू मोतीराम जेवणास हजर होता. निा २० चा साक्षीदार पढविलेला आहे असें मला वाटतें. तो इंग्रजी सहाव्या यत्तेपर्यंत शिकलेला आहे. त्याचा बाप केव्हां वारला व त्यानें आरोपीस केव्हां गुरु केलें याची इंग्रजी तारीख त्यानें सांगावी अशी अपेक्षा करणें सकारण आहे. तो शाळा सोडल्याची तारीख, त्याचा बाप वारल्याची तारीख व आरोपीस आपला गुरु केल्याची तारीख मराठींत सांगतो. गुरुचा चेला असल्यामुळें गुरुला बचावण्यांत त्याचें हित आहे, हें उघड आहे. दुसऱ्या साक्षीदारांचा सुद्धां आरोपीशीं हितसंबंध आहे. कारण या खटल्याकरितां मिळविलेले कांहीं फोटोग्राफ आरोपीनें मागविले होते तरी व्ही. पी.नें या साक्षीदारास पाठविले होते.

याप्रमाणें सर्व पुराव्याचा विचार करून माझें असें स्पष्ट मत झालें आहे की, आरोपीनें तें व्याख्यान दिलें व आरोपांतील शब्द उच्चारले.

२. आतां मी दुसऱ्या मुद्यावर येतो व आरोपीचे शब्द इं. पी. कोड कलम ४९९ यास असलेल्या अपवादांपैकीं एखाद्या अपवादाखालीं येतात किंवा काय याचा विचार करतों.

मूलतः अन्नुकसानकारक हकीगत असलेल्या सर्व खटल्यांत विधानाची सत्यता अथवा तें खरें आहे असें मानण्याला त्याला योग्य आहे व तसें विधान करतांना द्वेषमूलक हेतूनें नव्हे परंतु सार्वजनिक हिताकरितां वाटणाऱ्या योग्य कळकळीनें तो प्रेरित झाला होता व यावरून तें विधान चांगल्या समजुतीनें केलें होतें असें सिद्ध करण्याचा बोजा तें विधान करणारावर आहे. इंडियन एव्हिडन्स ॲक्टाचें कलम १०५ प्रमाणें सुद्धां त्याचें कृत्य अपवादापैकीं एखाद्या अपवादाखालीं येत आहे असें सिद्ध करण्याचा बोजा आरोपीवर आहे. २४ मुंबई १३ यांतील न्यायमूर्ति रानडे यांच्या निवाड्यानें हें तत्त्व बदलत नाहीं. असें लिहिलें आहे कीं जर त्या बाबतींत पक्षकाराचें कर्तव्यकर्म असेल, तो प्रसंग न्याय्य असेल आणि तसल्या प्रसंगीं त्या हक्काचा योग्य उपयोग केला असेल तर 'चांगली भावना' होती असें गृहीत धरावें व द्वेषयुक्त हेतू होता असें फिर्यादीनें दाखविलें पाहिजे. या खटल्यांत हें तत्व लागू होत नाहीं असें मला वाटतें. पक्षकाराचें त्या बाबतींत कर्तव्यकर्म होतें असें समजलें तरीसुद्धां तो प्रसंग न्याय्य नव्हता. या संबंधांत दाखविलेल्या आधाराप्रमाणें पंचायतींत भाषणाचा योग्य प्रसंग होता. आणखी तो हक्क योग्य प्रकारें बजावला नव्हता. कारण त्या वेळीं दुसऱ्या बाजूचे पक्षास त्याविरुद्ध बोलण्याला अवसर मिळाला नाहीं. तो प्रसंग न्याय्य नसल्यानें व तो हक्क योग्य प्रकारें न बजावल्यामुळें सत्यता अथवा चांगली भावना सिद्ध करण्याचा बोजा आरोपीवर आहे.

तें विधान नंबर १ चे अपवादाखालीं येण्यासाठीं तें खरें व सार्वजनिक हिताकरितां असलें पाहिजे. या सिद्धांतापैकीं पहिला सिद्धांत आपण तपासून पाहूं या.

आरोपीपक्षाचे पुराव्यांतील मुद्दे मी थोडक्यांत सांगतों व त्यांत शाबीत झालेले मुद्दे, फिर्यादपक्षाचे पुराव्यावरून शाबीत झालेल्या आरोपांतील विधानांपैकीं एखादें विधान खोडून काढतात कीं काय हें पहातों.

आरोपीपक्षाचा पुरावा पुढीलप्रमाणें आहे. संवत १९६२ सालांत सत्‌पंथ हा वैदिक धर्माबाहेर आहे असें एका पंचायतींत ठरलें. त्या वेळीं सत्‌पंथ हा मुसलमानी पंथ आहे किंवा नाहीं हा प्रश्न उद्भवला. त्यानंतर लोकांनीं तो पंथ सोडला अथवा गुप्तपणें तो आचरूं लागले. नंतर बधू महाजन नांवाचा एक इसम त्या पंथाच्या धर्मशाळेंत गेला. त्याकरितां त्याला २१३६ रुपये दंड झाला. नंतर संवत् १९७५ सालीं कांहीं लोकांनीं तो मार्ग उघडपणें स्वीकारला. व इतरांनीं तसेंच केलें. त्यांनां जातीबाहेर टाकलें; व नंतर पुनः गेल्या डिसेंबरांत एक पंचायत भरली, तेव्हां त्यांना पुनः जातीबाहेर टाकलें. यापुढें असें ह्मटलें आहे कीं, सत्‌पंथी लोकांच्या कांहीं चालीरीती मुसलमान चालीरीतीसारख्या आहेत–ते उलट बाजूनें मृतास पुरतात, रमझान व मुसलमानी रोजे पाळतात, ते नमाज पढतात व नातेवाईकाचे मृत्यूनंतर चाळिसावा दिवस पाळतात. मुसलमानी लोकांचें पवित्र स्थान पिराणा येथें ते जातात. कुराणांतून ते कलमें ह्मणतात. याप्रमाणें आरोपीपक्षाचें ह्मणणें आहे.

आरोपांतील पहिलें कलम हें स्पष्टपणें आरोपीनें केलेलें खोटें विधान आहे. फिर्यादी व आरोपी पक्षांच्या पुराव्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं गेल्या वर्षापर्यंत बेटीव्यवहार होत होता; व रोटीव्यवहार होत होता. रेवा पाटीदारांचा कुटुंबनायक भिका पाटील हा सत्‌पंथी तोता-

राम बधू याचा नातेवाईक आहे. (निा २४). आणखी आरोपीपक्षाचे ह्मणण्याप्रमाणें सत्‌पंथी हे संवत्‌ १९६२ सालापासून एकसारखे वाळीत होते. परंतु आरोपीपक्षाचे कांहीं साक्षीदार (२४,२५ व इतर) सत्‌पंथी लोकांशीं नातें असल्याचें कबूल करतात. शिवाय जर त्यांच्यांत रोटी व बेटीव्यवहार नव्हते तर आरोपीचा ही मोहीम चालविण्यांत काय हेतु होता ? निा १४ चा साक्षीदार सांगतो कीं, मी बारा वर्षेंपर्यंत गुप्तपणें सत्‌पंथी होतो. हें हास्यास्पद आहे. तो ह्मणतो कीं त्यावेळीं प्रत्येकजण गुप्तपणें सत्‌पंथी होता. परंतु त्यांच्यांत बेटीव्यवहार होतच होते. आरोपीपक्षाच्या ह्मणण्याप्रमाणें आपण सत्‌पंथी आहोंत असें दाखविण्याचा मुख्य मार्ग जर धर्मशाळेंत जाऊन मुसलमानी रोजे पाळणें हा आहे तर गुप्तपणें सत्‌पंथी रहाणें कठीण आहे हें सहज दिसतें. आरोपीपक्षाचें साक्षीदारसुद्धां सत्‌पंथी लोक गाईचें मांस खातात असें सांगत नाहींत. निा १४ साक्षीदार सुद्धां सांगतो की, मी सत्‌पंथी असतांना मुसलमान लोकांबरोबर जेवलों आहे. परंतु कधींहि गाईचें मांस खाल्लें नाहीं. हें विधान हिंदूला फार अब्रुनुकसान करणारें आहे. व या विधानाची सत्यता आरोपीपक्षाकडून स्थापीत झालेली नाहीं. याबद्दलची आरोपीची मनाची वृत्ती त्यानें तोताराम बधू यांस पाठविलेल्या पत्रांत दिसतें. त्यांत तो ह्मणतो कीं, सत्पंथी गाईचें मांस खातात. जर त्याला असें वाटत होतें तर कोणत्याही रीतीनें समर्थन करतां येण्यासारखें नसतांही उघडपणें तो असें ह्मणाला असल्यास आश्चर्य नाहीं.

इतर तीन विधानांबद्दल सत्पंथी हे हिंदू आहेत किंवा नाहींत याबद्दलच्या सर्वसाधारण वादांत मी विचार करतों. येथें सत्पंथी लोकांचा मुख्य काका लक्ष्मण करमसी याचे पुराव्याबद्दल बोललें

पाहिजे. त्याचा पुरावा कमिशनवर घेतला होता. तो ह्मणतो कीं, सत्पंथी हिंदू आहेत. ते कुराण मानीत नाहींत. ते सुंता करीत नाहींत अथवा नमाज पढत नाहींत. त्यांचा वेद, पुराणें व रामायण यांवर विश्वास आहे. शिक्षापत्री, मूळबंध व गुरुवाणी हे त्यांचे सन्माननीय ग्रंथ आहेत. पुजा व लग्न करण्याच्या पद्धती ह्या हिंदूंच्या आहेत. कांहीं लोक मृतांस पुरतात व कांहीं दहन करतात. ते एकादशीचा उपवास करतात व दशावतारावर त्यांचा विश्वास आहे. पिठाच्या केलेल्या गाई ते खात नाहींत. रमझानचे दिवशीं ते उपवास करीत नाहींत.

हिंदू ह्मणजे काय या प्रश्नाचा विचार थोडा विस्तृतपणें ३१ कलकत्ता १२ यांत केला आहे. त्यांत केलेलीं कांहीं विधानें या बाबतींत उपयोगाचीं आहेत. " हिंदुधर्म हा प्रसिद्धपणें सर्व लोकांचा व प्रसरणशील आहे. त्याचा वेदांत सर्वांतील सार घेणारा आहे व परधर्मसहिष्णुता व खासगी पूजेचें अनियंत्रित स्वातंत्र्य याबद्दल प्रसिद्ध आहे. त्याचा सामाजिक कायदा यापेक्षां अधिक कडक आहे, परंतु त्याच्या निरनिराळ्या जातींत व उपजातींत पुष्कळ निरनिराळ्या रीती चालू आहेत. हिंदुसमाज ओळखण्याची त्या समाजांत गाईचे मांस खाण्याबद्दलच्या दहशतीपेक्षां जास्त मोठी खूण सांपडणार नाहीं. तथापि हिंदुधर्म मानणारे चांभार लोक गोमांस खातात व ते किती खालच्या दर्जाचे आहेत, तरी त्या धर्मांत येतात. हिंदू कोण नाहींत हें सांगणें अधिक सोपें आहे."

याप्रमाणें प्रत्यक्ष चालीरीतींतील कांहीं फरकामुळें एखादा इसम हिंदू होत नाहीं असें नाहीं. एखादें मृत शरीर पुरलें अगर जाळलें

अथवा तें हिंदूपद्धतीनें पुरलें अगर इतर पद्धतीनें पुरलें या गोष्टी महत्वाच्या नाहींत. निव्वळ धर्माच्या बाबतींत पूर्ण सहिष्णुता आहे. ब्राह्मोधर्माच्या चालीरीती पुराणमताभिमानी हिंदुधर्माच्या चालीरीतीहून निराळ्या आहेत. त्या धर्मप्रमाणें एखादा मनुष्य हिंदूंचे सामाजिक नियम सोडून देईपर्यंत व मी हिंदू नाहीं असें स्वतःबद्दल जाहीर करीपर्यंत, हिंदू नाहीं असें होत नाहीं. जर एखाद्या हिंदूला ख्रिस्ती-धर्माचीं तत्वें पसंत पडलीं व तो ख्रिस्ती देवळांत जाऊं लागला तर तो हिंदू रहात नाहीं काय ? बाप्तीस्मा दिल्याशिवाय त्याचे जातीचा कायदा त्याजवर बंधनकारक होण्याचा थांबतो कीं काय ? नाहीं.

रमझानचा उपवास करण्यानें एखादा मनुष्य मुसलमान होत नाहीं. मला वाटतें कुराणावर विश्वास ठेवणें हीच मुख्य परीक्षा होय. काका करमसी यानें हें स्पष्टपणें नाकबूल केलें आहे. आरोपीपक्षाचा एक साक्षीदार निा १४ सांगतो कीं, मी सत्पंथी होतों तेव्हां कुराण मानीत होतों. परंतु कुराणांतून ' तोबा तोबा ' अशी एक ह्मण मी शिकलों. ती हास्यास्पद आहे. आरोपीपक्षाचा दुसरा एक साक्षीदार निा २३ सांगतो कीं, जर सत्पंथी लोक रोजे पाळण्याचे व मृतांस पुरण्याची रीत सोडून देतील तर सत्पंथी लोक व इतर हिंदू यांच्यांत कांहींएक फरक रहाणार नाहीं. एवढाच जर फरक असेल तर त्यामुळें कोणीही हिंदुधर्माचे बाहेर जाणार नाहीं. साक्षीदार निा २४ च्या ह्मणण्याप्रमाणें सत्पंथी लोकांतील लग्नाचे विधी हिंदूंचेच आहेत. आरोपीपक्षाचे कित्येक साक्षीदार व त्यांचे नातेवाईक यांनीं सत्पंथी कुटुंबांशीं लग्नें केलीं आहेत.

पिराणा येथील निा २५ यानें हजर केलेले फोटोग्राफ हे ईमाम-शहाचे कबरस्थानचे आहेत. ईमामशहा मुसलमान होता म्हणून

त्यास पुरलें व त्याचे सन्मानार्थ बांधलेल्या इमारती मुसलमानी आहेत. ईमामशहाबद्दल सत्पंथी लोकांनां आदर वाटतो. परंतु त्याचा अर्थ ते आपोआप मुसलमान झाले असा होत नाहीं. कबीर हा मुसलमान साधू होता. त्याला हिंदुलोक मान देत असत. त्यामुळें हिंदू मुसलमान झाले नाहींत. शिवाय फोटोग्राफ खरे आहेत किंवा नाहींत याबद्दल थोडा संशय आहे. ते साक्षीदार नि।। २५ याचे समक्ष घेतले नव्हते. त्या कबरीच्या पायथ्याशीं कुराण ठेविलें आहे. ही स्थिती मुसलमानी धर्माच्या विरुद्ध आहे, असें नि।। २७ डेप्यूटी चिटणीस ह्मणतो. नि।। २५ व सुद्धां दोन मुलगे मागें पडदा धरून आहेत असें दाखवितो. याचा नक्की अर्थ समजत नाहीं. कदाचित हें कांहीं भाग झाकण्याकरितां अथवा उजेडाला प्रतिबंध करण्याकरितां असेल.

याप्रमाणें या सर्व पुराव्यावरून सत्पंथी लोक हिंदु नाहींत अथवा ते मुसलमान आहेत असा निर्णय मला करतां येत नाहीं. ह्याचा निकाल लागल्यावर तीं सर्व विधानें अब्रुनुकसानकारक होतात. ज्याअर्थीं त्यांची सत्यता शाबीत केली नाहीं, त्याअर्थीं तीं सार्वजनिक हिताकरितां होतीं किंवा नव्हतीं हा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं.

आतां मी अपवाद ७ व ९, यांकडे वळतों. चांगल्या भावनेबद्दलच्या मुद्याचा विचार करावयाचा आहे. अपवाद ७ प्रमाणें तें विधान करणाऱ्या इसमाला कायदेशीर अधिकार होता असें पाहिजे. आरोपीला कोणता अधिकार दिला होता? फक्त सुमारें एक वर्षापूर्वीं तो फैजपूरला आला आहे. लेवा कुणबी लोकांचा तो जणूं काय शंकराचार्य आहे असें आरोपीपक्षाकडून सिद्ध झालेलें नाहीं. हिंदुधर्माचें

हित पहाणें हें त्याकडे होतें हें सिद्ध झालेलें नाहीं.२२ कलकत्ता ४६ यांत अपवाद ७ लागू केला होता. यांत असें स्पष्ट होतें कीं, जातीचा धर्ममार्गदर्शक ह्मणून प्रस्तुतसारख्या तंट्याचा निवाडा करणें ही गुरूची वहिवाट होती. व पत्रांतील विधानें ज्या समाजाचा आरोपी गुरु होता, त्या समाजाच्या सामाजिक व धार्मिक हिताकरितां चांगल्या भावनेनें तीं केलेलीं होती व त्या समाजाचा धर्मगुरु ह्मणून जो अधिकार आरोपीस दिला होता, त्या अधिकारानें ती निंदा वाजवी होती. ज्या अर्थीं या खटल्यांत असला कोणताही अधिकार दिसत नाहीं त्याअर्थीं अपवाद ७ लागू होत नाहीं असें मी ठरवितों. आणखी अपवाद ७ प्रमाणें चांगली भावना पाहिजे हा सिद्धांत मी आतां तपासून पहातों.

अपवाद ९ चें सार चांगली भावना दाखविणें हें आहे. ४ कलकत्ता १२४ यांत चांगली भावना ह्मणजे 'योग्य काळजी व लक्ष' अशी व्याख्या केली आहे. चांगल्या भावनेच्या पुष्ट्यर्थ आरोपीपक्षाचा पुरावा काय आहे ? ह्या मुद्यावरील सर्व साक्षीदार सांगतात कीं आमचें या मुद्यावर आरोपीशीं मुळींच बोलणें झालें नाहीं. ह्मणून आरोपीनें जेव्हां ते विधान केलें तेव्हां सत्पंथाचा इतिहास त्यास माहीत होता. असें समजावयाचें आहे. शेवटची पंचायत होई-पर्यंत एकमेकांशीं रोटी व बेटीव्यवहार सुरू होते. जर तसें नव्हतें तर पंचायतीनें जातीबाहेर टाकण्याचा निकाल देण्याची जरुरी नव्हती. जर असें होतें तर कोणी येऊन आरोपीस सांगितलें कीं त्याच्यांत रोटी व बेटीव्यवहार नाहीं ? मुसलमानी धर्माच्या चाली-रीतीसारख्या चालीरीती सत्पंथी लोक पाळीत असतील. ते शिक्षापत्री वगैरे ग्रंथ वाचतात. परंतु यावरून फिर्यादी व सत्पंथी लोक मुसल-मान आहेत अथवा ते कुराणांतील धर्म पाळतात असें आरोपीनें

ह्मणणें रास्त आहे काय ? असा निर्णय एकदम करणें हें 'योग्य काळजी व लक्ष' दाखवितें काय ? गाईचें मांस खाण्याबद्दलची असा थोडासुद्धां पुरावा नाहीं कीं ज्यावरून चांगल्या भावनेबद्दलची कल्पना दृढ करतां येईल. वकीलांनीं आपलें भाषणांत सांगितलें कीं, फिर्यादी मुसलमान आहेत म्हणून तो गोमांस खात असला पाहिजे. अशी आरोपीची समजूत झाली. ही 'योग्य काळजी व लक्ष' नव्हे.

गुजराथ गॅझेटीयर (खंड ९ भाग १) पहाण्याबद्दल मला विनंती केली आहे. तें पुराव्यांत ग्राह्य आहे किंवा नाहीं याबद्दल संशय आहे. परंतु येथेंसुद्धां आरोपांत वाटेल तसें म्हणण्यासारखीं तीं विधानें नाहींत. ते रमझानचा उपवास पाळतात व कलमें म्हणतात असें नमूद केलें आहे. परंतु त्यांत असेंसुद्धां म्हटलें आहे कीं, ते होळी, अक्षय्यतृतिया, दिवाळी हे हिंदूंचे सण पाळतात. ते चतुर्थवेद (अथर्व) पाळतात असेंसुद्धां त्यांत नमूद केलें आहे. त्यांचा पवित्र ग्रंथ कुराण नसून शिक्षापत्री आहे असें ह्मणतात. अमदाबादचे गॅझेटीअर (पानें २८८,२९०) यांत ह्मटलें आहे कीं, सत्पंथी लोकांपैकीं कोणीहि मुसलमान नाहींत व ते हिंदूंचे सण व जातीचे नियम पाळतात. त्यांचे स्वतःचे धर्मग्रंथ वाचतात, व इमामशहाबद्दल त्यांनां वाटत असलेल्या आदरामुळें त्यांच्या मृतांस जाळल्यानंतर त्यांच्या अस्थि पिराणा येथें पुरण्याची त्यांनां प्रवृत्ति होते. या गोष्टीखेरीज ते इतर हिंदूप्रमाणें आहेत. त्यांची नेहमीची प्रार्थना "शिवोहम्" मी शिव (एक हिंदूचा देव) आहे अशी आहे. व काका ह्मणतात, "इमाम केवल"—मी इमाम आहे. ईमामशहास ते फक्त धर्मोपदेशक ह्मणून मानतात.

'मुंबई इलाख्यांतील फिरत्या टोळ्या व जाती ' खंड २ पान १५५ या नांवाचें दुसरें एक पुस्तक पहाण्याबद्दल आरोपीपक्षाचे वकीलानें सूचना केली आहे. त्यांतसुद्धां असें सांगितलें आहे कीं, मोमना कुणबी हे मुसलमानांशीं संबंध ठेवीत नाहींत, मांस खात नाहींत, सुंता करीत नाहींत, दररोज पांच प्रार्थना करीत नाहींत व रमझानचा उपवास करीत नाहींत. त्यांत पुढें आणखी असें म्हटलें आहे कीं, आपणांस कोणी नुसतें नांवानें सुद्धां मुसलमान म्हणूं नये अशी मोमना कुणबी लोकांची प्रवृत्ति आहे. ते स्वतःस लेवा पाटीदार म्हणतात. व त्यांच्या धर्माच्या कांहीं मुसलमानी बाबीशिवाय इतर सर्व बाबतींत ते हिंदू आहेत. आणखी मोमना कुणबी हे हिंदु नाहीं व मुसलमान नाहीं असला धर्म पाळतात. परंतु आपणाला हिंदु म्हणावें याबद्दल ते फार खबरदार असतात. आरोपीनें आपलीं विधानें करण्यापूर्वीं हें वाचलें किंवा नाहीं ही गोष्ट निदान संदिग्ध रहाते. असल्या संदिग्ध माहितीवरून एखाद्या उपजातीला गोमांसभक्षक म्हणणें हें 'योग्य काळजी व लक्ष' यापेक्षां फार निराळें आहे. त्यावेळीं आरोपीस असलेल्या माहितीवरून अपवाद ७ व ९ चा पाठिंबा मिळेल असें विधान करण्यास त्याला मुळींच योग्य कारण नव्हतें. याप्रमाणें माझें असें मत झालें आहे कीं, आरोपीनें अब्रूनुकसानकारक विधान केलें व इं. पी. कोड कलम ४९९ यास असलेल्या अपवादापैकीं कोणत्याहि अपवादानें त्याचा बचाव होत नाहीं.

३. असें असल्यामुळें योग्य हक्काचें अतिक्रमण झालें कीं काय हा प्रश्नच उद्भवत नाहीं. परंतु मी आरोपीस गुन्हेगार ठरविण्याचें हें दुसरें कारण असल्यामुळें त्याचा मी येथें विचार करतो. ते जरी

उच्चारण्यास आरोपीस हक्क होता असें धरलें तरी तो हक्क त्या बाबीचा संबंध असणाऱ्या लोकांमध्येंच मर्यादित असतो. ३ बॉम्बे लॉ रिपोर्टर पान १५८ यांत लिहिलें आहे कीं, "जरी तें विधान सार्वजनिक हिताकरितां अथवा संरक्षणाकरितां होतें तरी जर ती गोष्ट कळलेल्या गोष्टींत ज्यांचें हित आहे अशा लोकांहून इतर वाचक वर्गाला कळविली तर मग मुळींच अधिकार रहाणार नाहीं." ६ मद्रास ३८१ यांत हेंच तत्व प्रस्थापित झालेलें आहे. १९ मुंबई ७०३ मध्यें हक्काचें प्रत्येक अंग होतें, परंतु वाजवीपेक्षां जास्त व अयोग्य प्रसिद्धीमुळें तें बिघडलें. त्याचप्रमाणें हल्लींच्या खटल्यांत जर आरोपीनें तीं विधानें पंचायतींत केलीं असतीं व तीं एखाद्या अपवादाखालीं येतात असें धरलें असतें तर बोलण्याचा अधिकार पूर्ण झाला असता. परंतु येथें तीं विधानें ज्यांचा त्यांत हितसंबंध नाहीं अशा लोकांच्या नजरेस आलीं. उदाहरणार्थ मुसलमान व इतर लोक. आरोपीपक्षाच्या वकिलानें ह्मटलें कीं, तो बाजाराचा दिवस होता व ज्याअर्थी पुष्कळ खेड्यांचे लोक फैजपूरला आले होते. त्याअर्थी लेक्चर बाज़ारांत दिलें गेलें हें उचित होतें. परंतु जातीचे लोकांची पंचाइत भरविणें हा मंडळी जमविण्याचा योग्य मार्ग होता. खरोखर थोडे दिवसानंतर एक पंचायत भरावयाचीच होती. अशा परिस्थितींत जर बोलण्याचा अधिकार असता तर त्याचा दुरुपयोग केला असेंच खरोखर ठरलें असतें. आणि इं. पी. कोड कलम ५०० प्रमाणें मी आरोपीस कां दोषी ठरवितों याचें हें आणखी कारण आहे.

शिक्षा:—कैदेच्या शिक्षेची जरूरी आहे असें मला वाटत नाहीं. आरोपीस ५०० रुपये दंडाची शिक्षा दिली आहे. दंड न दिल्यास

तीन महिन्यांची साधी कैद. दंड देण्यास आरोपीस दहा दिवसांची मुदत दिली आहे.

तारीख १५ नोव्हेंबर १९२३

Sd जी. एस्. राजाध्यक्ष.
मॅजिस्ट्रेट वर्ग १ ला प्रान्त मॅजिस्ट्रेट
पूर्वभाग, पूर्वखानदेश.

शिक्का

खरी नक्कल
सही इंग्रजी
मा० वर्ग १ पूर्वखदोनश

Appeal Judgement, Dhulia.

IN THE COURT OF THE SESSIONS JUDGE OF KHANDESH AT DHULIA.

Criminal Appeal No. 178 of 1923.

Atamanand Guru Premanand of Faizpur, Appellant.

Pleader for the appellant, Messrs: Barjibhe and Saundankar and Deo.

Pleader for the Crown, the 1st Asstt: P. P. Mr, Kharkar.

The appellant Atamanand Guru Premanand was convicted on a trial held on the 15th of November 1923, by G. S. RAJADHYAKSHA, Esquire, Magistrate of the First Class, E D. in the District of East Khandesh, of an offence under Section 500, of the Indian Penal Code and sentenced to pay a fine of Rs 500 or in default to suffer simple imprisonment for three months,

"ORDER"

Heard Mr. Dev.

Mr. Kharkar A. P. P.

The accused appellant was charged with an effence of defamation under section 500 I. P. C in the court of the Sub Divisional Magistrate, E. D. East Khandesh. He was convicted and sentenced to pay a fine of Rs. 500. Dis-satisfied he appeals.

Amongst the Lewa Patidars of Gujarath and East Khandesh there is a sect known as Stapanthis. Their religious beliefs and practices are described at page 167 et seq of the Bombay Gazetter Vol. 9 part 1 Gujarath Population Hindus under the heading Matia Kunbis and at page 150 et seq of Tribes and Castes of the Bombay Presidency Vol. 2. They are followers of Imamshah whose tomb is

at Pirana in Ahmedabad. There is some doubt exactly how far they have gone in the acceptation of Musalman beliefs and the orthodox Hindus Lewa Kunbis have made occasional attempts to out-caste them.

There is a fairly large community of Lewa Kunbis at Faizpur in East Khandesh and of these many are followers of the Satpanthi sect. On two occasions Satpanthis have been outcasted and intermarriage and interdining with other Lewa Kunbis prohibited.

The matter slept in Faizpur until recently when the accused came to Faizpur and was in charge of the Math at Khanderao Wadi. He began to move in the matter of the Satpanthis and published the hand bill Exb. 1A.

It is further alleged that on the 20th, December with the accompaniment of tom-toming the accused paraded the streets of Faizpur, stopped at various places, denounced the Satpanthis and distributed the handbill Exh 1 A. On this occasion he is said to have stopped in front of the complainant's house addressed him pointedly as a Satpanthi and an eater of cow's flesh.

Three days later a Panchayat of the Lewa Kunbis was held and the Satpanthis were outcasted. On these facts this charge of defamation is brought. The accused admits the publication of Exh 1 A but denies the incident in the bazar maintaining that he was at the Math on that day.

The case against him therefore splits up into two in which the respective issues will be

1. (a) Did the accused publish Exh 1 A?
   (b) Can a charge of defamation lie in respect of any of the allegations made there on?
2. (a) Did the accused lecture in Faizpur on December 20th ?

(b) Did he pointedly refer to the complainant in the presence of others as a "cow-eater"?

(c) Did such a remark constitute the offence of defamation.

My findings on these points are ; 1-a. Yes. 1-b. Yes. 2-a. Yes. 2-b Yes. 2-c. Yes. for the following reasons.

In Exh. 1 A the relevant words are " Hindus have no dealings with Satpanthis in the matter of marriages and dinner." " In Khandesh sacrilegious practices are going on." "These people follow the religion which is written in the Koran, there is no doubt in that whatsoever". "The people who follow the religion of that place (Pirana) are called Mominas in Gujarath." " Patidars following the old religion have also told me this."

It is clear from this that the accused maintains in the handbill Exh. 1 A. that Satpanthis are Mahomedans. There is also a vague refernce to the Faizpur Satpanthis in the Statement. "In Khandesh sacriligious practices are going on." The fact that the hand-bill was distributed in Faizpur is also some evidence that it was directed against the Faizpur Satpanthis amongst others.

Mr. Dev's first argument is that in this hand-bill the accused was criticising the whole sect and throughout there is no reference to any particular individual. No member of the sect can argue that he is personally defamed in a general criticism of the sect to which he belongs.

The law on this point is contained in explanation 2 to Section 499 I. P. C. which says that "it may amount to defamation to make an imputation concerning a Company or an association on collection of persons as such."

The use of the permissive "may" shows that the question of whether a man can be defamed by allegations against a class of which he is a member is in each case a

question of fact. I think the true test would be whether the allegation against the class as a whole would be taken generally as applying to every member of it and as a result expose him to some loss of reputation.

In the present case the leaflet exh 1 A declares that the Satpanthis although they call themselves Hindus are in reality Mahomedans and calls upon Hindus not to inter marry or dine with them.

It seems to me that this is defamatory of every Satpanthi and will harm his reputation not only amongst the Lewa Patidars to whom he claims to belong but amongst all Hindus.

The accused had admitted the publication of Exh 1 A there is an imputation therein that no Satpanthi is fit for normal relationships with other members of the Lewa Patidar caste and this is an imputation which harms the reputation of the complainant as a Satpanthi.

Unless therefore the accused can show that he is protected by some of the exceptions of Sec. 499 the publication of exh 1 A constituted an offence of defamation of the complainant.

Turning now to the alleged lectures in Faizpur.

Mr. Dev. urges that this part of the case is an after thought and has been elaborated in order to prove a direct case of defamation against a particular individual. He has asked me to examine carefully the complaint and its verification. He first urges that the complainant no-where says that the accused ever referred to him particularly but only refers to accused's allegation against the sect as a whole.

In general this is true but at the places I have marked A the complainant does urge that insulting speeches were made in front of his house and in his presence although

there is no mention that the accused used the defamatory expression " Cow-eater " against the complainant.

Again in the verification complainant only says that accused declared that he and the people following his religion were Mominas and cow eaters. There is no definite mention of accused having called the complainant personally a cow eater.

It is clear however from complainant's reference to the insulting speech in his presence that he is referring to the occasion on which he alleges that the accused called him a cow-eater. With his complaint he gave a list of witnesses which includes the names of Bhura Mura and Fakirkhan wd. Burekhan who gave evidence on this point.

It seems to me therefore that he had this incident in mind when he made his complaint. Whether it to be true or not, it is not I think an afterthought on the part of the prosecution after realising the weakness of their case regarding the general statements.

Upon this point as to whether the story of the lectures in the bazar is true the learned Magistrate has pointed out that lectures are alleged to have been given in five places. He holds the delivery of a lecture at the Hajaraya not proved but as regards the other he thinks that the giving of lectures in the other four places is fairly well established. The witnesses are agreed that the substance of these lectures was that the Satpanthis were Momans were cow eaters and that he was out to protect cows.

Except in one place these words were addressed to people in general.

In the case of the lecture in front of complainant's house it is alleged that accused further said that complainant was a Satpanthi and cow eater.

This story is corroborated by Bhura and Fakirkhan.

The former is a Rewa Patidar and not a Satpanthi. An attempt was made to show that Ananda could not have been at that place on that particular day but the learned Magistrate, has I think, rightly disbelieved that evidence.

An attempt was next made to show that the accused delivered no lecture in Faizpur. He himself says that he only distributed the hand bills at the "Math". It is difficult to believe this looking to the part he has played in the matter. Handbills are prepared for wide distribution and it is difficult to believe that the accused would content himself with giving them out at the Math. The accused's desciples also give evidence that he was at the Math throughout that particular day. They are clearly interested and Mr. Dev abandons any reliance on them.

Looking to the nature of the accused's campaign I think it very likely indeed that he would deliver these lectures on the bazar day.

I think it may therefore safely be taken as proved that the accused delivered lectures at Faizpur on bazar day in which he described Satpanthis as Mominas (i. e. Mahomedans) and cow eaters.

I further see no reason to disbelieve the evidence that he pointed to the complainant after making general statements about Satpanthis and said this is one of them he is a cow eater.

Now I think that the few things can hurt a Hindu more than being called a "cow eater" and such an accusation is bound to lower his reputation in the eyes of his fellow Hindus especially when that remark is made by a priest.

Similarly though not to the same extent I think that it is defamatory to call a Hindu a Momana not that this casts any reflection on Mahomedanism—but that it is

likely to prejudice his position in Hindu Society. If belived it would be certain to end in the suspect being outcasted with the dire social penalties which follow that step.

Objection is taken in the appeal memo that the lower court has described the statements as "pure defamatory" without raising any issue on the point. Mr. Dev has not however argued that they are not defamatory and I think that when used to a Hindu they are certainly defamatory.

These being my conclusions on the preliminary points it has next to be considered whether the accused is protected in any way.

Clearly the first exception does not apply. The matter was one extremely for the caste and had no interest for the general public.

The accused was certainly not justified in distributing handbills broad caste the public and thus leading the general public to believe that the Satpanthis were apostates.

As to the truth of the imputation I hold from the evidence given in this case and the information contained in standard works like the Bombay Gazetter and Tribes and Casts of the Bombay Presidency, that it is not true.

As stated in 31 Cal. P. 12 it is easier to say who are not Hindus than who are. Of Mahomedans one would be inclined to hold that the essential beliefs were a belief that there is only one God. That Mahomed was his prophet and that the Koran is the inspired word of God. I believe that circumcision is general amongst Mahomedans and that amongsl none of them is there any ban on eating the flesh of the cow.

Now at the best from the aecused's point of view it is shown that the Satpanthis reverence Imamshah but not that they revere the prophet himself. They have their

own religious heads the "Kakas" as distinguished from the successors of Imamshah to whom they meraly pay tribute.

Even if Satpanthis venerate Imamshah's tomb I do not see that this means more than a veneration for the man himself and not of his religion.

It does not seem that the Satpanthis venerate the Koran. Even if it be true—and it is be alleged to be untrue—that the Koran is placed at the feet of Imamshah's tomb this would not mean that Satpanthis visitors to the tomb venerated the Koran. The general appearance of the tomb is no doubt Mahomedan but Imamshah lived and died a Mahmedan and I think I am correct in stating that the guardians of the tomb are pure Mahomedans and not Satpanthis. The religious heads of the sect are the 'Kakas" who are Leva-Kunbis.

From the evidence it seems that the Satpanthis venerate the "Shiksa-patra" a complication of religious maxims made by Imamshah himself.

There is no evidence that the Satpanthis practice circummcision.

It is denied that there has ever been any intermarriage between Satpanthis and orthodox "Mahomedans"

Lastly there is the allegation that Satpanthis eat representation of the Cow made of dough. This is strenuously denied and there is no proof of it.

The accused has stated that he has learnt the truth of many of his allegations by a personal visit to Pirana. It is denied that he talked with the guardian of the tomb as stated.

It seems to me therefore that the accused is a zealot and has made many statements without the careful study which any fair minded man would give to a question be-

fore setting out to hurt other people. It is urged that he should be excused on the ground of his earnestness and ignorance but bigotry is a poor excuse for cruelty.

I think that the accused has quite failed to prove that his conduct falls within the first exeption.

Exception 2-6 have no application to the present case. Now as regards exception 7 and 8 it is urged that the accused as a priest was in a position of authority and was justified in commenting on the lapse from their religious faith.

It has frequently been held (33 Mad. p. 70) that authority in these matters rests with the castes although the authority may be deligated to a Guru. There is no evidence that in this case the accused was clothed by tne caste with such authority. On the contrary he obviously thought that the caste people were neglecting their duties in not out-casting the Satpathis and proceeded to stir them up.

The question of good faith also arises and I do not think that the accused can be said to have made these statements, with the due care and attention which is the great test of good faith.

Now as to exception 9:—

Protection is given to a person who makes an imputation in good faith on the character of another in the interest of any person.

This however would apply to private communications to other Lewa Kunbis. Warning them against the Satpanthis as transgressors.

I doubt if it would apply to a communication published to people in general. In any case good faith is essential and since the accused acted without due care and attention I do not think he can be said to have acted with good faith.

Exception 10 does not seem to apply to the case since the accused spoke against the complainant publicly.

I therefore hold that the Appellant in his handbill Ex. 1 A defamed the complainant as a Satpanthi. He further defamed him by referring to him pointedly as a Momina and cow-eater. He had no authority to attack the complaint's religious beliefs. The imputations were not true and he had not taken the necessary care to assure himself of their truth before making them. He did not act with good faith. He is not protected by any of the exceptions to the definition of defamation in Section 499 I. P. C.

He is therefore guilty of defamation. It is urged that the sentence is too heavy. Since accused is a poor man none too learned—and since he was inspired by religious zeal I think the better test would be the pain caused to others by his clumsy bigotry.

I see no reason to reduce the sentence.

I therefore confirm the conviction and sentence and dismiss this appeal.

Dhulia.

Sd. J. Scotson.
Sessions Judge.

Seal.

True Copy.
Sd. J. L. Limaye.

Clerk of the Court and Shirestedar to the Sessions.

धुळें अपील जजमेंटचें मराठी भाषांतर.

धुळें येथील खानदेशचे सेशन जज्ज यांचे कोर्टांत.

क्रिमिनल अपील नंबर १७८ सन १९२३.

आत्मानंद गुरु प्रेमानंद वा॥ फैजपूर, अपील करणार.

अपील करणारातर्फें वकील मेसर्स बारजिभे व सौंदाणकर व देव. सरकारतर्फें वकील फर्स्ट असिस्टंट पब्लिक प्रॉसिक्यूटर मि. खारकर.

अपील करणार आत्मानंद गुरु प्रेमानंद यास तारीख १५ नोवेंबर सन १९२३ रोजीं झालेल्या चौकशीवरून जी. एस्. राजाध्यक्ष एस्कायर, मॅजिस्ट्रेट वर्ग १ पूर्वभाग जिल्हा पूर्वखानदेश, यांनीं इं. पी. कोड कलम ५०० प्रमाणें गुन्हा केल्याबद्दल दोषी ठरविलें व ५०० रुपये दंड देण्याची अथवा दंड न दिल्यास तीन महिन्यांची साध्या कैदेची शिक्षा दिली.

" हुकूम "

मि. देव
मि. खारकर अ. प. प्रॉ. } यांचें ह्मणणें ऐकिलें.

प्रांत मॅजिस्ट्रेट पूर्वभाग जिल्हा पूर्वखानदेश यांचे कोर्टांत आरोपी सदरील अपील करणार याजवर इं. पी. कोड कलम ५०० प्रमाणें अब्रूनुकसानीचा गुन्हा केल्याचा आरोप ठेवण्यांत आला होता. त्याला दोषी ठरविलें व ५०० रुपये दंड देण्याची शिक्षा दिली. सदरहूबद्दल नाखुष होऊन आरोपीनें अपील केलें आहे.

गुजराथचे व पूर्वखानदेशचे लेवापाटीदार यांमध्यें सत्पंथ या नांवाचा एक पंथ आहे. त्यांच्या धार्मिक समजुती व चालीरीती बॉम्बे

गॅझेटीअर खंड ९ भाग १ ' गुजराथच्या लोकवस्तींतील हिंदू, पान १६७ येथें ' मतीया कुणबी ' या मथळ्याखालीं व मुंबई इलाख्यांतील फिरत्या टोळ्या व जाती, खंड २ पान १५० येथें वर्णिल्या आहेत. ते ईमामशहाचे अनुयायी आहेत. ईमामशहाचें थडगें अहमदाबाद जिल्ह्यांत पिराणा येथें आहे. मुसलमानी धर्मसमजुती त्यांनीं नक्की कितीशा ग्रहण केल्या आहेत याबद्दल थोडा संशय आहे. व पुराणमताभिमानी हिंदू लेवा कुणब्यांनीं त्यांना जातीबाहेर टाकण्याचे प्रयत्न केव्हां केव्हां कले आहेत.

पूर्वखानदेश जिल्ह्यांत फैजपूर येथें लेवा कुणब्यांची बरीच मंडळी आहेत व यांपैकीं पुष्कळ सत्पंथी पंथाचे अनुयायी आहेत. दोनवेळां सत्पंथी लोकांस जाती बाहेर टाकलें आहे व इतर लेवा कुणब्यांशीं बेटी व रोटीव्यवहार करण्यास मनाई केली आहे.

आरोपी नुकतांच फैजपुरास आला व त्यानें खंडेराववाडी येथील मठाचा ताबा घेतला. हें घडलें नव्हतें तोपर्यंत ती गोष्ट फैजपुरांत कोणाच्या नजरेस आली नाहीं. त्यानें सत्पंथी लोकांच्या बाबतींत उद्योग सुरू केला व नि।। १ अची जाहिरात प्रसिद्ध केली.

आणखी असें ह्मणण्यांत आलें आहे कीं, २० डिसेंबर रोजीं वाजंत्री लावून आरोपीनें फैजपूरचे रस्त्यांतून मिरवणूक काढली, निरनिराळ्या ठिकाणीं थांबला, सत्पंथी लोकांची निंदा केली व निा १ अ ची जाहिरात वाटली, यावेळीं तो फिर्यादीचे घरासमोर थांबला, त्याच्याकडे बोट दाखवून त्याला त्यानें सत्पंथी व गोमांसभक्षक ह्मटलें, असें ह्मटलें आहे.

तीन दिवसांनंतर लेवा कुणब्यांची एक पंचायत भरली. व सत्पंथी लोकांस जातीबाहेर टाकलें. या गोष्टीवरून अब्रुनुकसानीचा

आरोप आणिला आहे. आरोपी नि॥ १ अ ची जाहिरात प्रसिद्ध केल्याचें कबूल करतो. परंतु त्या दिवशीं मी मठांत होतों अशा सबबीवर बाजारांत घडलेली गोष्ट नाकबूल करतो.

म्हणून त्याचे विरुद्ध असलेल्या खटल्याचे दोन भाग होतात. प्रत्येक भागांत मुद्दे निघतील ते अनुक्रमें असे:—

१ (अ) आरोपीनें नि॥ १ अ ची जाहिरात प्रसिद्ध केली काय ?

(ब) त्यांत केलेल्या विधानांपैकीं कोणत्याही विधानाबद्दल अब्रूनुकसानीचा आरोप करणें शक्य आहे काय ?

२ (अ) २० डिसेंबर रोजीं फैजपुरांत आरोपीनें व्याख्यान दिलें काय ?

(ब) फिर्यादीकडे बोट दाखवून दुसऱ्या लोकांसमक्ष त्यानें त्याला गोभक्षक म्हटलें काय ?

(क) असें बोलण्यानें अब्रूनुकसानीचा गुन्हा झाला काय ?

या मुद्यांवर मी निकाल देतो तो असा:—

१ (अ) होय. १ (ब) होय. २ (अ) होय. २ (ब) होय. २ (क) होय. कारणें पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

नि॥ १ अ यांत मुद्याचे शब्द आहेत ते असे:—

" बेटी व रोटीव्यवहाराच्या बाबतींत हिंदू लोक सत्पंथी लोकांशीं संबंध ठेवीत नाहींत." " खानदेश जिल्ह्यांत धर्मबाह्य गोष्टी चालू आहेत." " हे लोक कुराणांत लिहिलेला धर्म पाळतात यांत मुळींच संशय नाहीं." " पिराणा येथील धर्म जे लोक पाळतात त्यांना गुजराथेंत " मोमीन " असें म्हणतात." " जुना धर्म पाळणारे पाटीदार यांनीं सुद्धां मला असें सांगितलें आहे."

यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, नि॥ १ अ या जाहिरातींत सत्पंथी लोक मुसलमान आहेत असें आरोपी ह्मणतो त्या विधानांत फैजपूरच्या सत्पंथी लोकांचा अस्पष्टपणें संबंध दाखविला आहे. "खानदेश जिल्ह्यांत धर्मबाह्य गोष्टी चालू आहेत" ती जाहिरात फैजपूर गांवांत वाटली ही गोष्ट सुद्धां इतर लोकांप्रमाणें फैजपूरच्या सत्पंथी लोकांविरुद्ध तें होतें याचा थोडा पुरावा आहे.

मि. देव यांचें पहिलें ह्मणणें असें आहे कीं, ह्या जाहिरातींत आरोपी त्या पंथाचे सर्व लोकांवर टीका करीत होता; व एखाद्या विशिष्ट इसमाविरुद्ध कोठेंहि कांहीं ह्मटलें नाहीं. त्या पंथाच्या कोणाहि इसमास असें ह्मणतां येणार नाहीं कीं, ज्या पंथाचा तो आहे त्या पंथावर सर्वसाधारण टीका केली असतां त्याची स्वतःची बदनामी होते.

या मुद्यावरील कायदा इं. पी. कोड कलम ४९९ चें स्पष्टीकरण २ यांत आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, एखादी मंडळी अथवा संस्था अथवा लोकांचा समुदाय यांच्या संबंधानें दोषारोप करणें ह्मणजे अब्रूनुकसान करणें असें होण्याचा संभव आहे.

'संभव आहे' या शब्दाच्या उपयोगावरून असें दिसतें कीं, एखाद्या वर्गाविरुद्ध निंदास्पद विधानें केल्यानें त्या वर्गांतील एखाद्या इसमाची अब्रूनुकसानी होते किंवा काय हा प्रश्न प्रत्येक बाबतींत घडलेल्या हकीगतीचा आहे. मला वाटतें कीं त्या सबंध वर्गाविरुद्ध केलेलें तें निंदास्पद विधान साधारणपणें त्या वर्गांतील प्रत्येक इसमाला लागू होतें असें समजलें जाईल काय व त्यामुळें त्या इसमाला कांहीं अब्रूनुकसानी सोसावी लागेल काय हीच खरी परीक्षा होईल.

हल्लींच्या खटल्यांत नि।। १ अचें पत्रक जाहीर करतें कीं सत्पंथी लोक जरी आपणाला हिंदू ह्मणवितात तरी खरोखर ते मुसलमान आहेत. व हिंदूंनीं त्यांच्याशीं बेटी व रोटीव्यवहार करूं नये असें त्यांस बजावतें.

मला वाटतें कीं हें प्रत्येक सत्पंथी इसमाला अब्रूनुकसानकारक आहे व तें ह्याच्या अब्रूला ज्यांपैकीं असल्याचा हक्क तो दाखवितो त्या लेवा पाटीदार लोकांतच फक्त नव्हे तर सर्व हिंदू लोकांत घातक होईल.

नि ।।१ अचें पत्रक प्रसिद्ध केल्याचें आरोपीनें कबूल केलें आहे. त्यांत असा एक दोषारोप आहे कीं, लेवा पाटीदार जातीच्या इतर लोकांशीं नेहेमीचा व्यवहार संबंध करण्याला कोणताहि सत्पंथी लायक नाहीं. व हा दोषारोप फिर्यादीचे अब्रूला तो सत्पंथी आहे ह्मणून घातक आहे.

ह्मणून इं. पी. कोड कलम ४९९ च्या कांहीं अपवादामुळें आपला बचाव होतो असें आरोपी दाखवूं शकेपर्यंत नि।। १ अ प्रसिद्ध करण्यानें फिर्यादीच्या अब्रूचें नुकसान केल्याचा गुन्हा घडला.

आतां फैजपूर येथील व्याख्यानाकडे वळूं.

मि. देव म्हणतात कीं खटल्याचा हा भाग मागाहून तयार केलेला आहे. व एखाद्या विशिष्ट इसमाविरुद्ध अब्रूनुकसानीचा दावा सिद्ध करण्यासाठीं तो मोठ्या श्रमानें तयार केला आहे. फिर्याद व ती खरी करून देतांना दिलेला जबाब काळजीपूर्वक पहाण्यास त्यांनीं मला विनंती केली आहे. त्यांनीं प्रथम असें दाखविलें कीं, आरोपी माझ्याच बद्दल विशेषतः बोलला असें फिर्यादी कोठेंहि ह्मणत नाहीं;

परंतु सबंध पंथाविरुद्ध असलेल्या आरोपीच्या निंदास्पद विधानांबद्दल फक्त बोलतो.

साधारणतः हें खरें आहे. परंतु ‘अ’ अशी मी खूण केली आहे त्या ठिकाणीं जरी फिर्यादीचे विरुद्ध “गोभक्षक” असा अब्रु-नुकसानकारक शब्द आरोपीनें उच्चारला असें ह्मटलें नाहीं, तरी फिर्यादी असें ह्मणतोच कीं माझ्या घरासमोर व माझ्या देखत अपमान-कारक भाषणें केलीं.

आणखी फिर्याद खरी करून देतांना फिर्यदी फक्त ह्मणतो कीं, मी व माझ्या धर्माचे लोक मोमीन आहेत व गोभक्षक आहेत असें आरोपीनें जाहीर केलें. आरोपीनें फिर्यादीसच जातीनें गोभक्षक ह्मटलें असें त्यांत सांगितलेलें नाहीं.

तथापि फिर्यादीचे समक्ष केलेल्या अपमानकारक भाषणासंबंधाचें फिर्यादीचें ह्मणण्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, ज्या वेळीं आरोपीनें मला गोभक्षक ह्मटलें असें तो ह्मणतो त्या प्रसंगाबद्दल तो बोलत आहे. फिर्यादीबरोबर त्यानें एक साक्षीदारांची यादी दिली. त्यांत भुरा मुन्हा व फकीरखान वा। बुरेखान यांचीं नांवें आहेत. त्यांनीं या मुद्यावर पुरावा दिला.

ह्मणून मला असें दिसतें कीं, त्यानें फिर्याद दिली तेव्हां हीच गोष्ट त्याचे मनांत होती. ती खरी असो अगर नसो परंतु फिर्यादी-पक्षानें त्याचे बाजूचा सर्वसाधारण विधानांबद्दलचा डळमळीतपणा पाहून ती मागाहून तयार केलेली आहे असें मला वाटत नाहीं.

बाजारांत व्याख्यानें दिलीं ही गोष्ट खरी आहे किंवा नाहीं या मुद्यावर विद्वान न्यायाधिशानें असें दाखविलें आहे कीं,

व्याख्यानें पांच ठिकाणीं दिलीं असें फिर्यादीपक्षाचें ह्मणणें आहे. इजिन्याजवळ व्याख्यान दिलें असें सिद्ध झालें नाहीं असें त्याचें मत आहे. परंतु इतर ठिकाणांबद्दल त्या इतर चार ठिकाणीं व्याख्यानें दिलीं हें चांगलें शाबीत झालें आहे असें त्यांना वाटतें. या व्याख्यानांचा सारांश, सत्पंथी लोक मोमीन आहेत, गोभक्षक आहेत व तो गाईचें रक्षण करण्यासाठीं आला आहे, असा आहे याबद्दल साक्षीदारांचें एकमत आहे.

एका ठिकाणाखेरीज इतर ठिकाणीं हे शब्द सर्व लोकांस उद्देशून उच्चारले होते.

फिर्यादीचे घरासमोर दिलेल्या व्याख्यानाचे बाबतींत असें ह्मटलें आहे कीं, फिर्यादी सत्पंथी आहे व गोभक्षक आहे असें आरोपी आणखी ह्मणाला.

भुरा व फकीरखान यांनीं या गोष्टीस पुष्टी दिली आहे. भुरा हा रेवा पाटीदार आहे. सत्पंथी नाहीं. त्या विशिष्ट दिवशीं आनंदा त्या ठिकाणीं असणें शक्य नव्हतें असें दाखविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु मला वाटतें कीं विद्वान न्यायाधिशानें तो पुरावा खरा मानला नाहीं हे बरोबर आहे.

यानंतर फैजपुरांत आरोपीनें मुळींच व्याख्यानें दिलीं नाहींत असें दाखविण्याचा प्रयत्न केला. तो स्वतः ह्मणतो कीं, मी मठापाशीं त्या जाहिराती फक्त वाटल्या. या बाबतींत त्यानें घेतलेला भाग लक्ष्यांत घेतला ह्मणजे ह्यावर विश्वास बसणें कठीण आहे. जाहिराती चोहींकडे वाटण्यासाठीं तयार केलेल्या असतात. म्हणून मठापाशीं त्या वाटण्यानें आरोपीचें समाधान होईल असें

मानणें कठीण आहे. आरोपीचे शिष्य सुद्धां पुरावा देतात कीं, त्या विशिष्ट दिवशीं सर्व दिवसभर तो मठापाशीं होता. ते त्याच्या बाजूचे आहेत हें स्पष्ट आहे व मि० देव हे त्यांजवर विश्वास ठेवण्याचें सोडून देतात.

आरोपीचे मोहिमेचें स्वरूप पाहिलें ह्मणजे मला असें वाटतें कीं, तो हीं व्याख्यानें बाजाराच्या दिवशीं देईल हें खरोखर फार संभवनीय आहे.

ह्मणून फैजपूर येथें बाजाराच्या दिवशीं आरोपीनें व्याख्यानें दिलीं. व त्यांत त्यानें सत्पंथी लोकांस मोमीन (ह्मणजे मुसलमान) व गोभक्षक म्हटलें हें सिद्ध झालें आहे असें मानण्यास हरकत नाहीं असें मला वाटतें.

आणखी सत्पंथी लोकांबद्दल सर्वसाधारण विधानें केल्यानंतर त्यानें फिर्यादीकडे बोट दाखविलें व म्हणाला कीं, हा त्यांच्यापैकीं एक आहे. तो गोभक्षक आहे, हा पुरावा खरा न मानण्यास मला मुळींच कारण दिसत नाहीं.

आतां एखाद्या हिंदूला तूं गोभक्षक आहेस या म्हणण्यापेक्षां अधिक लागणाऱ्या दुसऱ्या गोष्टी नाहींत असें मला वाटतें. व हा आरोप विशेषतः तो एका गोसाव्यानें (भिक्षुकानें) केला असल्यामुळें, त्याच्या हिंदू बांधवांच्या दृष्टीनें त्याची अब्रू कमी करील यांत शंका नाहीं.

त्याचप्रमाणें एखाद्या हिंदूला मोमीन ह्मणणें हें मुसलमानी धर्मावर यामुळें शिंतोडा येतो ह्मणून नव्हे परंतु त्यामुळें हिंदुसमाजांत त्याचा दर्जा कमी होण्याचा संभव आहे ह्मणून हें जरी तेवढ्या प्रमाणांत

नाहीं तरी अब्रूनुकसानकारक आहे असें मला वाटतें. जर यावर विश्वास ठेवला गेला तर त्यामुळें वहीमी इसम खचित जातीबाहेर टाकला जाईल व त्यावरून होणारे भयंकर सामाजिक दंड त्याला सोसावे लागतील.

अपील अर्जांत अशी हरकत घेतली आहे कीं, खालच्या कोर्टानें तीं विधानें 'स्पष्टपणें अब्रूनुकसानकारक' आहेत असें ह्मटलें आहे व त्यावर एकहि मुद्दा काढला नाहीं. तथापि तीं अब्रूनुकसानकारक नाहींत असें मि. देव यांनीं म्हटलें नाहीं. व मला वाटतें कीं, हिंदू इसमासंबंधानें म्हटलीं असतां तीं खचित अब्रूनुकसानकारक आहेत.

प्राथमीक मुद्यांवर माझा निवाडा असा आहे. आतां आरोपीचा कोणत्याहि रीतीनें बचाव होतो किंवा काय याचा विचार करावयाचा आहे.

अपवाद १ लागू होत नाहीं हें स्पष्ट आहे. ती गोष्ट जातीकरितांच फक्त होती व सर्व लोकांशीं तिचा संबंध नव्हता.

सर्व लोकांस जाहिराती वाटून त्यावरून त्यांनां सत्पंथी लोक स्वधर्मत्यागी आहेत असें मानावयास लावण्यांत आरोपी यास खचित मुळींच कारण नव्हतें.

या दोषयुक्त विधानाचे सत्यतेबद्दल, या खटल्यांत दिलेल्या पुराव्यावरून व 'बॉम्बे गॅझेटीअर' व 'मुंबई इलाख्यांतील फिरत्या टोळ्या व जाती' असल्या प्रमाणभूत ग्रंथांतील माहितीवरून तें खरें नाहीं असें मी ठरवितों.

३१ कलकत्ता पान १२ यांत म्हटल्याप्रमाणें हिंदू कोण आहेत हें सांगण्यापेक्षां हिंदू कोण नाहींत हें सांगणें अधिक सोपें आहे.

मुसलमानासंबंधानें त्यांच्या मुख्य धर्मश्रद्धा ह्मणजे एकच देव आहे असें माननें, महंमद हा पैगंबर आहे व कुराण हा देवाचा प्रेरित शब्द आहे असें माननें ह्या होत. मला वाटतें कीं मुसलमानांमध्यें सुंता सार्वत्रिक आहे. व त्यांच्यापैकीं कोणासही गाईचें मांस खाण्याबद्दल हरकत नाहीं.

आतां आरोपीतर्फे ज्यास्तीत ज्यास्त असें दाखविलें आहे कीं, सत्पंथी लोक ईमामशहास मान देतात; परंतु ते खुद्द पैगंबराला मान देतात असें दाखविलें नाहीं. त्यांना त्यांचे स्वतःचे धर्मगुरू ' काका'' हे आहेत; व ज्या ईमामशहाला ते फक्त मान देतात, त्यांचे वारस निराळे आहेत.

जरी सत्पंथी लोकांस ईमामशहाचे थडग्याबद्दल आदर वाटतो तरीसुद्धां त्या खुद्द इसमाला ते मान देतात, त्याच्या धर्माला देत नाहींत. यापेक्षां याचा ज्यास्त अर्थ होतों असें मला वाटत नाहीं.

सत्पंथी लोकांस कुराणाबद्दल आदर आहे असें दिसत नाहीं. ईमामशहाचे थडग्याचे पायथ्याशीं कुराण ठेविलें आहे हें खरें असलें—व तें खरें नाहीं असें ह्मणण्यांत आलें आहे—तरीसुद्धां त्या थडग्याचे दर्शनास जाणाऱ्या सत्पंथी लोकांस कुराणाबद्दल आदर होता असा त्याचा अर्थ होणार नाहीं. तें थडगें सामान्यतः मुसलमानी दिसतें यांत संशय नाहीं परंतु ईमामशहा मुसलमानच राहिला व वारला तेव्हांहि मुसलमानच होता. व मला वाटतें कीं त्या थडग्याचे पालक पूर्ण मुसलमान आहेत, सत्पंथी नाहींत असें मी ह्मणतों तें बरोबर आहे. त्या पंथाचे धर्मगुरू ' काका ' हे आहेत, ते लेवा कुणबी आहेत.

पुराव्यावरून असें कीं, सत्पंथी लोक शिक्षापत्री या ग्रंथाला मान देतात. ईमामशहानें स्वतः केलेल्या धर्मतत्वांचा तो एक ग्रंथ आहे.

सत्पंथी लोक सुंता करतात असा पुरावा नाहीं.

सत्पंथी लोक व धर्माभिमानी मुसलमान लोक यांच्यांत कधीं बेटीव्यवहार झाल्याचें कबूल नाहीं.

शेवटीं असें म्हणण्यांत आलें आहे कीं, सत्पंथी लोक कणकेच्या केलेल्या गाई खातात. हें जोरानें नाकबूल केलें आहे व याबद्दल मुळींच पुरावा नाहीं.

पिराणा येथें गेल्यानें माझ्या विधनांपैकीं पुष्कळ विधानांची सत्यता मला कळली आहे असें आरोपीनें सांगितलें आहे. त्या थडग्याचे पालकांशीं तो बोलला हें नाकबूल केलें आहे.

म्हणुन मला असें दिसतें कीं आरोपी हा धर्मवेडा आहे व त्यानें पुष्कळ विधानें केलीं आहेत. परंतु इतर लोकांचीं मनें दुखविण्यापूर्वी एखादा निःपक्षपाती मनुष्य जसा एकाद्या प्रश्नाचा काळजीपूर्वक अभ्यास करील तसा काळजीपूर्वक अभ्यास त्यानें केला नाहीं. त्याची कळकळ व अज्ञान लक्षांत घेऊन त्याला क्षमा करावी असें म्हणण्यांत आलें आहे. परंतु धर्माचें वेड ही दुष्टपणाकरितां निर्बल सबब आहे.

मला वाटतें कीं, आपली वर्तणुक पहिल्या अपवादाखालीं येतें हें आरोपीस मुळींच दाखवितां आलें नाहीं.

अपवाद २ ते ६ हल्लींच्या खटल्यांत लागू होत नाहींत.

आतां अपवाद ७ व ८ या संबंधानें असें म्हटलें आहे कीं, धर्मोपदेशक ह्मणून आरोपीस अधिकाराची जागा होती व त्यांची धर्मश्रद्धा त्यांनीं सोडली ह्मणून त्यांजवर टीका करण्यांत आरोपीस अधिकार होता.

असें वारंवार समजण्यांत आलें आहे कीं, (३३ मद्रास पान ७०) जरी गुरूला अधिकार देतां येईल तरी या बाबतींतील अधि-

कार जातीचे स्वाधीन असतो. या खटल्यांत असा अधिकार जातीनें आरोपीस दिला होता, असा मुळींच पुरावा नाहीं. उलट त्याला उघडपणें असें वाटलें कीं, सत्पंथी लोकांस जातीबाहेर न टाकण्यानें जातीचे लोक त्यांच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करीत होते. व त्यांच्यांत चळवळ करण्यासाठीं तो गेला.

चांगल्या समजुतीचा प्रश्नहि उद्भवतो. व आरोपीनें हीं विधानें योग्य काळजी व लक्ष देऊन केलीं, असें म्हणतां येणार नाहीं असें मला वाटतें. योग्य काळजी व लक्ष, ही चांगल्या समजुतीची मोठी परीक्षा आहे.

आतां अपवाद ९ याबद्दल.

जो मनुष्य दुसऱ्या इसमाचें वर्तनावर कोणत्याहि मनुष्याच्या हिताकरितां चांगल्या समजुतीनें दोषारोप करतो त्या मनुष्याचा या अपवादानें बचाव होतो.

तथापि हे इतर लेवा कुणबी लोकांस सत्पंथी लोकांचे विरुद्ध ते धर्माचें उल्लंघन करणारे आहेत म्हणून सूचना देणाऱ्या खासगी बातम्यांस लागू होईल.

सर्व लोकांत प्रसिद्ध केलेल्या बातम्यांस ते लागू होईल किंवा नाहीं याबद्दल मला शंका वाटते. कांहीं झालें तरी चांगली समजूत आवश्यक आहे. व ज्या अर्थी आरोपी योग्य काळजी व लक्ष्य दिल्या-शिवाय वागला त्या अर्थी चांगल्या समजुतीनें तो वागला असें म्हणतां येईल असें मला वाटत नाहीं. ज्या अर्थी आरोपी फिर्यादीचे विरुद्ध जाहीरपणें बोलला त्या अर्थी अपवाद १० येथें लागू होईल असें दिसत नाहीं.

म्हणून मी असें ठरवितों कीं, अपील करणारानें नि॥ १ अ चे त्याचे जाहिरातींत सत्पंथी म्हणून फिर्यादीची बदनामी केली. त्याचे-कडे बोट दाखवून व तो मोमीन व गोभक्षक आहे असें म्हणून त्याची आणखी बदनामी केली.फिर्यादीच्या धर्मश्रद्धांवर टीका करण्याचा त्याला मुळींच अधिकार नव्हता.ते दोषारोप खरे नव्हते व ते करण्या-पूर्वीं त्यांच्या सत्यतेबद्दल आपली खात्री करून घेण्याकरितां जरूर असलेली काळजी त्यानें घेतली नव्हती. तो चांगल्या समजुतीनें वागला नाहीं. इं. पी. कोड कलम ४९९ यांतील अब्रूनुकसानीच्या व्याख्येला असलेल्या अपवादांपैकीं कोणत्याहि अपवादानें त्याचा बचाव होत नाहीं.

ह्मणून तो अब्रूनुकसानीबद्दल दोषी आहे. शिक्षा फार मोठी आहे असें ह्मणण्यांत आलें आहे. ज्या अर्थी आरोपी गरीब आहे, फार शिकलेलाहि नाहीं व ज्या अर्थीं धर्माच्या कळकळीनें तो प्रेरित झाला होता त्या अर्थीं त्याच्या अडाणी धर्मवेडामुळें इतर लोकांस झालेलें दुःख हेंच परीक्षा करण्यास अधिक चांगलें साधन होईल. शिक्षा कमी करण्यास मला मुळींच कारण दिसत नाहीं. ह्मणून मी तो अपराध व ती शिक्षा कायम करतों व हें अपील रद्द करतों.

धुळें. Sd. जे. स्कॉट्सन्.
सेशन्स जज्ज.

शिक्का

नक्कल करणार.
बी. जी. पवार.
(खरी नक्कल)
हायकोर्टाचा कारकून व सेशन्स जज्ज यांचा शिरस्तेदार.

IN HIS MAJESTY'S HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

Criminal Revisional Application No. 175 of 1924.

Atmanand Guru Premanand of Faizpur

versus

IMPERATOR.

The humble petition of the abovenamed applicant

Most respectfully sheweth,

That the applicant was charged with the offence of defamation under Section 500 I. P. C. in the Court of Sub-Divisional Magistrate. E. D. East Khandesh and was convicted and sentenced to pay a fine of Rs. 500 or in default to suffer simple imprisonment for three months.

In Criminal Appeal No. 178 of 1923 in the Court of the Sessions Judge of Khandesh, at Dhulia the conviction and sentence were confirmed.

That being aggrieved, the applicant prays that Your Lordships will be pleased to call for the record and set aside the conviction and sentence on the following among other grounds.

(1) The Lower Courts erred in holding that Ex. 1A is defamatory.

(2) The Lower Courts lost sight of the fact that the contents of Ex. 1A are fully borne out by the Bombay Gazetter.

(3) Ex. 1A is at most a warning and advice to Lewa Patidars of Khandesh not to have any connection with Satpanthis.

(4) The applicant as a Mahant of Khandoba's Temple at Faizpur was bound to advise the Lewa Patidars and other Hindus to belong to their own Dharma.

(5) The Satpanthis have become Momins and have taken the Mahomedan practices is fully borne out.

(6) It is admitted that the Satpanthis were out-

casted on two occasions long before Ex. 1A and were prohibited from intermarrying and interdinning with other Lewa Kunbis.

(7) The Lower Courts erred in holding that exception 1 to Section 499 I. P. C. does not apply.

(8) The imputations made in Ex. 1A against Satpanthis were true and were made for the good of Lewa Kunbis.

(9) It is an error to hold that Satpanthis revere Imamshah only and not the Prophet.

(10) The Lower Courts should have held that Satpanthis are substantially Mahomedans because they observe Mahomedan practices such as the observing of fast in Ramzan, the doing of Namaz and the reading of Kalmas from the Koran.

(11) The applicant as a priest was in a position of authority and was justified in commenting for the good Lewa Kundis on the lapse of Satpanthis from their religious faith, and as such was entitled to the benefit of exceptions 7 & 8 and 10 of Saction 499 I. P. C.

(12) The Lower Courts erred in holding that the statements were not made in good faith.

(13) That the applicant called the complainant a caw eater is an after thought.

(I4) There is no definite mention in the complaint that the applicant called the complainant personally a cow-eater.

(15) The burden of proof is wrongly thrown on the applicant.

(16) The conviction is against law and evidence in the case.

Bombay
9th June 1924.
2515.

Sd/ T. G. DESAI.

Presented with a court fee stamp of rupees two (Rs. 2) only.

This 9th day June 1924.

Sd/ D. R. WAGH — Sd/ S. M. MOBEDJINA.

Asstt. Sheristedar — Ag. Deputy Registrar.

Criminal application for Revision No. 175 of 1924.

Seal of the Bombay High Court.

True Copy
Signature
Deputy Registrar
Signature.
Sealer
The 29th day of Sep. 1924.

(आरोपीनें मुंबई हायकोर्टांत केलेला रिव्हिजन अर्ज.)

मराठी भाषांतर.

मुंबई येथील हिज् मॅजेस्टींचे न्यायाचे हायकोर्टांत.

फौजदारी रिव्हिजन अर्ज नंबर १७५ सन १९२४.

आत्मानंद गुरु प्रेमानंद वा॥ फैजपूर,........अर्जदार

विरुद्ध

सरकार.

सदरील अर्जदार अतिशय आदरपूर्वक व नम्रपणें अर्ज करितो कीं:—

प्रान्त मॅजिस्ट्रेट पूर्वभाग, जिल्हा पूर्व खानदेश यांचे कोर्टांत इं. पी. कोड कलम ५०० प्रमाणें अब्रुनुकसानीचा गुन्हा केल्याबद्दल अर्जदार यजवर आरोप ठेवला होता. व त्यास दोषी ठरवून ५०० रुपये दंड देण्याची अगर दंड न दिल्यास तीन महिन्यांच्या साध्या कैदेची शिक्षा दिली.

धुळें येथील खानदेशचे सेशन जज्ज यांचे कोर्टांतील फौजदारी अपील नंबर १७८ सन १९२३ यांत दोष व शिक्षा कायम केली गेली.

म्हणून दुःखित झाल्यामुळें अर्जदार विनंती करतो कीं, मेहेरबानांनीं कृपा करून खटल्याचे कागदपत्र मागवावे व दोष व शिक्षा काढून टाकावी. यांस कारणें आहेत तीं येणेंप्रमाणें:—

(१) निा १ अ ची जाहिरात अब्रुनुकसानकारक आहे असें मानण्यांत खालच्या कोर्टांनीं चुकी केली.

(२) निा १ अ यांतील मजकूर बाम्बे गॅझेटीयरवरून पूर्ण-पणें खरा ठरतो हें खालच्या कोर्टांनीं पाहिलें नाहीं.

(३) निा १ अ फार झालें तर खानदेशच्या लेवा पाटीदार लोकांस तुम्ही सत्पंथी लोकांशीं संबंध ठेवूं नका अशी एक सूचना व उपदेश आहे.

(४) फैजपूर येथील खंडोबाचे देवळाचा अर्जदार हा महंत असल्यामुळें, लेवा पाटीदार व इतर हिंदू लोक यास स्वधर्मांत रहाण्याबद्दल त्यानें उपदेश करणें जरूर होतें.

(५) सत्पंथी लोक मोमीन झाले असून मुसलमानी चालीरीती त्यांनीं घेतल्या आहेत हे पूर्णपणें खरें ठरलें आहे.

(६) निा १ अ होण्यापूर्वीं दोन वेळां सत्पंथी लोकांस जाती-बाहेर टाकलें होते व इतर लेवा कुणबी लोकांशीं बेटी व रोटी व्यवहार करण्यास त्यांस मनाई केली होती हें कबूल केलें आहे.

(७) इं. पी. कोड कलम ४९९ चा अपवाद १ लागू होत नाहीं असें मानण्यांत खालच्या कोर्टांनीं चुकी केली आहे.

(८) निा १ अ यांत सत्पंथी लोकांविरुद्ध केलेलीं निंदास्पद विधानें खरीं होतीं व लेवा कुणबी लोकांचें हिताकरितां होतीं.

(९) सत्पंथी लोक फक्त ईमामशहास मान देतात, पैगंबरास देत नाहींत असें मानणें चूक आहे.

(१०) खालच्या कोर्टांनीं, सत्पंथी लोक हे तत्वतः मुसलमान आहेत असें ठरवावयास पाहिजे होतें; कारण रमझानमध्यें उपवास करणें, नमाज पढणें, व कुराणांतून कलमें वाचणें यासारख्या पुष्कळ मुसलमानी चालीरीती ते पाळतात.

(११) धर्मगुरु म्हणून अर्जदार यास अधिकाराची जागा होती, व सत्पंथी लोकांनीं त्यांची धर्मश्रद्धा सोडली या गोष्टीवर लेवा कुणबी लोकांचे हिताकरितां टीका करण्यांत तो बरोबर होता आणि म्हणून इं. पी. कोड कलम ४९९ चे अपवाद ७ व ८ व १० यांचा फायदा त्यांस मिळावयास पाहिजे होता.

(१२) तीं विधानें चांगल्या समजुतीनें केलीं नव्हतीं असें मानण्यांत खालच्या कोर्टांनीं चुकी केली.

(१३) अर्जदारानें फिर्यादीस गोभक्षक म्हटलें हें मागाहून तयार केलें आहे.

(१४) अर्जदारानें फिर्यादीला स्वतःला गोभक्षक म्हटलें असें फिर्यादींत स्पष्ट नमूद केलें नाहीं.

(१५) पुराव्याचा बोजा अर्जदार याजवर टाकला ही चुक आहे.

(१६) अर्जदारास दोषी ठरविणें हें खटल्यांतील पुराव्याच्या व कायद्याच्या विरुद्ध आहे.

मुंबई. Sd. एस्. जी. देसाई.

तारीख ९ जून १९२४.

फक्त दोन (२) रुपयांचा कोर्ट फीस्टांप लावून दिलें.
आज तारीख ९ जून १९२४.

Sd. डी. आर्. वाघ.
असिस्टंट शिरस्तेदार.

Sd. एस्. एम्. मोबेड्जिना.
ॲ० डेप्युटी रजिस्ट्रार.

In His Majesty's High Court of Judicature at Bombay.

ORDER PASSED BY EHE HIGH COURT IN THE CASE OF

ATMANAND GURU PREMANAND... APPLICANT

versus

IMPERATOR.

Being Criminal Application for Rivision No. 175 of 1924.

CORAM :—Shah Acting C. J. and Fawcett J.

REJECTED

25-6-24

Sd. N. D. Gharda,

Registrar,

True copy

The Seal of the High Court at Bombay.

Sd. Deputy Registrar,

Sd. Sealer.

The 28th day August 1924.

(मुंबई हायकोर्टाचा निकाल.)

मराठी भाषांतर.

मुंबई येथील हिज मॅजेस्टींचे न्यायाचें हायकोर्टांत.

आत्मानंद गुरु प्रेमानंद........अर्जदार

विरुद्ध

सरकार.

या खटल्यांत हायकोर्टांनें केलेला हुकूमः—

रिव्हिजनचा फौजदारी अर्ज नंबर १७५ सन १९२४.

कोरमः—शहा अक्टिंग चीफ जज्ज व फॉसेट जज्ज.

काढून टाकलें.

२५–६–२४

Sd. N. D. Gharda.
रजिस्ट्रार

मुंबई हायकोर्टाचा
शिक्का.

खरी नक्कल

(सही इंग्रजी) डेप्यूटी रजिस्ट्रार यांची.

(सही इंग्रजी) सीलर यांची.

